# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.०२/२०२०** **दिनांक ०६.०२.२०२०**
**स्थळ- साईनिवास अतिथीगृह, शिर्डी** **वेळ- सायं. ०४.०० वाजता**

मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील जनहित याचिका नं.१२०/२०१९ यावर दिनांक ०९/१०/२०१९ रोजी मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करीता नियुक्त केलेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा सोमवार दिनांक ०३/०२/२०२० रोजी सायं. ०४.०० वाजता शिर्डी येथील संस्थानचे साईनिवास अतिथीगृहामध्ये आयोजित करणेत आली असलेबाबत जा.नं.एसएसएस/वशी-०४/४२०४/२०२०, दि.२५.०१.२०२० अन्वये सर्व मा.सदस्यांना कळविणेत आलेले होते.

तसेच जा.नं.एसएसएस/ वशी-०४/४३०६/२०२०, दि.३१.०१.२०२० नुसार सदरहू सभा काही अपरिहार्य कारणास्तव Postpone करण्यात येत असुन मा.तदर्थ (Ad-hoc) समितीची सदर सभा गुरुवार दि.०६.०२.२०२० रोजी सायं.०४.०० वा. शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये आयोजित करणेत आलेली असुन सभेची विषयसुची (अजेंडा) पुर्वीप्रमाणेच राहील, असे सर्व मा.सदस्यांना कळविणेत आले होते.

त्यानुसार सदरहु सभा गुरुवार दिनांक ०६/०२/२०२० रोजी सायं.०४.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

१. मा.न्या.श्रीकांत आणेकर, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर.
२. मा.श्री.दी.म.मुगळीकर (भा.प्र.से.) मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.
३. मा.श्री.दिलीप स्वामी, अप्पर महसुल विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक.
४. मा.श्रीमती गीता प्रविण बनकर, सहा.धर्मादाय आयुक्त, अहमदनगर.

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत आली.
त्यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु केली.

---

**विषय नं.०१** **दिनांक १४.०१.२०२० रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.४६** **दिनांक १४.०१.२०२० रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या,त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.**

---

**विषय नं.०२** **चक्रीय पध्दतीने मान्यता दिलेले विषय वाचून कायम करणे.**

**अ) गाईचे शुध्द तुप खरेदी सन-२०२० करीता ई-निविदेतील न्युनत्तम दरधारक मे.हर्ष फ्रेश डेअरी इंडस्ट्रीज प्रा.लि.भगवानपुर यांना १ महिन्यासाठी पुरवठा आदेश देणे व दरम्यानचे कालावधीत दराबाबत चर्चा वाटाघाटी व व्हेंडर ऑडिट करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २६.०७.२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ३९१ अन्वये ८,४०० क्विंटल तुप खरेदी कामी भांडार विभागाने व मा.तदर्थ समितीचे दि.४/१२/२०१९ चे सभेतील निर्णय क्रं.५३० अन्वये खरेदी विभागाने मान्यता घेतली होती. सदर निर्णयांना अनुसरुन त्यातील वार्षिक मागणी विचारात घेऊन सन २०२० या एक वर्षासाठी तुप खरेदीबाबत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.१६/१२/२०१९ ते ०६/०१/२०२० या कालावधीत ४ टप्प्यांसाठी ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात आली होती. यामध्ये शक्यतो तांत्रीक निविदा (Technical Bid) दि.०९.०१.२०२० रोजी उघडण्यात येतील असे नमुद करण्यात आले होते. तसेच तूपाचे नमुने दि.०७/०१/२०२० ते ०८/०१/२०२० अखेर मागविण्यात आले होते.

मा.तदर्थ समितीचे दि.०४.१२.२०१९ चे सभेत सदर शुध्द तूप खरेदीस व याकामी येणारे खर्चास मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेण्याचे ठरले होते. त्यास अनुसरून याकामी उच्च न्यायालयाची मान्यता दि.२०.१२.२०१९ रोजी मिळालेली आहे.

वरील ऑनलाईन ई-निविदेस अनुसरून सन २०२० वर्षासाठी मुदतीअखेर गाईचे शुध्द तूपाच्या १० ई-निविदा प्राप्त झाल्या होत्या. त्याचा तपशील खालीलप्रमाणे-

१. हर्ष फ्रेश डेअरी प्रॉडक्ट्स प्रा.लि., भगवानपुर, हरिद्वार
२. स्मृती प्रॉडक्टस् प्रा.लि., सहा, अंबाला, हरियाणा
३. व्ही.एस.पी.डेअरी इंडस्ट्रीज, अहमदाबाद
४. सनफ्रेश ॲग्रो इंडस्ट्रीज प्रा.लिमीटेड, रांजणखोल, महाराष्ट्र
५. ऊमिया मिल्क प्रॉडक्ट्स, मेहसाना, गुजरात
६. श्री राधे डेअरी फार्म ॲन्ड फुडस प्रा.लि., सुरत.
७. रजवाडी डेअरीज प्रा.लि., कमली, जि.मेहसाना, गुजरात
८. एस डि पी इंडस्ट्रीज प्रा.लि., दमण
९. मल्टी ग्लोब डेअरी प्रा.लि., नानहेरी, हरीयाणा
१०. श्रीमुल डेअरीज प्रा.लि.पालनपूर, गुजरात

वरील ई-निविदांच्या तांत्रिक निविदा दि.९/१/२०२० रोजीचे खरेदी समितीचे सभेत उघडण्यात आल्या होत्या. सदर ई-निविदांची छाननी केली असता खालील बाबी निदर्शनास आल्या होत्या.

वरील निविदांची ऑनलाईन छाननी केली असता सदर निविदाधारकांपैकी

(अ) अनुक्रम नं. १ ते ३ निविदाधारकांनी संस्थानचे मागणीप्रमाणे सर्व कागदपत्रे ऑनलाईन सादर केलेली आहेत त्यामुळे ते पात्र ठरले.

(आ) अ.नं. ४ ते ७ यांनी सादर केलेल्या टर्न ओव्हर Certificate मध्ये सन २०१६-१७, सन २०१७-१८ व सन २०१८-१९ चा टर्नओव्हर नमूद केला आहे.

(इ) अ.नं. ८ यांनी सादर केलेले फॅक्टरी लायसेन्सची प्रत सादर केलेली आहे. यामध्ये त्यांचे सदर परवान्याची मुदत दि..३१/१२/२०१९ रोजी संपलेली असल्याचे नमूद केलेले आहे.

(ई) अ.नं. ०९ यांनी सादर केलेल्या टर्न ओव्हर Certificate मध्ये सन २०१६-१७, सन २०१७-१८ व सन २०१८-१९ चा टर्नओव्हर नमूद केला आहे.

२) उत्पादन क्षमता प्रमाणपत्र सादर केले आहे, त्यामध्ये तुपाचा उल्लेख नाही.

(उ) अ.नं. १० यांनी FSSAI चे प्रमाणपत्र रिटेलरचे सादर केलेले आहे.

१) सी.ए. चे टर्नओव्हर प्रमाणपत्र जोडलेले नाही. तथापि, सन २०१६-१७, २०१७-१८, २०१८-१९ या तीन वर्षाचे आय.टी. रिटर्न जोडलेले आहेत.

२) तुप उत्पादन क्षमता सी.ए. चे प्रमाणपत्र जोडले आहे.

वरील अ.नं. ४ ते ९ या ६ निविदाधारकांनी सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये किरकोळ अनियमीतता दिसून आली होती.

केंद्र शासनाच्या वित्त विभागाच्या Manual for Procurement of Goods 2017 मधील ७.३.४ व ७.३.५ मध्ये वरील किरकोळ स्वरुपाचे अनियमीततेबाबत खालीलप्रमाणे तरतुदी आहेत.

7.3.4 Minor Infirmity/Irregularity/Non-conformity-

During the preliminary examination, some minor infirmity and/or irregularity and/or nonconformity may also be found in some tenders. Such minor issues could be a missing pages/ attachment or illegibility in a submitted document; non-submission of requisite number of copies of a document. There have been also cases where the bidder submitted the amendment Bank Guarantee, but omitted to submit the main portion of Bid Document. The court ruled that this is a minor irregularity. Such minor issues may be waived provided they do not constitute any material deviation (please refer to Para 7.4.1 (iv)) and financial impact and, also, do not prejudice or affect the ranking order of the tenderers. Wherever necessary, observations on such 'minor' issues (as mentioned above) may be conveyed to the tenderer by registered letter/ speed post, and so on, asking him to respond by a specified date also mentioning therein that, if the tenderer does not conform Procuring Entity's view or respond by that specified date, his tender will be liable to be rejected. Depending on the outcome, such tenders are to be ignored or considered further.

7.3.5 Clarification of Bids/Shortfall Documents-

During evaluation and comparison of bids, the purchaser may, at his discretion, ask the bidder for clarifications on the bid. The request for clarification shall be given in writing by registered/ speed post, asking the tenderer to respond by a specified date, and also mentioning therein that, if the tenderer does not comply or respond by the date, his tender will be liable to be rejected. Depending on the outcome, such tenders are to be ignored or considered further. No change in prices or substance of the bid shall be sought, offered or permitted. No postbid clarification at the initiative of the bidder shall be entertained. The shortfall information/ documents should be sought only in case of historical documents which pre-existed at the time of the tender opening and which have not undergone change since then. These should be called only on basis of the recommendations of the TC. (Example: if the Permanent Account Number, registration with sales tax/VAT has been asked to be submitted and the tenderer has not provided them, these documents may be asked for with a target date as above). So far as the submission of documents is concerned with regard to qualification criteria, after submission of the tender, only related shortfall documents should be asked for and considered. For example, if the bidder has submitted a supply order without its completion/performance certificate, the certificate can be asked for and considered. However, no new supply order should be asked for so as to qualify the bidder.

वरील अ.नं. ४ ते ७ व ९ या निविदाधारकांकडून संस्थानने निविदेत नमुद केल्याप्रमाणे टर्नओव्हर सर्टीफिकिट व अ.नं.८ यांचेकडून अद्ययावत फॅक्ट्री लायसेन्स, तसेच अ.नं. ९ यांचेकडून तुपाचा उल्लेख असलेले क्षमता प्रमाणपत्र सदर ई-निविदेमध्ये अधिकाधिक स्पर्धा होण्याच्या दृष्टीने २ दिवसांची मुदत देवून सदर कागदपत्रे ई-मेल द्वारे मागविण्यात आली होती. सदर कागदपत्रे मागविल्यामुळे या प्रक्रियेत काही नव्याने कागदपत्रे मागविली असा अर्थ होणार नाही. तसेच अ.नं. १० निविदाधारकाचे FSSAI प्रमाणपत्र रिटेलरचे असल्यामुळे (संस्थानने Manufacturer/ Processor यांनीच निविदा भरण्याची मागणी केलेली आहे) ते अपात्र ठरले आहेत, त्यामुळे त्यांना कागदपत्रे सादर करण्याची संधी देणे उचित होणार नाही असे ठरले होते.

त्यामुळे वरील अ.नं ४ ते ९ या निविदाधारकांकडून ई-मेलव्दारे मागविलेले कागदपत्रांचा व छाननीचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ. नं | निविदाधारकाचे नांव | मागणी केलेली कागदपत्रे | मेलद्वारे सादर केलेली कागदपत्रे | कागदपत्रे छाननीनंतर आढळून आलेली वस्तुस्थिती. |
|---|---|---|---|---|
| ०१ | सनफ्रेश ॲग्रो इंडस्ट्रीज प्रा.लि., रांजणखोल (प्रभात डेअरी) (४) | सन २०१५-१६ टर्न ओव्हर सर्टिफिकेट मागणी केली आहे. | सीए श्री.मानधने यांचेकडील सन २०१५-१६ वर्षाचे टर्न ओव्हर सर्टिफिकेट रू.६९१.५९ कोटी मेलद्वारे सादर केले आहे. | सन २०१५-१६, २०१६-१७ व २०१७-१८ या ३ वर्षाचा एकुण टर्न ओव्हर रू.२७८०.८६ कोटी होत आहे. तसेच एकूण सरासरी उलाढाल रू.९२८.८८ कोटी होत आहे. त्यामुळे सदर निविदाधारक **<u>पात्र</u>** ठरले. |
| ०२ | उमिया फुड प्रॉडक्ट्स, मेहसाना, गुजरात (५) | सन २०१५-१६ टर्न ओव्हर सर्टिफिकेट मागणी केली आहे. | दि.३१.०३.२०१६ अखेरचे Profit & Loss Account Statment मेलद्वारे सादर केले आहे. यामध्ये टर्न ओव्हर २,०१,८१,०४४/- नमूद आहे. | सन २०१५-१६, २०१६-१७ व २०१७-१८ या तीन वर्षाचा टर्न ओव्हर रू.३३,२४,५७,४६९/- होत आहे. सरासरी टर्न ओव्हर रू.११.०८ कोटी होत आहे. संस्थानने निविदेमध्ये सरासरी ३ वर्षांचा टर्नओव्हर १५ कोटी अगर त्यापेक्षा जास्त नमूद केला आहे. त्यामुळे सदर निविदाधारक **<u>अपात्र</u>** ठरले. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०३ | श्री राधे डेअरी फार्म ॲण्ड फुड्स प्रा.लि., सुरत (६) | सन २०१५-१६ टर्न ओव्हर सर्टिफिकेट मागणी केली आहे. | सीए श्री.Naval Tummar & Co. यांचे सन २०१५-१६ चे श्री राधे डेअरी फार्म या नावाने टर्न ओव्हर सर्टिफिकेट जोडले आहे. यामध्ये सन २०१५-१६ चा टर्न ओव्हर रू.२४,७८,१२,०५४/- नमूद आहे. तसेच सदर दोन्हीही फर्मचे एमडी व प्रोप्रायटर एकच असल्याचे सीए श्री.नवल तूम्मर ॲण्ड कंपनी, सुरत चे सर्टिफिकेट सादर केले आहे. | श्री राधे डेअरी फार्म ॲण्ड फुड्स प्रा.लि., सुरत ही फर्म जून २०१६ ला सुरु झाली आहे. सदर निविदाधारकाने त्यांचे श्री राधे डेअरी फार्म या फर्मचे सन २०१५-१६ या वर्षाचे टर्नओव्हर सर्टिफीकेट सादर केले आहे. तसेच दोन्हीही फर्मचे प्रोप्रायटर एक असल्याचे सीए सर्टिफीकेट सादर केले आहे. तथापि सदर दोन्हीही फर्म स्वतंत्र कार्यरत असल्याचे दिसून येते. मात्र सदर निविदाधारक सन २०१५-१६ चे निविदा भरलेले फर्मचे टर्नओव्हर सर्टिफीकेट सादर न करु शकलेमुळे सदर निविदाधारक **अपात्र** ठरले. |
| ०४ | रजवाडी डेअरीज प्रॉ., गुजरात (७) | सन २०१५-१६ टर्न ओव्हर सर्टिफिकेट मागणी केली आहे. | सन २०१५-१६ चा टर्न ओव्हर २७,७१,६०२/- मेलद्वारे सादर केला आहे. | सन २०१५-१६, २०१६-१७ व सन २०१७-१८ या ३ वर्षांचा एकूण टर्नओव्हर रु.३,०७,२०,१८४/- होत आहे. म्हणजेच एकूण सरासरी उलाढाल १,०२,४०,०६१/- होत आहे. संस्थानने निविदेमध्ये सरासरी ३ वर्षांचा टर्नओव्हर १५ कोटी अगर त्यापेक्षा जास्त नमूद केला आहे. सरासरी टर्न ओव्हरमध्ये सदर निविदाधारकांचा टर्नओव्हर कमी असलेमुळे ते **अपात्र** ठरले. |
| ०५ | एसडीपी इंडस्ट्रीज प्रा.लि., मुंबई (८) | परवाना सर्टिफिकेटची मुदत दि.३१.१२.२०१९ पर्यंतच नमूद होती. अदयावत दाखल्याची प्रत मागविण्यात आली होती. | सुधारीत अदयावत परवाना प्रत मेलद्वारे सादर केली आहे. | मेलद्वारे सादर केलेले परवान्यामध्ये Renewal तारीख ०३.०१.२०२० आहे व परवाना मुदत ३१.१२.२०२० पर्यंत आहे. त्यामुळे सदर निविदाधारक **पात्र** ठरले. |
| ०६ | मल्टीग्लोब डेअरीज प्रा.लि., नानेरी, फतेहबाद (९) | १.सन २०१५-१६ टर्न ओव्हर सर्टिफिकेट मागणी केली आहे.<br>२.क्षमता सर्टिफिकेट नाही. FSSAI सर्टिफिकेट जोडले आहे. त्यामध्ये तूपाचा उल्लेख नाही. | १.FSSAI सर्टिफिकेट Food Categorization Code कागदपत्रे सादर केली आहेत.<br>२. सन २०१५-१६ चे टर्न ओव्हर सर्टिफिकेट ऐवजी सदर कंपनी डिसेंबर २०१७ मध्ये सुरू झाल्याचे सीए सर्टिफिकेट सादर केले आहे. | १.FSSAI सर्टिफिकेट Food Categorization Code मध्ये २.१.१ मध्ये Butter oil, anhydrous milk fat, ghee नमूद आहे.<br>२.संस्थानने निविदेमध्ये सरासरी ३ वर्षांचा टर्नओव्हर १५ कोटी अगर त्यापेक्षा जास्त नमूद केला आहे. सरासरी टर्न ओव्हरमध्ये सदर निविदाधारकांचा टर्नओव्हर कमी असलेमुळे ते **अपात्र** ठरले. |

शुध्द तूपाचे सन २०२० चे निविदांची ऑनलाईन तांत्रिक छाननी व ई मेलव्दारे मागविलेले कागदपत्रांचे छाननीअंती वरील एकूण १० निविदाधारकांपैकी खालीलप्रमाणे ५ ई-निविदाधारक पात्र ठरले आहेत.

१. हर्ष फ्रेश डेअरी प्रॉडक्ट्स प्रा.लि., भगवानपुर, हरिद्वार
२. स्मृती प्रॉडक्टस् प्रा.लि., सहा, अंबाला, हरियाणा
३. व्ही.एस.पी.डेअरी इंडस्ट्रीज, अहमदाबाद

४. सनफ्रेश ॲग्रो इंडस्ट्रीज प्रा.लिमीटेड, रांजणखोल, महाराष्ट्र

५. एस डि पी इंडस्ट्रीज प्रा.लि., दमण

वरील पात्र निविदाधारकांचे कमर्शिअल बीड दि.१८.०१.२०२० चे खरेदी समितीमध्ये उघडण्यात आले आहेत. सदर ई-निविदेतील क्वॉर्टरवाईज दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे-

**अ- जानेवारी २०२० ते मार्च २०२०**

| Sl.No | Description of Work / Item(s) | No.of Qty | Units | SDP INDUSTRIES PVT LTD | SMRITI PRODUCTS PRIVATE LIMITED | VSP DAIRY INDUSTRIES | HARSH FRESH DAIRY PRODUCTS PVT LTD | Sunfresh Agro Industries Pvt. Ltd. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1.00 | Cow Ghee - Pure 15Kg. New Tin Packing, AGMARK/FSSAI | 2100.00 | Quintal | 36960.00 | 39400.00 | 35800.00 | **26150.00** | 45920.00 |

**ब- एप्रिल २०२० ते जून २०२०**

| Sl.No | Description of Work / Item(s) | No.of Qty | Units | SDP INDUSTRIES PVT LTD | SMRITI PRODUCTS PRIVATE LIMITED | VSP DAIRY INDUSTRIES | HARSH FRESH DAIRY PRODUCTS PVT LTD | Sunfresh Agro Industries Pvt. Ltd. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1.00 | Cow Ghee - Pure 15Kg. New Tin Packing, AGMARK/FSSAI | 2100.00 | Quintal | 36960.00 | 39400.00 | 36800.00 | **26275.00** | 45920.00 |

**क- जुलै २०२० ते सप्टेंबर २०२०**

| Sl. No | Description of Work / Item(s) | No.of Qty | Units | SDP INDUSTRIES PVT LTD | SMRITI PRODUCTS PRIVATE LIMITED | VSP DAIRY INDUSTRIES | HARSH FRESH DAIRY PRODUCTS PVT LTD | Sunfresh Agro Industries Pvt. Ltd. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1.00 | Cow Ghee - Pure 15Kg. New Tin Packing, AGMARK/ FSSAI | 2100.00 | Quintal | 38080.00 | 39400.00 | 37500.00 | **26450.00** | 45920.00 |

**ड- ऑक्टोंबर २०२० ते डिसेंबर २०२०**

| Sl. No | Description of Work / Item(s) | No.of Qty | Units | SDP INDUSTRIES PVT LTD | SMRITI PRODUCTS PRIVATE LIMITED | VSP DAIRY INDUSTRIES | HARSH FRESH DAIRY PRODUCTS PVT LTD | Sunfresh Agro Industries Pvt. Ltd. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1.00 | Cow Ghee - Pure 15Kg. New Tin Packing, AGMARK/FSSAI | 2100.00 | Quintal | 38080.00 | 39400.00 | 38000.00 | **26150.00** | 45920.00 |

वरील ४ तिमाहीतील तुलनात्मक तक्तयांचे अवलोकन करता ४ ही क्वॉर्टरमध्ये मे.हर्ष फ्रेश डेअरी प्रॉ.प्रा.लि., भगवानपुर यांचे दर न्युनतम आलेले आहेत. सदर न्युनतम दरांबाबत संबंधित निविदाधारकाशी चर्चा-वाटाघाटी करून अंतिम निर्णय घेतला जात असतो. त्यानंतर त्यांचे फर्मचे व्हेंडर ऑडिट करून त्याचा अहवाल मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करून अहवाल सकारात्मक असल्यास संबंधित न्युनतम दरधारकास पुरवठा आदेश दिला जातो.

तथापि सध्या भांडार विभागामध्ये दि.१८.०१.२०२० अखेर शुध्द तूपाचा ४९६ क्विंटल साठा शिल्लक आहे. तो साधारण १५ दिवस पुरेल असा अंदाज आहे. त्यामुळे पुढील कालावधीत साईभक्तांना बुंदी व लाडू प्रसाद सेवा देणेत अडचण होऊ नये म्हणून १ महिन्यासाठी आवश्यक असणारे १००० क्विंटल शुध्द तूप तातडीने खरेदी करणे गरजेचे आहे.

यापुर्वी सन २०१८ या वर्षामध्ये माहे जानेवारी ते डिसेंबर या कालावधीमध्ये मे.हर्ष डेअरी प्रॉ.प्रा.लि., भगवानपुर यांनी संस्थानला ८२४०.२२ क्विंटल शुध्द तूपाचा पुरवठा केलेला होता. तसेच त्यांचे व्हेंडर ऑडिटचा अहवालही समाधानकारक होता तसेच केंद्र सरकारच्या एनडीआरआय या संस्थेनेही मे.हर्ष डेअरी प्रॉ.प्रा.लि., भगवानपूर यांचे प्लॅन्टचे संस्थानचे विनंतीवरुन इन्स्पेक्शन केले होते. त्यांनीही दि□.४ एप्रिल, २०१८ रोजी Overall remark मध्ये Considering all the condition and production practice and record keeping, the plant comes in the fair category as per best knowledge of our plant practices. या बाबी विचारात घेता, मे.हर्ष फ्रेश डेअरी प्रॉ. प्रा.लि., भगवानपुर यांना जानेवारी ते मार्च २०२० या कालावधीतील न्युनतम दर रू.२६,१५०/- प्रती क्विंटल दराने १००० क्विंटल शुध्द तूपाचा पुरवठा आदेश देऊन दरम्यानचे कालावधीत त्यांना मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे चर्चा-वाटाघाटीसाठी बोलविता येईल व व्हेडर ऑडिट करता येईल. असे मत आहे.

प्रस्ताव:-

तरी,

१. मे.हर्ष फ्रेश डेअरी प्रॉ. प्रा.लि., भगवानपुर यांना जानेवारी ते मार्च २०२० या कालावधीतील न्युनतम दर रू.२६,१५०/- प्रती क्विंटल दराने १००० क्विंटल शुध्द तूपाचा पुरवठा आदेश देणेस,

२. दरम्यानचे कालावधीत मे.हर्ष फ्रेश डेअरी प्रॉ. प्रा.लि., भगवानपुर यांना चर्चा-वाटाघाटीसाठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेत बोलविणेस व दरम्यान त्यांचे फर्मचे व्हेंडर ऑडिट करणेस,

वरील प्रस्तावित १ व २ बाबत चक्रिय पध्दतीने मान्यता मिळणेसाठी सादर.

**निर्णय क्र.४७(अ)** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन-२०२० करीता गाईचे शुध्द तुप खरेदी करणेकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नत्तम दरधारक मे.हर्ष फ्रेश डेअरी इंडस्ट्रीज प्रा.लि.भगवानपुर यांना जानेवारी-२०२० या एक महिना कालावधीसाठी निम्नत्तम दर रू.२६,१५०/- प्रती क्विंटल दराने शुध्द तूपाचा पुरवठा आदेश देणेस चक्रिय पध्दतीने मान्यता देण्यात आलेली आहे. त्याचे अवलोकन करण्यात येऊन आजचे मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेमध्ये त्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-खरेदी विभाग)**

---

**ब) संस्थानला कंत्राटी पध्दतीने सुरक्षा कर्मचारी पुरविणारे ठेकेदार मे.सेंट्रल इन्व्हेस्टीगेशन ॲन्ड सिक्युरिटी सर्व्हिसेस लि.मुंबई यांना मुदतवाढ मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना दि.१०.०६.२०१८ ते दि.०९.०६.२०१९ अखेर १ वर्ष कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी ०१ एजन्सीची नेमणूक करण्यात आलेली असून, सुरक्षा व माजी सैनिक सुरक्षा कंत्राटी कर्मचारी पुरविण्याचे मे.सेंट्रल इनव्हेस्टीगेशन ॲण्ड सिक्युरिटी सर्व्हिसेस लि., मुंबई यांना कार्यादेश देण्यात आलेले असून, त्यांची मुदत दि.०९.०६.२०१९ रोजी संपुष्टात आली होती.

त्यावर मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०६.०६.२०१९, निर्णय क्र.२११ अन्वये संस्थानला अकुशल, कुशल व सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी ठेकेदार मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.पुणे व मे.सेंट्रल इन्व्हेस्टीगेशन ॲण्ड सिक्युरिटी सर्व्हिसेस लि., मुंबई यांना निविदेतील, करारमान्यातील व कार्यादेशातील आहे त्याच अटी-शर्तीस व दरपत्रकास अधिन राहून दि.१०.०६.२०१९ ते ३१.०८.२०१९ या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आलेली होती.

सदर निविदा प्रक्रिया राबविणेची कार्यवाही विस्तृत स्वरुपाची असल्याने मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२१.०८.२०१९निर्णय क्र. ४५३ अन्वये दि.०१.०९.२०१९ पासून ते दि.३०.११.२०१९ पर्यंत संस्थानला कंत्राटी पध्दतीने सुरक्षा कर्मचारी पुरविणारे ठेकेदार मे. सेंट्रल इन्व्हेस्टीगेशन सिक्युरिटी सर्व्हिसेस मुंबई यांना

करारनाम्यातील व कार्यादेशातील आहे त्याच अटी-शर्तीस व दरपत्रकास अधिन राहून मुदतवाढ देण्यात आलेली होती.

सुरक्षा व माजी सैनिक सुरक्षा कंत्राटी कर्मचारी पुरविण्याबाबत नव्याने निविदा प्रक्रिया राबवली असून सध्या संस्थानला नविन कॉन्ट्रॅक्टर्सची नेमणूक करणेकामी वाणिज्यीक निविदा उघडणेत आलेली असून, दोन निविदा धारक L-1 आलेले असून त्यांना कार्यादेश देणेबाबत कार्यवाही चालू असून त्यासाठी काही कालावधी लागणार आहे.

आता मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभा दि.०४.१२.२०१९, निर्णय क्र.५७४ अन्वये संस्थानला कंत्राटी पध्दतीने सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी राबविणेत येत असलेली ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन पात्र ठेकेदारास कार्यादेश देईपावेतो अथवा दि.३१.०१.२०२० पर्यंत यापैकी जे अगोदर होईल तो पर्यंत कामाची गैरसोय होऊ नये म्हणून सध्या संस्थानला सुरक्षा कंत्राटी कर्मचारी पुरविणारे ठेकेदार मे.सेंट्रल इन्व्हेस्टीगेशन सिक्युरिटी सर्व्हिसेस, मुंबई यांना निविदेतील, करारनाम्यातील व कार्यादेशातील आहे त्याच अटी-शर्तीस व दर पत्रकास अधिन राहून मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली. तसेच प्रस्तुत प्रकरणी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील वाणिज्यीक ई-निविदा खरेदी समितीसमोर उघडल्यानंतर याबाबतचा प्रस्ताव स्थानिक उपसमिती समोर न नेता थेट तदर्थ (Ad-hoc)समितीसमोर सादर करण्यात यावा.असा निर्णय पारित झालेला होता. त्यास अनुसरुन मा. तदर्थ(Ad-hoc) समितीचे दि.१४.०१.२०२० रोजीचे सभेत विषयांकित निविदेचा वाणिज्यीक तुलनात्मक तक्ता तसा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर करणेत आलेला होता, परंतू न्युन्नतम दरधारक यांना समक्ष चर्चेसाठी समितीपुढे बोलविणेत यावे, असा निर्णय पारित झालेला आहे. तथापि, संस्थानला कंत्राटी पध्दतीने सुरक्षा कर्मचारी व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरविणारे ठेकेदार मे.सेंट्रल इन्व्हेस्टीगेशन ॲण्ड सिक्युरिटी सर्व्हिसेस, मुंबई यांची वाढीव मुदत दि.३१.०१.२०२० अखेर पर्यंत संपुष्टात येत आहे. सदर कालावधीत नवीन सुरक्षा ठेकेदाराची नियुक्ती प्रक्रिया पूर्ण होऊ शकणार नाही.

उपरोक्त बाबींस अनुसरुन, मे.सेंट्रल इन्व्हेस्टीगेशन ॲण्ड सिक्युरिटी सर्व्हिसेस लि., मुंबई यांना पुढील ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन पात्र ठेकेदारास कार्यादेश देई पावेतो अथवा दि.०१.१२.२०१९ ते दि.३१.०१.२०२० या कालावधीसाठी निविदेतील, करारमान्यातील व कार्यादेशातील आहे त्याच अटी-शर्तीस व दरपत्रकास अधिन राहून मुदतवाढ देण्यात आली होती, सदरची मुदतवाढ दि.३१.०१.२०२० अखेर संपत असल्याने व सदरची ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होणेस अजून काही कालावधी लागणार असल्याने सदर ठेकेदारास मुदतवाढ देणे आवश्यक आहे.

तरी, मे.सेंट्रल इन्व्हेस्टीगेशन ॲण्ड सिक्युरिटी सर्व्हिसेस लि., मुंबई यांना दि.०१.०२.२०२० ते दि.२९.०२.२०२० अखेरपर्यंत किंवा ई-निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन, पात्र ठेकेदार यांना नियुक्ती कार्यादेश देईपावेतो यापैकी जे अगोदर होईल तोपर्यंत कामाची गैरसोय होऊ नये म्हणून निविदेतील, करारनाम्यातील व कार्यादेशातील आहे त्याच अटी-शर्तीस व दरपत्रकास अधिन राहून मुदतवाढ देणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.४७(ब)** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.सेंट्रल इन्व्हेस्टीगेशन ॲण्ड सिक्युरिटी सर्व्हिसेस लि., मुंबई यांना दि.०१.०२.२०२० ते दि.२९.०२.२०२० अखेरपर्यंत किंवा ई-निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन, पात्र ठेकेदार यांना नियुक्ती कार्यादेश देईपावेतो यापैकी जे अगोदर होईल तोपर्यंत कामाची गैरसोय होऊ नये म्हणून निविदेतील, करारनाम्यातील व कार्यादेशातील आहे त्याच अटी-शर्तीस व दरपत्रकास अधिन राहून मुदतवाढ देणेस चक्रिय पध्दतीने मान्यता देण्यात आलेली आहे. त्याचे अवलोकन करण्यात येऊन आजचे मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेमध्ये त्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-कामगार विभाग)**

---

**विषय नं.०३** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी मार्फत जम्मु काश्मिरच्या पुलवामा जिल्हयात शहीद झालेल्या ४० जवानांच्या वारसांना रु.२.५१ कोटी अर्थसहाय्य रेखांकित धनादेशाव्दारे किंवा धनाकर्षाव्दारे आदा करणेस मान्यता देणेबाबत.**

**प्रस्ताव-** जम्मू काश्मिरमधील पुलवामा जिल्हयात १४ फेब्रुवारी २०१९ रोजी केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या जवानांच्या ताफ्यावर हल्ला झाला. या ताफ्यात ७८ वाहनातून एकूण २५४७ जवान प्रवास करीत होते. या ताफ्यातील एका वाहनावर दहशतवादी संघटनेने, दहशतवाद्याकरवी आरडीएक्स स्फोटकांचा साठा असलेले वाहन धडकविण्यात आले व त्यात ४४ जण शहीद झाले. अशा प्रकारचे वृत्त तत्कालीन वृत्तपत्रात प्रसिद्ध झाले होते.

भारतीय सिमेवर शहीद झालेल्या या जवानांचे ऋण आपणां सर्वांवर आहे. त्याचबरोबर त्यांच्या कुटुंबीयांची जबाबदारी आपणांवर आहे. आपण देशात सुरक्षित आहोत याचे श्रेय जवानांना जाते. त्यामुळे या जवानांच्या त्यागाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी चे व्यवस्थापन समितीने खालील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

मा. व्यवस्थापन समितीचा निर्णय:- मा.व्यवस्थापन समितीचे दि. २६.०२.२०१९ रोजीचे सभेत निर्णय क्रं. १६० वर आयत्या वेळी चर्चा होऊन दि. १४ फेब्रुवारी २०१९ रोजी जम्मु व काश्मीरच्या पुलवामा जिल्हयात केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या जवानांवर दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात शहीद झालेल्या ४४ जवानांच्या वारसांना संस्थानतर्फे २.५१ कोटी मदत देणेकामी मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये सिव्हील अ‍ॅप्लीकेशन दाखल करून मा.न्यायालयाची परवानगी मिळालेनंतर छाननी समिती व शासनाचे मान्यतेनंतर रक्कम आदा करण्याची कार्यवाही करण्यात यावी, असे ठरले.

मा. उच्च न्यायालयाचा आदेश:- मा.मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांनी खालील प्रमाणे आदेश दिलेले आहेत. “Prays for grant of permission to provide financial assistance to the tune of Rs.2,51,00,000/- (Rs Two Crores Fifty One lakhs) to the families of CRPF personnel killed in the attack in Pulwama district” असे आदेश दिलेले आहेत.

विधी व न्याय विभागास पत्र:- मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयान्वये जा.न.एसएसएसटी/वशी-लेखा अनुदान/२२६२/२०१९ दि.१२.०९.२०१९ सदरच्या प्रस्ताव शासनास सादर केला होता.

शासन निर्णय:- विधी व न्याय विभागाचा शासन निर्णय क्रं.सासंवि-१०१९/८७६/प्र.क्र.१६२/का.१६ दि.२०.०९.२०१९ अन्वये जम्मू काश्मिर राज्यातील पुलवामा येथील दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या केंद्रीय राखीव दलाच्या ४४ जवानांच्या वारसांना रु. २.५१ कोटी इतकी आर्थिक मदत देणेस मान्यता देऊन अर्थसहाय्य दिल्यानंतर याबाबतचा अनुपालन अहवाल ६ महिन्यांच्या आत शासनास सादर करावा असा शासन निर्णय निर्गमित झाला आहे.

उपरोक्त निर्णयाचे अनुषंगाने मा. उपमहानिरीक्षक, केंद्रीय राखीव दल, नवी दिल्ली यांना जा.न. एसएसएसटी/वशी-लेखा अनुदान /२४७९/२०१९ दि. २५.०९.२०१९ अन्वये पुलवामा जिल्हयात केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या जवानांवर दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात शहीद झालेल्या जवानांच्या बॅंक तपशीलाबाबत माहिती देणेबाबत कळविले होते.

प्राप्त माहिती:- उपरोक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने केंद्रीय राखीव पोलीस दल, नवी दिल्ली यांचेकडून दि.०१.११.२०१९ रोजी पत्र प्राप्त झाले असून त्यांनी “Bharat Ke Veer,” CRPF HQr, Dte. General, CGO Complex Lodhi Road, New Delhi-110003 या बॅंक तपशीलावर धनादेशाद्वारे अथवा धनाकर्षाद्वारे रक्कम पाठविणेबाबत कळविले आहे.

मात्र “Bharat Ke Veer,” या केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या (CRPF) बॅंक खात्यातून आसाम रायफल्स, सीमा सुरक्षा दल (BSF) केंद्रीय औद्योगीक सुरक्षा दल, केंद्रीय राखीव पोलीस दल, इन्डोतिबेटन सिमा पोलीस दल, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल, राष्ट्रीय सुरक्षा गार्ड, (NSG) सशस्त्र सिमा बल इ. सुरक्षा दलातील शहीद जवानांच्या कुटुंबीयांना या निधीमधून एकत्रितपणे मदत केली जाते. त्यामुळे मा. व्यवस्थापन समिती व शासन निर्णयात विसंगती निर्माण होत असल्याने पुनःश्च पोलीस महानिरीक्षक कार्यालय, केंद्रीय रिजर्व पोलीस दल, नवी मुंबई यांचेशी पत्रव्यवहार करून जम्मु व काश्मीरच्या पुलवामा जिल्हयात केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या जवानांवर दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात शहीद झालेल्या ४० जवानांच्या वारसांना संस्थानतर्फे अर्थसहाय्य देणेबाबत पत्रव्यवहार केला असता त्यांनी खालीलप्रमाणे माहिती सादर केली आहे.

पोलीस महानिरीक्षक कार्यालय, केंद्रीय रिजर्व पोलीस दल, नवी मुंबई यांनी सादर केलेली माहिती

| SL. NO | RANK& NAME | NAME OF NOK | PRESENT ADDRESS OF NOK |
|---|---|---|---|
| 1 | CT/GD RATHOD NINTIN SHIVAJI | SMT.VANDANA NITIN RATHOD (WIFE) | VILL- CHOPANFRA, POST+ PS - BIBI, TEHSIL - LONAR, DIS – BHULDHANA, MH PIN – 443202 |

| | | | |
|---|---|---|---|
| 2 | HC/GD SANJAY RAJPUT | SMT.SUSHMA SANJAY RAJPUT (WIFE) | VILL – LAKHANI PLOT WARD NO.21, BULDHANA ROAD MALKAPUR, PO+PS- MALAPUR, DIS – BHULDHANA, MH PIN - 443101 |
| 3 | CT/GD PRADEEP KUMAR | SMT. SHARMISTHA DEVI (WIFE) | VILL- TOWN BANAT, POST-BANAT, PS – SHAMLI, DIS-SHAMLI, UP, PIN - 247776 |
| 4 | CT/COOK KOUSHAL KUMAR | SMT. MAMTA RAWAT (WIFE) | VILL– KARAHAI, PO- PRATHAPPURA, PS – TAJGANJ, DIST- AGRA, UP PIN – 281200 |
| 5 | HC/GD BABLU SANTRA | SMT. MITA SANTRA (WIFE) | VILL- WEST BAURIA, PO- CHACKASHI, PS- BAURIA, THE- ULUBERA, DIST- HOWRAH, WB, PIN-711307 |
| 6 | CT/GD SUDIP BISWAS | SMT. MAMATA BISWAS (MOTHER) | VPO-HANSPUKURIA, THE- TEHATTA, PS - TEHATTA, DIST – NADIA, WB, PIN - 741160 |
| 7 | CT/GD ASHVNI KUMAR KAOCHI | SHRI SUKROO PRASAD (FATHER) | VILL- KHUDAWAL,PO-DARSHANI, THE – MAJHAULI, DIST- JABALPUR, MP, PIN – 483225 |
| 8 | CT/GD RATAN KUMAR THAKUR | SMT. RAJNANADANI KUMARI (WIFE) | S/O RAM NIRANJAN THAKUR, VILL- RATNAPUR, PO – MADARGANJ, PS – AMDAANDA, DIST- BHAGALPUR BIHAR PIN -813204 |
| 9 | HC/GD SANJAY KUMAR SINHA | SMT. BABY DEVI (WIFE) | VILL- TAREGANA MATH, PO+PS MASAURHI, DIST – PATNA BIHAR PIN - 808252 |
| 10 | CT/GD VIRENDRA SINGH | SMT. RENU (WIFE) | S/O DIWAN SINGH RANA, VILL- MOHAMMADPUR, BHURIA, POST – PRATAPPUR NO – 4 PS – KHATIMA , DIST– UDHAM SINGH NAGAR, UKD, PIN - 262308 |
| 11 | CT/GD BHAGIRATH SINGH | SMT. RANJANA DEVI (WIFE) | S/O SHRI PARSHURAM VILL+PO – JAITPUR, PS – DEHOLI TAL – RAJA KHEDA, DIS – DHOLPUR RJ, PIN – 328029 |
| 12 | CT/GD JEET RAM | SMT. SUNDRI DEVI (WIFE) | VILL & PO – SUNDRAWALI, PS+ TEHSIL NAGAR, DIS- BHARATPUR RJ, PIN 321205 |
| 13 | CT/ DVR PANKAJ KUMAR TRIPATHI | SMT. ROHINI (WIFE) | VILL- HARPUR TOLA BELAHIYA, PO- LEJAR MAHADEVA, PS–PHARENDA,DIST- AHARAJGANG PIN - 273155 |
| 14 | HC/GD HEMRAJ MEENA | SMT. MADHUBALA MEENA (WIFE) | VILL- VINOD KALAN, POST- VINOD KHURD, POLICE STATION – SANGOD DIST - KOTA, RJ PIN -325601 |
| 15 | CT/GD ROHITASH LAMBA | SMT.MANJU JAT (WIFE) | VILL- GOVINDPURA BASRI, PO – KHEJROLI, TEH – SHAHPURA DIST – JAIPUR, RJ, PIN – 303803 |

| | | | |
|---|---|---|---|
| 16 | HC/CRYPTO NARAYAN LAL GURJAR | SMT. MOHINI DEVI GURJAR (WIFE) | VI/PO – BINOL,<br>THE DIST- RAJSAMAND,<br>RJ, PIN - 313327 |
| 17 | CT/GD RAMESH YADAV | SMT.REENU YADAV (WIFE) | VILL- TOFAPUR, PO - BARAIN<br>PS – CHAUBEYPUR, NRS – SARNATH,<br>THE – SADAR, DIST – VARANASI<br>UP PIN – 221007 |
| 18 | CT/BUG VIJAY KUMAR MOURYA | SMT. VIJAY LAXMI MAURYA (WIFE) | VILL – CHHAPIYA JAYDEV,<br>PO–BHATNI, PS–BHATNI, THE–SALEMPUR,<br>DIST – DEORIA, UP PIN- 274701 |
| 19 | CT/GD MAHESH KUMAR | SMT SNAJU DEVI (WIFE) | VILL – TUDIHAR BADAL KA PURVA<br>PO – NEWDHIYA, TEL –MEJA<br>DIS – ALLAHABAD, UP PIN - 212303 |
| 20 | HC/GD PRASANNA KUMAR SAHOO | SMT. MINA SAHOO (WIFE) | VILL – PARI SIKHAR, PO – SIKHAR,<br>NRS – BHUBNESHWAR, PS- NAUGAN,<br>THE – BALIKUDA, DIST – JAGAT SINGH PUR,<br>OD, PIN - 754113, |
| 21 | CT/CD MANOJ KUMAR BEHRA | SMT.ILILATA BEHERA (WIFE) | VILL- RATANPUR, PO – MADHAB,<br>PS – NIALI, DIST- CUTTACK,<br>ODISHA PIN – 754004 |
| 22 | SAHEED CY/WC MANINDER SINGH ATTRI | SHRI SATPAL ATTRI (FATHER) | VILL – ARYANAGAR, PO/PS – DINANAGAR<br>THE – GURDASPUR, DIST – GURDASPUR, PB<br>PIN 143531 |
| 23 | HC/DVR JAIMAL SINGH | SMT.SUKHJIT KUMAR (WIFE) | VPO - KOT- ISE-KHAN,<br>TEH – DHARAMKOT, DIS - MOGA,<br>PB, PIN- 142043 |
| 24 | CT/BUG TILAK RAJ | SMT. SAVITRI DEVI (WIFE) | VILL – DHEWA, PO- DHARKALAN,<br>TEH – JAWALI, DIST- KANGRA<br>HP, PIN - 176210 |
| 25 | CT/GD KULWINDER SINGH | SHRI DARSHAN SINGH (FATHER) | VI/PO – ROULI, PS- NURPUR BEDI<br>TEH – ANANADPUR SAHIB,<br>DIS – ROPAR, PB – 140117 |
| 26 | CT/GD SUKHJINDER SINGH | SMT. SARBJIT KAUR (WIFE) | VPO- GANDIWIND (DHATTAL)<br>THE – PATTI, DIST- TARANTARAN<br>PB, PIN – 143410 |
| 27 | HC/GD NASEER AHMED | SMT.SHAZIA KOUSER (WIFE) | VPO - DODASAN BALA,<br>THE- THANA MANDI,<br>DIST- RAJOURI, J&K PIN – 185212 |
| 28 | HC/CD VIJAY SORENG | SMT. CARMELA SORENG (WIFE) | PO- BARIATU, PS- SADAR,<br>DIST- RANCHI, JR, PIN- 834009 |
| 29 | CT/GD VASANTHA KUMAR | SMT. SHEENA B (WIFE) | V. V. HOUSE –VAZHAKKINDI,<br>VILL – KUNNATHIDAVAKA,<br>POST- LAKKIDI, PS+THE- VYTHIRI<br>DIST- WAYANAD, KR, PIN -673576 |

| | | | |
|---|---|---|---|
| 30 | CT/GD SUBRAMNIAN G. | SMT. KRISHNA VENI A. (WIFE) | VILL- SAVALAPERI, PO- VILLISERI, TEH- KOVILPATTI, PS- KAYATHAR, DIST-TUTICORIN, TM, PIN - 628716 |
| 31 | CT/GD C. SIVA CHANDRAN | SMT.S.GANDHIMATHI (WIFE) | VILL & PO- KARGUDI, PS- T. PALUR, THE- UDAYARPALAYAN, DIS – ARIYALUR TM PIN- 612904 |
| 32 | CT/CD GURU. H | SMT. KALAWATHI.S (WIFE) | VILL- BHARTINAGAR, GUDIGERE NO-6, PO- BIDHARAHALLI, THE-MADDUR, PS-BHARTINAGAR, DIS- MANDYA, KA, PIN-571422 |
| 33 | GT/WM AMIT KUMAR | SMT. URMULA DEVI (MOTHER) | HN 124, KUDANA ROAD RALPAR, PO+ THE- SHAMLI, PS- ADARSH MANDI, DIS-SHAMLI, UP, PIN-247776 |
| 34 | HC/GD MANESHWAR BASUMATARY | SMT. SANMATI BASUMATARY (WIFE) | VPO- KALBARI, PS-TAMULPUR, THE- PUB-BASKA, DIS-BAKSA, ASSAM, PIN-781367 |
| 35 | ASI/GD MOHAN LAL | 1.SMT. SARITA DEVI (WIFE) | C/O L.S MEHRA H NO.152 VIDYA VIHAR, NEAR KARGIL CHOWK, DEHRADUN, UK. |
| 36 | CT/GD PRADEEP KUMAR | SMT. NEERAJ DEVI (WIFE) | VI- AZAN, P.O-SUKHAHAINPUR, P.S. – TERWA, DIST-KANNUJ, UP, PIN - 209728 |
| 37 | CT/GD SHYAM BABU | SMT. RUBI DEVI (WIFE) | VILL-RAIGWAN, P.O.- NOWRI, P.S-DERAPUR, DIST – KANPUR UP. PIN-209310 |
| 38 | CT/CD AJIT KUMAR AZAD | SMT. MEENA GAUTAM (WIFE) | VILL-WARD NO. 21 HOUSE NO.133 LOK NAGAR UNNAO,PO+P.S. SADAR, DIST - UNNAO UP. PIN-209801 |
| 39 | HC/GD RAM VAKEEL | SMT. GEETA (WIFE) | VILL-VINAYAKPUR, KAKHAN MAU, P.S. BARNAHAL, DIST-MAINPURI UP. PIN – 205261 |
| 40 | HC/RO AWADHESH KUMAR YADAV | SMT. SHILPI YADAV (WIFE) | VILL- BAHADURPUR, P.O.- JALILPUR, P.S. MUGHALSARAI DIST-CHANDAULI, UP. PIN 232102 |

विभागाचा अभिप्राय:-

१) मा. व्यवस्थापन समितीचे दि. २६.०२.२०१९ रोजीच्या सभेतील आयत्या वेळेचा विषयात दि. १४ फेब्रुवारी रोजी जम्मु व काश्मीरच्या पुलवामा जिल्हयात केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या जवानांवर दहशातवाद्यांनी केलेल्या हल्ल्यामध्ये शहीद झालेल्या ४४ जवानांच्या वारसांना संस्थानतर्फे रक्कम रु. २.५१ कोटी अर्थसहाय्य मंजूर करण्यात आलेले होते. त्यानुसार ४४ जवानांच्या वारसांना अर्थसहाय्य करणेबाबतचा प्रस्ताव मा. विधी व न्याय विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडे मंजूरीसाठी सादर करण्यात आला होता. त्यानुसार विधी व न्याय विभागाने ४४ जवानांच्या वारसांना रक्कम रु.२.५१ कोटी अर्थसहाय्य देण्यास मंजूरी दिलेली आहे. मात्र पोलीस महानिरीक्षक केंद्रीय राखीव पोलीस दल, नवी मुंबई यांनी त्यांचे पत्र क्रं. NO.M.V-4/2019-WS-Adm-VI Dated 05 December 2019 अन्वये प्रत्यक्षतः ४० जवानांची यादी सादर केली आहे. त्यामुळे सदरहू रक्कम रु.२.५१ कोटी मात्र ४० जवानांच्या वारसांना समप्रमाणात विभागून द्यावी लागेल.

२) पोलीस महानिरीक्षक कार्यालय, केंद्रीय रिजर्व पोलीस दल, नवी मुंबई यांनी जम्मू काश्मिर राज्यातील पुलवामा येथील दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या केंद्रीय राखीव दलाच्या ४० जवानांची व त्यांच्या

वारसांची यादी सादर केलेली आहे. त्यामुळे ४४ ऐवजी ४० जवानांच्या वारसांना सदर रक्कम विभागून द्यावी लागेल.

३) उपरोक्त प्रमाणे रक्कम रु. २.५१ कोटी ४० शहीद जवानांच्या वारसांना प्रत्येकी रु. ६,२७,५००/- रक्कम रेखांकित धनादेश किंवा धनाकर्षाद्वारे पोलीस महानिरीक्षक कार्यालय, केंद्रीय रिजर्व पोलीस दल, नवी मुंबई यांचेकडे सूपूर्द करून पोहच पावती मागविता येईल.

प्रस्ताव:- जम्मू काश्मिर राज्यातील पुलवामा येथील दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या ४४ जवानांच्या वारसांना मदत देणेबाबत मा. व्यवस्थापन समिती ठराव व विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासनाचा निर्णय झाला आहे. मात्र आता पोलीस महानिरीक्षक केंद्रीय राखीव पोलीस दल, नवी मुंबई यांनी त्यांचे पत्र क्रं. NO.M.V-4/2019-WS-Adm-VI दि. ०५ १२.२०१९ नुसार फक्त ४० शहीद जवानांची यादी पाठविली आहे त्यामुळे ४४ ऐवजी केंद्रीय राखीव दलाच्या ४० जवानांच्या वारसांना रेखांकित धनादेश किंवा धनाकर्षाद्वारे, पोलीस महानिरीक्षक कार्यालय, केंद्रीय रिजर्व पोलीस दल, नवी मुंबई यांचेमार्फत रक्कम रु. २.५१ कोटी (अक्षरी रुपये दोन कोटी एक्कावन्न लक्ष) प्रत्येकी रु. ६,२७,५००/- अदा करण्याचा प्रस्ताव निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.४८** **यावर सविस्तर चर्चा झाली, वर्तमानपत्रातील माहिती प्रमाणे दि.१४ फेब्रुवारी २०१९ रोजी जम्मु व काश्मीरच्या पुलवामा जिल्हयात केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या जवानांवर दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात ४४ जवान शहीद झाल्याची प्राथमिक माहिती असल्याने शहीद झालेल्या ४४ जवानांच्या वारसांना संस्थानतर्फे रक्कम रु.२.५१कोटी मदत देणेबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६.०२.२०१९ रोजीचे सभेत आयत्या वेळेच्या विषयान्वये निर्णय झालेला असुन सदर निर्णयास मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांची तसेच महाराष्ट्र शासनाची मान्यता मिळालेली आहे.**

**तथापी पोलीस महानिरीक्षक केंद्रीय राखीव पोलीस दल, नवी मुंबई यांचेशी झालेल्या पत्रव्यवहाराव्दारे त्यांनी दिलेल्या यादीनुसार दि.१४ फेब्रुवारी २०१९ रोजी जम्मु व काश्मीरच्या पुलवामा जिल्हयात केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या जवानांवर दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात ४० जवान शहीद झालेले असल्याचे कळविले आहे.**

**यावर समितीने सर्वानुमते असे ठरविले की, दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या ४० जवानांची यादी अधिकृत शासकीय यंत्रणेकडून प्राप्त झालेली असुन त्याची पडताळणी देखील झालेली आहे. मा.व्यवस्थापन समितीने संस्थानतर्फे रक्कम रु.२.५१ कोटी मदत देण्याचे जाहिर केलेले असल्याने मानवतावादी दृष्टीकोनातून सदरची रक्कम दि.१४ फेब्रुवारी २०१९ रोजी जम्मु व काश्मीरच्या पुलवामा जिल्हयात केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या जवानांवर दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात शहीद झालेल्या ४० जवानांच्या वारसांना रेखांकित धनादेशाद्वारे, पोलीस महानिरीक्षक कार्यालय, केंद्रीय रिजर्व पोलीस दल, नवी मुंबई यांचेमार्फत समप्रमाणात प्रत्येकी रु.६,२७,५००/-मात्र याप्रमाणे एकुण रक्कम रु.२.५१ कोटी मात्र आदा करणेस मान्यता देण्यात आली. तसेच याकामी मान्यतेसाठी मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात यावे, असे ठरले.**

**(कार्यवाही-लेखाशाखा/विधी विभाग)**

---

**विषय नं.०४** **श्री भवानी माता सेवा समिती यांचे माँ भवानी हॉस्पिटल, नागपुर यांना "Equipments for Eye, Radiology Cardiology Departmet" साठी श्री साईबाबा संस्थान शिर्डीकडून रक्कम रु.२.३५ कोटी अनुदानाचे उपयोगिता प्रमाणपत्र अवलोकनार्थ सादर करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री भवानी माता सेवा समितीच्या वतीने पारडी भागात"मॉ भवानी हॉस्पीटल" चे निर्माण कार्य सुरू झाले आहे. या हॉस्पीटलमध्ये गोरगरीब जनतेच्या सेवेसाठी अत्याधुनिक सुविधेसह एकूण ११० खाटांची व्यवस्था करण्यात येत आहे. संस्थेचा हा उपक्रम प्राप्त दान व सामाजिक सहभागातून पुर्ण होणार आहे. या हॉस्पीटल करिता लागणा-या वैद्यकीय उपकरणापैंकी "Equipments for Eye, Rediology Cardiology Department" साठी रक्कम रु. २.३५ कोटी आर्थिक सहाय्य मिळण्याची विनंती अध्यक्ष श्री भवानी माता सेवा समिती, पारडी जि. नागपूर यांनी केली होती.

मा. व्यवस्थापन समितीचा निर्णय:- मा.व्यवस्थापन समितीचे दि. ०२.०५.२०१८ रोजीचे सभेत निर्णयार्थ सादर केला असता निर्णय क्र.३०६ पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे. मॉ भवानी हॉस्पिटल, नागपुर यांना "Equipments for Eye, Rediology Cardiology Department" साठी रक्कम रुपये २.३५ कोटी आर्थिक

मदत देण्यास मान्यता देण्यात आली. त्यासाठी छाननी समितीची व शासनाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले. त्यानुसार प्रस्ताव मा. छाननी समितीचे सभेत सादर केला असता खालीलप्रमाणे निर्णय झाला आहे.

मा. छाननी समितीचा निर्णय:- मॉ भवानी हॉस्पिटल, नागपुर यांना “Equipments for Eye, Rediology Cardiology Department” साठी अर्थसहाय्य देणेबाबतचा प्रस्ताव मा. छाननी समितीचे दि. २२.०८.२०१८ रोजीचे सभेत सादर केला असता त्यावर निर्णय क्रं. ३७ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

१) अनुदान मागणी रु. २.३५ कोटी मध्ये घ्यावयाच्या यंत्रसामुग्रीचे वर्गीकरण व अशी यंत्रसामुग्री ज्या इमारतीत ठेवली जाईल तीचे बांधकाम कधी पुर्ण होणार याची माहिती.

२) यंत्रसामुग्री निहाय अंदाजित किंमतीचे विवरण.

३) अंदाजित किंमतीसाठी मागविलेल्या दरांच्या कंपनीचे नाव,

४) सदर रकमेच्या विनियोगाचे हमीपत्र सर्व विश्वस्तांनी द्यावे.

५) सदर यंत्रसामुग्री किमान १० वर्ष विकता येणार नाही किंवा दुस-या संस्थेला देता येणार नाही असे हमीपत्र.

६) खरेदी करावयाच्या यंत्रसामुग्रीच्या देखभाल दुरुस्तीची व्यवस्था/तरतुद.

७) हॉस्पीटलच्या बॅलन्सशीटची पडताळणी केली असता संस्थानकडे मागणी केलेल्या खर्चाची पुर्तता करण्याइतपत असल्याचे दिसुन येते, त्यामुळे सदर हॉस्पीटलचे प्रतिनिधी यांना पुढील बैठकीत उपरोक्त बाबी कळवून चर्चेसाठी बोलविण्याचा निर्णय झाला.

त्यानुसार श्री भवानी माता सेवा समिती नागपूर यांनी उपरोक्त तपशीलाबाबत माहिती सादर केली आहे.

उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने प्रस्ताव मा. छाननी समितीचे दि. ०६.१०.२०१८ रोजीचे सभेत सादर केला असता निर्णय क्रं. ४३ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झाला आहे.

मा. छाननी समितीचा निर्णय- यावर सविस्तर चर्चा होऊन, छाननी समितीच्या दि.२२.०८.२०१८ रोजीच्या सभेमध्ये मॉ भवानी हॉस्पिटल, नागपुर यांना “Equipment for Eye, Rediology Cardiology Department” साठी रक्कम रु.२.३५ कोटी आर्थिक मदत देण्याचा विषय चर्चिला गेला आहे. वरील संस्थेच्या कागदपत्रांची छाननी केल्यावर काही त्रुटी आढळल्या त्याअनुषंगाने दि.२२.०८.२०१८ रोजीच्या सभेतील विषय क्र.३ अन्वये पुर्तता करण्यासाठी म्हणून संबधित सेवासमितीचे प्रतिनिधी यांना बोलविण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याअनुषंगाने सदरील सेवा समितीतर्फे दिलेला खुलासा खालील प्रमाणे आहे.

| अ.न. | मागितलेला तपशील | सादर केलेली माहिती |
|---|---|---|
| १ | सदर यंत्रसामुग्री ज्या इमारतीत बसविणार आहे ती इमारत कधी पुर्ण होणार आहे. | संस्थेने इमारत पुर्ण झालेचे नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर प्रमाणपत्र सादर केले आहे . |
| २ | अनुदान मागणी रु. २.३५ कोटी मध्ये द्यावयाच्या यंत्रसामुग्रीचे वर्गीकरण. | संस्थेने रेडिओलॉजी कलर डॉपलर मशीन व अतिदक्षता विभाग त्याचप्रमाणे डोळयांचा तपासणी मशीन असे वर्गीकरण केलेले आहे . |
| ३ | यंत्रसामुग्री निहाय अंदाजित किंमतीचे विवरण. | संस्थेने अनुक्रमे रेडिओलॉजी कलर डॉपलर मशीन व अतिदक्षता विभागासाठी एकूण ९३,५०,००० व डोळयांचा तपासणी मशीनसाठी १,४१,७३,५०० असे एकूण २,३५,२३,५०० विवरण सादर केले आहे . |
| ४ | अंदाजित किंमतीसाठी मागविलेल्या दरांच्या कंपनीचे नाव. | GE, Nidek/KLB, Zeiss, Appasamy, Opthrotronics, Opthoindia Inc, Alcon, Vison sales सविस्तर तपशील जोडलेला आहे . |
| ५ | सदर रकमेच्या विनियोगाचे हमीपत्र सर्व विश्वस्तांनी द्यावे . | प्रत्येक विश्वस्तांनी हमीपत्र स्टॅम्पपेपर वर सादर केले आहे |
| ६ | सदर यंत्रसामुग्री किमान १० वर्ष विकता येणार नाही किंवा दुस-या संस्थेला देता येणार नाही असे हमीपत्र. | हमीपत्र सादर केलेले आहे (AMC/CMC) |
| ७ | खरेदी करावयाच्या यंत्रसामुग्रीच्या देखभाल दुरूस्ती व्यवस्था/तरतुद. | सदर यंत्रसामुग्रीची दुरुस्ती देखभालीची जबाबदारी मॉ भवानी सेवा समितीने घेतली आहे त्याबाबत लेखी पत्र सादर केले आहे . |
| ८ | हॉस्पीटलच्या बॅलन्सशीटची पडताळणी केली असता संस्थानकडे मागणी केलेल्या खर्चाची पुर्तता करण्याइतपत आर्थिक स्थिती असल्याचे दिसून येते याबाबत खुलासा . | याबाबतचा खुलासा सादर केलेला नाही. |

त्यावर विचार करता, अतिदक्षता विभागासाठी म्हणून जी मागणी झाली आहे. ती इमारतीसाठी नसुन रु.११ लक्ष किंमतीच्या Portable shared system ICU मध्ये लागणाऱ्या (Ultra Sound) उपकरणाची आहे.

संस्थेचे सहसचिव श्री.नितीन अरासपुरे यांनी असा खुलासा केला की, ज्यावेळी आर्थिक मदतीची मागणी / प्रस्ताव श्री साईबाबा संस्थानकडे केला होता, त्याआगोदर पासुन सेवासमितीचे बांधकाम प्रगतीपथावर होते. ताळेबंदात शिल्लकेत दिसत असलेली रक्कम ही वरील बांधकामासाठी बहुतांश वापरण्यात आली. संस्थेने नागपुर सुधार प्रन्यास यांचेतर्फे दि.२१.०९.२०१८ रोजी Occupancy Certificate (भोगवटा प्रमाणपत्र) काही शर्तीवर मंजूर करण्यात आले आहे. छाननी समितीच्या आजच्या बैठकीमध्ये सर्व कागदपत्रांचे अवलोकन करुन व हमीपत्राचे आधारावरुन, श्री भवानी माता सेवा समिती, पुनापुर रोड, पारडी, नागपुर यांना "Equipment for Rediology Cardiology Department" यंत्रसामुग्री खरेदीसाठी लागणारे अर्थसहाय्य रु.२.३५ कोटी मात्र मागणीचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला. सदरचा प्रस्ताव मान्यतेसाठी महाराष्ट्र शासनाकडे पाठविणेत यावा. तसेच तो संबधीताकडे पाठविण्याची तजवीज करण्यात यावी. संचालकांचे हमीपत्र त्यांचेवर बंधनकारक राहील. व यंत्रसामुग्रीचा कुठल्याही प्रकारे दुरुपयोग झाल्यास व बेकायदेशीरपणे विक्री केल्यास, ती संचालक मंडळाची वैयक्तीक जबाबदारी धरण्यात येईल. याची जाणीव श्री भवानी माता सेवा समिती, नागपूर समिती सदस्यांना समक्ष देण्यात आली.

शासन निर्णय:- विधी व न्याय विभाग शासन निर्णय क्र. सासंवि १०१८/१७०२/प्र. क्र. १९४ /का.१६ दि. ०३.जानेवारी २०१९ अन्वये खालीलप्रमाणे शासन निर्णय पारीत झाला आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) अधिनियम -२००४ मधील कलम २१ (२) (एक) मधील तरतूदीनुसार श्री भवानी माता सेवा समिती संचलीत मॉ भवानी हॉस्पिटल, नागपुर यांना "Equipments for Eye, Rediology Cardiology Department" साठी रक्कम रुपये २.३५ कोटी इतके अर्थसहाय्य श्री साईबाबा संस्थानकडून देण्यास उपरोक्त शासन निर्णयान्वये खालील अटींच्या अधिन राहून मान्यता देण्यात आलेली आहे.

१) श्री साईबाबा संस्थानच्या अनुदानातून खरेदी करण्यासाठी प्रस्तावित केलेली यंत्रसामुग्री ही स्पर्धात्मक निविदा प्रक्रियेने पारदर्शकरित्या खरेदी करावी. सदर यंत्रसामुग्री प्रचलित बाजार किंमतीपेक्षा (Market rate) जास्त किंमतीने खरेदी करू नये. खरेदी प्रक्रियेच्या अभिलेखांची प्रत संस्थानला माहितीस्तव सादर करावी.

२) प्रस्तावित यंत्रसामुग्री खरेदी करण्यासाठी संस्थानकडून दिल्या जाणा-या अनुदानातून बचत झाल्यास सदर रक्कम संस्थानला परत करावी लागेल. तथापि अनुदानापेक्षा जास्त रक्कम खर्च झाल्यास वाढीव खर्च संस्थेला करावा लागेल.

३) धर्मादाय रुग्णालयासाठी असलेल्या शासनाचे नियमानुसार आर्थिक दृष्टया दुर्बल व अल्प उत्पन्न गटातील रुग्णांसाठी खाटा राखीव न ठेवल्यास संस्थानतर्फे देण्यात येणारे अनुदान वसुलपात्र राहील. याबाबत धर्मादाय आयुक्तांचे प्रमाणपत्र दरवर्षी संस्थानला सादर करावे लागेल.

४) सदर यंत्रसामुग्री श्री भवानी माता सेवा समितीस किमान १० वर्ष विकता येणार नाही किंवा कोणत्याही प्रकारे हस्तांतरण करता येणार नाही. यंत्रसामुग्री कार्यान्वित असलेबाबत तसेच वर्षभरात सदर यंत्रसामुग्रीचा लाभ घेतलेल्या रुग्णांच्या संख्येबाबतचे प्रमाणपत्र दरवर्षी एप्रिल महिन्यात संस्थानला सादर करावे लागेल.

५) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी अनुदान वाटप करण्यापूर्वी उपरोक्त यंत्र सामुग्री वापरण्यासाठी आवश्यक त्या मुलभुत सोयी - सुविधा व सदर यंत्रसामुग्री हाताळणारे कर्मचारवृंद आहेत किंवा नाहीत याची खातरजमा करून घ्यावी.

६) सदर श्री भवानी माता सेवा समितीने ज्या कामासाठी निधी दिला आहे त्याच कामासाठी निधी वापरणे आवश्यक आहे.

७) सदर यंत्राची दुरूस्ती देखभालीची जबाबदारी मॉ भवानी सेवा समितीने घेणे आवश्यक आहे.

८) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत उपलब्ध करून देण्यात येणा-या अर्थसहाय्याद्वारे खरेदी करण्यात येणारी यंत्रसामुग्री ज्या ठिकाणी बसविण्यात येणार आहे, त्या ठिकाणी दर्शनीभागावर "श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्याकडून अर्थसहाय्य" असा फलक लावण्यात येईल.

९) सदर अनुदानातुन यंत्र सामुग्री खरेदी केल्यानंतर खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र श्री भवानी माता सेवा समितीने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना सादर करणे आवश्यक राहिल.

१०) उपरोक्त अटी व शर्तीबरोबरच संस्थानतर्फे लागू करण्यात येणा-या इतर अनुषांगिक अटी व शर्तींचा समावेश असलेला करारनामा श्री भवानी माता सेवा समिती, चे मॉ भवानी माता हॉस्पीटल नागपुर यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्याशी एक महिना कालावधीत करून देणे बंधनकारक राहील. सदर करारनाम्याची प्रत शासनास सादर करण्यात यावी.

उपरोक्त शासन निर्णयातील अट क्रं. १० अन्वये श्री भवानी माता सेवा समिती, पारडी, नागपूर यांचे मॉ भवानी हॉस्पीटल नागपूर यांना "Equipments for Eye, Rediology Cardiology Department" साठी अर्थसहाय्य देतांना शिर्डी संस्थानतर्फे लागू करण्यात येणा-या अटी व शर्तीचा समावेश असलेला करारनामा करण्यात यावा, असा निर्णय झालेला आहे. त्यानुसार श्री भवानी माता सेवा समिती, पारडी, नागपूर यांचे मॉ भवानी हॉस्पीटल नागपूर यांचेशी करण्यात आलेल्या करारनाम्याच्या मसुदा खालीलप्रमाणे

:- करारनामा :-

करारनामा दिनांक दि. ०८.०१.२०१९

करारनामा लिहून घेणार :- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी<br>(पार्टी नं. १) ता. राहाता जि. अहमदनगर करिता व तर्फे<br>मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा<br>प्राधिकृत प्रतिनिधी

करारनामा लिहून देणार :- श्री हरिदास लक्ष्मणराव वाडीभस्मे<br>श्री भवानी माता सेवा समिती नागपुर यांचे,<br>(पार्टी नं . २ ) यांचे प्राधिकृत प्रतिनिधी

विधी व न्याय विभाग महाराष्ट्र शासन यांचा शासन निर्णय क्रं. सासंवि १०१८/१७०२/प्र. क्र. १९४/का.१६ दि. ०३.जानेवारी २०१८ नुसार श्री भवानी माता सेवा समिती संचलित मॉ भवानी हॉस्पीटल या रुग्णालयाला "Equipments for Eye, Rediology Cardiology Department" मध्ये (रेडिओलॉजी कलर डॉपलर मशीन, अतिदक्षता विभाग, डोळे तपासणी मशीन साठी) रक्कम रु. २,३५,००,०००/- इतके अर्थसहाय्य देण्याचा निर्णय घेतलेला आहे. विधी व न्याय विभाग यांचे शासन निर्णयानुसार श्री भवानी माता सेवा समिती यांचेशी करारानामा करून घेणे आवश्यक आहे. करारनाम्याच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे

अटी व शर्ती :-

१) पार्टी नं. २ यांनी श्री साईबाबा संस्थानच्या अनुदानातून खरेदी करण्यासाठी प्रस्तावित केलेली यंत्रसामुग्री, (रेडिओलॉजी कलर डॉपलर मशीन, अतिदक्षता विभाग, डोळे तपासणी मशीनची) पारदर्शकरित्या खरेदी करावी. निविदा प्रक्रिया ही स्पर्धात्मक प्रक्रियेने राबवावी. सदर यंत्रसामुग्री प्रचलित बाजार किंमतीपेक्षा (Market rate) जास्त किंमतीने खरेदी करू नये. खरेदी प्रक्रियेच्या अभिलेखांची प्रत संस्थानला सादर करणे बंधनकारक राहील.

२) प्रस्तावित यंत्रसामुग्री खरेदी करण्यासाठी संस्थानकडून दिल्या जाणा-या अनुदानातून बचत झाल्यास सदर रक्कम संस्थानला परत करणे पार्टी नं. २ यांचेवर बंधनकारक राहील. तथापि अनुदानापेक्षा जास्त रक्कम खर्च झाल्यास वाढीव खर्च पार्टी नं. २ यांना करावा लागेल.

३) धर्मादाय रुग्णालयासाठी असलेल्या शासनाचे नियमानुसार आर्थिक दृष्टया दुर्बल व अल्प उत्पन्न गटातील रुग्णांसाठी खाटा राखीव ठेवणे बंधनकारक राहील तसेच अल्पदरात/ इतर रुग्णांलयांच्या तुलनेत अत्यल्प दरात सेवा पुरविणे बंधनकारक राहील. याबाबतचा तपशील धर्मादाय आयुक्त कार्यालय यांचेमार्फत प्रमाणित करून संस्थानला सादर करावे, तसे न केल्यास सदर अनुदान वसुलपात्र राहील.

४) श्री भवानी माता सेवा समितीचे मॉ भवानी हॉस्पीटल यांना सदर यंत्रसामुग्री किमान १०वर्ष विकता येणार नाही किंवा कोणत्याही प्रकारे हस्तांतरण करता येणार नाही. यंत्रसामुग्री कार्यान्वित असलेबाबत तसेच वर्षभरात सदर यंत्रसामुग्रीचा लाभ घेतलेल्या रुग्णांच्या संख्येबाबतचे प्रमाणपत्र दरवर्षी एप्रिल महिन्यात संस्थानला सादर करणे बंधनकारक राहील.

५) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत देण्यात आलेला निधीचा वापर ज्या कामासाठी निधी दिला आहे त्याच कामासाठी निधी वापरणे बंधनकारक आहे. सदर निधी विनावापर ठेवल्यास

किंवा ज्या यंत्रसामुग्री खरेदीसाठी दिला आहे त्यासाठी न वापरल्यास निधी वितरणाच्या दिनांकापासून व्याजासह पार्टी नं. १ ला परत करणे पार्टी नं. २ वर बंधनकारक राहील.

६) सदर यंत्राची दुरूस्ती देखभालीची जबाबदारी मॉं भवानी सेवा समितीची राहील.

७) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत उपलब्ध करून देण्यात येणा-या अर्थसहाय्याद्वारे खरेदी करण्यात येणारी यंत्रसामुग्री ज्या ठिकाणी बसविण्यात येणार आहे, त्या ठिकाणीचे दर्शनीभागावर "श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्याकडून अर्थसहाय्य" असा कायमस्वरुपी दिसेल असा फलक लावणे बंधनकारक राहील.

८) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडून देण्यात आलेल्या अनुदानातुन यंत्र सामुग्री खरेदी केल्याचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे पार्टी नं. २ यांना बंधनकारक राहिल.

९) अनुदान दिलेल्या रकमेतून खरेदी केलेली यंत्रसामुग्रीसाठी इतर कोणत्याही संस्थेकडून अनुदान मागता/स्विकारता येणार नाही.

१०) यंत्रसामुग्रीचा कुठल्याही प्रकारे दुरूपयोग झाल्यास व बेकायदेशीरपणे विक्री केल्यास श्री भवानी माता सेवा समितीचे संचालक मंडळाची वैयक्तीक जबाबदारी राहील.

वरील अटी व शर्तीचा अंतर्भाव करारनाम्यात नमूद करण्यात आलेला होता.

उपरोक्त प्रमाणे करारनाम्याचा मसुद्यास मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०८.०१.२०१९ रोजीचे सभेत मान्यता दिल्याने श्री भवानी माता सेवा समिती, पारडी, नागपूर यांचे मॉं भवानी हॉस्पीटल नागपूर यांना रक्कम रु.२.३५ कोटी अदा करण्याची कार्यवाही करण्यात आली.

श्री भवानी माता सेवा समिती, पारडी, नागपूर यांचे मॉं भवानी हॉस्पीटल नागपूर यांना जा.नं.एसएसएसटी/वशी-लेखा-अनुदान/३२७/२०१९ दि.२७ एप्रिल २०१९ उपयोगिता प्रमाणपत्र व अहवाल सादर करणेबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार त्यांनी उपयोगिता प्रमाणपत्र व अहवाल दि. ११.०५.२०१९ सादर केला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे

त्यानुसार संस्थेने शासन निर्णयातील अटींस अधिन राहून उपयोगिता प्रमाणपत्र व अहवाल सादर केला आहे.

| **List of Equipment Purchased For Radiology Department** | | | | |
|---|---|---|---|---|
| EQUIPMENT | Qty | Name of Campany | Model | Purchase Amount |
| Radioloy Depar | | | | |
| UGC Machine | 1 | GE | E6 | |
| Cardiology Department | | | | |
| ECHO Machine | 1 | GE | Vivid T8 R2 | |
| Protable Shared System | | | | |
| ICU | 1 | GE | Logique V2 | 5900000 |
| CT Scan Machine | 1 | Siemens | Somatom Go Now | 11100000 |
| | | | | **17000000** |
| List if Equipment Purchased for EYE Department | | | | |
| Auto Refractor Keratometer | 1 | TopCon | TRK – 2P | 1020000 |
| Silt Lamp | 1 | TopCon | SL – 2G | 180000 |
| Eye OPD Chair & Electronic Vision Screen Trail Set + Frame | 1 | Appaswamy | Regular + Lite | 123200 |
| A Scan | 1 | Biomedix | Echorule Pro | 200000 |
| Op M icrroscope | 1 | Biomedix | Allegra 90 | 1381000 |
| Op table | 1 | Appaswamy | AAOT | 82600 |
| Flash autoclave | 1 | PSI Marketing | Truclava | 170000 |
| Hand Instrument | 1 | Vision Sales | | 145350 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| Surgical | | | | |
| Phaco Machine | 1 | Johnson & Johnson | Intutive Lite | 1500000 |
| Indirect opthalmoscope | 1 | Biomed Healthtech Pvt. Ltd. | Sigma 250 | 65000 |
| Non Contact Tonometer | 1 | Alka Surgical | MK3 | 103017 |
| Lensometer | 1 | TopCon | CL – 300 | 115000 |
| | | | | **5085167** |
| UPS | 1 | Neeshu Enterprises | | 1180000 |
| Higher End Cautery Machine | 1 | Ashankul Healthcare Solution | FX-8 | 540000 |
| | | | | 1720000 |
| | | | GRAND TOTAL | **2,38,05,167.00** |

श्री भवानी माता सेवा समिती संचलित मॉ भवानी हॉस्पीटल यांनी खालीलप्रमाणे माहिती सादर केलेली आहे.

| अ.न. | मागितलेली माहिती | पुर्तता केली आहे काय |
|---|---|---|
| १ | श्री साईबाबा संस्थानच्या अनुदानातून खरेदी करण्यासाठी यंत्रसामुग्री ही स्पर्धात्मक निविदा प्रक्रियेने पारदर्शकरित्या खरेदी करावी. खरेदी प्रक्रियेच्या अभिलेखांची प्रत संस्थानला माहितीस्तव सादर करावी. | संस्थेने खरेदी प्रक्रियेचा फक्त तुलनात्मक तक्ता सादर केला आहे. |
| २ | प्रस्तावित यंत्रसामुग्री खरेदी करण्यासाठी संस्थानकडून दिल्या जाणा-या अनुदानातून बचत झाल्यास सदर रक्कम संस्थानला परत करावी लागेल. तथापि अनुदानापेक्षा जास्त रक्कम खर्च झाल्यास वाढीव खर्च संस्थेला करावा लागेल. | संस्थानने दिलेल्या रकमेतून बचत झालेली नाही असे संस्थेने कळविले आहे. |
| ३ | धर्मादाय रुग्णालयासाठी असलेल्या शासनाचे नियमानुसार आर्थिक दृष्टया दुर्बल व अल्प उत्पन्न गटातील रुग्णांसाठी खाटा राखीव न ठेवल्यास संस्थानतर्फे देण्यात येणारे अनुदान वसुलपात्र राहील. याबाबत धर्मादाय आयुक्तांचे प्रमाणपत्र दरवर्षी संस्थानला सादर करावे लागेल. | शासकीय नियमानुसार आर्थिक दृष्टया दुर्बल व अल्प उत्पन्न गटातील रुग्णांसाठी एकूण २२ खाटा राखीव ठेवल्याचे, इतर रुग्णांच्या तुलनेत त्यांना अल्पदरात तसचे निःशुल्क सेवा देण्यात येत असल्याचे संस्थेने कळविले आहे. |
| ४ | सदर यंत्रसामुग्री श्री भवानी माता सेवा समितीस किमान १० वर्ष विकता येणार नाही किंवा कोणत्याही प्रकारे हस्तांतरण करता येणार नाही. यंत्रसामुग्री कार्यान्वित असलेबाबत तसेच वर्षभरात सदर यंत्रसामुग्रीचा लाभ घेतलेल्या रुग्णांच्या संख्येबाबतचे प्रमाणपत्र दरवर्षी एप्रिल महिन्यात संस्थानला सादर करावे लागेल. | माहे डिसेंबर २०१८ ते माहे एप्रिल २०१९ पर्यंत OPD, IPD, USG,ECHO मध्ये एकूण ३०,८७७ इतक्या रुग्णांनी लाभ घेतला असल्याचे संस्थेने कळविले आहे. |
| ५ | संस्थानमार्फत देण्यात आलेल्या अनुदानाचे कक्षाचे दर्शनी भागावर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्याकडून अर्थसहाय्य असा फलक लावण्यात येईल. | फलक लावण्यात आलेला असून त्याबाबतचे फोटो संस्थानला सादर केले आहे. |
| ६ | यंत्र सामुग्री खरेदी केलेल्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र. | संस्थेने उपयोगिता प्रमाणपत्र सादर केले आहे. |

उपरोक्त प्रमाणे माहिती संस्थेने सादर केली आहे.

श्री भवानी माता सेवा समिती, पारडी, नागपूर यांचे मॉ भवानी हॉस्पीटल नागपूर यांनी खरेदी केलेल्या साहित्याची यादी, किंमत सादर केली असल्याने सदर साहित्य / यंत्रसामुग्री ही “Equipments for Eye, Rediology Cardiology Department” शी सबंधीत आहे काय? तसेच सदर साहित्याची दर्शविलेली किंमत वाजवी आहे काय? याबाबत वैद्यकीय संचालक, श्री साईबाबा रुग्णालये यांचा अभिप्राय घेण्यात यावा असे ठरले. त्यानुसार दि. ०७.१२.२०१९ रोजी वैद्यकीय संचालक, श्री साईबाबा रुग्णालये यांचा अभिप्राय प्राप्त झाला आहे.

साईबाबा हॉस्पीटलचा अभिप्रायः- श्री भवानी माता सेवा समिती यांचे मॉ भवानी हॉस्पिटल नागपूरसाठी मागविलेल्या मशिनरीजचे दर व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी श्री साईबाबा संस्थान रुग्णालये

करिता मागविलेल्या दराची तुलना केली असता मॉ भवानी हॉस्पीटलसाठी मागविलेले दर वाजवी आहेत असे कळविले असून खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता सादर केलेला आहे.

| अन. | मशिनचे नाव | श्री भवानी माता सेवा समिती यांनी दिलेले दर | | श्री साईबाबा संस्थान करिता मागविलेले दर |
|---|---|---|---|---|
| | | कंपनीने कोटेशनमध्ये दिलेले दर | अंतिम दर | कोटेशन द्वारे मागविलेले दर |
| 1 | CT Scan Machine (Somatom go now) | 1,60,00,000 | 1,11,00,000 | 1,50,00,000 |
| 2 | 2d echo machine (vivid T8 R2) | 17,50,000 | 12,00,000 | 27,00,000+ GST extrs |
| 3 | Ultrasound machine (Voluson E 6 radiance) | 52,00,000 | 34,00,000 | 59,00,000+ GST extrs |
| 4 | Portable shared stystem (Logiq E R7) | 17,00,000 | 13,00,000 | 24,00,000+ GST extrs |
| 5 | Autorefractometer (TRK-2P) | 13,05,000 | 10,20,000 | 13,86,000 |
| 6 | Slit Lamp (SL-2G) | 4,37,500+GST extrs | 1,80,000 | 258720 |
| 7 | Eye OPD Chair & Electronic Vision Screen Trail Set + Frame (Regular+Lite) (Appaswamy) | 1,00,800 (Approximately) | 1,23,200 | 1,51,200+ GST extrs |
| 8 | Ascan (Echorule pro) | 2,10,000 | 2,00,000 | 2,25,000 |
| 9 | Op Microscope (Allegra 90) | 19,00,000 | 13,81,000 | 17,11,000 |
| 10 | Op Table (AAOT) (Approx) (Appaswamy) | 84,000 | 82,600 | 1,18,000 |
| 11 | Flash Autoclave (Truclava) | 2,07,680 | 1,70,000 | 2,52,300 |
| 12 | Hand Instrument Surgical (Vision Sales) | | 1,45,350 (2 PO) | 1,72,590 |
| 13 | Pheco Machine (Intutive Lite) (J & J) | 16,00,000 | 15,00,000 | 15,00,000+ GST |
| 14 | Indirect Opthlamoscope (Sigma 250) (Biomed) | 89,600 | 65,000 | 73,360 |
| 15 | Non Contact Tonometer (MK3) | 1,34,400 | 1,03,017 | 110000+ 12%GST extrs |
| 16 | Lensometer (CL-300) | 1,35,000 | 1,15,000 | 1,61,280 |
| 17 | UPS (20KVA, 30 KVA, 40 KVA) | 12,01,435 | 11,80,000 | 14,30,160 |
| 18 | Higher End Cautery ALAN-ESU Machine (MBXVP) | 8,17,600 | 5,40,000 | 8,40,000 |
| | **Total** | **3,28,73,015** | **2,38,05,167** | **3,43,89,610** |

विभागाचा अभिप्राय :-

१) श्री साईबाबा संस्थान तर्फे श्री भवानी माता सेवा समिती संचलित मॉ भवानी हॉस्पीटल यांना “Equipments for Eye, Rediology Cardiology Department” ची यंत्रसामुग्री खरेदी करण्यासाठी अर्थसहाय्य देण्यात आलेले आहे. संस्थेने माहिती पत्रकात सादर केलेली यंत्रसामुग्रीचे किंमतीबाबत संस्थानचे वैद्यकीय संचालक यांचा अभिप्राय मागविला असता त्यांनी दराची तुलना करून यंत्रसामुग्रीचे दर वाजवी असलेबाबत कळविले आहे.

२) वैद्यकीय संचालक, श्री साईबाबा संस्थान रुग्णालये यांनी दिलेल्या अभिप्रायावरुन उपरोक्त यंत्रसामुग्री श्री भवानी माता सेवा समितीने वाजवी दरात खरेदी केली असून उपयोगिता प्रमाणपत्र सादर केले असल्याने मा.तदर्थ समितीचे अवलोकनानंतर उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करण्यात येईल.

प्रस्ताव:- श्री भवानी माता सेवा समिती यांचे मॉं भवानी हॉस्पीटल नागपूर यांना "Equipments for Eye, Rediology Cardiology Department" साठी श्री साईबाबा संस्थान शिर्डीकडून रक्कम रु. २.३५ कोटी अनुदानाचे उपयोगिता प्रमाणपत्र अवलोकनार्थ व निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री भवानी माता सेवा समिती यांचे मॉं भवानी हॉस्पीटल नागपूर यांना "Equipments for Eye, Rediology Cardiology Department" साठी संस्थानकडून देण्यात आलेली रक्कम रु.२.३५ कोटी अनुदान रकमेबाबत त्यांनी सादर केलेल्या उपयोगिता प्रमाणपत्राचे अवलोकन करुन त्याची नोंद घेण्यात आली. तसेच सदरचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनाकडे सादर करण्यात यावे, असे ठरले.**

**(कार्यवाही- लेखाशाखा)**

---

**विषय नं.०५** **आर्थिक अनुदान मागणीकरीता आलेल्या अर्जाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडे अर्थसहाय्य मागणीकरीता दररोज, नोंदणीकृत संस्था, शासकीय कार्यालये, निमशासकीय संस्था, तसेच वैयक्तीकरित्या अर्ज येत असतात. सदरच्या अर्जांद्वारे, १) बांधकाम, २) आश्रमातील लोकांचा खर्च, ३) वाचनालयासाठी पुस्तके-फर्निचर, ४) दवाखान्यासाठी मशिनरी / औषधे, ५) संमेलने, स्पर्धा, शिबिरे, ६) दुष्काळी भागाकरीता चारा/अन्नधान्य/पाणी ७) मुलांच्या शिक्षणासाठी मदत, ८) विधवा/निराधार/अपंग यांना दैनंदिन खर्चासाठी मदत, ९) व्यवसाय सुरू करणेकरीता मदत, १०) मुलांचे लग्नासाठी मदत, ११) जळीत झाल्याने मदत, अशाप्रकारे अनेक कारणासाठी अनुदान मागणी केली जाते.

संस्थान अधिनियम तरतुद:- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिडी अधिनियम २००४ कलम १७ मधील (२)(ण) "मानव जातीचे कल्याण करणा-या किंवा आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल."

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, अधिनियम २००४ चे कलम २१(२) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या विविध प्रयोजनासाठी पुरेशा तरतूदी केल्यानंतर, विश्वस्तव्यवस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास अशा शिल्लक रक्कमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरण योग्य उत्पन्नाच्या तीस टक्कयापेक्षा अधिक नसेल एवढा भाग,समितीस वेळोवेळी खालील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरता व खर्च करता येईल.

कलम २१ (२) (एक) " छाननी समितीच्या शिफारसीनुसार व राज्य शासनाचे पूर्व मान्यतेने नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था, किंवा नोंदणीकृत सोसायटी यांचेकडून कोणतीही शैक्षणिक संस्था, क्रिडा अकादमी वा संस्था, सार्वजनिक वाचनालय, रूग्णालय, आधारगृह, किंवा इतर धर्मदाय अथवा धार्मिक संस्था, अथवा कला वा साहित्याशी संबंधित असलेली सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था, किंवा नोंदणीकृत सोसायटी यांची स्थापना व देखभाल करून घेणेसाठी, अशी तरतुद आहे.

संस्थान कडे दाखल झालेले अर्ज:- दि.०१.११.२०१९ ते ३१.१२.२०१९ कालावधीत आर्थिक अनुदान मागणी करीता आलेले अर्ज खालीलप्रमाणे-

| अ.नं. | अर्जदाराचा/ संस्थेचे नाव व पत्ता | अनुदान मागणीचे कारण | शेरा |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती पन्नाबेन नरेशकुमार सोनी | उदरनिर्वाह चालविणेसाठी | |
| २ | खुशी शैक्षणीक व सामाजीक ट्रस्ट, मुंबई | कलामहोत्सवा साहित्यासाठी | |
| ३ | क्षितीज मतिमंद मुलांची शाळा, डोंबिवली | शैक्षणीक उपक्रमासाठी | |
| ४ | शेतकरी बचाव कल्याणकारी बहूउद्देशीय संस्था, यवतमाळ | लघु सिंचन प्रकल्पासाठी | |
| ५ | जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कैनाड खरपडपाडा, डहाणू | शाळेसाठी हॉल व कंपाऊंडसाठी | |
| ६ | महाराष्ट्र पशु व मत्स विज्ञान विद्यापीठ | पशुसंवर्धनासाठी | |

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | दि नॅशनल असोशिएन फॉर द ब्लाईंड नाशिक | वृद्धाश्रमासाठी मदत | |
| ८ | अपंग एकता विकास सेवा संस्था, रत्नागिरी | अपंगासाठी मदत | |
| ९ | जिद्द अपंग सामाजिक संस्था, मुरबाड | अपंगासाठी मदत | |
| १० | श्री भास्करराव म्हस्के | क्रिकेट मैदानासाठी | |
| ११ | ओम श्री साईनाथ बाबा सेवा संस्थान, गोंदिया | मंदीर शेजारील तलावाचे सुशोभिकरणासाठी | |
| १२ | रामचंद्र प्रतिष्ठान | व्यसनमुक्ती, महिला सबलीकरण | |
| १३ | निशांत नामदेव | राम मंदीरासाठी | |
| १४ | Be The Change, Ahmedabad | Digital Learning | |
| १५ | Be The Change, Ahmedabad | Digital Learning | |
| १६ | श्री राहूल शर्मा | शैक्षणीक मदत | |
| १७ | श्री प्रदीप कोडींबा कांबळे, सातारा | कर्ज भरण्यासाठी | |
| १८ | श्री भास्करराव म्हस्के | क्रिकेट मैदानासाठी | |
| १९ | श्री भास्करराव म्हस्के | क्रिकेट मैदानासाठी | |
| २० | श्री व्ही. अरुणाचलम | मंदीरासाठी मदत | |
| २१ | श्री व्ही. अरुणाचलम | मंदीरासाठी मदत | |
| २२ | कु. प्रियंका पोपट सुतार, सातारा | शैक्षणीक मदत | |
| २३ | श्रीमती रेखा मुखर्जी | आईच्या वैद्यकीय उपचारासाठी | |
| २४ | श्री चिंतामणी पार्श्वनाथ अल्पसंख्याक बहूउद्देशीय विकास संस्था, मुर्तीजापूर | सामाजीक कार्यासाठी | |
| २५ | आदेश्वर वैदिक संस्कार विवाह सेवा समिती, इंदोर | आर्थिक दुर्बल घटकांसाठी | |
| २६ | मा. श्री सदाशिव लोखंडे, लोकसभा सदस्य | पुरग्रस्तांना मदत | मा. श्री सदाशिव लोखंडे साहेब, लोकसभा सदस्य शिर्डी यांचे पत्र |
| २७ | श्री करविरभद्रेश्वर देवस्थान ट्रस्ट | मंदीर बांधकाम | |
| २८ | श्री राहूल शर्मा, | शैक्षणीक मदत | |
| २९ | श्री दिनेश परमानंद पगारे, खरगोन | कर्ज भरण्यासाठी | |
| ३० | श्री मीर आबेद अली, औरंगाबाद | शैक्षणीक मदत | |
| ३१ | तक्षवी चॅरिटेबल ट्रस्ट, सांगली | कॅन्सरग्रस्तांसाठी मदत | |
| ३२ | साईबाबा सामाजिक संस्था, ठाणे | गोशाळा मदत | |
| ३३ | ग्रामपंचायत कानळद | घाट बांधण्यासाठी | |
| ३४ | श्री सुशील मधुकर शिंदे, उल्हासनगर | दंड रक्कम भरण्यासाठी | |
| ३५ | श्रद्धा सबुरी मित्र मंडळ, पेण | मंदीर बांधकाम | |
| ३६ | श्री प्रथमेश प्राणेश सोनदूर, पुणे | शैक्षणीक मदत | |
| ३७ | श्री रिहान आर. बागवान, औरंगाबाद | शैक्षणीक मदत | |
| ३८ | आधार बहूउद्देशीय सेवा मंडळ, पंढरपूर | सार्वजनिक विवाहसोहळा मदत | |
| ३९ | सेवा भारत फौंडेशन, ओरिसा | रुरल डेव्हलपमेंटसाठी | |
| ४० | भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम सेवाभावी संस्था, शिर्डी | सामुदायीक विवाह सोहळा | |
| ४१ | सौ. शैला सुरेश कासार, संगमनेर | आर्थिक मदत | |
| ४२ | सौ. वर्पे सविता चांगदेव, शिर्डी | मुलाचे शिक्षणासाठी | |
| ४३ | श्री किसन दगडू मकासरे, नेवासा | चर्च बांधकामासाठी | |

| | | | |
|---|---|---|---|
| ४४ | श्री राजाराम साहू | इमारत बांधकामासाठी | |
| ४५ | सौ छाया सूहास झालटे, अमरावती | शैक्षणीक मदत | |
| ४६ | श्री सुरेश ए. गायकवाड, राहाता | वैद्यकीय मदत | |
| ४७ | श्री शिवराम आर. होके, बीड | शैक्षणीक मदत | |
| ४८ | ग्रामपंचायत कार्यालय चापडगांव | विकासासाठी | |
| ४९ | सेवा भारत फौंडेशन, ओरिसा | रुरल डेव्हलपमेंटसाठी | |
| ५० | स्नेहालय सामाजिक विश्वस्त संस्था सोलापूर | शाळा इमारत बांधकाम | |
| ५१ | संतोष पंढरीनाथ खालकर, लोणी, राहाता | बॅंक कर्ज भरण्यासाठी | |

विभागाचा अभिप्राय :-

१) वैयक्तीक आर्थिक मदत देणेबाबत अधिनियमात स्पष्ट तरतूद नाही.

२) आर्थिक मदत मागणीकरीता दिलेल्या अर्जाबाबतची सद्यस्थितीची अर्जदार विचारणा करीत असतात. त्याबाबत संबंधितांना त्यांच्या "अर्जाबाबतची सद्यस्थिती कळविणेबाबतच्या विषयावर मा.त्रिसदस्य समितीचे दि.०८.१०.२०१३ रोजीचे सभेत निर्णय क्र.७६६ अर्जदारास अर्जाची सद्यस्थिती कळविण्याची आवश्यकता नाही" असे ठरले आहे. "

३) अधिनियम २००४ मध्ये ज्या बाबीसाठी अनुदानची स्पष्ट तरतूद आहे संस्थानने त्यासाठी योजना तयार केलेली आहे व अर्ज मागविले आहेत त्याच अर्जाचा अनुदान देतांना विचार व्हावा असे नम्र मत आहे.

प्रस्ताव:- दि.०१.११.२०१९ ते ३१.१२.२०१९ या कालावधीत आर्थिक अनुदान मागणीबाबत आलेले अर्ज अवलोकनार्थ व नस्तीबंद करण्याचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५०** **सदरचा विषय स्थगित ठेवण्यात आला.**

**(कार्यवाही- लेखाशाखा)**

---

**विषय नं.०६** **संस्थानकरीता तज्ञ जी.एस.टी.कर सल्लागार (GST Consultant) नेमणूक करणेकामी संस्थानच्या संकेतस्थळावर माहिती प्रसिध्द करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानमध्ये दैनंदिन कामकाजाचा व्याप दिवसेंदिवस वाढत असुनत्या अनुषंगाने आर्थिक व्यवहारात व कामकाजातही मोठया प्रमाणात वाढ झाली आहे. वित्त विभाग भारत सरकार यांनी वस्तु व सेवा कर (GST)हा कर दि.१ जुलै,२०१७ पासुन नव्यानेच लागु केलेला आहे. या कायद्यातील नव-नविन तरतुदींचा प्रभाव दैनंदिन आर्थिक कामकाजात पडत असतो. संस्थानचे आर्थिक व्यवहार संख्येने व रक्कमेने मोठे आहेत. लागु असलेल्या करप्रणालीनुसार व वेळावेळी नव्याने पारित करण्यात आलेल्या कर प्रणालीस अनुसरुन आर्थिक व्यवहार अचुकपणे होण्याच्या दृष्टीने व वैधानिक लेखापरिक्षणामध्ये आक्षेपांचे प्रमाण कमी होण्याच्या दृष्टीने आणि आर्थिक व्यवहारांत पारदर्शकता येऊन वेळीच त्याच्यात सुधारणा करुन तात्काळ कार्यवाही होऊन अंतर्गत नियंत्रण सक्षम राहणेकामी, तज्ञ कर सल्लागारांची नेमणुक करण्यात येतात. अशाप्रकारे मा.व्य.स. निर्णय क्र.२२५(२)/दि.०४.०४.२०१८ अन्वये मे.एस.जी.अंदाणी ॲन्ड कं.चार्टर्ड अकौंटंटस् अहमदनगर यांची वार्षिक एकत्रित रु.३,००,०००/- फी वर दि.०१.०८.२०१७ ते दि.३१.०७.२०१९ या कालावधी करिता नियुक्ती करण्यात आली होती. मा.व्य.स. निर्णय क्र.१७९/दि.०६.०६.२०१९ अन्वये दि.०१.०७.२०१९ ते दि.३१.०३.२०२० या कालावधीकरिता पुर्वीच्याच अटी शर्तीवर मुदतवाढ देण्यात आली होती.

जीएसटी कर सल्लागार यांची नेमणुकांची मुदत दि.३१.०३.२०२० अखेर पुर्ण होत असल्याने पुढील कालावधी करिता वस्तु व सेवा कर (GST) कर सल्लागार (Tax Consultant) नेमणुक करणेकामी नामांकित लेखापरिक्षण संस्थांकडून साधारणतः रु.१०० कोटींचे वर वार्षिक उलाढाल असलेल्या संस्था/कंपन्यांचे जीएसटी कर सल्लागार म्हणुन काम करण्याचा अनूभव असलेल्या लेखापरिक्षण संस्थांकडून बंद पाकिटामध्ये ते पुर्णवेळ पुरविणार असलेल्या कर्मचा-यांची शैक्षणिक पात्रता व अनुभव यांची माहिती व त्याकरिता वार्षिक अपेक्षित मानधन/फिसह अर्ज मागविता येतील.मुदतीत आलेल्या अर्जांची मा.खरेदी समितीचे सभेसमोर उघडण्यात येऊन त्यामधील पात्र लेखापरिक्षण संस्थांच्या फिचा तुलनात्मक तक्ता मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर करता येईल.

तरी दि.०१.०४.२०२० पासुन साधारणः तीन वर्षे कालावधीकरिता जीएसटी कर सल्लागार (GST Consultant) नियुक्तीकरिता संस्थानचे संकेतस्थळावर माहिती प्रसिध्द करुन, उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करुन, जीएसटी कर सल्लागार लेखापरिक्षण संस्थेची नेमणुक करण्यास मान्यता मिळणेकामी सदर प्रस्ताव मा.तदर्थ समितीपुढे सादर.

**निर्णय क्र.५१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानकरीता तज्ञ जी.एस.टी.कर सल्लागार (GST Consultant) नेमणूक करणेकामी साधारणतः रु.१०० कोटींचे वर वार्षिक उलाढाल असलेल्या तसेच संस्था/कंपन्यांचे जीएसटी कर सल्लागार म्हणुन काम करण्याचा अनूभव असलेल्या नामांकित लेखापरिक्षण संस्थांकडून बंद पाकिटामध्ये ते पुर्णवेळ पुरविणार असलेल्या कर्मचा-यांची शैक्षणिक पात्रता व अनुभव यांची माहिती व त्याकरीता अपेक्षित वार्षिक मानधन/फी सह अर्ज मागविणेस मान्यता देण्यात आली. तसेच मुदतीत प्राप्त झालेले अर्ज खरेदी समितीचे सभेसमोर उघडण्यात येऊन त्यामधील पात्र लेखापरिक्षण संस्थांच्या फीचा तुलनात्मक तक्ता मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर सादर करण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- लेखाशाखा)**

---

**विषय नं.०७** **केंद्र शासनामार्फत चलनातुन बाद करण्यात आलेल्या परंतु संस्थान व्यवस्थापनाकडे जमा होत असलेल्या रु.१०००/- व रु.५००/- च्या चलनी नोटांबाबत.**

**प्रस्ताव-** मा.वित्त विभाग, भारत सरकार यांनी दि.०८ नोव्हेंबर २०१६ रोजीचे शासन निर्णयानुसार रु.१०००/- व रु.५००/- मुल्यांच्या जुन्या चलनी नोटा व्यवहारातून बाद (बंद) केलेल्या आहेत. तसेच दि.०८ नोव्हेंबर २०१६ ते दि.३० डिसेंबर २०१६ अखेर सदर नोटांची माहिती देऊन राष्ट्रीयकृत बॅंके जमा करण्यास सवलत दिली होती. त्यास अनुसरुन प्राप्त झालेल्या व बॅंकेत जमा केलेल्या रकमेची माहिती खालीलप्रमाणे :-

१. दि.०८.११.२०१६ ते दि.३०.१२.२०१६ या कालावधीत साईभक्तांकडुन दक्षिणापेटीमध्ये रु.६,४६,२०,५००/-इतकी रक्कम प्राप्त झाली असून संस्थानचे बॅंक खाते असलेल्या राष्ट्रीयकृत बॅंकेमध्ये जमा करण्यात आली आहे.

२. दि.३१.१२.२०१६ ते दि.३१.१२.२०१९ अखेर दक्षिणापेटीमध्ये रु.१०००/- च्या रु.१०,२०,८०००/- व रु.५००/- च्या रु.१,८३,६८,०००/- असे एकुण रु.२,८५,७६,०००/- रक्कम व्यवहारातुन बंद करणेत आलेल्या नोटांच्या स्वरुपात प्राप्त झाली असुन विहीत पद्धतीने ईन-कॅमेरा दक्षिणापेटी मोजणीमध्ये मोजणी करण्यात येऊन सिलबंदस्वरुपात संस्थानचे स्ट्रॅांगरुममध्ये साठविली आहे.

चलनातून बाद झालेल्या नोटासंबंधीत सद्यस्थिती मा.व्यवस्थापन समितीचे दि.२०.११.२०१८ रोजीचे सभेसमोर अवलोकनार्थ सादर करण्यात आली होती. त्यावर निर्णय क्र.६९९ अन्वये,"केंद्र शासनामार्फत चलनातून बाद करण्यात आलेल्या रु.१०००/- व रु.५००/- च्या जुन्या नोटा स्विकारणेबाबत रिझर्व्ह बॅंकेला निर्देश देण्यासाठी मा.उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल करुन मा.न्यायालयाचे निर्देशानुसार कार्यवाही करण्यात यावी, असे ठरले. तसेच याप्रकरणी मा.अॅड.मोहन जयकर यांचे मार्गदर्शनाखाली याचिका दाखल करणेस व त्यासाठी येणा-या अनुषंगीक खर्चास मान्यता देण्यात आली."

मा.व्यवस्थापन समितीच्या निर्णयास अनुसरुन मा.विश्वस्त श्री.मोहन जयकर यांनी मे.जुन्नरकर अॅण्ड असोसिएटस्, मुंबई येथे रिट अर्ज दाखल करणेबाबत कागदपत्रांची जमवाजमव केली आहे. दरम्यानच्या कालावधीत दि.१३.१२.२०१८ रोजीचे मा.विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र प्राप्त झाले आहे. त्यामध्ये, निश्चलनीकरणानंतर चलनातून बाद झालेल्या जुन्या रु.१०००/- व रु.५००/- च्या नोटासंदर्भात केंद्र शासनाने अद्याप कोणताही निर्णय घेतलेला नाही. त्यामुळे सद्यस्थितीत चलनातून बाद झालेल्या व आपल्या देवस्थानकडे असलेल्या जुन्या नोटासंदर्भात कोणतीही कार्यवाही करण्यात येऊ नये" असे कळविण्यात आले आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०.०१.२०१९ रोजीचे सभेसमोर चलनातून बाद झालेल्या नोटासंबंधीत सद्यस्थिती अवलोकनार्थ सादर करण्यात आली होती. त्यावर निर्णय क्र.८० अन्वये,"केंद्र शासनामार्फत चलनातून बाद करण्यात आलेल्या जुन्या रु.१०००/- व रु.५००/- च्या नोटा संबंधीच्या कायद्यामध्ये एकुण १० पेक्षा अधिक जुन्या नोटा बाळगणा-या विरुद्ध त्याच्याकडील जुन्या चलनातील रकमेच्या पाच पटीपर्यंत दंड आकारण्याची तरतुद आहे. सदर तरतुद शासनाच्या निदर्शनास आणुन देऊन शासनाचे पुन्हा मार्गदर्शन घ्यावे, असे ठरले."

दि.२८ फेब्रुवारी २०१७ रोजी प्रकाशित भारत सरकारच्या राजपत्रामध्ये (The Gazette of India) मध्ये चलनातून बाद करण्यात आलेल्या जुन्या रु.१०००/- व रु.५००/- च्या नोटा बाळगणा-या विरुद्ध खालीलप्रमाणे दंडाची तरतुद नमुद केली आहे.

Sr.No.7 - Penalty for Contravention of section 5, "Whoever contravenes the provisions of section 5 shall be punishable with fine which may extend to ten thousand rupees or five times the amount of the face value of the specified bank notes involved in the contravention, whichever is higher."

मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयास अनुसरुन चलनातून बाद करण्यात आलेल्या जुन्या रु.१०००/- व रु.५००/- च्या नोटा बाळगणा-या विरुद्ध भारत सरकारच्या राजपत्रात उपरोक्त असलेली दंडाची तरतुद शासनाच्या निदर्शनास आणुन देण्यासाठी अवलोकनार्थ व निर्देश होणेकामी दि. १८/०३/२०१९ अन्वये मा.प्रधान सचिव, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांना पत्राने कळविण्यात आलेले आहे. परंतु शासनाकडून त्याबाबत अद्यापपोवेतो कुठलेही निर्देश प्राप्त झालेले नाही.

आज मितीस, म्हणजेच दि.३१.१२.२०१६ ते दि.३१.१२.२०१९ अखेर दक्षिणापेटीमध्ये रु.१०००/- च्या रु.१०,२०,८०००/- व रु.५००/च्या रु.१,८३,६८,०००/- असे एकुण रु.२,८५,७६,०००/- रक्कम व्यवहारातुन बंद करणेत आलेल्या नोटांच्या स्वरुपात प्राप्त झाली असुन विहीत पद्धतीने ईन-कॅमेरा दक्षिणापेटी मोजणीमध्ये मोजणी करण्यात येऊन सिलबंद स्वरुपात संस्थानचे स्ट्रॅाग रुममध्ये साठविली आहे.

तरी, सदरचा विषय मा.तदर्थ समिती समोर अवलोकनार्थ व पुढील निर्देश होणेकामी सविनय सादर.

**निर्णय क्र.५२** **सदरचा विषय स्थगित ठेवण्यात आला.**

**(कार्यवाही- लेखाशाखा)**

---

**विषय नं.०८** **संस्थानचे साईनगर कर्मचारी वसाहती लगतचे सर्व्हे नं.१२५ पै. व १२६ पै.चे बाजुने संरक्षक भिंत बांधकामाचे ठेकेदार सिध्देश्वर तुकाराम मुरमुटे, शिर्डी यांचे दुसरे व अंतिम देयकाची रक्कम रु.३५,९८,२३४/-मात्र मंजुर होऊन त्यापैकी निव्वळ देय रक्कम रु.६,६७,९५८/-मात्र ठेकदार यांना आदा करणेस मंजुरी देणे.**

**प्रस्ताव-** संस्थानचे साईनगर कर्मचारी वसाहतीलगतचे सर्व्हे नं.१२५पै. व १२६ पै. चे बाजूने संरक्षक भिंतीचे बांधकाम ठेकेदार सिद्धेश्वर तुकाराम मुरकुटे, शिर्डीयांचेमार्फतकरणेत आले आहे. ठेकेदार यांनी सदरहु कामाचेरु.४०,७०,५५०/-मात्र रकमेचे दूसरे व अंतिम बिल सादर केले आहे.सदर बिलाची इकडीलविभागामार्फततपासणीकरणेतआली असुन बिलाची एकूण रक्कम (Gross value of work executed) रु.३५,९८,२३४/-मात्र इतकी होत आहे.ठेकेदार यांना अंतीम बिल अदा करणेकामी मा.व्यवस्थापन समितीची मान्यता मिळणेसाठीप्रस्ताव खालीलप्रमाणे सादर करणेत येत आहे.

| | |
|---|---|
| कामाचे नांव | संस्थानचे साईनगर कर्मचारी वसाहतीलगतचे सर्व्हे नं.१२५ पै. व १२६ पै. चे बाजूने संरक्षक भिंतीचे बांधकाम करणे. |
| ठेकेदाराचे नांव | सिद्धेश्वर तुकाराम मुरकुटे, शिर्डी |
| कार्यादेशक्रमांक व दिनांक | जा.क्र.एसएसएसटी/बांधकाम/४४३७/२०१८ दि.०७/१२/२०१८ |
| मंजूरनिविदा रक्कम | रु.४१,४७,३८५/- |
| मा.व्यवस्थापन मंडळ निर्णय क्रमांक व दिनांक | नि.क्र ६७८(०८) दि.०१/११/२०१८ |
| पहीलेव अंतिम बिलाची रक्कम | रु.३५,९८,२३४/- |
| आजपर्यंतअदा केलेली रक्कम | रु.२९,३०,२७६/- |
| मंजूरनिविदा रकमेपेक्षा कमी अथवा जास्त झालेला खर्च | रु.५,४९,१५१/- कमी |
| करारनाम्यानुसारकाम पूर्ण करण्याची मूदत | सहा महिने दि.२१/०६/२०१९ |
| प्रत्यक्षकाम पूर्ण झाल्याचा दिनांक | दि.२१/०७/२०१९ |

विषयांकीत संरक्षक भिंतीचे बांधकाम ठेकेदार सिद्धेश्वर तुकाराम मुरकुटे यांना सदरकाम पुर्ण करण्यास विहीत मुदतीपेक्षा ३० दिवसांचा विलंब झालेला असल्याने निविदा शर्तीनुसार प्रती दिवस रु.१,०००/- प्रमाणे झालेल्या ३० दिवसांच्या विलंबापोटी रु.३०,०००/- दंड आकारणी करणेत आली आहे. सदरहु दंड आकारणीची

रक्कम व यापुर्वी दिलेली रक्कम वजा जाता ठेकेदार यांना उर्वरीत रक्कम रु.६,६७,९५८/-मात्र देय होते.तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीचे दि.२१/०८/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४४९ मध्ये खालीलप्रमाणे नमूद आहे.

“..तसेच प्रत्येक कामाचे अंतिम बिल आदा करणेपुर्वी पुर्ण झालेल्या कामाची प्रशासकीय अधिकारी यांचे मार्फत पाहणी करण्यात यावी, असे ठरले.” त्यानुसार प्रशासकीय अधिकारी श्री. एस. व्ही. गमे यांनी सदरहु कामाची पाहणी केली आहे.

प्रस्ताव: तरी संस्थानचे साईनगर कर्मचारी वसाहतीलगतचे सर्व्हे नं.१२५पै. व १२६ पै.चे बाजूने संरक्षक भिंतीचे बांधकाम करणेसाठी ठेकेदार सिद्धेश्वर तुकाराम मुरकुटे, शिर्डी यांना दुसरे वअंतिम देयकाची एकूणरु.३५,९८,२३४/-मात्र रक्कम मंजुरहोवून त्यापैकी निव्वळ देय रक्कम रु.६,६७,९५८/- मात्र ठेकदार यांना आदा करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.५३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे साईनगर कर्मचारी वसाहती लगतचे सर्व्हे नं.१२५ पै. व १२६ पै.चे बाजुने संरक्षक भिंत बांधकामाचे एकुण बिलाची रक्कम रु.३५,९८,२३४/-मात्र मंजुर करण्यात येऊन त्यापैकी निव्वळ देय रक्कम रु.६,६७,९५८/-मात्र सदर कामाचे ठेकेदार सिध्देश्वर तुकाराम मुरकुटे, शिर्डी यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.०९** **सन २०२०-२१ या वार्षिक कालावधीत संस्थानचे १२३ वाहनांचा विमा नुतनीकरण करणेकामी राष्ट्रीयकृत विमा कंपन्यांकडून दरपत्रके मागविणेस व याकामी येणारे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुदः- कलम १७ (१) मध्ये, “राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधिन राहुन संस्थान विश्वस्तव्यवस्थेची मालमत्तेची व कामाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, भक्तगंणांना आवश्यकत्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये, विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करणेसाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे ही समितीची कर्तव्ये असतील ,” असे नमुद केलेले आहे.

कलम १७ (२) (झ) मध्ये, “सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील असे नमुद केलेले आहे.

प्रस्ताविक:- सन २०१९-२० या आर्थिक वर्षात संस्थान वाहनांचा वार्षीक कालावधी विमा नुतणीकरण मा.व्यवस्थापन समिती निर्णयक्रमांक १४० नुसार तसेच ऑड कालावधीचा विमा नुतणीकरण मा.व्यवस्थापन समिती निर्णयक्रमांक३४४ (२) नुसार करण्यात आलेले आहे.

सन२०१९-२० या वर्षी १३५ वाहनांना विमा नुतणीकरणा करीता आलेल्या खर्चाची तपशिलवार माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ.न. | तपशिल / कालावधी | | विमा कंपनी | वाहन संख्या | विमा हप्ता रक्कम (रू.) |
|---|---|---|---|---|---|
| १. | सन २०१९-२०२० या कालावधी करीता वार्षीक विमा | | युनाइटेड इंडिया इन्शुरेन्स कं. लि. शिर्डी | ११० वाहने | १९,९४,०००.००/- |
| २. | नविन वाहनांचा सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षातील ऑड कालावधी संपुष्टात येणारा विमा ३१/०३/२०२० पर्यंत करणे | १ | नेशनल इंश्योरेन्स क. लि. शाखा-कोपरगांव | ५ वाहने | १,४६,०५०.००/- |
| | | २ | दि.ओरीएन्टल इंश्योरेंन्स क. लि. शाखा-शिर्डी | ५ वाहने | ४७,३९०.०० |
| | | ३ | युनाइटेड इंडिया इन्शुरेन्स कं.लि. -नाशिक रोड | १५ वाहने | ११,१७,०६५.०० |
| | | | **एकुण** | **१३५ वाहने** | **३३,०४,५०५.००/-** |

उपरोक्त प्रमाणे सन २०१९-२० मधील वाहन विभागाकडील १३५ वाहनाचे विमा नुतणीकरणा करीता एकुण रक्कम रू.३३,०४,५०५/- /-(अक्षरी रक्कम रु.तेहतीसलाख चार हजार पाचशे पाच मात्र ) खर्च आलेला आहे.

सध्या वाहन विभागाकडे असलेली १२३ वाहनांचा दि.०१/०४/२०२०ते दि.३१/०३/२०२१ या कालावधीतील विमा नुतनीकरण करणे आवश्यक आहे.या वाहनांची तपशिलवार माहिती खालीलप्रमाणे आहे.

अ) दि.०१.०४.२०२० ते दि.३१.०३.२०२१अखेर विना घसारा (Zero depreciation)विमा करावयाची वाहने.

| अ.न. | वाहन क्रमांक | वाहनकंपनी | वाहन प्रकार | आय. डी .व्ही. |
|---|---|---|---|---|
| १ | MH17 BV 1510 | टोयोटा अल्टीस | कार्यालयीन वाहन | १३,३५,१७२.०० |
| २ | MH17 BV 3526 | इनोव्हा क्रिस्टा | कार्यालयीन वाहन | ९,५५,४०६.०० |
| ३ | MH-17-BD-5181 | मारुती इकोॲम्ब्युलन्स | रुग्णवाहीका वाहन | २,४१,२९८.०० |
| ४ | MH-17-BD-5601 | बोलेरो ॲम्ब्युलन्स | रुग्णवाहीका वाहन | ४,०४,४४१.०० |
| ५ | MH17 BD 9933 | कार्डीयाक ॲम्ब्युलन्स | रुग्णवाहीका वाहन | १२,४६,५००.०० |
| ६ | MH17 BY 0263 | भारत बेंच एसी बस | प्रवासी एसी बस | १९,६०,१०४.०० |
| ७ | MH 17 CC 1918 | TVS मोटारसायकल | दुचाकी वाहन | १,४१,९४२.०० |
| ८ | MH-17 BV-7297 | इनोव्हा क्रिस्टा | कार्यालयीन वाहन | १४,२५,०००.०० |
| ९ | MH17 BV-7306 | इनोव्हा क्रिस्टा | कार्यालयीन वाहन | १४,२५,०००.०० |
| १० | MH17 BY 1535 | महेंद्रा पिकअप | मालवाहतुक वाहन | ४,४०,०००.०० |
| ११ | MH 17 BY 1536 | महेंद्रा पिकअप | मालवाहतुक वाहन | ४,५०,०००.०० |
| १२ | MH 17 BV8588 | महेंद्राबोलेरो + | कार्यालयीन वाहन | ५,५०,०००.०० |
| १३ | MH 17 BV8589 | महेंद्राबोलेरो + | कार्यालयीन वाहन | ५,५०,०००.०० |
| | | | **एकुण-** | **१,११,२४,८६३.००** |

**ब.)** दि.०१.०४.२०२० ते दि.३१.०३.२०२१ अखेर फुल विमा (पॅकेज पॉलीसी)करावयाची वाहने

| अ.न. | वाहन क्रमांक | वाहनकंपनी | वाहन प्रकार | आयडीव्ही |
|---|---|---|---|---|
| १ | MH-17-AE-3801 | टाटा नॅनो | कार्यालयीन वाहन | ५०,०००.०० |
| २ | MH-17-AJ-1691 | स्विफ्ट डिझायर | कार्यालयीन वाहन | २,२५,०००.०० |
| ३ | MH-17-AJ-9899 | टोयोटा इनोव्हा | कार्यालयीन वाहन | ५,२५,०००.०० |
| ४ | MH-17-AJ-8889 | टोयोटा इनोव्हा | कार्यालयीन वाहन | ५,२५,०००.०० |
| ५ | MH-17-AJ-2651 | महिंद्रा बोलेरो | कार्यालयीन वाहन | २,३५,०००.०० |
| ६ | MH-17-AJ-2951 | महिंद्रा **XUV** | कार्यालयीन वाहन | ३,००,०००.०० |
| ७ | MH-17-AZ-5015 | महिंद्रा स्कॉर्पिओ | कार्यालयीन वाहन | ४,००,०००.०० |
| ८ | MH-17-BS-0301 | महिंद्रा T.U.V.300 | कार्यालयीन वाहन | ४,००,०००.०० |
| ९ | MH-17-AG-1016 | कार्डीयाकॲम्ब्युलन्स | रुग्णवाहीका वाहन | ४,५०,०००.०० |
| १० | MH-17-BD-1991 | मारुती इकोॲम्ब्युलन्स | रुग्णवाहीका वाहन | ९०,०००.०० |
| ११ | MH-17-BD-1992 | मारुती इकोॲम्ब्युलन्स | रुग्णवाहीका वाहन | ९०,०००.०० |
| १२ | MH-17-BD-0889 | मोबाईल मेडीकल व्हॅन | रुग्णवाहीका वाहन | ८,५०,०००.०० |
| १३ | MH-17-BD-2248 | एस.एम.एल. इसुझू ॲम्ब्युलन्स | रुग्णवाहीका वाहन | ६,००,०००.०० |
| १४ | MH-17-BD-2249 | मारुती इकोॲम्ब्युलन्स | रुग्णवाहीका वाहन | २,००,०००.०० |
| १५ | MH-15-EF-0596 | फोर्स मोटार्स टेम्पो ट्रॅव्हलर | रुग्णवाहीका वाहन | ५,९५,०००.०० |
| १६ | MH-17-BD-2442 | तवेराॲम्ब्युलन्स | रुग्णवाहीका वाहन | ३,७०,०००.०० |
| १७ | MH-17-C-8851 | टाटा-1510 स्कुलबस | स्कुलबसवाहन | २,२५,०००.०० |
| १८ | MH-17-K-9371 | टाटा-1510 स्कुलबस | स्कुलबसवाहन | २,५०,०००.०० |
| १९ | MH-17-K-9370 | टाटा-1510 स्कुलबस | स्कुलबसवाहन | २,५०,०००.०० |
| २० | MH-17-T-8501 | टाटा-1510 स्कुलबस | स्कुलबसवाहन | ३,६०,०००.०० |
| २१ | MH-17-T-9501 | अशोक लेलँण्ड स्कुलबस | स्कुलबसवाहन | ३,००,०००.०० |
| २२ | MH-17-T-9502 | अशोक लेलँण्ड स्कुलबस | स्कुलबसवाहन | ३,००,०००.०० |
| २३ | MH-17-T-8502 | टाटा-1510 स्कुलबस | स्कुलबसवाहन | ३,६०,०००.०० |
| २४ | MH-17-T-8503 | टाटा-1510 स्कुलबस | स्कुलबसवाहन | ३,६०,०००.०० |
| २५ | MH-17-T-3101 | टाटा-1510 स्कुलबस | स्कुलबसवाहन | ३,७५,०००.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २६ | MH-17-T-3102 | टाटा-1510 स्कुलबस | स्कुलबसवाहन | ३,७५,०००.०० |
| २७ | MH-17-T-3103 | टाटा-1510 स्कुलबस | स्कुलबसवाहन | ३,७५,०००.०० |
| २८ | MH-17-T-3104 | टाटा-1510 स्कुलबस | स्कुलबसवाहन | ३,७५,०००.०० |
| २९ | MH-17-BD-3240 | आयशर स्कुलबस | स्कुलबसवाहन | ७,२५,०००.०० |
| ३० | MH-17-T-3301 | टाटा-1510 पॅसेंजरबस | प्रवासी बस वाहन | ३,७५,०००.०० |
| ३१ | MH-17-T-3302 | टाटा-1510 पॅसेंजरबस | प्रवासी बस वाहन | ३,७५,०००.०० |
| ३२ | MH-17-AG-9747 | आयशर पॅसेंजरबस | प्रवासी बस वाहन | ७,००,०००.०० |
| ३३ | MH-17-AG-9748 | आयशर पॅसेंजरबस | प्रवासी बस वाहन | ७,००,०००.०० |
| ३४ | MH-17-AG-9749 | आयशर पॅसेंजरबस | प्रवासी बस वाहन | ७,००,०००.०० |
| ३५ | MH-17-AG-9750 | आयशर पॅसेंजरबस | प्रवासी बस वाहन | ७,००,०००.०० |
| ३६ | MH-17-AG-9751 | आयशर पॅसेंजरबस | प्रवासी बस वाहन | ७,००,०००.०० |
| ३७ | MH 17 BY 2264 | आयशरप्रवासी बस | ज्यु. कॉलेज बस | १६,०५,०००.०० |
| ३८ | MH 17 BY 2265 | आयशरप्रवासी बस | ज्यु. कॉलेज बस | १६,०५,०००.०० |
| ३९ | MH 17 BY 2266 | आयशरप्रवासी बस | ज्यु. कॉलेज बस | १६,०५,०००.०० |
| ४० | MH 17 BY 2267 | आयशरप्रवासी बस | ज्यु. कॉलेज बस | १६,०५,०००.०० |
| ४१ | MH 17 BY 2268 | आयशरप्रवासी बस | ज्यु. कॉलेज बस | १६,०५,०००.०० |
| ४२ | MH 17 BY 2262 | आयशरप्रवासी बस | नविन प्रवासी बस | १६,०५,०००.०० |
| ४३ | MH 17 BY 2263 | आयशरप्रवासी बस | नविन प्रवासी बस | १६,०५,०००.०० |
| ४४ | MH 17 BY 2269 | आयशरप्रवासी बस | नविन प्रवासी बस | १६,०५,०००.०० |
| ४५ | MH 17 BY 2270 | आयशरप्रवासी बस | नविन प्रवासी बस | १६,०५,०००.०० |
| ४६ | MH 17 BY 2271 | आयशरप्रवासी बस | नविन प्रवासी बस | १६,०५,०००.०० |
| ४७ | MH 17 BY 2272 | आयशरप्रवासी बस | नविन प्रवासी बस | १६,०५,०००.०० |
| ४८ | MH 17 BY 2273 | आयशरप्रवासी बस | नविन प्रवासी बस | १६,०५,०००.०० |
| ४९ | MH 17 BY 2274 | आयशरप्रवासी बस | नविन प्रवासी बस | १६,०५,०००.०० |
| ५० | MH 17 BY 2275 | आयशरप्रवासी बस | नविन प्रवासी बस | १६,०५,०००.०० |
| ५१ | MH 17 BY 2276 | आयशरप्रवासी बस | नविन प्रवासी बस | १६,०५,०००.०० |
| ५२ | MH 17 BY 1532 | महेंद्रा पिकअप | मालवाहतुक वाहन | ४,५०,०००.०० |
| ५३ | MH 17 BY 1533 | महेंद्रा पिकअप | मालवाहतुक वाहन | ४,४०,०००.०० |
| ५४ | MH 17 BY 1534 | महेंद्रा पिकअप | मालवाहतुक वाहन | ४,५०,०००.०० |
| ५५ | MH17 BY 0711 | टाटा एलपीके | मालवाहतुक वाहन | ८,८९,९१०.०० |
| ५६ | MH-17-T-7111 | महिंद्रा मॅक्स | मालवाहतुक वाहन | १,१०,०००.०० |
| ५७ | MH-17-T-7112 | महिंद्रा मॅक्स | मालवाहतुक वाहन | १,१०,०००.०० |
| ५८ | MH-17-T-2811 | टाटा-1109 टेम्पो | मालवाहतुक वाहन | २,३०,०००.०० |
| ५९ | MH-17-T-2810 | टाटा-407 टेम्पो | मालवाहतुक वाहन | १,६०,०००.०० |
| ६० | MH-17-T-2809 | टाटा-ACE | मालवाहतुक वाहन | ८०,०००.०० |
| ६१ | MH-17-T-3751 | टाटा-407 टेम्पो | मालवाहतुक वाहन | १,५०,०००.०० |
| ६२ | MH-17-AG-0253 | महिंद्रामॅक्सिमो | मालवाहतुक वाहन | १,००,०००.०० |
| ६३ | MH-17-AG-2358 | टाटा ए.सी.ई | मालवाहतुक वाहन | ३,००,०००.०० |
| ६४ | MH-17-AG-4506 | महिंद्रा पिकअप | मालवाहतुक वाहन | १,७५,०००.०० |
| ६५ | MH-17-AG-9190 | टाटा-407 टेम्पो | मालवाहतुक वाहन | ३,७५,०००.०० |
| ६६ | MH-17-BD-0458 | ॲपेथ्रिव्हीलररिक्षा | मालवाहतुक वाहन | ६०,०००.०० |
| ६७ | MH-17-BD-2552 | एस.एम.एल.सम्राट ट्रक | मालवाहतुक वाहन | ६,१५,०००.०० |
| ६८ | MH17 BD 6401 | एलएमएल | थ्रि व्हीलर मालवाहतुक | ६०,०००.०० |
| ६९ | MH-17-V-6421 | स्वराज-८५५ | ट्रॅक्टर | १,१०,०००.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७० | MH-17-AE-3820 | महिंद्रा अॅन्डमहिंद्रा | युवराजट्रॅक्टर | ६०,०००.०० |
| ७१ | MH-17-AV-2414 | आयशर | ट्रॅक्टर-२४२ | १,३५,०००.०० |
| ७२ | MH-17-AE-7313 | महिंद्रा अॅन्डमहिंद्रा | अर्जुन नोव्हो ट्रॅक्टर | ४,००,०००.०० |
| ७३ | MH 17 BX 1615 | जॉनडिअर (नविन) | ट्रॅक्टर | ३,९२,४००.०० |
| ७४ | बॅटरी थ्रिव्हीलर | इलोडर | मालवाहतुक वाहन | ३५,८४०.०० |
| ७५ | MH-17-BV-828 | दोन चाकी ट्रेलर | मालवाहतुक ट्रेलर | ८५,०००.०० |
| ७६ | MH-17-W-8542 | हिरो होंडास्प्लेंडर | दुचाकी वाहन | १०,०००.०० |
| ७७ | MH-17-BB-7635 | महिंद्रा सेंच्युरो | दुचाकी वाहन | १८,०००.०० |
| ७८ | MH-17-BG-8844 | टी.व्ही.एस झेस्ट | दुचाकी वाहन | २१,०००.०० |
| ७९ | MH-17-T-2651 | टाटा-407 | कॅशव्हॅन | २,१५,०००.०० |
| ८० | MH-17-AG-0241 | टाटा-407 (क्रेन) | आपत्तकालीन | २,४०,०००.०० |
| ८१ | ओझान मशिन | सक्शन मशिन टॉली | आपत्तकालीन | १,७५,०००.०० |
| ८२ | MH-17-BD-0696 | जेटमशिन | आपत्तकालीन | ३,६०,०००.०० |
| ८३ | MH-02-CE-6723 | मिनी फोम वॉटर फायर | अग्निशामक | ६,१०,०००.०० |
| ८४ | MH-17-BD-2718 | मोठी अग्निशामक(आयशर) | अग्निशामक | १८,००,०००.०० |
| ८५ | MH-17-BY-0278 | लॅडर माऊटेंड व्हॅन(टाटा) | आपत्तकालीन | २४,००,०००.०० |
| ८६ | MH-17-AG-2251 | टॉयलेट व्हॅन (टाटा ACE) | आपत्तकालीन | २,७५,०००.०० |
| | | | **एकुण** | ५,०९,५७,१५०.०० |

क.) दि.०१.०४.२०२० ते दि.३१.०३.२०२१ अखेर थर्डपार्टी विमा करावयाची वाहने

| अ.न. | वाहन क्रमांक | वाहनकंपनी | वाहन प्रकार | आयडीव्ही |
|---|---|---|---|---|
| १. | MH-17-V-1701 | टाटा सुमो | कार्यालयीन वाहन | ०.०० |
| २. | MH-17-Y-3636 | महिंद्रा लोगान | कार्यालयीन वाहन | ०.०० |
| ३. | MH-17-AG-2418 | टाटा विंगर | रूग्णवाहीका | ०.०० |
| ४ | MH-17-F-5545 | चार चाकी ट्रेलर | मालवाहतुक ट्रेलर | ०.०० |
| ५. | MH-17-F-5645 | चार चाकी ट्रेलर | मालवाहतुक ट्रेलर | ०.०० |
| ६. | MH-17-F-9099 | चार चाकी ट्रेलर | मालवाहतुक ट्रेलर | ०.०० |
| ७. | MH-17-AF-0848 | दोन चाकी ट्रेलर | मालवाहतुक ट्रेलर | ०.०० |
| ८. | MH-17-F-6001 | चार चाकी ट्रेलर | मालवाहतुक ट्रेलर | ०.०० |
| ९. | MH-17-AF-3778 | चार चाकी टॅन्कर | वॉटर टॅन्कर | ०.०० |
| १०. | MH-17-AF-4531 | दोन चाकी ट्रेलर | मालवाहतुक ट्रेलर | ०.०० |
| ११ | इलेक्ट्रीककार-**01** | मिनी मटेरिअल मुव्हमेंट | बॅटरी कार | ०.०० |
| १२ | इलेक्ट्रीककार-**02** | मिनी मटेरिअल मुव्हमेंट | बॅटरी कार | ०.०० |
| १३ | इलेक्ट्रीककार-**03** | मिनी मटेरिअल मुव्हमेंट | बॅटरी कार | ०.०० |
| १४ | इलेक्ट्रीककार-**04** | मिनी मटेरिअल मुव्हमेंट | बॅटरी कार | ०.०० |
| १५ | मोबाईल टॉयलेट नं.१ | मोबाईल टॉयलेट | फिरते शौचालय | ०.०० |
| १६ | मोबाईल टॉयलेट नं.२ | मोबाईल टॉयलेट | फिरते शौचालय | ०.०० |
| १७ | मोबाईल टॉयलेट नं.३ | मोबाईल टॉयलेट | फिरते शौचालय | ०.०० |
| १८ | मोबाईल टॉयलेट नं.४ | मोबाईल टॉयलेट | फिरते शौचालय | ०.०० |
| १९ | मोबाईल टॉयलेट नं.५ | मोबाईल टॉयलेट | फिरते शौचालय | ०.०० |
| २० | मोबाईल टॉयलेट नं.६ | मोबाईल टॉयलेट | फिरते शौचालय | ०.०० |
| २१ | मोबाईल टॉयलेट नं.७ | मोबाईल टॉयलेट | फिरते शौचालय | ०.०० |
| २२ | मोबाईल टॉयलेट नं.८ | मोबाईल टॉयलेट | फिरते शौचालय | ०.०० |
| २३ | मोबाईल टॉयलेट नं.९ | मोबाईल टॉयलेट | फिरते शौचालय | ०.०० |
| २४ | मोबाईल टॉयलेट नं.१० | मोबाईल टॉयलेट | फिरते शौचालय | ०.०० |

वरील वाहनांचा करावयाचा विमा प्रकारानुसार संख्यानिहाय तपशिलवार माहिती खालीलप्रमाणेआहे.

| अ.न. | कालावधी | झिरो डेप विमा | फुल विमा | थर्ड पार्टी | एकुण वाहने |
|---|---|---|---|---|---|
| | | अ | ब | क | |
| १. | कार्यालयीन वाहने | ६ | ०८ | ०२ | १६ |
| २. | रुग्णवाहीका वाहने | ३ | ०८ | ०१ | १२ |
| ३. | स्कुल बस वाहने | ० | १३ | ० | १३ |
| ४. | प्रवासी एसी बस वाहने | १ | ० | ० | ०१ |
| ५. | प्रवासी बस वाहने | ० | ७ | ० | ०७ |
| ६. | ज्यु कॉलेज बस | ० | ५ | ० | ०५ |
| ७. | नविन प्रवासी बस वाहने | ० | १० | ० | १० |
| ८. | मालवाहतुक वाहने ( ट्रॅक्टर सह ) | ०२ | २३ | ० | २५ |
| ९. | टॅन्कर / ट्रेलर | ० | १ | ७ | ०८ |
| १० | दुचाकी वाहने | १ | ३ | ० | ०४ |
| ११. | इतर( आपत्कालीन) | ० | ८ | ० | ०८ |
| १२. | बॅटरी कार वाहने | ० | ० | ४ | ०४ |
| १३. | मोबाईल टॉयलेट | ० | ० | १० | १० |
| | एकुण वाहने | **१३** | **८६** | **२४** | **१२३** |

विभागाचा स्पष्ट अभिप्रायः- दि.०१/०४/२०२० ते दि.३१/०३/२०२१ अखेर एक वर्ष कालावधी करीता उपरोक्त प्रमाणे वाहन विभागाकडील १२३ वाहनांचा वाहन निहाय विमा उतरविण्याचा असलेने राष्ट्रीयकृत विमा कंपन्याकडूनच बंद लिफाफ्यामध्ये निविदा मागविणे आवश्यक आहे. कारण ई-निविदा प्रक्रिया राबविल्यास त्यास सर्व राष्ट्रीयकृत विमा कंपन्या प्रतिसाद देत नसलेने संस्थानला विमा पॉलिसीचे स्पर्धात्मक दर प्राप्त होत नाही. तसेच विमा कंपन्याचे दरात स्पर्धा ही होत नाही.हा अनुभव संस्थानच्या वाहनांचा दि.१/०४/२०१६ ते ३१/०३/२०१७ या कालावधीतील विमानुतनीकरण करते वेळी आलेला आहे.

त्यामुळे सन २०१६-१७ पासून प्रतिवर्षी संस्थान वाहनांचे विमानुतणीकरणाचे काम राष्ट्रीयकृत विमाकंपन्याकडून दर पत्रके मागवून करण्यात येत आहे.संस्थान फक्त राष्ट्रीयकृत विमा कंपन्याकडुनच दरपत्रक मागवित असलेने ई-निविदेची आवश्यकता नाही असे मत आहे.यानुसार मागील वर्षी सन २०१९-२० या आर्थीक वर्षात १३५ वाहनांचा विमा नुतनीकरण राष्ट्रीयकृत विमा कंपन्याकडुन दरपत्रकाद्वारे मागवून केलेले आहे.याकामी एकुण रू.३३,०४,५०५/- इतका खर्च आलेला आहे.

उपरोक्त प्रमाणे संस्थानकडे असलेल्या सध्याचे १२३ वाहनांचेदि.०१/०४/२०२० ते दि.३१/०३/२०२१ यावार्षीक कालावधीसाठी विमा नुतनीकरण करणे कामी (जी.एस.टी.सह) अंदाजे रक्कम रु.३०,००,०००/- (अक्षरी रक्कम रु. तीस लाख मात्र ) खर्च अपेक्षीत आहे. वाहन विभागाचे सन-२०२०-२०२१ या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्राकामध्ये विमा खर्चाकरीता रक्कम रु.३८,००,०००/- (अक्षरी रक्कम रु.अडतिस लाख ) मात्र खर्चाची तरतुद प्रस्तावीत असुन सदरचा खर्च विमा खर्च या अंदाजपत्रकीयतरतुदीतुन करता येईल.

उपरोक्त प्रमाणेवाहनांचा विमा नुतनीकरन करण्याचा कालावधी दि.०१/०४/२०२० ते दि.३१/०३/२०२१ वार्षीक आहे. यातील ‘अ’ रकान्यात नमुद केलेल्या १३ वाहनांचा झीरो डेप प्रकारचा तर ‘ब’ रकान्यात नमुद केलेल्या ८६ वाहनांचा पुर्ण विमा (पॅकेज पॉलीसी) व‘क’ रकान्यात नमुद केलेल्या २४ वाहनाचा थर्ड पार्टी विमा करणे आवश्यक आहे.

वरील प्रमाणे एकुण १२३ वाहनांचे विमा नुतनीकरणाकरीता ४राष्ट्रीयकृत विमा कंपन्याकडुनदरपत्रके मागवावे लागतील.

संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी / शासन निर्देश तांत्रिक कायदेशिर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करून अनुमानः-सदरचे काम संस्थान वाहनाचे विमा नुतनीकरणासंबधीत असुन सदर बाब आर्थिक आहे.

मागणी:- तरी उपरोक्त प्रमाणे संस्थानचे प्रस्तावित विमा प्रकारानुसार वाहनांचा विमानुतनीकरण करणेस व याकामी येणारे अंदाजे रु.३०,००,०००/- (अक्षरी रक्कम रु.तीस लाख मात्र ) पर्यतचे खर्चास मान्यता मिळणेस

तसेच याकामी राष्ट्रीयकृत विमा कंपन्याकडुन दरपत्रके मागविणेस मान्यता मिळणे करीता सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ(Ad-hoc) समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५४** **यावर सविस्तर चर्चा झाली, वाहन विभागाचे प्रशासकिय अधिकारी श्री.औटी यांनी समितीस अशी माहिती दिली की, उपरोक्त प्रस्तावात नमुद १२३ वाहने सद्यस्थितीत वापरात आहेत. त्यामुळे सन २०२०-२१ या वार्षिक कालावधीत संस्थानचे १२३ वाहनांचा विमा नुतनीकरण करणेकामी राष्ट्रीयकृत विमा कंपन्यांकडून दरपत्रके मागविणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रु.३०,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-वाहन विभाग)**

---

**विषय नं.१०** **श्री साईबाबा हॉस्पिटल येथील जुने सेंट्रल ए.सी.बायबॅक करुन नविन सेंट्रल ए.सी.प्लॅन्ट उभारणीकामी प्राप्त ई-निविदेतील निम्नत्तम दरधारक मे.व्यंकटेश्वरा टूंकी प्रोजेक्ट,पुणे यांचेशी चर्चा करुन त्यांना कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-**

| | | |
|---|---|---|
| १ | कामाचे नाव | श्री साईबाबा हॉस्पीटल येथील जुने सेंट्रल ए.सी. बायबॅक करुन नविन सेट्रल ए.सी. प्लॅन्ट उभारणीकरणे. |
| २ | प्रशासकिय मान्यता | मा. व्यवस्थापन समिती दिनांक ६.०६.२०१९रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ४९६ |
| ३ | अंदाजे खर्च | रु.- २,९९,६१,८७१/- |
| ४. | प्रस्तावाची थोडक्यात माहीती | श्री साईबाबा हॉस्पीटल येथील जुने १३ नग सेंट्रल ए.सी. बॉयबॅक करुन नविन १३ नग सेंट्रल ए.सी. प्लॅन्ट बसविणे कामीविहीत पद्धतीने ई निविदा राबविणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु. २,९९,६१,८७१/- मात्रचे खर्चास मा. व्यवस्थापन समिती दिनांक ६.०७.२०१८रोजीचे सभेतील निर्णय कं. ४९६ मान्यता मिळालेली आहे. |
| ५ | ई निविदा तपशिल | ई निविदा नोटीस महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.inया बेबसाईटवर अपलोड करण्यात आली होती. ई निविदा अपलोड करण्याची मुदत दिनांक १४.०९.२०१९ ते ३०.०९.२०१९ देणेत आली होती. |
| | I. कामाची मुदत | १२० दिवस |
| | II. तांत्रिक निविदा उघडणेची दिनांक व वेळ | दिनांक ५.११.२०१९ दिनांक ११.०० वा. |
| | III. प्राप्त ई निविदा | ०४ |
| | IV. प्राप्त ई निविदा धारकांनी सर्व आवश्यक कागदपत्रे ऑनलाईन जमा केले आहेत का ? | प्रस्तुत कामी 1)S.S. Enterprises, Mumbai 2) Sai H.V.A.C. System Thane 3) Shree VenkteshwaraTunkey Project Solution Pvt. Ltd. Pune 4) Speedfrost Services Pvt ltd, Mumbai. या चार निविदाधारकांनी ई निविदा जमा केल्या होत्या. त्यापैकी अ.नं. २,३,४ यांनी सर्व आवश्यक कागदपत्र ऑनलाईन जमा केले असून अ.नं. १ M/S S.S. Enterprises, Mumbai यांनी तत्सम प्रकारचे कामाचे अनुभवाचे कागदपत्र जमा केलेली नसल्याने ते अपात्र दर्शविणेत आले आहे. |
| | V. सर्व निविदा धारकांनी EMD भरलेले कागदपत्र जमा केले आहेत का ? | होय |
| | VI. मागील वर्षाकरीता निम्नत्तम दर रु. | -- |
| | VII. मागील निम्नत्तम दरधारक | -- |

ई निविदा प्रक्रियातील तांत्रिक दुष्टया पात्र निविदाधारकांनी दिलेल्या दराचा तपशिल

| अ नं. | निविदाधारकांचे नाव | ई निविदेतील नविन प्लॅन्टचे दर रक्कम रु. | निविदेतील जुने एसी बायबॅकदर रक्कम रु. | बायबॅक रक्कम वजा जाता दर रुपये | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | Speedfrost Services Pvt Ltd | १,८६,२७,५१९.०० | २,९९,०००.०० | १,८३,२८,५१९.०० | L 2 |
| २ | Shree Venkateshwara Turnkey Project | २,६७,६९,५७५.०० | २,६७,६९,५७५.०० | ०.०० | L1 |
| ३ | Sai H.V.A.C. System | २,१९,०३,०७२.०० | ३,९०,०००.०० | २,१५,१३,०७२.०० | L 3 |

उपरोक्त तपशिलानुसार श्री साईबाबा हॉस्पीटल येथील जुने १३ नग सेंट्रल ए.सी. प्लॅन्ट बॉयबॅक करुन नविन १३ नग सेंट्रल ए.सी. प्लॅन्ट बसविणे कामी मे. व्यकटेंश्वरा टंकी प्रोजेक्ट, पुणे यांचे नवे १३ नग सेट्रल ए.सी. प्लॅन्ट करीता दिलेले दर मधुन जुने सेट्रल एसी प्लॅन्ट बायबॅक किमंत वजा जाता प्राप्त (देवु केलेली) रक्कम रुपये ०.०० ( अक्षरी रक्कम रुपये शुन्य ) मात्र निम्नत्तम असून त्यांचेशी प्राप्त दराबाबत चर्चा करुन त्यांना प्रस्तावीत कामी कार्यादेश देणेस मान्यतेकरीता प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे (Ad-Hoc) सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५५** **प्रस्तुत प्रकरणी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक मे. व्यकटेंश्वरा ट्रंकी प्रोजेक्ट, पुणे यांचे प्रतिनिधी श्री.राजु आजबे हे आजचे मा.तदर्थ समिति सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. त्यांनी समितीस असे सांगीतले की, जुने १३ नग ए.सी. बायबॅकचे ई-निविदेतील दर टेंडर भरतांना नजरचुकीने नमुद केलेले आहेत. त्यावर समितीने त्यांना जुने १३ नग ए.सी. बायबॅकचे दराबाबत विचारणा केली असता त्यांनी प्रत्येकी रु.२०,०००/- याप्रमाणे एकुण रु.२,६०,०००/-मात्र दर देतो असे सांगीतले. सदरचे दर विचारात घेता ते इतर दोन्ही निविदाधारकांनी दिलेल्या दरापेक्षा कमी आहेत.**

**श्री साईबाबा हॉस्पिटल येथील जुने सेंट्रल ए.सी.बायबॅक करुन नविन सेंट्रल ए.सी.प्लॅन्ट उभारणीकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमध्ये मे.व्यकटेंश्वरा ट्रंकी प्रोजेक्ट, पुणे यांचे दर सर्वात कमी असल्याने इतर निविदाधारकांना या प्रक्रियेतुन वगळण्यात आले आहे. वाटाघाटीच्या स्तरावर मे.व्यकटेंश्वरा ट्रंकी प्रोजेक्ट, पुणे यांनी काम करण्यास नकार दिल्याने सदरची बाब संस्थानचे आर्थिक हिताची नाही. मेकॅनिकल विभागाने समितीचे असे निदर्शनास आणून दिले की मे.व्यकटेंश्वरा ट्रंकी प्रोजेक्ट, पुणे यांची अनामत रक्कम रु.१,२५,०००/-मात्र संस्थानकडे जमा आहे. यावर निविदाधारकास त्यांची अनामत रक्कम जप्त का करु नये, अशी विचारणा केली असता त्यांनी रु.२५,०००/- दंडापोटी जमा करण्यास सहमती दर्शविली, व तसे लेखी पत्राव्दारे विनंती केली. सदर पत्र या अभिलेखाचा भाग समजण्यात यावे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.व्यकटेंश्वरा ट्रंकी प्रोजेक्ट, पुणे यांची संस्थानकडे जमा असलेल्या अनामत रकमेमधुन रु.२५,०००/- दंड म्हणून आकारण्यात येऊन उर्वरीत रक्कम रु.१,००,०००/- मात्र मे.व्यकटेंश्वरा ट्रंकी प्रोजेक्ट, पुणे यांना परत देण्यात यावी, तसेच श्री साईबाबा हॉस्पिटल येथील जुने सेंट्रल ए.सी.बायबॅक करुन नविन सेंट्रल ए.सी.प्लॅन्ट उभारणीकामी फेर ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी, असे ठरले.**

**(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)**

---

**विषय नं.११** **श्री साईनाथ रुग्णालयाकरीता नविन दोन लिफ्ट बसविणेकामी प्राप्त ई-निविदेतील निम्नत्तम दरधारक मे.जॉनसन लिफ्ट प्रा.लि.यांचेशी चर्चा करुन त्यांना कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-**

| | | |
|---|---|---|
| १ | कामाचे नाव | श्री साईनाथ रुग्णालय इमारती करीता नविनदोन स्वयंचलित लिफ्ट बसविणेकामी |
| २ | प्रशासकिय मान्यता | मा. व्यवस्थापन समिती दिनांक ६.६.२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. २३२ |
| ३ | अंदाजे खर्च | रु. ३४,२२,०००/- |
| ४. | प्रस्तावाची थोडक्यात माहीती | श्री साईनाथ रुग्णालय इमारती करीता नविनदोन स्वयंचलित लिफ्ट |

| | | |
|---|---|---|
| | | बसविणेकामी विहीत पद्धतीने ई निविदा प्रकिया राबविणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु. ३४,२२,०००/- मात्रचे खर्चास मा. व्यवसथापन समिति दिनांक ६.६.२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. २३२ नुसार मान्यता मिळालेली आहे. |
| ५ | ई निविदा तपशिल | ई निविदा नोटीस महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या बेबसाईटवर अपलोड करण्यातआली होती. ई निविदा अपलोड करणेची मुदत दिनांक २१.०८.२०१९ ते दिनांक ११.०९.२०१९ देणेत आलेली होती. सदर मुदतीत दोनच ई निविदा प्राप्त झालेने विधानसभा निवडणुक आचारसहिता संपलेनंतर फेर ई निविदा मागविणेत आलेली आहे. फेर ई निविदा अपलोड करणेची मुदत दिनांक १.११.२०१९ ते दिनांक १३.११.२०१९ देणेत आलेली होती. |
| | कामाची मुदत | ९० दिवस |
| | तांत्रिक निविदा उघडणेची दिनांक व वेळ | दिनांक १८.१२.२०१९ रोजी सकाळी ११.०० वा. |
| | प्राप्त ई निविदा | ०३ |
| | प्राप्त ई निविदा धारकांनी सर्व आवश्यक कागदपत्रे ऑनलाईन जमा केले आहेत का ? | होय |
| | सर्व निविदा धारकांनी EMD भरलेले कागदपत्र जमा केले आहेत का ? | होय |
| | मागील वर्षाकरीता निम्नत्तम दर रु . | -- |
| | मागील निम्नत्तम दरधारक | -- |

ई निविदा प्रक्रियातील तांत्रिक दुष्टया पात्र निविदाधारकांनी दिलेल्या दराचा तपशिल

| अ नं. | निविदाधारकांचे नाव | नग | ई निविदेतील प्रति लिफ्ट करीता दर रक्कम रु . | एकुण रक्कम रुपये. | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | मे.व्हिक्टोरा लिफ्ट प्रामुंबई .लि .. | २ | १६,४६,१००/- | ३२,९२,२००/- | L 2 |
| २ | पावरलिंक इंजिनिअर्सएलएलपी, नाशिक | २ | १,५९,५०,०००/- | ३,१९,००,०००/- | L3 |
| ३ | मे. जॉन्सन लिफ्ट प्रा.लि .पुणे | २ | **१५,९०,०००/-** | **३१,८०,०००/-** | **L 1** |

उपरोक्त तपशिलानुसार श्रीसाईनाथ रुग्णालय इमारती करीता नविनदोन स्वयंचलित लिफ्ट बसविणेकामी मे. जॉन्सन लिफ्ट प्रा. लि., पुणे यांचे रक्कम रुपये ३१,८०,०००/- ( अक्षरी रक्कम रुपये एकतीस लाख ऐंशी हजार ) मात्र निम्नत्तम असून त्यांचेशी प्राप्त दराबाबत चर्चा करुन त्यांना प्रस्तावीत कामी कार्यादेश देणेस मान्यतेकरीता प्रस्ताव मा. तदर्थ (Ad-Hoc) समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.५६** **प्रस्तुत प्रकरणी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक मे. जॉन्सन लिफ्ट प्रा. लि., पुणे यांचे प्रतिनिधी हे आजचे मा.तदर्थ समिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. समितीने त्यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा केली असता त्यांनी ई-निविदेतील नमुद रु.३१,८०,०००/- ऐवजी रक्कम रु.३१,२५,०००/-मात्र दर देऊ केले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयाकरीता नविन दोन लिफ्ट बसविणेकामी निम्नतम निविदाधारक मे. जॉन्सन लिफ्ट प्रा. लि., पुणे यांनी चर्चेअंती देऊ केलेले अंतिम दर रक्कम रु.३१,२५,०००/-मात्र स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- मेकॅनिकल विभाग)**

---

**विषय नं.१२ समाधी मंदिर सेंट्रल ए.सी.प्लॅान्ट यंत्रणेचे एक वर्ष कालावधीकरीता CAMC देणेकरीता प्राप्त ई-निविदेतील निम्नत्तम दरधारक मे.हेरंब एन्टरप्राईजेस यांचेशी चर्चा करुन त्यांना कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-**

| | | |
|---|---|---|
| | कामाचे नाव | समाधी मंदिर सेंट्रल ए यंत्रणेचे एक वर्ष कालावधीकरीतान्टप्लॉ .सी. CAMC देणे |
| २ | प्रशासकिय मान्यता | मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेची दिनांक २९/७/२०१९ रोजीची टिपणी. |
| ३ | अंदाजे खर्च | रु. ३,३८,१२७/- |
| ४. | प्रस्तावाची थोडक्यात माहीती | समाधी मंदिर सेंट्रल ए यंत्रणेचे एक वर्ष कालावधीकरीतान्टप्लॉ .सी. CAMC देणेकामी विहीत पद्धतीने ई निविदा प्रकिया राबविणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु. ३,३८,१२७/- मात्रचे खर्चास मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २९/७/२०१९ रोजीचे टिपनीने मान्यता मिळालेली आहे. |
| ५ | ई निविदा तपशिल | ई निविदा नोटीस महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.inया बेबसाईटवर अपलोड करण्यात आली होती. ई निविदा अपलोड करणेची मुदत दिनांक २१.०८.२०१९ ते दिनांक ९.०९.२०१९ देणेत आलेली होती. सदर मुदतीत दोनच ई निविदा प्राप्त झालेने विधानसभा निवडणुक आचारसहिता संपलेनंतर फेर ई निविदा मागविणेत आलेली आहे. फेर ई निविदा अपलोड करणेची मुदत दिनांक १.११.२०१९ ते दिनांक ०९.११.२०१९ देणेत आलेली होती. |
| | कामाची मुदत | ३६५ दिवस |
| | तांत्रिक निविदा उघडणेची दिनांक व वेळ | दिनांक १८.१२.२०१९ रोजी सकाळी ११.०० वा. |
| | प्राप्त ई निविदा | ०३ |
| | प्राप्त ई निविदा धारकांनी सर्व आवश्यक कागदपत्रे ऑनलाईन जमा केले आहेत का ? | होय |
| | सर्व निविदा धारकांनी EMD भरलेले कागदपत्र जमा केले आहेत का ? | होय |
| | मागील वर्षाकरीता निम्नत्तम दर रु . | रु. ३,२२,०२६/- |
| | मागील निम्नत्तम दरधारक | मे. कैलास रेफ्रिजरेशन वकर्स, मुंबई |

ई निविदा प्रक्रियातील तांत्रिक दुष्टया पात्र निविदाधारकांची दिनांक ७.०१.२०२० रोजीचे मा. खरेदी समितीमध्ये कर्मशियल बीड उघडणेत आले असून दराचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ नं. | निविदाधारकांचे नाव | ई निविदेतील CAMC करीता दिलेले दर रक्कम रु. | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे. कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स, मुंबई | ३,४७,००८/- | L 2 |
| **२** | मे. हेरंब एन्टसरप्राईजेस, जळगाव | **३,३७,६५०/-** | **L1** |
| ३ | मे. स्ट्रलींग ॲन्ड विल्सन प्रा.लि. मुंबई | ८,००,०००/- | L 3 |

उपरोक्तसमाधी मंदिर सेंट्रल ए.सी. प्लॅान्ट यंत्रणेचे एक वर्ष कालावधीकरीता CAMC देणेकामी मे.हेरंब एन्टरप्राईजेस,जळगाव यांचे रक्कम रुपये ३,३७,६५०/- (अक्षरी रक्कम रुपये तीन लाख सदोतीस हजार सहाशे पन्नास) मात्र निम्नत्तम असून त्यांचेशी प्राप्त दराबाबत चर्चा करुन त्यांना प्रस्तावीत कामी कार्यादेश देणेस मान्यतेकरीता प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे (Ad-Hoc) सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.५७** **प्रस्तुत प्रकरणी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक आजचे मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमोर चर्चेसाठी अनुपस्थित होते. तथापी त्यांनी ई-निविदेतील दर अंतिम असल्याचे लेखी कळविले आहे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरचे काम हे श्रींचे समाधी मंदिरातील असल्याने समाधी मंदिर सेंट्रल ए.सी.प्लॉन्ट यंत्रणेचे एक वर्ष कालावधीकरीता CAMC देणेकरीता निम्नतम निविदाधारक मे.हेरंब एन्टरप्राईजेस,जळगाव यांचे रक्कम रु.३,३७,६५०/-मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- मेकॅनिकल विभाग)**

---

**विषय नं.१३** **सन २०१९-२० कंत्राटी कर्मचारी यांचे पाल्याचा शैक्षणिक शुल्क परतावा देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** संस्थानचे प्रचलित पद्धतीनुसार मा.कोर्ट रिसिव्हर यांचे काळापासून मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने दरवर्षी संस्थान कर्मचा-यांना त्यांच्या पाल्याचा शैक्षणिक शुल्काचा परतावा दिला जातो.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२१/०४/१९९६ चे सभेतील निर्णय क्र.८९ अन्वये मार्गदर्शक तत्वे वजा नियमावली ठरविण्यात आलेली आहे. सदरच्या मार्गदर्शक तत्वानुसार सध्या शैक्षणिक शुल्काचा परतावा देण्याची कार्यवाही चालु आहे. निर्णय क्र.८९ (१) शासनाने विद्यापीठांनी केवळ गुणवत्तेच्या निकाषावर (On Merit Basis) भरण्यात येणा-या (सुमारे ५० % पर्यंतच्या) जागांवर प्रवेश दिल्या जाणा-या विद्यार्थ्यांसाठी (निम्न दराने) निर्धारीत केलेल्या फी दर रकमेपर्यंतच, मर्यादीत असावा असे नमुद आहे. यास अनुसरुन शासकीय/शासन अनुदानित अभ्यासक्रमासाठी आकरण्यात येणा-या शुल्काच्या मर्यादेपर्यंत शैक्षणिक शुल्क रकमेचा परतावा दिला जातो. तसेच ज्यु.के.जी ते इ.१० वी (इंग्रजी माध्यम) व आयटीआय या अभ्यासक्रमांचा शैक्षणिक शुल्काचा परतावा संस्थानच्या शाळेतील फीचे मर्यादेपर्यंत अदा केला जातो.

शासन मंजुरी क्र.सासंवि २००७/२४२/(६०)-का.सोळा, मंत्रालय मुंबई दि.१६ जुलै, २००९ अन्वये विधी व न्याय विभाग मंत्रालय मुंबई यांनी सदर योजना मा.व्यवस्थापन मंडळाचे सन १९९६ चे सभेतील निर्णयाप्रमाणे संस्थान कर्मचा-यांना लागू आहे. त्याच धर्तीवर ती यापुढेही प्रचलीत पद्धतीने चालु राहील, अशी मंजुरी दिलेली आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६.०२.२०१९ चे सभेतील निर्णय क.१४३ व मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील क्र.सासंवि १०१९/३७२/प्र.क्र.७८/का.१६ दि.२४ जुन, २०१९ रोजीचे पत्रान्वये, सन २०१८-१९ करीता खालीनमुद केलेप्रमाणे मान्यता मिळालेली आहे.

१. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या आस्थापनेवरील स्थायी कर्मचा-यांना त्यांच्या पाल्यांच्या शैक्षणिक फीचा परतावा करण्यात येतो, त्याच धर्तीवर तसेच संदर्भाकिंत शासन आदेश क्र. (२) अनुसार कंत्राटी कर्मचायांच्या पाल्यांना देण्यात आलेला शैक्षणिक शुल्काच्या परताव्यानुसार सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाकरिता, श्री साईबाबा संस्थानच्या विविध विभागात कार्यरत असलेल्या सर्व कंत्राटी कर्मचा-यांना पाल्यांचा शैक्षणिक फीचा परतावा करण्यास आणि त्याकरिता होणा-या अंदाजे ३८ लक्ष इतक्या खर्चास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर आदेशाच्या आधारे संस्थानच्या कंत्राटी कर्मचा-यांना इतर कोणताही सेवाविषयक किंवा आस्थापनाविषयक लाभ अथवा स्थायित्वाच्या अन्य सुविधांसाठी संस्थानवर दावा करता येणार नाही. याकरिता श्री साईबाबा संस्थानद्वारे सर्व कंत्राटी कर्मचा-यांकडून लेखी हमीपत्र घेण्यात येईल.

३. मुख्यकार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी उपरोक्त शासन आदेशाची अंमलबजावणी करुन झालेल्या खर्चाच्या विवरणपत्रासह कार्यपूर्तता अहवाल शासनास सादर करावा.

**(ब)** सदर मान्यतेनुसार संस्थानचे विविध विभागात कार्यरत कंत्राटी कर्मचारी यांना त्यांचे पाल्यांचा सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाचा फी परताव्याकामी जा.क्र.एसएसएस/साप्रशा/वशी-०६/८९९/२०१९ दि.१५ जुलै, २०१९ अन्वये परिपत्रक पारित करण्यात आलेले होते. सदर परिपत्रकान्वये विहित नमुन्यात माहिती तयार करुन, लेखाशाखा विभागाकडून तपासून घेणेत येऊन, कंत्राटी कर्मचा-यांचे पाल्यांचा शैक्षणिक शुल्क परताव्याच्या मंजुर रक्कमा त्यांच्या बॅंक खात्यावर वर्ग करण्यात आलेल्या आहेत.

कंत्राटी कर्मचा-यांच्या पाल्यांचा सन २०१८-१९ या वर्षाचा शैक्षणिक शुल्क परतावा खालीलप्रमाणे अदा करण्यात आलेला आहे.

| अ.नं. | विभागाचे नांव | कर्मचारी संख्या | पाल्य संख्या | देय्य रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | कामगार विभाग | ०२ | ०२ | ८,५५०/- |
| ०२ | श्री साईबाबा कन्या विद्यामंदिर | ०७ | ०८ | ४२,२८०/- |
| ०३ | माहीती तंत्रज्ञान | ०७ | ११ | ४६,७००/- |
| ०४ | सामान्य प्रशासन शाखा | १२ | १९ | ९९,७८०/- |
| ०५ | अभिलेख कक्ष | ०१ | ०१ | ४,५१०/- |
| ०६ | मेकॅनिकल विभाग | १३ | १७ | ७५,५२०/- |
| ०७ | फायर ॲण्ड सेफ्टी | ०६ | ०८ | ३५,३५०/- |
| ०८ | साईप्रसाद निवासस्थान | १० | १२ | ५४,५२०/- |
| ०९ | इंग्लिश मिडीयम स्कुल | १९ | २६ | १,४५,९९५/- |
| १० | औ.प्र.संस्था. | ०१ | ०१ | ४,३६०/- |
| ११ | जनसंपर्क विभाग | ०८ | १२ | ५२,९००/- |
| १२ | वाहन विभाग | २७ | ३७ | १,९१,३७७/- |
| १३ | साईबाबा भक्तनिवास्थान | ०६ | १० | ४३,८९०/- |
| १४ | साई धर्मशाळा | ०३ | ०६ | २६,३००/- |
| १५ | बगीचा विभाग | ०२ | ०२ | १९,८४०/- |
| १६ | व्दारावती भक्तनिवास | ०७ | १० | ४२,३००/- |
| १७ | भांडार विभाग | ०२ | ०२ | ८,०८०/- |
| १८ | साईआश्रम भक्तनिवास | ०६ | १० | ४४,७००/- |
| १९ | विद्युत विभाग | १३ | १६ | ७०,०२०/- |
| २० | लेखाशाखा | १८ | २३ | १,१३,४३८/- |
| २१ | प्रसादालय | ३७ | ४८ | २,१७,०७०/- |
| २२ | पाणी पुरवठा विभाग | ०६ | ०७ | ३३,१९०/- |
| २३ | आरोग्य विभाग | १८ | २५ | १,११,७३०/- |
| २४ | प्रकाशने विभाग | ०४ | ०४ | १७,६००/- |
| २५ | मालमत्ता विभाग | ०१ | ०१ | ८,८००/- |
| २६ | ध्वनिक्षेपण व टेलिफोन | ०५ | ०७ | ३३,५६०/- |
| २७ | सीसीटीव्ही कंट्रोल सेल | ०४ | ०७ | ३०,९९०/- |
| २८ | बांधकाम विभाग | ०३ | ०५ | २३,५५०/- |
| २९ | कनिष्ठ महाविद्यालय | ०४ | ०६ | ८८,२२०/- |
| ३० | मंदिर विभाग | १२ | १६ | ७२,४५०/- |
| ३१ | मंदिर विभाग | ०१ | ०१ | ५,८१०/- |
| ३२ | कॅन्टीन विभाग | १८ | २४ | १,०२,९२४/- |
| ३३ | लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग | ०६ | ०८ | २६,५७८/- |
| ३४ | संरक्षण विभाग | २२० | २९५ | १३,५६,३७३/- |
| ३५ | श्री साईबाबा हॉस्पीटल | ९१ | ११७ | ५,३५,२५०/- |
| ३९ | श्री साईनाथ रुग्णालय | ३९ | ५१ | २,२८,३४८ |
| | एकुण | **६३९** | **८५५** | **४०,२२,८५३/-** |

सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात एकूण ६३९ कंत्राटी कर्मचा-यांच्या ८५५ पाल्यांचा शैक्षणिक शुल्क परतावा अदा करणेत आलेला आहे. कंत्राटी कर्मचा-यांच्या पाल्यांचा सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाचा शैक्षणिक फी परतावा करणेकामी एकुण रक्कम रु.४०,२२,८५३/- मात्र इतका खर्च आलेला असून मंजूर रक्कमेपक्षा रु, २,२२,८५३/- मात्र इतकी रक्कम जादा खर्च झालेली आहे.

(क) सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाकरिता कंत्राटी कर्मचा-यांच्या पाल्यांचा अदा करण्यात आलेल्या शैक्षणिक शुल्क परताव्याबाबत महाराष्ट्र शासन यांचेकडील क्र.सासंवि-१०१९/३७२/प्र.क्र.७८/का.१६,

दि.२४ जुन, २०१९ रोजीचे पत्रातील बाब क्रमांक ३ नुसार मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांना कार्यपुर्तता अहवाल सादर करता येईल.

(ड) प्रस्तावः- नमुद केलेप्रमाणे विवेचनास अनुसरुन, सन २०१८-१९ प्रमाणेच संस्थानमधील कंत्राटी कर्मचा-यांना सन २०१९-२० करीता त्यांचे पाल्यांचा शैक्षणिक फी परतावा करणेकामी येणा-या अंदाजित रक्कम रु.५०,००,०००/- (अक्षरी रुपये- पन्नास लाख मात्र) चे खर्चास मान्यता मिळणेकामी मा. तदर्थ समितीचे निर्णयास्तव सादर. तसेच मा. तदर्थ समितीची मान्यता मिळालेनंतर, मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे प्रस्ताव सादर करता येईल.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानमधील कंत्राटी कर्मचा-यांना सन २०१९-२० करीता त्यांचे पाल्यांचा शैक्षणिक फी परतावा करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.५०,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच सदरचा प्रस्ताव मान्यतेसाठी मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग,महाराष्ट्र शासन यांचेकडे पाठविणेत यावा, व याकामी मान्यतेसाठी मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ,औरंगाबाद यांचेकडे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात यावे, असे ठरले.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग/विधी विभाग)**

---

**विषय नं.१४** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीचे सुधारित आकृतीबंध, सेवाप्रवेश नियम, पदोन्नतीची साखळी, कार्यपध्दती एकल पदे तसेच आरक्षण नियमानुसार बिंदु नामावलीचे प्रस्ताव तयार करणेकामी सेवानिवृत्त शासन अधिकारी यांचा कार्यागटास मुदतवाढ देणेबाबत.**

**प्रस्ताव-** विषयाची पूर्वपिठीका-

**(अ)** मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दिनांक २८ ऑक्टोबर, २०१३ व दिनांक ३० जानेवारी, २०१४ चे पत्रान्वये, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे आस्थापनेवरिल पदांचे कर्मचारी आकृतीबंधास अनुसरुन, संस्थानचे आस्थापनेवरील विविध संवर्ग, त्यांची शैक्षणिक पात्रता, नियुक्ती, वेतनश्रेणी व पदोन्नती इत्यादीबाबत छाननी करुन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांचे आस्थापनेवरील कर्मचा-यांच्या नियुक्ती व पदोन्नतीच्या विनियमाचे प्रारुप पदांच्या तपशिलांच्या परिशिष्टासह शासनास तातडीने सादर करणेबाबत कळविलेले होते.

त्यानुसार तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १२ जून, २०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ४९३ अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे आस्थापनेवारील कर्मचा-यांचे सेवाप्रवेश नियम-विनियम मध्ये प्रस्तावित दुरुस्त्या करणेत येऊन, सदर सेवाप्रवेश नियमाचा प्रस्ताव परिशिष्टांसह मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडेस मान्यतेसाठी सादर करणेत यावा, असा निर्णय पारित करणेत आला.

उपरोक्त निर्णयानुसार संस्थानचे विविध विभागातील पदांबाबत आवश्यक ते बदल करुन तसेच सेवाप्रवेश नियमांमध्ये दुरुसत्या करणेत येऊन प्रारुप सेवा प्रवेश नियमांचा प्रस्ताव परिशिष्टांसह मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे सामान्य प्रशासन विभागाकडील पत्र क्रमांक १४७०/ २०१४, दिनांक २६ जून, २०१४ अन्वये, सादर करणेत आला होता.

दिनांक २६ जून, २०१४ रोजीचे सादर करणेत आलेल्या प्रस्तावाबाबत, मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी त्यांचेकडील पत्र दिनांक ३० जून, २०१५ नुसार, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम,२००४ च्या कलम २५(३) मधील तरतुदीनुसार सदर अधिनियमांतर्गत लागू करण्यात आलेल्या नियमांना पुर्व प्रसिद्धी देणे आवश्यक असुन त्याप्रमाणे प्रस्तुत प्रकरणी सदर नियमांना पुर्वप्रसिद्धी देण्यात आली आहे किंवा कसे हे स्पष्ट करावे, असे कळविले.

मा. शासनाचे उपरोक्त दिनांक ३० जून, २०१५ रोजीचे पत्रानुसार कार्यवाही करुन सेवाप्रवेश नियमाचा अंतिम मसुदा सादर करणेत येईल, असे सामान्य प्रशासन विभागाकडील पत्र दिनांक ३१ जुलै, २०१५ अन्वये कळविणेत आलेले आहे.

संस्थान आस्थापनेवरील कर्मचा-यांचे सेवाप्रवेश अंतिम न झाल्यामुळे त्यांच्या नियुक्ती व पदोन्नतीत अनियमितता होत असल्याच्या अनेक तक्रारी संस्थान प्रशासनास व शासनाकडे प्राप्त झालेल्या आहेत. त्यामुळे सेवाप्रवेश नियम अंतिम करणे आवश्यक आहे. शासनाकडून या संदर्भात वारंवार पत्रव्यवहार करुनही सेवाप्रवेश नियम तयार करुन त्यांना पुर्वप्रसिध्दी देवुन त्याचे प्रारुप अद्यापही शासनास सादर करणे प्रलंबित आहेत.

**(ब)** मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६.०२.२०१९ रोजीचे सभेत निर्णय क्र.१६५ अन्वये संस्थान मधील कर्मचा-यांचा सुधारीत आकृतीबंध व सेवाप्रवेश नियम एक महिन्यात करणेकामी या क्षेत्रातील सेवानिवृत्त तज्ञ शासकीय अधिकारी/कर्मचारी यांची मानधनावर नेमणूक करणेस व याकामी येणा-या अनुषंगीक खर्चास मान्यता देण्यात आली.

उपरोक्त मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार, सामान्य प्रशासन विभागाकडील दिनांक ११ जून, २०१९ व दिनांक १३ जून, २०१९ रोजीचे मंजूर टिपणी अन्वये , संस्थान आस्थापनेवरील विविध विभागांचे सुधारित आकृतीबंध आणि सेवाप्रवेश नियमांचे प्रारुप तयार करुन त्यास अंतिम स्वरुप देणे, मा. शासनाने सुधारित आकृतीबंध व सेवाप्रवेश नियमांस मान्यता दिलेनंतर बिंदू नामावली तयार करुन अद्यायवत करणे आदि अनुषंगिक आस्थापनाविषयक सेवानिवृत्त शासकीय अधिकारी / कर्मचारी यांची नामिका सुची / कार्यगट तयार करणेकामी महाराष्ट्रातील प्रमुख वर्तमान पत्रातुन संस्थानचे अधिकृत संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन, दिनांक ०५ जुलै, २०१९ अखेर अर्ज मागविणेत आलेले होते.

सदर जाहिरातीत नमूद केलेनुसार दिनांक ०५ जुलै, २०१९ अखेर एकूण ३६१ अर्ज प्राप्त झालेले होते. सदर प्राप्त झालेल्या अर्जांची सर्वंकष तपासणी प्रशासकीय स्तरावर करणेकामी मा. वरिष्ठ अधिका-यांची उपसमिती गठीत करणेत येऊन, प्राप्त अर्जांमधून उचित व योग्य असलेल्या एकूण १७ सेवानिवृत्ती शासकीय अधिाकरी/ कर्मचा-यांच्या दिनांक ०९ ऑगष्ट, २०१९ रोजी थेट मुलाखती घेण्यात येऊन ०४ अधिकारी / कर्मचारी यांची आस्थापना विषयक कामकाजासाठी व ०१ यांची जमीन व महसूल विषयक तसेच भूसंपादन विषयक कामकाज करणेकामी मालमत्ता विभागाकडे नेमणूक करण्यात आलेली आहे.

त्यानुसार खालील पाच अधिकारी / कर्मचारी यांना प्रथमतः ०३ (तीन) महिन्यांकरीता नियुक्ती आदेश देण्यात आलेले आहेत. त्यानुसार ते दिनांक ०३ सप्टेंबर, २०१९ पासून रुजू झालेले आहेत.

तक्ता क्र. ०१

| अ.क्र. | निवड करण्यात आलेल्या अधिकारी / कर्मचारी यांचे नांव व पत्ता |
|---|---|
| ०१ | श्री. त्र्यंबक अंबादास खैरे, पंचवटी, नाशिक |
| ०२ | ॲड. डॉ. मधुकर दगडू गिरी, लातूर |
| ०३ | श्री. बाळासाहेब बापूराव भंडारकवठे, हडपसर, पुणे |
| ०४ | श्री. अशोक विठ्ठलराव शिंदे, वडगांव बुद्रूक, पुणे |
| ०५ | श्री. सुरेश सुधाकर भालेराव, कर्मवीरनगर, कोपरगांव |

**(क)** मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०९ ऑगष्ट, २०१९ रोजीचे सभेत उपरोक्त तक्त्यातील अ.क्र. ०१ ते ०४ अधिकारी यांची संस्थान आस्थापनेवरील विविध विभागांचे सुधारित आकृतीबंध, सेवाप्रवेश नियम, बिंदूनामावली यासह इतर अनुषंगिक आस्थापना विषयक कामकाजासाठी सेवा करार पध्दतीने प्रथमतः ०३ महिन्यांकरीता नियुक्ती करणेत येऊन, या कालावधी विषयांकित कामकाज पूर्ण करुन घेणेत यावे. तथापि, सदर कालावधीत कामकाज पूर्ण न झालेस, या कालावधीत करणेत आलेल्या कामकाजाचा आढावा घेऊन, त्यांना मुदतवाढ देणेबाबत विहित पध्दतीने यथावकाश निर्णय घेणेत यावा, असे ठरलेले आहे. त्यांनी खालील विभागांचे प्राथमिक आकृतीबंध तयार करुन सामान्य प्रशासन विभागाकडे सादर केलेले आहेतः-

तक्ता क्र. ०२

| अ.क्र. | विभागाचे नांव | अ.क्र. | विभागाचे नांव |
|---|---|---|---|
| ०१ | व्दारावती भक्त निवासस्थान विभाग | ०२ | श्री साईबाबा भक्त निवासस्थान विभाग |
| ०३ | अभिलेख कक्ष | ०४ | ध्वनीक्षेपण आणि दूरध्वनी विभाग |
| ०५ | प्रसादालय विभाग | ०६ | लाडू व बर्फी प्रसाद विभाग |
| ०७ | मालमत्त विभाग | ०८ | साईप्रसाद निवासस्थान विभाग |
| ०९ | बगीचा विभाग | १० | विधी विभाग |
| ११ | सभा कामकाज विभाग | १२ | जनसंपर्क विभाग |
| १३ | कॅन्टीन विभाग | १४ | साईआश्रम धर्मशाळा विभाग |
| १५ | साईआश्रम भक्तनिवासस्थान विभाग | १६ | अग्निशमन विभाग |
| १७ | आरोग्य विभाग | १८ | बांधकाम विभाग |
| १९ | मुंबई विभाग | २० | यांत्रिकी विभाग |

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | प्रकाशने विभाग | २२ | संरक्षण विभाग |
| २३ | विद्युत विभाग | २४ | वाहन विभाग |
| २५ | माहिती व तंत्रज्ञान विभाग | | |

उपरोक्त एकूण २५ विभागांचा आकृतीबंध प्ररुप मसुदा इकडील विभागास प्राप्त झालेला असून उर्वरित १५ विभागांचा आकृतीबंध प्ररुप मसुदा सादर करणे बाकी आहे. त्याचप्रमाणे सर्व संवर्गाचे सेवा प्रवेश नियम तयार करणे आणि बिंदू नामावली नोंदवही तयार करण्याचे काम बाकी आहे.

दिनांक २८/११/२०१९ रोजीचे अर्जान्वये सर्व संवर्गाचे सेवा प्रवेश नियम तयार करणे आणि बिंदू नामावली नोंदवही तयार करणेचे काम बाकी आहे, या करीता कमीत कमी ०६ महिन्यांचा कालावधी अपेक्षित आहे. सदरची कामे किलष्ट स्वरुपाचे असून त्यास वेळ लागणार आहे. दिनांक ०२ डिसेंबर, २०१९ रोजी त्यांना प्रथमतः देण्यात आलेली तिन महिन्यांचे मानधन तत्वारील नेमणकू कालावधीची मुदत संपुष्टात येत आहे.

दिनांक ०९ ऑगष्ट, २०१९ रोजीचे इतिवृत्तातील कलम ०७ मध्ये पुढीलप्रमाणे नमूद करणेत आलेले आहे- " परिशिष्ट अ मधील अ.नं. ०१ ते ०४ यांची विषयांकित कामकाजासाठी प्रथमतः ०३ महिन्यांकारीता नियुक्ती करणेत येऊन, या कालावधीत विषयांकित कामकाज पूर्ण करुन घेणेत यावे. तथापि, सदर कालावधीत कामकाज पूर्ण न झालेस, या कालावधीत करणेत आलेल्या कामकाजाचा आढावा घेऊन, त्यांना मुदतवाढ देणेबाबत विहित पध्दतीने यथावकाश निर्णय घेणेत यावा." नुसार त्यांना किमान ०६ महिन्यांची मुदतवाढ देण्यात यावी, असे मत आहे.

(ड) तसेच दिनांक दिनांक ०९ ऑगष्ट, २०१९ रोजीचे इतिवृत्तातील कलम ०८ मध्ये पुढीलप्रमाणे नमूद करणेत आलेले आहे- " उपरोक्त परिशिष्ट अ मध्ये अ.नं. ०५ श्री. सुरेश सुधाकर भालेराव, कोपरगांव यांना मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०४ जुलै, २०१९ रोजीचे सभेतील निर्णयानुसार, संस्थानचे जमीन व महसूल विषयक तसेच भूसंपादन विषयक कामकाज करणेकामी प्रथमतः०१ वर्षासाठी एकत्रित मानधनावर नियुक्त करणेत यावे."

त्यानुसार श्री. सुरेश भालेराव, सेवानिवृत्त नायब तहसिलदार यांना मालमत्ता विभागाकडे जमिन महसूल व भूसंपादन विषयक अनुषंगिक कामे करण्यासाठी प्रथमतः तीन महिन्यांकरीत मानधनावर नेमणूक करण्यात आली आहे. त्यानुसार ते दिनांक ०५ सप्टेंबर, २०१९ पासून रुजू झालेले आहेत. त्यांनी सादरचे कालावधीत केलेल्या कामविषयीचा अहवाल उपरोक्त संदर्भ क्र. १० नुसार सादर केलेले आहे. तथापि त्यांची दिनांक ०४ डिसेंबर, २०१९ रोजी त्यांना प्रथमतः तीन महिन्यांचे मानधन तत्वारील नेमणकीचे कालावधीची मुदत संपुष्टात येत आहे. तसेच उर्वरित कामांसाठी त्यांना मुदतवाढ मिळणेसाठी दिनांक २०/११/२०१९ रोजीचे अर्जान्वये विनंती केलेली आहे.

दिनांक ०९ ऑगष्ट, २०१९ रोजीचे इतिवृत्तातील कलम ०८ नुसार श्री. सुरेश सुधाकर भालेराव, सेवानिवृत्त नायब तहसिलदार यांना पुढील ०६ महिनेचे कालावधीसाठी सामान्य प्रशासन, महाराष्ट्र शासन, निर्णय क्र. संकीर्ण- २७१५/ प्र.क्र. १००/ १३ दिनांक १७/१२/२०१६ नुसार मानधन देण्यात येऊन, आहे त्याच अटीशर्ती नुसार मुदतवाढ देण्यात यावी, असे मत आहे.

(इ) प्रस्ताव –

उपरोक्त परिच्छेद 'अ' ते 'ड' मध्ये नमूद केलेल्या वस्तुस्थितीदर्शक विवेचनास अनुसरुन ,

(१) तक्ता क्र. ०१ मधील अ.नं. ०१ ते ०४ मध्ये नमूद केलेले सेवानिवृत्त शासकीय अधिकारी अनुक्रमे १) श्री. त्र्यंबक अंबादास खैरे २) ॲड. डॉ. मधुकर दगडू गिरी ३) श्री. बाळासाहेब बापूराव भंडारकवठे ४) श्री. अशोक विठ्ठलराव शिंदे यांना आस्थापना विषयक कामकाजासाठी दिनांक ०३ डिसेंबर, २०१९ पासून पुढील ०६ महिन्यांकरीता आहे त्याच अटीशर्तीवर मुदतवाढ देणेकामी सदरचा प्रस्ताव तदर्थ समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सविनय सादर.

(२) तक्ता क्र. ०१ मधील अ.नं. ०५ मध्ये नमूद केलेले सेवानिवृत्त शासकीय अधिकारी श्री. सुरेश सुधाकर भालेराव यांना भूसंपादन व जमीन महसूल विषयक कामकाजासाठी दिनांक ०५ डिसेंबर, २०१९ पासून पुढील ०६ महिन्यांकरीता सामान्य प्रशासन, महाराष्ट्र शासन, निर्णय क्र. संकीर्ण- २७१५/ प्र.क्र.१००/१३ दि. १७/१२/२०१६ नुसार मानधन देण्यात येऊन आहे त्याच अटी शर्तीवर मुदतवाढ देणेकामी सदरचा प्रस्ताव तदर्थ समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.५९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे सुधारित आकृतीबंध, सेवाप्रवेश नियम, पदोन्नतीची साखळी, कार्यपध्दती एकल पदे तसेच आरक्षण नियमानुसार बिंदु नामावलीचे प्रस्ताव तयार करणेकामी नेमणूक करण्यात आलेले सेवानिवृत्त शासकीय कर्मचारी १) श्री.त्र्यंबक अंबादास खैरे २) अॅड.डॉ.मधुकर दगडू गिरी ३) श्री.बाळासाहेब बापूराव भंडारकवठे ४) श्री.अशोक विठ्ठलराव शिंदे यांना आस्थापना विषयक कामकाजासाठी दिनांक ०३ डिसेंबर,२०१९ पासून पुढील ०६ महिन्यांकरीता आहे त्याच अटी शर्तीवर मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.**

**संस्थानचे जमीन, महसूल व भूसंपादन विषयक कामकाज करणेकामी सेवानिवृत्त नायब तहसिलदार श्री.सुरेश सुधाकर भालेराव यांना सामान्य प्रशासन, महाराष्ट्र शासन, निर्णय क्र.संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३ दि.१७/१२/२०१६ नुसार मानधन देण्यात येऊन दिनांक ०५ डिसेंबर,२०१९ पासून पुढील ०६ महिन्यांकरीता आहे त्याच अटी शर्तीवर मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.**

**तसेच सदर सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी केलेल्या कामाचा त्रैमासिक अहवाल मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर सादर करण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.१५** **आय.टी.आय.विभागाकडील गट निदेशक व निदेशक यांना मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद व मा.उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे शासन निर्णयानुसार सातव्या वेतन आयोगाचे फरकाची रक्कम आदा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अ)** श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्था शिर्डी (आय टी आय) कडील श्री. रा. ज्ञ. चौधरी, गटनिदेशक व श्री. दा. नि. जांभुळकर, गटनिदेशक यांनी दि.०३/१०/२०१६, दि.०९/०५/२०१७ व दि.२६/०७/२०१८ रोजीचे अर्जान्वये दि.२६ ऑगस्ट, २०१३ व दि.१७ जुलै, २०१८ चे शासन निर्णयानुसार आम्हाला गटनिदेशक पदासाठीचे ग्रेड वेतन ४६०० ऐवजी ४८०० असे सन २००६ पासुन मंजूर केलेले आहे. तरी, वरील शासन निर्णयानुसार बदल केलेले ग्रेडवेतन रु. ४८०० सन २००८ ला आम्हाला १२ वर्ष पूर्ण झाले असून आश्वसित प्रगती योजनेचा पहीला लाभ मिळालेला आहे. तेव्हा पासुन वाढीव ग्रेड वेतन व एकल पदाचा लाभ मिळणेस विंनती केलेली होती.

मा. वित्त विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्र. वेपुर-१२१२/ प्र.क्र.३१/सेवा-९ दि. ११/०२/२०१३ रोजीचे वेतन त्रुटी निवारण समितीचे शिफारशींची अमलबजावणी बाबतचा आदेश, मा. वित्त विभाग, महाराष्ट्र शासन पूरकपत्र क्रमांक वेपुर-१२१२/प्र.क्र.३१/ सेवा-९, दि. २६ ऑगस्ट, २०१३ व मा. वित्त विभाग, महाराष्ट्र शासन शुध्दीपत्रक क्रमांक वेपुर-१२१२/ प्र.क्र.३१/सेवा-९ दि. १७ जुलै, २०१८ रोजीचे शुध्दीपत्रकानुसार तसेच दि. १७/०६/२०१३ रोजीचे आयटीआय विभागाकडील आदेशानुसार श्री. रा. ज्ञ. चौधरी, गटनिदेशक व श्री. दा. नि. जांभुळकर, गटनिदेशक यांना अनुक्रमे दि.१९/०९/२००८ व दि. २४/०९/२००८ पासून ९३००-३४८०० ग्रेड वेतन ४८०० ही वरिष्ठ वेतनश्रेणी व निवड श्रेणी मा. उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे शासन निर्णयानुसार त्यांची वेतन निश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ चे नियम ११ (२) नुसार करुन त्यानुसार देय्य रक्कम आदा करणेस / अतिप्रदान झालेली रक्कम समान ३० हप्त्यांमध्ये संबंधितांचे मासिक वेतनातुन वसुल करण्यात यावी, असा जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/३०६०/ २०१८ दि. १०/०१/२०१९ अन्वये आदेश पारित झालेला आहे.

**ब)** सामान्य प्रशासन विभागाचे दिनांक १८/०८/२०१८ रोजीचे टिपणीवरील निर्देशानुसार श्री. चौधरी व श्री. जांभुळकर गटनिदेशक यांना वरिष्ठ वेतनश्रेणी मंजूर करण्यास हरकत नसावी. मात्र सर्वच शिक्षकिय पदांना सुधारीत आश्वासित प्रगती योजना लागू नाही. तर त्यांनी वरिष्ठ वेतनश्रेणी / निवडश्रेणी प्रकरण व पद परत्वे लागु आहे. यापुर्वी श्री. चौधरी व श्री. जांभुळकर यांचेप्रमाणे इतरही शिक्षकांना सुधारीत आश्वसित प्रगती योजनेचा लाभ अनुज्ञेय केला असल्यास त्याबाबतचा आढावा घेणेबाबत निर्देशीत करण्यात आलेले आहे.

त्यास अनुसरुन त्याबाबतचा आढावा घेतला असता, आयटीआय विभागाकडील प्राचार्य, गटनिदेशक व निदेशक यांना कालबध्द पदोन्नती, आश्वासित प्रगती योजना व सुधारीत आश्वासित प्रगती योजनेचे लाभ देण्यात आलेले आहेत. तसेच सदरचे लाभ देतांना त्यांची वेतननिश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ चे नियम ११ (१) ए नुसार करण्यात आलेली आहे. परंतू ती महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ चे नियम ११ (२) नुसार करणे आवश्यक होते.

त्यामुळे आयटीआय विभागाकडील प्राचार्य व निदेशक यांना ज्या दिनांकापासून कालबध्द पदोन्नती,

आश्वासित प्रगती योजना व सुधारीत आश्वासित प्रगती योजनेचे लाभ देण्यात आलेले आहेत त्या दिनांकापासून आयटीआय विभागाकडे २४ निदेशक कार्यरत असलेबाबत (सेवा निवृत्त निदेशकासह) दिसत असल्यामुळे २४ निदेशकांपैकी निवड श्रेणीसाठी (२० % प्रमाणे ४.८ म्हणजेच ५ शिक्षकांना) सदर शासन निर्णयातील निदेशकांना निवड श्रेणी देऊन मा. उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे शासन निर्णयानुसार त्यांची वेतन निश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ चे नियम ११ (२) नुसार करुन त्यानुसार देय्य रक्कम देणेस / अतिप्रदान झालेली रक्कम वसुल करणेबाबत जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/३०६०/२०१८ दि. १०/०१/२०१९ अन्वये आदेशीत करण्यात आलेले होते.

सदरचे आदेशाचे विरुध्द ०२ गटनिदेशक व २४ निदेशक यांचेपैकी आय. टी. आय. विभागाकडील एकूण १९ निदेशाकांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद येथे रिट पिटीशन याचिका क्र. ४३६६ ते ४३८३ व ५०१४ अन्वये मा. मुख्य कार्यकारी अधिकारी , श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व प्राचार्य, श्री साईबाबा संस्थान औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांना प्रतिवादी करुन त्यांचे विरुध्द याचिका दाखल केलेल्या होत्या. सदर याचिकेचा दिनांक १६/०८/२०१९ रोजी सुनावणी होउन निकाल दिलेला आहे. (उपरोक्त संदर्भ क्र. १६ नुसार सादर निकाल सोबत अवलोकनार्थ सादर केलेला आहे.) सदरचे निकालानंतर संबंधित निदेशक यांनी दिनांक १६/०८/२०१९ रोजी दिलेल्या निकालानुसार जा.क्र.एसएसएस/ साप्रशा/ आस्था/ ३०६०/ २०१८ दि.१०/०१/२०१९ रोजीचा आदेश रद्दबातल केलेला आहे. त्यामुळे फेब्रुवारी, २०१९ पासून काढून घेतलेली वेतनवाढ पुर्वलक्षीप्रभावाने व त्यासंबंधित इतर अनुषंगिक लाभ मिळणेबाबतचे एकूण १९ निदेशक यांचेअर्ज प्राचार्य, श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शिर्डी यांनी एकत्रितरित्या आवक क्र. ८६२४ दि. २८/०८/२०१९ अन्वये इकडील कार्यालयास सदर केलेले होते.

त्यामुळे मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद येथे रिट पिटीशन याचिका क्र. ४३६६ ते ४३८३ व ५०१४ चे निकालाचा अन्वयार्थ व त्यासंबंधीत विश्लेषणावर सविस्तर अभिप्राय मिळणेबाबत जा.न.एसएसएस/ साप्रशा-वशी-१/ २१८९/ २०१९ दि. ०६/०९/२०१९ अन्वये अॅड. नितिन आर. भवर, अॅडव्होकेट औरंगाबाद हायकोर्ट, यांना विनंती करण्यात आलेली होती.

त्यानुसार मा. अॅड. नितिन आर. भवर, अॅडव्होकेट औरंगाबाद हायकोर्ट, यांनी दिनांक २१/०९/२०१९ रोजी खालील प्रमाणे अभिप्राय दिलेला आहे-

“As you know, the Hon’ble High Court of Judicature at Bombay Bench at Aurangabad vide common judgement & order dated 16.08/2019 passed in Writ Petition No. 4366/2019 to Writ Petition No. 4283/2019 has quashed & set aside the orders dated 10.01.2019 issued by Shri Saibaba Sansthan Trust directing recovery of excess amount of salary allowances paid to the petitioners therein. Consequently, the orders dated 10.01.2019 issued by Shri Saibaba Sansthan Trust in respect of recovery cannot be effected & implemented and the recovery of excess amount os salary cannot be made. Therfore, in our opinion, the petitioners in Writ Petition No. 4366/2019 to Writ Petition No. 4283/ 2019 shall be paid monthly regular salary from the date of revision of pay fixation & benefit of ACPs.”

उपरोक्त अभिप्रायाबाबत दिनांक १९/०९/२०१९ रोजी मा. उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कक्षात मा. अॅड. भवर यांनी चर्चा करतांना मा. उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे शासन निर्णयानुसार त्यांची वेतन निश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ चे नियम ११ (२) नुसार करुन आलेल्या वेतननिश्चितीबाबत मा. न्यायालायाचा आक्षेप नसुन त्यांना अतिरिक्त देण्यात आलेले वेतन वसुल न करणेबाबत न्यायालयाने आदेशित केलेले आहे, असे सांगितले आहे.

त्यानुसार मा. उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे शासन निर्णयानुसार त्यांची वेतन निश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ चे नियम ११ (२) नुसार करुन आलेल्या वेतननिश्चितीनुसार दिनांक ०१ जानेवारी, २०१६ पासून देण्यात येऊन त्यानुसार देय्य रक्कम त्यांना आदा करावी लागणार आहे.

संस्थान कायम कर्मचारी यांची दिनांक ०१ जानेवारी, २०१६ पासून पूर्वलक्षी प्रभावाने वेतन निश्चिती करुन (सेवा निलंबीत / ज्यांचे बाबत काही त्रुटी / अडचणी / कार्यवाही प्रलंबित / चालू आहे/ न्यायप्रविष्ट, अशा कर्मचा-यांचे व्यतिरिक्त) माहे जुलै, २०१९ पासुन सातवा वेतन आयोग लागू करण्यात आलेला आहे. तसेच दिनांक ०१/०१/२०१६ ते दिनांक ३०/०६/२०१९ या कालावधीतील फरकाची रक्कमही आदा करण्यात आलेली

आहे. तथापि मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांचे दिनांक १६/०८/२०१९ रोजीचे निर्णयाबाबत मा. ॲड. नितिन आर. भवर, ॲडव्होकेट औरंगाबाद हायकोर्ट यांचे अभिप्राय प्राप्त झालेनंतर स्वतंत्र अलाहिदा प्रशासकीय टिपणी सादर करुन फरक आदा करणेबाबत दिनांक १६/०९/२०१९ रोजीचे टिपणीनुसार मान्यता घेण्यात आलेली आहे.

त्यानुसार ॲड. नितिन आर. भवर, ॲडव्होकेट औरंगाबाद हायकोर्ट यांचे अभिप्रायानुसार मा. उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे शासन निर्णयानुसार त्यांची वेतन निश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ चे नियम ११ (२) नुसार करुन आलेल्या फेरवेतन निश्चितीनुसारचे वेतनानुसार सातव्या वेतन आयोगानुसार दिनांक ०१ जानेवारी, २०१६ पासूनची देय्य रक्कम (सहाव्या वेतन आयोगानुसार दिलेल्या रक्कमेत कुठलाही बदल न करता), आय. टी. आय. विभागाकडील १९ निदेशक यांना आदा करणेसाठी इकडील विभागाकडून दिनांक ०१/११/२०१९ रोजी टिपणी सादर केलेली आहे.

**क)** मा. उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे शासन निर्णयानुसार तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ चे नियम ११ (२) नुसार आय. टी. आय. विभागाकडील ०२ गटनिदेशक व २४ निदेशक यांना वरिष्ठ श्रेणी / निवड श्रेणी लागू असल्याने त्यांची फरेवेतन निश्चिती करुन त्यानुसार देय्य रक्कम आदा करणेस / अतिप्रदान झालेली रक्कम समान ३० हप्त्यांमध्ये संबंधितांचे मासिक वेतनातुन वसुल करणेबाबत आदेश पारित झालेला आहे.

सदर आदेशाचे विरुध्द आय. टी. आय. विभागाकडील एकूण २६ गटनिदेशक / निदेशक यांचेपैकी १९ निदेशक यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद येथे रिट पिटीशन याचिका दाखल केलेली होती. उर्वरित ०७ गटनिदेशक / निदेशक यांनी संस्थान विरोधात कुठलीही याचिका दाखल केलेली नाही.

आता, उपरोक्त संदर्भ क्र. १९ नुसार दिनांक ०१/११/२०१९ रोजीचे अर्जान्वये खालील निदेशक यांनी विनंती अर्ज केलेला आहे-

| अ.क्र. | नाव | पदनाम | अ.क्र. | नांव | पदनाम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री रामनाथ ज्ञानदेव चौधरी | गटनिदेशक | ०२ | श्री दादा निळकंठ जांभुळकर | गटनिदेशक |
| ०३ | श्री अभयकुमार शांताराम दुनाखे | निदेशक | ०४ | श्री सुनिल सखाराम तांबे | निदेशक |
| ०५ | श्री युवराज पुंडलीक एंडाईत | सेवानिवृत्त निदेशक | ०६ | श्री बन्सी किसन मुठे | सेवानिवृत्त निदेशक |
| ०७ | श्री प्रभाकर वेडू सोनवणे | सेवानिवृत्त निदेशक | | | |

उपरोक्त ०७ गटनिदेशक / निदेशक यांनी आम्ही कोर्टात गेलेलो नाही. तरी, आम्हाला कोर्टाच्या निर्णयाप्रमाणे व मानवतेच्या दृष्टीने तोच निर्णय लागू करुन व सहानुभुतीपूर्वक विचार करुन लाभ मिळणेस विनंती केलेली आहे.

त्यानुसार सामान्य प्रशासन विभागाचे दिनांक ०७/११/२०१९ रोजीचे टिपणीनुसार ०७ गटनिदेशक / निदेशक यांनी संस्थान विरोधात कुठलीही याचिका दाखल केलेली नव्हती. सदरचे ०७ गटनिदेशक / निदेशक यांचेकडूनही समान नैसर्गिक न्याय तत्वानुसार कुठलीही वसुली न करता मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांचे आदेशानुसार व मा. उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे शासन निर्णयानुसार त्यांची वेतन निश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ चे नियम ११ (२) नुसारचे फेरवेतन निश्चितीनुसार सातव्या वेतन आयोगानुसार दिनांक ०१ जानेवारी, २०१६ पासूनची देय्य रक्कम त्यांना (सहाव्या वेतन आयोगानुसार दिलेल्या रक्कमेत कुठलाही बदल न करता) आदा करणेबाबतचे मान्यतेस्तव टिपणी सादर केली असता, सदरचे प्रकरण तदर्थ समीती समोर ठेवणेस हरकत नसलेबाबत निर्देशित करणेत आलेले आहे.

उपरोक्त "क" नुसार ०७ गटनिदेशक / निदेशक यांनी संस्थान विरोधात कुठलीही याचिका दाखल केलेली नव्हती. सदरचे ०७ गटनिदेशक / निदेशक यांचेकडूनही समान नैसर्गिक न्याय तत्वानुसार कुठलीही वसुली न करता मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांचे आदेशानुसार व मा. उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे शासन निर्णयानुसार त्यांची वेतन निश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ चे नियम ११ (२) नुसारचे फेरवेतन निश्चितीनुसार सातव्या वेतन आयोगानुसार दिनांक ०१ जानेवारी, २०१६ पासूनची देय्य रक्कम त्यांना (सहाव्या वेतन आयोगानुसार दिलेल्या रक्कमेत कुठलाही बदल न करता) आदा करणेबाबत सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६०** **यावर सविस्तर चर्चा झाली, समितीचे असे निदर्शनास आणून दिले की, संस्थानचे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील १९ निदेशकांनी मा.उच्च न्यायालय मुंबईच्या औरंगाबाद खंडपीठात दाखल केलेल्या रिट पिटीशन याचिका क्र.४३६६ ते ४३८३ व ५०१४ मध्ये मा.न्यायालयाने अतिरिक्त देण्यात आलेले वेतन वसुल न करणेबाबत आदेशित केलेले आहे.**

**उपरोक्त प्रस्तावात नमुद ०७ गटनिदेशक/निदेशक यांनी संस्थान विरोधात कुठलीही याचिका दाखल केलेली नव्हती. सदरचे ०७ गटनिदेशक/निदेशक यांचेकडूनही समान नैसर्गिक न्याय तत्वानुसार कुठलीही वसुली न करता इतर १९ निदेशक यांचे प्रकरणात रिट पिटीशन याचिका क्र.४३६६ ते ४३८३ व ५०१४ नुसार मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाप्रमाणे सातव्या वेतन आयोगाचा फरक अदा करणेस मान्यता देण्यात आली. तसेच अर्जदारांच्या बाबतीत त्यांना सुधारीत वेतनवाढ देतांना त्यांची वेतन निश्चिती काळजीपुर्वक करावी जेणेकरुन त्यांना जास्तीची रक्कम अदा होणार नाही, असे ठरले.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.१६** **दुसरे अपत्य दिव्यांग असल्याने त्यानंतरचे (तिसरे) पाल्यास शैक्षणिक शुल्क परताव्याबाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६.०२.२०१८ चे सभेतील निर्णय क्र.१४३ व मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील क्र.सासंवि १०१९/३७२/प्र.क्र.७८/का.१६ दि.२४/०७/२०१९ रोजीचे पत्रान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या आस्थापनेवरील स्थायी कर्मचा-यांना त्यांच्या पाल्यांच्या शैक्षणिक फीचा परतावा करण्यात येतो, त्याच धर्तीवर सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाकरिता श्री साईबाबा संस्थानच्या विविध विभागात कार्यरत असलेल्या सर्व कंत्राटी कर्मचा-यांना त्यांचे पाल्यांचा शैक्षणिक फीचा परतावा करण्यास आणि त्याकरिता होणा-या रुपये-३८ लक्ष मात्र इतक्या खर्चास शासन मान्यता मिळालेली आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२१/०४/१९९६ चे सभेतील निर्णय क्र.८९ अन्वये मंजूर मार्गदर्शक तत्वे वजा नियमावली ठरविण्यात आलेली आहे. सदरच्या मार्गदर्शक तत्वानुसार सध्या शैक्षणिक शुल्काचा परतावा देण्याची कार्यवाही चालु आहे. निर्णय क्र.८९ (१) शासनाने विद्यापीठांनी केवळ गुणवत्तेच्या निकाषावर (On Merit Basis) भरण्यात येणा-या (सुमारे ५० % पर्यंतच्या) जागांवर प्रवेश दिल्या जाणा-या विद्यार्थ्यांसाठी (निम्न दराने) निर्धारीत केलेल्या फी दर रकमेपर्यंतच, मर्यादीत असावा असे नमुद आहे. यास अनुसरुन शासकीय/शासन अनुदानित अभ्यासक्रमासाठी आकारण्यात येणा-या शुल्काच्या मर्यादेपर्यंत शैक्षणिक शुल्क रकमेचा परतावा दिला जातो. तसेच ज्यु.के.जी ते इ.१० वी (इंग्रजी माध्यम) व आयटीआय या अभ्यासक्रमांचा शैक्षणिक शुल्काचा परतावा संस्थानच्या शाळेतील फीचे मर्यादेपर्यंत अदा केला जातो.

(ब) श्री राजु विनायक गोपाळ, अकुशल कंत्राटी कर्मचारी कॅन्टीन विभाग यांनी त्यांचे दि. १३/१२/२०१९ रोजीच्या अर्जान्वये " माझी मुलगी कुमारी श्रध्दा राजु गोपाळ ही दुस-या इयत्तेत शिकत आहे. श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल येथे शिक्षण घेत आहे. मी सन २०१८-१९ फी परतावा मुलीचा मिळणेसाठी अर्ज केला आहे. मला अद्याप पावेतो फी मिळालेली नाही.

मला दोन मुली व एक मुलगा आहे. दोन नंबरची मुलगी ही ९८ टक्के अपंग आहे. ती कोणत्याही प्रकारचे काम करुन शकत नाही. मुकबधीर आहे. तीचा सर्व प्रकारचा सांभाळ आम्हालाच करावा लागतो. फक्त एक मुलगी व मुलगा हा व्यवस्थित आहे. त्यामुळे जी मुलगी मुकबधीर आहे ती गृहीत धरुन माझी फी देण्याचे थांबवु नये अशी मी कळकळीची आपणास विनंती करतो.

तरी मा. साहेबांनी माझी सन २०१८-१९ ची मुलीची (तीसरे अपत्य) फी देणेस विनंती. "

(क) मा.व्यवस्थापन समितीचे दि.२१/०४/१९९६ चे सभेतील निर्णय क्र.८९ अन्वये मंजूर मार्गदर्शक तत्वे वजा नियमावलीत अ.नं. १०. मध्ये पुढील प्रमाणे नमुद आहे. " सन १९९६-९७ चे शैक्षणिक वर्षापासून फि चा परतावा कर्मचा-यांच्या प्रथम वा अधिकाधिक दोन पाल्यांना देण्यात यावा." थोडक्यात, अर्जदार श्री गोपाळ यांची व्दितीय पाल्य कुमारी वैष्णवी राजू गोपाळ ही ९८% दिव्यांग असून जिल्हा हॉस्पीटल, अ.नगर चे प्रमाणपत्र सादर केले आहे. तृतीय अपत्य इयता दुसरी मध्ये शिक्षण घेत आहे. सदर पाल्यास शैक्षणिक शुल्क द्यावयाचे झाल्यास रु.४३६०/- मात्र परतावा द्यावा लागेल.

सन २०१७-१८ मध्ये (मागील वर्षी) कंत्राटी कर्मचारी श्री प्रल्हाद कचरु पगारे यांचे पहिले अपत्य १०० टक्के दिव्यांग असल्याने उर्वरीत दोन पाल्यांच्या शैक्षणिक शुल्क परताव्याचा अर्ज प्राप्त झाला होता. त्यावर दि.०१/०३/२०१९ टिपणी सादर केली होती. तिसरे अपत्यास शैक्षणिक शुल्क परताव्याबाबतचा शासन निर्णय नसल्याने दि.०७/०३/२०१९ रोजी पुन्हा टिपणी सादर केली असता, सदर अर्ज प्रशासकीय स्तरावर नामंजूर

करण्यात आला होता. त्यामुळे श्री. राजु विनायक गोपाळ, अकुशल कंत्राटी कर्मचारी यांना, त्यांचे व्दितीय पाल्य (अर्जदाराने अर्जात नमुद केलेप्रमाणे पाल्य क्रमांक ०२ मुलगी) हे दिव्यांग असल्याने त्यांचे तिसरे अपत्य (मुलगी) यांस शैक्षणिक शुल्क फी परतावा आदा करणेत यावा किंवा कसे? याबाबत धोरणात्मक निर्णय होणेकामी सदर विषयांकीत प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेपुढे विचारार्थ व निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री राजु विनायक गोपाळ, अकुशल कंत्राटी कर्मचारी कॅन्टीन विभाग यांचे दुसरे अपत्य कुमारी वैष्णवी राजू गोपाळ ही ९८% दिव्यांग असून त्याबाबत जिल्हा हॉस्पीटल, अहमदनगर यांचेकडील प्रमाणपत्र सादर केलेले असल्याने विशेष बाब म्हणून त्यानंतरचे (तिसरे) अपत्य कुमारी श्रध्दा राजु गोपाळ हिचे सन २०१८-१९ मधील शैक्षणिक फी परतावा रक्कम रु.४,३६०/- मात्र आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.१७** **मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार खरेदी करावयाच्या साऊंड सिस्टीम साहित्यांबाबत मा.विश्वस्त ॲड श्री.मोहन जयकर साहेब यांचे मार्गदर्शनानुसार त्यांचेकडून उपलब्ध होणाऱ्या तज्ञ सल्लागारांचे अभिप्रायानुसार साऊंड सिस्टीम साहित्य संस्थानचे विहीत पध्दतीने खरेदी करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद:- (१)२१(ग) भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा धार्मीक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

मा.व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/०१/२०१९ रोजीचे सभेतील विषय नं.३१ निर्णय क्र.६९.

प्रस्तावनाः- मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/०१/२०१९ रोजीचे सभेतील विषय नं.३१ निर्णय क्र.६९ नुसार श्री साईबाबांचे समाधी मंदिरातील आरती व दैनंदिन साईभजन संध्या कार्यक्रमाकरीता आवश्यक असलेले साऊंड सिस्टीम साहित्य खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रीया राबविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.८२,४८,९५०/-+टॅक्स (अक्षरी रक्कम रुपये- ब्याऐंशी लाख अठ्ठेचाळीस हजार नऊशे पन्नास मात्र+टॅक्स) मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली आहे. त्यास अनुसरुन दि.०५/०५/२०१९ रोजीचे टिपणीवरील निर्देशास अनुसरुन कार्यवाही होणेस मान्यता मिळालेली आहे.

तथापी, श्रींचे समाधी मंदिरातील आरती व दैनंदिन साईभजन संध्या कार्यक्रमाकरीता आवश्यक असलेले नमुद साऊंड सिस्टीम साहित्य हे उच्च दर्जीत Specific Make/Brand व Model Number चे असल्याने महाराष्ट्र शासनाचे दि.०१/०४/२०१९ रोजीचे पत्रास अनुसरुन संस्थानच्या खरेदी विभागाचे दि.०६/०५/२०१९ रोजीचे परिपत्रकात नमुद केलेनुसार एकल स्त्रोत पध्दतीने खरेदी करावयाच्या साहित्याबाबत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी/ मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेतलेनंतर मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांची मान्यता घेऊनच अशा वस्तु व साहित्याची खरेदी करावी, असे नमुद करण्यात आले आहे.

महाराष्ट्र शासनाचे दि.०१/०४/२०१९ रोजीचे पत्रास अनुसरुन सदर साहित्य खरेदी करणेपुर्वीखरेदी विभागाचे दि.०६/०५/२०१९ रोजीचे परिपत्रकानुसार नमुद Specific Make/Brand व Model Number चे साहित्याची एकल स्त्रोत पध्दतीने ई-निविदा प्रक्रीयेव्दारे खरेदी करणेकामी महाराष्ट्र शासनाचे मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांची मान्यता मिळणेकामी त्यांना दि.१६/०५/२०१९ रोजीचे पत्रान्वये कळविण्यात आले होते. त्यानुसार महाराष्ट्र शासनाचे दि.१८/०६/२०१९ रोजीचे पत्रात उपस्थित केलेल्या मुद्यांबाबत स्पष्टीकरणासह परीपुर्ण सविस्तर प्रस्ताव शासनास सादर करणेबाबत कळविण्यात आले आहे. त्यानुसार महाराष्ट्र शासनाचे दि.१८/०६/२०१९ रोजीचे पत्रातील उपस्थीत मुद्यांबाबत स्पष्टीकरणासह खुलासा त्यांना पत्राव्दारे कळविणेचे मान्यतेस्तव प्रस्ताव दि.११/०७/२०१९ रोजीचे टिपणी अन्वये सादर करण्यात आला होता.सदर प्रस्तावावर ‘विधी व न्याय विभागाने मांडलेल्या प्रश्नांकित मुद्याला खरेदी नियमावलीतील नियम नमुद करुन विधी व न्याय विभागास कळविता येईल. टिपणीत याबाबत अभाव दिसून येतो’असे निर्देशित केलेले आहे.

उपरोक्त प्राप्त निर्देशास अनुसरुन महाराष्ट्र शासनाचे दि.१८/०६/२०१९ रोजीचे पत्रातील नमुद मुद्याला खरेदी नियमावलीतील नियम नमुद करण्यात येऊन,सदर महाराष्ट्र शासनाचे पत्रातील उपस्थित मुद्यांबाबत स्पष्टीकरणासह खुलासा महाराष्ट्र शासनास दि.१२/०८/२०१९ रोजीचे टिपणी सोबतच्या प्रस्तावित पत्राव्दारे कळविणेकामी प्रस्ताव मान्यतेस्तव सादर करण्यात आला होता.सदर प्रस्तावावर ‘‘शासनाकडुन आलेल्या पत्रात अपवादात्मक परिस्थिती नमुद करण्यास सांगीतले आहे. तशी बाब नमुद नाही. जेथे २ Brands नमुद आहेत

त्याच्या वैधतेबाबत व नमुद अनुषंगिक बाबींबाबत इकडील विभागाचे दि.१२/०८/२०१९ रोजीचे टिपणीवर खरेदी विभागाचा अभिप्राय घेता येईल , असे नम्र मत असलेबाबत” निर्देश दिलेले होते.

सदरहु निर्देशास अनुसरुन संस्थानचे खरेदी विभागाने आपला अभिप्राय दि.२३/०९/२०१९ रोजीचे पत्राव्दारे खालीलप्रमाणे सादर केलेला आहे.

*१)* ध्वनिक्षेपण विभागाकडुन महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभागाकडे जा.नं.एसएसएसटी/ध्वनिक्षेपण व टेलिफोन/५२०/२०१९ दि.१६/०५/२०१९ अन्वये Specific Make/Brand व Model Number साहित्याची एकलस्त्रोत पध्दतीने ई-निविदा प्रक्रीयेव्दारे खरेदी करणेस मान्यता मिळणेची विनंती केली आहे.

महाराष्ट्र शासनाचे सुधारीत खरेदी नियमावली २०१६ मधील तरतुद क्र.३.२.६ एकल स्त्रोत खरेदीची तरतुद खालीलप्रमाणे आहे.

“एकल स्त्रोत पुरवठादाराच्या निवडीमध्ये गुणवत्ता आणि खर्चाच्या संबंधात स्पर्धेमुळे जे फायदे मिळतात ते फायदे मिळत नाहीत. तसेच अशा निवडीत पारदर्शकतेची उणीव असते आणि त्यामुळे अस्वीकारार्ह प्रथांना प्रोत्साहन मिळते. त्यामुळे एकलस्त्रोत निवड पध्दत खाली नमुद केलेल्या अपवादात्मक परिस्थितीत वापरण्यात येते”.

अ- खरेदीची वस्तु फक्त एका विशिष्ट विक्रेत्याकडे उपलब्ध असते किंवा खरेदीच्या विषयाच्या संदर्भात फक्त विशिष्ट विक्रेत्याला अधिकार असतात. ज्यामुळे अन्य कोणताही किंवा बदली पर्याय उपलब्ध नसतो. व अन्य कोणत्याही खरेदी पध्दतीचा अवलंब करणे शक्य नसते.

वरील तरतुदीचा विचार करता एकल स्त्रोत म्हणजे एकाच विशिष्ट विक्रेत्याकडून खरेदी करणे असा आहे. तथापि सदर प्रस्तावामध्ये एकल स्त्रोत पध्दतीने ई-निविदा प्रक्रियेव्दारे खरेदी करणेस मान्यता मागितलेली आहे. हा प्रस्ताव मागे घ्यावा असे मत आहे.

२) ध्वनिक्षेपण विभागाकडुन शासनाचे विधी व न्याय विभागाला सादर केलेले प्रस्तावित पत्रातील (दि.१२/०८/२०१९ रोजीचे टिपणी सोबतचे प्रस्तावित पत्र) मुद्दा क्र.३ मध्ये Cordless Micसाठी ४ कंपन्या नमुद करुन त्याची अंदाजे किंमत नमुद केली आहे. यामध्ये सदर साहित्याचा दर्जा व गुणवत्तेनुसार किमतीमध्ये मोठ्या प्रमाणावर Variation दिसुन येते.

संस्थानला चांगले दर्जेदार व उच्च प्रतिचे साहित्य खरेदी करणे गरजेचे आहे व त्यानुसार मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/०१/२०१९ चे सभेतील निर्णय क्र.६९ नुसार विशिष्ट कंपन्यांचे साहित्य खरेदी करणेस ध्वनिक्षेपण विभागास मान्यता मिळालेली आहे.

शासनाचे सुधारीत नियमावलीतील तरतुद क्र.४.४.१ निविदा दस्तावेज तयार करणे मध्ये खालील तरतुद आहे.

“खरेदीदार विभागांनी निविदेमध्ये नामांकित ब्रॅण्डच्या वस्तुची मागणी करावयाची असल्यास एकच ब्रॅण्ड नमुद न करता किमान तीन ब्रॅण्ड नमुद करणे आवश्यक राहील.

सदर तरतुदीनुसार तीन ब्रॅण्ड नमुद केल्यास उदाहरणादाखल नमुद केलेले Cordless Micप्रमाणे परिस्थिती निर्माण होईल. ही वस्तुस्थिती शासनाचे नजरेस आणुन सदर ध्वनिक्षेपण साहित्यासाठी मा.व्यवस्थापन समितीचे प्रस्तावातील नमुद केलेल्या ब्रॅण्ड नुसार एक विशेष अपवादात्मक बाब म्हणून सदर साहित्याची खरेदी करणेस मान्यता मिळणेकामी शासनास प्रस्ताव सादर करावा, असे मत आहे.

तरी, उपरोक्त खरेदी विभागाचे अभिप्रायास अनुसरुन संस्थानला चांगले दर्जेदार व उच्च प्रतिचे साहित्य खरेदी करणे गरजेचे आहे व त्यानुसार मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/०१/२०१९ चे सभेतील निर्णय क्र.६९ नुसार विशिष्ट कंपन्यांचे साहित्य खरेदी करणेस मान्यता मिळालेली आहे. शासनाचे सुधारीत नियमावलीतील तरतुद क्र.४.४.१ निविदा दस्तावेज तयार करणे मध्ये खालील तरतुद आहे.

“खरेदीदार विभागांनी निविदेमध्ये नामांकित ब्रॅण्डच्या वस्तुची मागणी करावयाची असल्यास एकच ब्रॅण्ड नमुद न करता किमान तीन ब्रॅण्ड नमुद करणे आवश्यक राहील.

सदर तरतुदीस अनुसरुन तीन ब्रॅण्ड नमुद केल्यास उदाहरणादाखल दि.१२/०८/२०१९ रोजीचे टिपणीसोबतचे प्रस्तावित पत्रात नमुद केलेले Cordless Micप्रमाणे परिस्थिती निर्माण होईल. सदरहु वस्तुस्थिती महाराष्ट्र शासनाचे निदर्शनास आणुन श्री साईबाबांचे समाधी मंदिरातील आरती व दैनंदिन साईभजन संध्या कार्यक्रमाकरीता आवश्यक असलेले साऊंड सिस्टीम साहित्य ई-निविदापध्दतीने खरेदी करणेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/०१/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६९ नुसार प्रस्तावातील नमुद केलेल्या ब्रॅण्ड नुसार एक विशेष अपवादात्मक बाब म्हणून सदर साहित्याची खरेदी ई-निविदा पध्दतीने करणेस मान्यता

मिळणेकामी महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभागास पत्राव्दारे कळविणेस मान्यता मिळणेकामी प्रस्ताव दि.०३/१०/२०१९ रोजी सादर करण्यात आलेला होता.

सदर प्रस्तावावर मा.उप मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांनी "व्यवस्थापन समितीचे निर्णय क्र.६९ अन्वये केवळ ८२,४८,९५० रु. मान्यता मिळालेली आहे. सदर निर्णयात ब्रॅंडला मान्यता दिलेली नाही. तसेच प्रस्तावात केवळ एकच ब्रॅंड नमूद केला आहे. तरी तीन ब्रॅंड नमुद करणे योग्य राहील बाजारात विविध ब्रॅंड उपलब्ध असतांना एकल स्त्रोत पध्दतीने ध्वनिक्षेपण यंत्रणा खरेदीचे कारण स्पष्ट होत नाही. एकल स्त्रोत खरेदी ही अपवादात्मक परिस्थिती मध्ये करावयाची असते. तरी,शासनाचे खरेदी नियमावली (सुधारीत) तरतूद क्र. ४.४.१ अन्वये तीन ब्रॅंड नमूद करुन तसेच स्पेसिफीकेशन नमूद करुन सुधारीत प्रस्ताव करुन शासनास मान्यतेस पाठविणे योग्य होईल " असे मत आहे.

"वास्तविक संस्थानला चांगले दर्जेदार व उच्च प्रतिचे साहित्य खरेदी करणे गरजेचे असुन सदर खरेदी करावयाच्या साऊंड सिस्टीम साहित्याची अंदाजे किंमत रक्कम रुपये ही एक करोड रुपये किमंतीचे जवळपास असल्याने सदर साहित्य संस्थानला खरेदी करणेकामी संस्थानचे विहीत पध्दतीने तज्ञ सल्लागाराची नियुक्ती करुन त्यांचे मार्गदर्शनानुसार तथा अभिप्रायानुसारच चांगले दर्जेदार व उच्च प्रतिचे साहित्य खरेदी होणे अत्यावश्यक आहे"

सदरहु विषयाबाबत मा.विश्वस्त ॲड.श्री मोहन जयकर साहेब यांनी प्रस्तावित साऊंड सिस्टीम साहित्याचे खरेदीकामी तज्ञ सल्लागार उपलब्ध करुन देणार असून सदर तज्ञ सल्लागाराचे मार्गदर्शनानुसार व त्यांचे प्राप्त अभिप्रायानुसार साऊंड सिस्टीम साहित्य खरेदी करणेत यावे, असे सुचविले आहे. त्यानुसार मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/०१/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६९ नुसार खरेदी करावयाचे साऊंड सिस्टीम साहित्याबाबत संस्थानला तज्ञ सल्लागाराची उपलब्धता करुन देणेबाबत मा.विश्वस्त ॲड.श्री.मोहन जयकर साहेब यांना तसेच मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांना पत्राव्दारे कळविणेकामी प्रस्ताव दि.१४/११/२०१९ रोजीचे टिपणी अन्वये मान्यतेस्तव सादर करण्यात आला होता.

सदर प्रस्तावावर मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांनी "तदर्थ समितीची मान्यता घ्यावी" असे निर्देश दिलेले आहेत.

उपरोक्त निर्देशास अनुसरुन मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/०१/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६९ नुसार श्री साईबाबांचे समाधी मंदिरातील आरती व दैनंदिन साईभजन कार्यक्रमाकरीता आवश्यक असलेले साऊंड सिस्टीम साहित्य संस्थानचे विहीत पध्दतीने खरेदी करणेकामी सदर क्षेत्रातील तज्ञ सल्लागार मा.विश्वस्त ॲड.श्री.मोहन जयकर साहेब हे उपलब्ध करुन देणार असल्याने सदरकामी मा.विश्वस्त ॲड.श्री.मोहन जयकर साहेब यांना तसेच मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांना पत्राव्दारे कळविता येईल.

विभागाचा अभिप्रायः- उपरोक्त प्रस्तावणेत नमुद केलेनुसार मा.व्यवस्थापन समितीचे संदर्भ क्र.१ चे निर्णयानुसार श्री साईबाबांचे समाधी मंदिरातील आरती व दैनंदिन साईभजन कार्यक्रमाकरीता आवश्यक असलेले साऊंड सिस्टीम साहित्य संस्थानचे विहीत पध्दतीने खरेदी करणेकामी सदर क्षेत्रातील तज्ञ सल्लागार मा.विश्वस्त ॲड.श्री.मोहन जयकर साहेब हे उपलब्ध करुन देणार असल्याने सदरकामी मा.विश्वस्त ॲड.श्री.मोहन जयकर साहेब यांना तसेच मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांना कळविणेकामी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेपुढे निर्णयार्थ तथा मान्यतेस्तव सादर करता येईल.

विभागाचा प्रस्तावः- उपरोक्त प्रस्तावणेत व विभागाचे अभिप्रायात नमुद केलेनुसार मा.व्यवस्थापन समितीचे संदर्भ क्र.१ चे निर्णयानुसार श्री साईबाबांचे समाधी मंदिरातील आरती व दैनंदिन साईभजन कार्यक्रमाकरीता आवश्यक असलेले साऊंड सिस्टीम साहित्य संस्थानचे विहीत पध्दतीने खरेदी करणेकामी सदर क्षेत्रातील तज्ञ सल्लागार मा.विश्वस्त ॲड.श्री.मोहन जयकर साहेब हे उपलब्ध करुन देणार असल्याने सदरकामी मा.विश्वस्त ॲड.श्री.मोहन जयकर साहेब यांना तसेच मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग,महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांना कळविणेकामी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेपुढे निर्णयार्थ तथा मान्यतेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.६२** **सदरचा विषय स्थगित ठेवण्यात आला.**

**(कार्यवाही-ध्वनिक्षेपन व टेलिफोन विभाग)**

---

**विषय नं.१८** **Microsoft Licenses खरेदी करणेकामी ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत उघडणेत आलेल्या वाणिज्यीक ई-निविदांमधील निम्नत्तम दरधारक निविदाकार M/s Cloudstrats Technologies Pvt.Ltd., Mumbai यांनी देऊ केलेल्या निम्नत्तम दरांबाबत चर्चा होऊन त्यांना पुरवठा आदेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे विविध विभागामध्ये कार्यरत असलेल्या संगणक संचासाठी Microsoft Licenses खरेदी करणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती.

| | | |
|---|---|---|
| ०१ | खरेदी करावयाचे साहित्य/ वस्तूचा तपशिल. | Microsoft Licenses खरेदी करणे. |
| ०२ | मागणी | (see table below) |
| ०३ | ई-निविदा प्रसिद्धी | दि.०४.११.२०१९ ते दि.१५.११.२०१९ |
| ०४ | वृत्तपत्राच्या अधिसुचनेच्या व्यतिरिक्त चौकशी कशी पाठविली जाते ? | www.mahatenders.gov.in, संस्थान वेबसाईट (sai.org.in) व ई-मेलद्वारे |
| ०५ | तर तसे, कोणाला पाठविले ? | ११ पुरवठाधारकांना ई-मेलद्वारे कळविले. |
| ०६ | निविदा सुरू झालेची दिनांक व वेळ | दि.०४.११.२०१९ सकाळी ११:०० वा.<br>तांत्रिक निविदा- दि.२४.१२.२०१९<br>व्यावसायीक निविदा- दि.०७.०१.२०२० |
| ०७ | प्राप्त निविदाकारांची संख्या | ०२ (दोन) |
| ०८ | पात्र निविदाकारांची संख्या | ०२ (दोन) |
| ०९ | सर्व निविदाकारांनी नमुने दिली आहेत का ? | लागू नाही. |
| १० | सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम अदा केली आहे का ? | सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम भरलेली आहे. |
| ११ | जर नमुने दिले नाही, तर का ? | लागू नाही. |
| १२ | निविदाकारांनी सादर केलेले दर – | |
| १३ | यापुर्वी केलेल्या खरेदीचा तपशील आणि खरेदी दर – | |

मागणी (०२):

| **Sr. No** | **Description** | **Qty** |
|---|---|---|
| 01 | Visio Pro 2019 SNGL OLP NL | 04 |
| 02 | MS Office Std 2019 SNGL OLP NL Chrty | 50 |
| 03 | WinSvrCAL SNGL LicSAPk OLP NL Chrty UsrCAL | 150 |

निविदाकारांनी सादर केलेले दर (१२):

| **अ. नं.** | **निविदाकाराचे नाव** | **सादर केलेले दर (प्रती नग रु.)** | **स्थिती** |
|---|---|---|---|
| **Visio Pro 2019 SNGL OLP NL** | | **04 Nos Qty** | |
| 01 | M/s Minitek Systems India Pvt Ltd, Nashik | 15,174.80 | L2 |
| **02** | **M/s Cloudstrats Technologies Pvt Ltd., Mumbai** | **14,900.20** | **L1** |
| **MS Office Std 2019 SNGL OLP NL Chrty** | | **50 Nos Qty** | |
| 01 | M/s Minitek Systems India Pvt Ltd, Nashik | 7,363.20 | L2 |
| **02** | **M/s Cloudstrats Technologies Pvt Ltd., Mumbai** | **7,230.98** | **L1** |
| **WinSvrCAL SNGL LicSAPk OLP NL Chrty UsrCAL** | | **150 Nos Qty** | |
| 01 | M/s Minitek Systems India Pvt Ltd, Nashik | 894.44 | L2 |
| **02** | **M/s Cloudstrats Technologies Pvt Ltd., Mumbai** | **876.48** | **L1** |

यापुर्वी केलेल्या खरेदीचा तपशील आणि खरेदी दर (१३):

| **Sr. No** | **Year-2017-2018** | **UOM** | **Amount** | |
|---|---|---|---|---|
| | | | **2017-2018** | **2018-2019** |
| 01 | Visio Pro 2019 SNGL OLP NL | Nos | -- | -- |

| अ.नं. | तपशील | | | |
|---|---|---|---|---|
| 02 | MS Office Std 2019 SNGL OLP NL Chrty | Nos | -- | -- |
| 03 | WinSvrCAL SNGL LicSAPk OLP NL Chrty UsrCAL | Nos | -- | -- |

**१४** मागील वर्षात वापरण्यात आलेल्या परिमाणाचा तपशिल -

| अ.नं. | तपशील | वर्ष | खर्च परिमाण |
|---|---|---|---|
| 01 | Visio Pro 2019 SNGL OLP NL | -- | -- |
| 02 | MS Office Std 2019 SNGL OLP NL Chrty | -- | -- |
| 03 | WinSvrCAL SNGL LicSAPk OLP NL Chrty UsrCAL | -- | -- |
| | | एकूण रक्कम | -- |

| | | |
|---|---|---|
| १५ | सध्याची शिल्लक | निरंक |
| १६ | मागील खरेदी दर | अ.नं. १३ प्रमाणे |

**१७** मागील पुरवठादार

| अ.नं. | वस्तूचे वर्णन | पुरवठादाराचे नाव |
|---|---|---|
| 01 | Visio Pro 2019 SNGL OLP NL | -- |
| 02 | MS Office Std 2019 SNGL OLP NL Chrty | -- |
| 03 | WinSvrCAL SNGL LicSAPk OLP NL Chrty UsrCAL | -- |

**१८** सध्याचे निम्नत्तम निविदाकाराने सादर केलेले दर

| Sr. No. | Specification of Material | Amount |
|---|---|---|
| 01 | Visio Pro 2019 SNGL OLP NL | 14,900.20 |
| 02 | MS Office Std 2019 SNGL OLP NL Chrty | 7,230.98 |
| 03 | WinSvrCAL SNGL LicSAPk OLP NL Chrty UsrCAL | 876.48 |

**१९** सध्याचे निम्नत्तम निविदाकाराचे नाव

| Sr. No. | Name of Bidder | Specification of Material |
|---|---|---|
| 01 | M/s Cloudstrats Technologies Pvt Ltd., Mumbai | Visio Pro 2019 SNGL OLP NL |
| 02 | | MS Office Std 2019 SNGL OLP NL Chrty |
| 03 | | WinSvrCAL SNGL LicSAPk OLP NL Chrty UsrCAL |

| | | |
|---|---|---|
| २० | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करणेत आला आहे का ? | होय |
| २१ | सदर खरेदीचा प्रकल्प (प्रस्ताव) खरेदी समितीसमोर सादर करणेत आला असल्यास उपस्थितांची नावे | मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.उपमुख्य कार्यकारी अधिकारी, मा.मुख्यलेखाधिकारी, मा.प्रशासकीय अधिकारी, प्र.विभागप्रमुख, आयटी विभाग. |
| २२ | घाऊक आणि किरकोळ दर यांचे तपशील अंदाजे रक्कम रुपये ----प्रतिसेट मार्केट रेट रुपये ---- | |

**२३** मागील खरेदी रु.-------------- सध्याचे प्राप्त दर रु.---------------------- फरक रु.----------- % ने कमी/जास्त रु.-----------------

| अ.नं. | तपशिल | मागील खरेदी दर | सध्याचे दर | फरक | % ने कमी/जास्त |
|---|---|---|---|---|---|
| 01 | Visio Pro 2019 SNGL OLP NL | -- | 14,900.20 | -- | -- |
| 02 | MS Office Std 2019 SNGL OLP NL Chrty | -- | 7,230.98 | -- | -- |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 03 | WinSvr CAL SNGL LicSAPk OLP NL Chrty Usr CAL | -- | 876.48 | -- | -- | |

२४. संक्षिप्त टिप:- संस्थानचे विविध विभागामध्ये कार्यरत असलेल्या संगणक संचासाठी Microsoft Licenses खरेदी करणेकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत दोन वेळेस मुदतवाढी अंती प्राप्त झालेल्या दोन ई-निविदा खरेदी नियमावली मुद्दा क्र.४.४.३.१ यास अधिन राहुन उघडणेत आलेल्या आहेत. उघडणेत आलेल्या निविदांपैकी निम्नत्तम दरधारक निविदाकार M/s Cloudstrats Tech. Pvt Ltd., Mumbai यांनी देऊ केलेले निविदेतील सर्व लायसन्सेसचे दर अनुक्रमे रु.१४,९००.२०, ७,२३०.९८ व ८७६.४८ एकूण रक्कम रुपये ५,५२,६२१.८० (सर्व करांसहीत) हे निम्नत्तम आहेत. सबब, M/s Cloudstrats Technologies Pvt Ltd., Mumbai यांनी देऊ केलेल्या निम्नत्तम दरांबाबत त्यांचेबरोबर चर्चा होऊन त्यांना याकामी पुरवठा आदेश देणेच्या मान्यतेस्तव सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर सविनय सादर.

**निर्णय क्र.६३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, Microsoft Licenses ची ऑनलाईन किंमत किती आहे, याची माहिती घेऊन याबाबतचा सविस्तर तुलनात्मक प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे पुढील सभेसमोर ठेवण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही-माहिती तंत्रज्ञान विभाग)**

---

**विषय नं.१९** **ऐतिहासिक वस्तु, शस्त्रात्रे, कलादालन व प्रदर्शन मांडण्यासाठी वापरास दिलेल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीची मौजे निमगाव कोऱ्हाळे, ता.राहाता येथील साईप्रसादालय इमारतीतील जागा वापराची पुढील मुदतवाढ संबंधातील मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.५१० बाबत श्री.अभिजित देविदास शिंदे, रा.श्रीरामपूर यांचा दि.२८.१२.२०१९ रोजीचा अर्ज.**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतूद - श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

प्रस्तावना- श्री.अभिजित देविदास शिंदे यांचे यापूर्वीचे दि.१४/१०/२०१९ रोजीच्या अर्जास अनुसरुन मा.कार्यासन अधिकारी, विधी व न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई यांचेकडील पत्र जा.क्रं.सासंवि-१०१६/८४०/ प्र.क्र.११०/का.१६ दि.२२/१०/२०१८ रोजीच्या पत्राचे अनुषंगाने ऐतिहासिक वस्तु,शस्त्रास्त्रे, कलादालन व प्रदर्शन मांडण्याकरीता श्री.अभिजित देविदास शिंदे, रा.श्रीरामपूर यांना वापरास दिलेल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे मौजे निमगाव-को-हाळे, ता.राहाता येथील गट नं.८० व ८५ पै. यामधील साईप्रसादालय इमारतीतील पहिल्या मजल्यावरील आय.टी.विभागाशेजारी असलेला हॉल अंदाजे रुंदी दक्षिणोत्तर ६० फुट व लांबी पूर्व-पश्चिम १२० फुट याचे साधारणत: क्षेत्रफळ ७२०० चौ.फुट या जागेच्या वापराची तिसरी मुदतवाढ दि.०१/११/२०१९ ते दि.३०/०९/२०२० या ११ महिने कालावधीसाठी, यापूर्वीची मासिक भाडेदराची रक्कम रु.१२,१००/- मध्ये १०% वाढ करुन म्हणजेच रक्कम रु.१२,१००/-+ रु.१,२१०/- अशी एकुण रक्कम रु.१३,३१०/- इतकी आकारुन व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन मुदतवाढ देणेच्या व यापूर्वी प्रमाणेच लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा करुन घेणेच्या निर्णयार्थचा प्रस्ताव संस्थानचे मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४/१२/२०१९ रोजीचे सभेपुढे सादर करणेत आला. त्यात निर्णय क्रं.५१० प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन, तसेच सर्व वाचन केले व ऐकले असता असे दिसून येते की,सदरचे प्रदर्शन पाहण्यासाठी प्रवेश शुल्क आकारण्यात येते. याचा अर्थ असा की, नाममात्र शुल्कावर दिलेल्या इमारतीचा उपयोग वाणिज्यीक कारणासाठी केला जातो. येथे नमुद करावेसे वाटते की,शासनाने जा.क्रं.सासंवि-१०१६/८४०/प्र.क्र.११०/का.१६ दि.२२/१०/२०१८ चे पत्रान्वये खालील अटी शर्तीवर परवानगी दिलेली होती.

अ) प्रत्येक वेळी लिव्ह ॲण्ड लायसन्स करार करतांना मागील वर्षाच्या भाडयात १०% वाढ करण्यात यावी.

ब) या कलादालनात व प्रदर्शनात ठेवण्यात आलेल्या वस्तू या शिवकालीन व पुरातन असल्याचा उल्लेख करारनाम्यात करण्यात येणार नाही.

क)	कोणत्याही व्यक्तीने या कलादालनात प्रदर्शनासाठी ठेवलेल्या वस्तू या शिवकालीन किंवा पुरातन नाहीत याबाबत घेतलेल्या कोणत्याही आक्षेपा संदर्भात फक्त लायसेन्सी हेच जबाबदार असतील.

ड)	सदर कलादालन/प्रदर्शनामुळे भविष्यात काही कायदेविषयक बाबी किंवा अन्य कारणास्तव होणा-या नुकसानीची,खर्चाची संपूर्ण भरपाई लायसेन्सीने संस्थानला करुन देणे आवश्यक राहील.

शासनाचे जा.क्रं.सासंवि-१०१६/८४०/प्र.क्र.११०/का.१६ दि.२२/१०/२०१८ चे पत्र समितीच्या निदर्शनास आणून दिले. जर ११ महिन्याच्या Licenceप्रमाणे पुढील दहा वर्ष मुदतवाढ सदर पत्राद्वारे दिली तर ती श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) चे उल्लंघन होणारे ठरेल व तसे करणे हे कायद्याच्या कलमांशी प्रतारणा करणारे ठरेल,असे समितीला वाटते.

सदरची इमारत श्री साई मंदिरापासून १ किमी. अंतरावर आहे. समितीने सर्व बाबींचा साकल्यपुर्ण विचार केला. सदरची जागा ही ७२०० चौ.फुट आहे व त्याचा वाणिज्यिक वापर दिसून येतो. अशा परिस्थितीत सदरची जागा नाममात्र शुल्कावर पुढील कालावधीसाठी देणे संस्थानच्या आर्थिक हिताच्या आड येण्याची शक्यता आहे,असे वाटते. अशा परिस्थितीत सदरच्या कराराची मुदत ऑक्टोबर २०१९ मध्ये संपलेली असल्याने श्री.शिंदे यांना लगेचच जागा खाली करा असे सांगणे उचित होणार नाही. करिता समिती सर्वानुमते असा निर्णय घेते की,

१)	श्री.शिंदे यांचेकडून नोव्हेंबर २०१९ पासून ३१ मार्च २०२० पर्यंत पाचपट जास्त म्हणजेच दरमहा रक्कम रु.६०,५००/- मात्र (१२,१००x५) व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे असे शुल्क आकारण्यात येईल व असे शुल्क देण्यास ते तयार आहेत का? अशी विचारणा त्यांचेकडे करावी व त्यांनी त्यास तयारी दर्शविल्यास ३१ मार्च २०२० पर्यंत मुदतवाढ दरमहा रक्कम रु.६०,५००/- मात्र व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे या शुल्कावर द्यावी व पुढील कार्यवाही करावी.

२)	सदर जागेचा सध्यस्थितीतील वाणिज्यीक वापरासाठीचा बाजारातील दर किती आहे याची पडताळणी संबंधीत विभागाकडून करावी व तसा अहवाल समितीला सादर करावा. त्यानंतर योग्य तो निर्णय समिती घेईल.

३)	श्री.शिंदे यांना वरील क्रं.१ मधील नमुद बाब मान्य नसल्यास डिसेंबर २०१९ अखेर सदरची जागा खाली करण्यासाठी नोटीस श्री.शिंदे यांना द्यावी व सदरची जागा खाली करुन घेण्याची कारवाई करावी,असे सर्वानुमते ठरले.

उपरोक्त निर्णयाप्रमाणे श्री.अभिजित देविदास शिंदे यांना इकडील पत्र जा.नं.एसएसएसटी/ मालमत्ता/ ३७५८/२०१९ दि.२६/१२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये "सदर निर्णयात नमुद केलेप्रमाणे उक्त मिळकत वापरासाठीचे भाडे माहे नोव्हेंबर २०१९ पासून ते ३१ मार्च २०२० पर्यंत पाचपट म्हणजेच दरमहा रक्कम रु.६०,५००/- मात्र (१२,१००x५) व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे असे शुल्क आकारण्यात येत आहे. हे आपणास मान्य आहे किंवा कसे? याबाबत इकडेस दोन दिवसात खुलासा सादर करावा.सदरची बाब आपणास मान्य नसल्यास ऐतिहासिक वस्तु,शस्त्रास्त्रे,कलादालन व प्रदर्शन मांडण्यासाठी आपणास वापरास दिलेल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे उक्त मौजे निमगाव-को-हाळे,ता.राहाता येथील साई प्रसादालय इमारतीतील जागा दि.३१ डिसेंबर २०१९ अखेर खाली करुन देणेत यावी." असेबाबत कळविणेत आलेले आहे.

तदनुषंगाने श्री.अभिजित देविदास शिंदे यांनी त्यांचेकडील उपरोक्त दि.२८/१२/२०१९ रोजीच्या अर्जान्वये "आपण शिवसृष्टीच्या वापरासाठी दिलेल्या साईप्रसादालयाच्या इमारतीतील जागेच्या संदर्भात दिलेल्या पत्रान्वये आमचे म्हणणे सादर करणेकामी दोन दिवसाची मुदत दिलेली आहे. मात्र सध्या नवीन वर्षानिमित्त शिर्डी येथे असलेली भाविकांची गर्दी विचारात घेता तसेच शिवसृष्टी संग्रहालयाचे सामाजिक,धार्मिक,ऐतिहासिक महत्व लक्षात घेवून याबाबत खुलासा देणेकामी किमान एक महिना मुदत मिळावी,"असेबाबत इकडेस विनंती केलेली आहे.

विभागाचा अभिप्राय- श्री.अभिजित देविदास शिंदे यांचा उपरोक्त दि.२८/१२/२०१९ रोजीचा अर्ज मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे अवलोकनार्थ व निर्णयार्थ सादर करता येईल.

प्रस्ताव- श्री.अभिजित देविदास शिंदे,रा.श्रीरामपूर यांचा उपरोक्त दि.२८/१२/२०१९ रोजीचा अर्ज अवलोकनार्थ व निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६४**	**सदरचे विषयावर आजचे सभेतील आयत्या वेळेचा विषय नं.०१ निर्णय क्र.८७ नुसार निर्णय घेण्यात आलेला आहे.**

**(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.२०** **श्री.कृष्णा विश्वनाथ वालझडे (सेवानिवृत्त नायब तहसिलदार) कंत्राटी सल्लागार, मालमत्ता विभाग यांचा शासकीय सुट्टया मिळणे व मानधन वाढवून मिळणेबाबतचा दि.२७.१२.२०१९ रोजीचा अर्ज.**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतुद– श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ चे कलम १७(झ) सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज योग्य प्रकारे व्यवस्थापन,देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनासाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील.

प्रस्तावना – संस्थानचे मा.व्यवस्थापन समितीचे दि.२१/०८/२०१९ रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.४४० प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे,सेवानिवृत्त नायब तहसिलदार यांना कंत्राटी सल्लागार म्हणून एकत्रित रक्कम रु.२५,०००/- मात्र इतक्या मासिक मानधन तत्वावर कंत्राटी कर्मचारी म्हणून प्रचलित पध्दतीने कामगार विभागामार्फत कर्मचारी ठेकेदाराकडून दि.१९/०९/२०१९ ते दि.१८/०९/२०२० या एक वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली."

तथापि श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे, (सेवानिवृत्त नायब तहसिलदार),कंत्राटी सल्लागारयांना रजा,शासकीय सुटया सवलत नसलेने काही अडचणीचे वेळेस अथवा आजारपणाच्या वेळेस त्यांनी सुटी घेतली तर त्या सुटीच्या दिवसांचे त्यांचे मानधनातून पैसे कपात केले जातात. परिणामी त्यांना सरासरी रु.१५,०००/- ते रु.१८,०००/- पर्यंतच मानधन मिळत आहे. त्यांचे कुटूंब संगमनेर येथे राहत असून ते नोकरीनिमित्त शिर्डी येथे राहत आहेत. त्यामुळे त्यांना दोन्ही ठिकाणचा खर्च भागवावा लागत आहे. त्यांना मिळणारे मानधन हे अत्यल्प असल्याने व महागाई भयंकर वाढलेली असल्याने त्यांना त्यांचे कुटूंबाचा खर्च भागविणे कठीण होत आहे. तरी महागाईचाविचार करुन आणि त्यांचे पदाचा,अनुभवाचा व कामाचा विचार करुन त्यांचे मासिक मानधन किमान रु.३५,०००/- (रु.पस्तीस हजार मात्र) पर्यंत वाढविल्यास त्यांच्या रजा,सुटयांचे पैसे कपात होवून त्यांना सरासरी रु.२५,०००/- ते रु.३०,०००/- पर्यंत मासिक मानधन मिळू शकेल. म्हणून त्यांचे मासिक मानधन रु.३५,०००/- पर्यंत वाढविणेस व शासकीय सुटया सवलत अनुज्ञेय होणेस त्यांनी उपरोक्त विषयांकित अर्जान्वये इकडेस विनंती केलेली आहे.

श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे (सेवानिवृत्त नायब तहसिलदार) यांनी त्यांचे कार्यकाळात संस्थानचे मालमत्ता विभागाकडे खालीलप्रमाणे कामे केलेली आहेत.

१) मौजे निमगाव-को-हाळे येथील संस्थान मालकीच्या अकृषिक बखळ जागेवरील सन २०१३-१४ व सन २०१४-१५ या दोन वर्षाचे कालावधीसाठी ग्रामपंचायतीने आकारलेली कराची रक्कम प्रति वर्ष रु.१२,७८,०००/- प्रमाणे दोन वर्षांची रक्कम रु.२५,५६,०००/- इतकी ग्रामपंचायतीकडून माफ करुन घेतली असून उर्वरित सन २०१५-१६,२०१६-१७ व २०१७-१८ या तीन वर्षांसाठी ग्रामपंचायत कराची प्रतिवर्ष रक्कम रु.१२,७८,०००/- ऐवजी प्रतिवर्ष रक्कम रु.६,३९,०००/- इतकी किमान दराने आकारणी करणेकामी ग्रामपंचायतीस भाग पाडलेले आहे.

२) मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१७१/१२ मधील नियोजित बसस्थानक व भक्तनिवास इमारतीचे बांधकाम संस्थानचे निधीतून करणे व त्यापैकी काही क्षेत्राचा वापर संस्थानसाठी भाडेपट्टयाने करणेविषयी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचेशी करावयाचे करारनाम्याचे प्रकरणी व त्याचे मुद्रांक शुल्क मा.मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयाकडून निश्चित करुन घेणेकामीचे प्रकरणी कामकाज केलेले आहे.

३) मौजे घारी,ता.कोपरगाव येथील संस्थान मिळकतीच्या भूसंपादनाची नुकसान भरपाईची रक्कम रु.२,८४,७६५/- इतकी सन २००४ पासून शासनाकडे प्रलंबित आहे. ती संस्थानला मिळणेकामीचे प्रकरण करुन सदरची रक्कम मिळणेकामी दिवाणी न्यायालयात प्रकरण करणेत आलेले आहे.

४) मौजे निघोज येथील श्री.काशिनाथ गोविंद पाटील,रा.कोपरी यांनी त्यांचे मालकीच्या साई पालखी निवारा येथीलशासकीय मुल्यांकन रक्कम रु.३२,२७,१३,५००/- इतक्या किंमतीच्या इमारत बी व डी दान केल्या संबंधातील कागदपत्र प्राप्त करुन तपासून मा.मुद्रांक जिल्हाधिकारी,अहमदनगर यांचेकडून मुल्यांकन निश्चित करुन घेवून नोंदणीकृत दानपत्र करुन घेणेबाबतची कार्यवाही पूर्ण केली असून त्याप्रमाणे संस्थानच्या नावाने महसुल दप्तरी व ग्रामपंचायत दप्तरी नोंदी करुन घेतलेल्या आहेत.

५) शिर्डी येथील द्वारावती भक्तनिवास चे सर्वे नं.१४८/१,१४८/२/१,१४८/२/२,१४८/२/३ चा अकृषिक सारा माफी अनुज्ञेय असताना कामगार तलाठी यांनी सन २०१६-१७ या वर्षासाठी सदर क्षेत्राचा अकृषिक सारा मागणी नोटीस दिलेली होती. सदर बाब कामगार तलाठी,शिर्डी यांचे निदर्शनास आणून देवून त्यासाठीची अकृषिक सारा मागणी नोटीस रद्द करुन घेतली.

६) मौजे पांढुर्ली,ता.सिन्नर येथील संस्थान मालकीची जमीन गट नं.१९ क्षेत्र ०.४९ आर या अकृषिक जमीनीचा आकार महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ११७(३) चे तरतुदीनुसार माफ होणेबाबतचे प्रकरण तयार करुन मा.उपविभागीय अधिकारी,निफाड भाग,निफाड यांचेकडेस सादर करण्यात आले आहे व पाठपुरावा करीत आहे.

७) संस्थानसाठी आरक्षित असलेल्या जमीनींपैकी काही जमीन खरेदी करणेसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करुन खरेदी करणेकामीची कार्यवाही पूर्ण केलेली आहे.

८) खरेदी केलेल्या जमीनींची शासकीय मोजणी करुन घेवून महसुल दप्तरी रेकॉर्ड ऑफ राईटला संस्थानच्या नावाने नोंदी करुन घेतलेल्या आहेत.

९) मौजे निमगाव-को-हाळे येथील शेती महामंडळाचे जमीनीपैकी भुसंपादनाद्वारे संस्थानला प्राप्त झालेल्या स.नं.८७ व ८८ मधील क्षेत्रात प्रस्तावित लाडू इमारत व वाणिज्य प्रयोजनासाठी बांधकाम परवानगी मिळणेकामीचा प्रस्ताव मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांचेकडेस सादर करणेत आला असून परवानगीसाठी पाठपुरावा करणेत येत येवून आदेश प्राप्त करुन घेतला आहे.

१०) मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांचेकडील संस्थानसाठी प्रलंबित असलेली भूसंपादन प्रकरणे तातडीने निर्गत करणेकामी समन्वय साधून पाठपुरावा केलेला आहे. त्यात आरक्षण क्रं.३४ ची भुसंपादन कार्यवाही यापूर्वीच दि.२९/०४/२०१५ रोजी पूर्ण झालेली होती. मात्र भुसंपादित क्षेत्राचा ताबा संस्थानला मिळणेस ऊशिर होत होता. त्याकामी पाठपुरावा करुन भुसंपादन क्षेत्र ६९०३ चौमी.चा ताबा संस्थानला दि.०७/०३/२०१८ रोजी मिळविलेला आहे व त्याप्रमाणे महसुल दपत्री रेकॉर्ड ऑफ राईटला संस्थानचे नावाने नोंदी करुन घेतलेल्या आहेत.

११) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांच्यासाठी "जमीन खरेदी धोरण" निश्चित करणेबाबतचा प्रस्ताव शासनाकडे मा.वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली तयार करुन पाठविलेला आहे.

१२) महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाकडील क्षेत्र ५२ हेक्टर ३५ आर इतके संस्थानला कायमस्वरुपी खरेदी मिळणेकामीचा प्रस्ताव सादर करणेत येवून त्यात वरिष्ठ पातळीवर पाठपुरावा करणेचे कामकाज चालू आहे.

१३) मौजे रुई,ता.राहाता येथे संस्थानचे वैद्यकीय संकुल प्रस्तावित आहे. त्यासाठी संस्थान मालकीच्या क्षेत्रालगत असलेली श्री.भंडारी व श्री.भनसाळी यांची जमीन खरेदी करणेकामी कागदपत्रांची छाननी करणे,मोजणी करुन घेणे व त्या संबंधीत कोर्ट प्रकरणी कामकाज पूर्ण करणेत येवून शासन निर्णयाप्रमाणे सदर जमीन संस्थानला खरेदी करणेसाठीची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

१४) श्रीं चे शताब्दी उत्सव कालावधीत आवश्यकतेनुसार खाजगी व शेती महामंडळाची जमीन वेळोवेळी अधिग्रहण करणेची कार्यवाही पूर्ण केलेली आहे.

१५) सध्यस्थितीत मा.उच्च न्यायालयात मयत साखरबाई हरीभाऊ शेळके यांची जमीन संस्थानला भुसंपादनाद्वारे खरेदी करणेचे प्रकरण चालू आहे. या प्रकरणी मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयाप्रमाणे कार्यवाही करणेचे कामकाज चालू आहे.

१६) मालमत्ता व भुसंपादन संबंधात विविध कोर्टात उदा.दिवाणी न्यायालय,राहाता, कोपरगाव, दिवाणी न्यायालय, व.स्तर, कोपरगाव, सत्र न्यायालय, कोपरगाव, उच्च न्यायालय,औरंगाबाद व सर्वोच्च न्यायालय,दिल्ली इ.कोर्टात चालू असलेल्या सुमारे ३० केसेसमध्ये नियमाप्रमाणे कार्यवाही करणेकामी मार्गदर्शन करीत आहे.

१७) संस्थानच्या ताब्यात असलेल्या मोफत सर्वे नं.१ पैकीचे क्षेत्रासंबंधात शासकीय स्तरावर प्रलंबित असलेल्या दंडात्मक कार्यवाहीचे प्रकरणी कामकाज चालू आहे.

१८) संस्थानसाठी आरक्षित असलेले आरक्षण क्रं.३९ हे मा.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद यांचेकडील आदेशाप्रमाणे रद्द करणेची कार्यवाही करणेत आली असून शासनाकडे भुसंपादनापोटी जमा करणेत आलेली अनामत रक्कम परत मिळणेकामी व इतर भुसंपादन प्रकरणी शासनाकडे जमा असलेल्या रकमा परत मिळणेकामी पाठपुरावा करुन रक्कम रु.२०,७९,००,०००/- इतकी संस्थानकडे जमा करण्यात आलेली आहे.

१९) मौजे शिर्डी येथील नगरपंचायत हद्दीतील सर्वे नं.५७/९५ क्षेत्र ०.०१ आर ही कै.महतछत्री यांचे मालकीची स्वकष्टार्जित मिळकत त्यांचे मृत्यूनंतर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांना देण्याची त्यांची इच्छा असल्याचे त्यांचे दि.०७/०९/२००५ रोजीच्या अर्जावरुन स्पष्टपणे दिसून आलेने सदरचा अर्ज हेच त्यांचे इच्छापत्र (मृत्युपत्र) संबोधून ते दिवाणी न्यायालयात दाखल करुन मे.कोर्टाकडून प्रोबेट करुन घेणेकामीचे

प्रकरण तयार करुन संस्थान पॅनलवरील वकील अॅड.जे.के.गोंदकर यांना त्याप्रमाणे मे.कोर्टात उक्त मिळकतीस संस्थानचे नाव लावणेकामीचे आदेश प्राप्त करुन घेणेकामी सुचित केलेले आहे.

२०) मयत हंसाबेन त्रिवेदी यांचे शिर्डी येथील साई समर्पण इमारतीतील उर्वरित क्षेत्र संस्थानला दान करणेबाबतचे मृत्यपत्राप्रमाणे मिळकत कायदेशीररित्या प्राप्त करुन घेणेकामीची कार्यवाही सुरु करणेत आलेली आहे.

२१) मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयाप्रमाणे शिर्डी विकास योजना आरक्षण व प्रारुप विकास आराखडा (सुधारीत) मधील संस्थानसाठी प्रस्तावित असलेली आरक्षणे रद्द करणेकामी संबंधीत कार्यालयांकडे प्रस्ताव सादर केले आहेत.

२२) संस्थान मालकीच्या भाडेकराराने दिलेल्या मिळकतींचे करारनामे करणेत आलेले आहेत.

२३) संस्थान मालमत्तेची देखभाल करणेकामी वेळोवेळी मिळकतींना भेटी देणेत आलेल्या आहेत व अडचणींचे निराकरण करणेत आलेले आहे. त्यात विशेषत: कनकुरी येथील संस्थान मालकीच्या तळयाकडे जाण्यासाठीच्या रस्त्याबाबत संबंधीत जमीन मालक यांनी हरकत घेतलेने त्याकामी सदर जमीनीचे मुळ खरेदीखत पडताळून सदर रस्त्या संबंधात बांधकाम विभाग व पाणीपुरवठा विभाग यांना मार्गदर्शन करणेत आलेले आहे.

२४) कार्यालयाचे दैनंदिन कामकाजात कार्यालयीन टिपण्या,मा.व्यवस्थापन समितीचे सभेपूढे सादर करावयाच्या टिपण्या व इतर पत्रव्यवहार नियमितपणे सादर करणेत आलेले आहेत.

विभागाचा अभिप्राय- श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे, (सेवानिवृत्त नायब तहसिलदार),कंत्राटी सल्लागार यांनी त्यांचे कार्यकाळात उपरोक्तप्रमाणे समाधानकारक कामे केलेली असून मालमत्ता विभागाचे दैनंदिन कामकाजात देखील त्यांचे मार्गदर्शन होत आहे. मालमत्ता विभागामार्फत भविष्यात प्रस्तावित असलेल्या कामांच्या वाढत्या व्यापाच्या दृष्टिने यापुढेही त्यांची सेवा संस्थानला उपयुक्त ठरणार आहे.

श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे,(सेवानिवृत्त नायब तहसिलदार)कं.सल्लागार यांना यापूर्वी कंत्राटी ठेकेदारामार्फत दि.१९/१०/२०१५ ते दि.१८/१०/२०१६ या एक वर्ष कालावधीसाठी दरमहा एकत्रित मासिक मानधन रक्कम रु.१२,०००/- देण्यात आलेले आहे. तदनंतर दि.१९/१०/२०१६ ते दि.१८/१०/२०१८ या दोन वर्ष कालावधीसाठी दरमहा एकत्रित मासिक मानधन रक्कम रु.१५,०००/- देण्यात आलेले आहे व तदनंतर दि.१९/१०/२०१८ ते दि.१८/०९/२०१९ या ११ महिने कालावधीसाठी दरमहा एकत्रित मासिक मानधन रक्कम रु.२५,०००/- देण्यात आलेले आहे व तदनंतर दि.१९/०९/२०१९ ते दि.१८/०९/२०२० या एक वर्ष कालावधीसाठी मागील वर्षीप्रमाणेच एकत्रित मासिक मानधन रक्कम रु.२५,०००/- इतके अदा करणेस मान्यता देण्यात आलेली आहे.

श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे,(सेवानिवृत्त नायब तहसिलदार),कंत्राटी सल्लागार यांना रजा व शासकीय सुटया सवलत नसल्याने त्यांचे मानधनातून रजेचे व सुटीचे पैसे कपात केले जातात. परिणामी त्यांना ठरवून दिलेले मासिक मानधन पूर्णत: मिळत नाही. यास्तव त्यांचे विनंतीप्रमाणे त्यांचे पूर्वीचे एकत्रित मासिक मानधनात रक्कम रु.१०,०००/- इतकी वाढ करुन एकत्रित मासिक मानधन रक्कम रु.३५,०००/- इतके करता येईल व त्यांना शासकीय सुटयांची सवलत अनुज्ञेय करता येईल.

प्रस्ताव- श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे,(सेवानिवृत्त नायब तहसिलदार),कंत्राटी सल्लागार यांचे पूर्वीचे एकत्रित मासिक मानधनात रक्कम रु.१०,०००/- इतकी वाढ करुन त्यांना एकत्रित मासिक मानधन रक्कम रु.३५,०००/- इतके करणेच्या व त्यांना शासकीय सुटयांची सवलत अनुज्ञेय करणेच्या निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.कृष्णा विश्वनाथ वालझडे (सेवानिवृत्त नायब तहसिलदार) कंत्राटी सल्लागार, मालमत्ता विभाग यांचे पूर्वीचे एकत्रित मासिक मानधनात रक्कम रु.५,०००/- इतकी वाढ करुन त्यांना एकत्रित मासिक मानधन रक्कम रु.३०,०००/- मात्र आदा करणेस मान्यता देण्यात आली. तसेच त्यांची शासकीय सुट्टया मिळणेबाबतची विनंती अमान्य करण्यात आली.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.२१** **मौजे रुई, ता.राहाता, जि.अहमदनगर येथील जमीन गट नं.२८८अ, २८८ब,२८८क व गट नं.२९४ पै. एकूण क्षेत्र १०.२३ हेक्टर क्षेत्र संस्थानला कायम खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतुद– श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(२)(ट) मध्ये विकास करण्याच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या योजना राबविण्याच्या प्रयोजनासाठी तसेच विश्वस्तव्यवस्थेची

उद्दिष्टे व प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक त्या जमीनी व इमारती संपादित करील किंवा खरेदी करील,अशी तरतुद आहे.

पूर्वपिठीका – १) यापूर्वी राधा कालियनदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट,मुंबई यांनी मौजे रुई शिवारामध्ये सुमारे ५४ एकर ११ गुंठे जमीन संस्थानला काही अटी व शर्तींवर दान म्हणून देण्याचे प्रस्तावित केलेले होते. त्यात त्यांचे नावावर प्रत्यक्षात असलेल्याखालील नमूद केलेल्या जमीनी बक्षिसपत्राने देवू केलेल्या होत्या.

परिशिष्ट अ-

| अ.नं. | गट नंबर | दर्यानानी ट्रस्टचे नावावर असलेले क्षेत्र |
|---|---|---|
| १ | २९३ | ०७ हे ३२ आर ०० चौमी |
| २ | २७५ | ०० हे ६९ आर ०० चौमी |
| ३ | २८० | ०० हे ६१ आर ०० चौमी |
| ४ | २८३ | ०० हे ४६ आर ०० चौमी |
| ५ | २८४ | ०० हे ४८ आर ०० चौमी |
| ६ | २८५ | ०० हे ५४ आर ०० चौमी |
| | एकूण | १० हे १० आर ०० चौमी |

तसेच खालील परिशिष्ट "ब" मध्ये नमूद केलेल्या मौजे रुई,ता.राहाता येथील जमीनी त्यांचे प्रत्यक्षात नावावर नसलेल्या परंतु त्या जमीनी संबंधात राधा कालियनदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट,मुंबई यांना असलेले कायदेशीर अधिकार संस्थानला देण्याबाबत प्रस्तावित केलेले आहे.

परिशिष्ट ब-

| अ.नं. | गट नंबर | क्षेत्र<br>हे.आर.चौमी | कब्जेदार सदरी असलेली नावे |
|---|---|---|---|
| १ | २९४ | ०५.९०.०० | राजेंद्र चांदमल भनसाळी/सुभाष चांदमल भनसाळी |
| २ | २७३ | ०१.९२.०० | भिमबाई बाबुराव कहांडळ |
| ३ | २७४ | ००.७४.०० | एकनाथ सहादू पठारे/शिवनाथ सहादू पठारे/रेल्वेकडे |
| ४ | २८८ अ | ०३.०६.०० | लखीचंद कचरदास भंडारी |
| ५ | २८८ ब | ००.५४.०० | पुष्पाताई लखीचंद भंडारी |
| ६ | २८८ क | ००.९७.०० | पुष्पाताई लखीचंद भंडारी |
| | एकूण | १३.१३.०० | |

**२)** उपरोक्त परिशिष्ट अ मधील जमीन गट नं.२९३ क्षेत्र ७ हे.३२ आर इतके दर्यानानी ट्रस्टने संस्थानला दि.०१/१२/२००९ रोजी नोंदणीकृत बक्षिसपत्रान्वये दिलेले आहे. परिशिष्ट अ मधील उर्वरित जमीनीचे संबंधात न्यायालयात वाद सुरु असल्याने सदर जमीनींचे बक्षिसपत्र होवू शकलेले नाही.

**३)** उपरोक्त परिशिष्ट ब मधील जमीनींचे मूळ मालकाशी राधा कालियनदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट,मुंबई यांनी सन १९८७-८८ मध्ये जमीन खरेदीचा करार केलेला होता.

**४)** तद्नंतर मुळ मालक श्री.लखीचंद कचरदास भंडारी व इतर यांनी त्रयस्थ इसम श्री.संग्राम माधवराव देशमुख यांचेबरोबर उक्त जमीनीचा व्यवहार ठरवून त्यांना विसार पावती करुन दिली.

**५)** सदर व्यवहारासंबंधात श्री.संग्राम माधवराव देशमुख यांनी दै.सार्वमत व दै.लोकमत मध्ये जाहीर नोटीस प्रसिध्द केली. त्यास अनुसरुन राधा कालियनदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट यांनी हरकत घेतली. त्यामुळे श्री.संग्राम माधवराव देशमुख यांनी श्री.भंडारी/भनसाळी व दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट यांचेविरुध्द मा.दिवाणी न्यायाधीश,व.स्तर,कोपरगाव यांचे कोर्टात स्पे.मु.नं. ४९/२००८ चा दावा दाखल केला. सदर दाव्यात दि.०५/०३/२०१२ रोजीच्या करारनाम्यानुसार वादी व प्रतिवादी क्रं.१ ते ५ यांचे दि.०६/०३/२०१२ रोजी तडजोड होवून दावा निकाली काढण्यात आला.

**६)** उपरोक्त दावा चालू असतांना अर्जदार यांनी संस्थानकडे सदर जमीनी खरेदी करणेकामी दि.१७/११/२०११ रोजी अर्ज केलेला होता. त्याअनुषंगाने सदर जमीनीचे किंमतीबाबत दि.२४/०९/२०११ मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय नं.१७ मधील निर्णय क्रं.७५९ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होवून यापूर्वी मा.व्यवस्थापन मंडळाने दि.१०/१०/२०१० रोजीचे सभेत घेतलेल्या निर्णयास अनुसरुन दर्यानानी ट्रस्ट यांची वर नमूद केलेली जमीन सर्व कायदेशीर बाबींची पडताळणी व पुर्तता करुन रु.५५,००,०००/- प्रति एकर या दराने खरेदी करण्यात यावी. याकामी विहीत पध्दतीने

संस्थान वकीलामार्फत जमीनीचा सर्च रिपोर्टसह अभिप्राय घेणेत यावा तसेच वकीलामार्फत जमीनीबाबत कोणत्याही व्यक्तीची/संस्थेची हरकत नाही याबाबत वृत्तपत्रात जाहीर नोटीस प्रसिध्द करुन जमीनी खरेदीस कोणाचीही हरकत नाही,याबाबत पडताळणी करण्यात यावी. दर्यानानी ट्रस्ट,संबंधीत जमीन मालक व इतर हितसंबंधीत व्यक्ती/संस्थायांचेत असणारे सर्व न्यायालयीन दावे निपटल्यानंतर जमीन मालकांनी संस्थानकडे जमीन विक्रीचा स्वतंत्ररित्या प्रस्ताव सादर करावा. त्यानुसार जमीनीचे खरेदीखत नोंदणीचे वेळेस जमीनीच्या एकूण किंमतीच्या ८० टक्के रक्कम अदा करणेस व उर्वरित २० टक्के रक्कम जमीनीस संस्थानचे नाव लागलेनंतर संस्थानमार्फत रितसर शासकीय मोजणी करुन ताब्यात मिळणारे जमीनीच्या प्रमाणात रक्कम जमीन मालकांना अदा करणेस तसेच जमीन खरेदीकामी मुद्रांक व नोंदणी शुल्क,सरकारी मोजणी शुल्क,वकील फी आदी अनुषंगिक योग्य त्या समावेशक खर्चास मान्यता देण्यात यावी,असे ठरले". असे बाबतचा निर्णय झालेला आहे.

सदर निर्णयाच्या अनुषंगाने दि.१४/०१/२०१२ रोजीच्या दै.सार्वमत व दै.पुण्यनगरी आणि दि.१५/०१/२०१२ रोजीच्या दै.गावकरी या स्थानिक वृत्तपत्रात जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यात आल्या. त्यास अनुसरुन १) श्री.राजीव गणपत मयेकर यांनी हरकत घेवून जमीन मालक यांनी त्यांना २००७ साली विसार पावती करुन दिलेचे नमूद केलेले आहे. तसेच २) श्री.राजेंद्र चंदनमल भनसाळी यांनी हरकत घेवून उक्त वडीलोपार्जित जमीनीचे अद्यापपावेतो वाटप झालेले नसलेचे नमूद केलेले आहे. ३) मॅनेजर,साई नागरी सहकारी पतपुरवठा संस्था यांनी हरकत घेवून उक्त जमीनी जमीन मालक यांनी त्यांचे पतसंस्थेस नजर गहाणखत करुन दिलेले आहे. आणि ४) राधाबाई कालियनदास चॅरिटेबल ट्रस्ट,मुंबई यांनी हरकत घेवून त्यात उक्त जमीनीसंबंधात न्यायालयात वाद न्यायप्रविष्ट आहे. त्याचे निराकरण झालेशिवाय जमीन मालकांना उक्त जमीनी खरेदी देता येणार नाही, असेबाबत नमूद केलेले आहे.

उपरोक्त निर्णयात नमूद केलेप्रमाणे उक्त जमीनींचा सर्च रिपोर्टसंबंधात संस्थान पॅनलवरील वकील ॲड.जे.के.गोंदकर यांनी उपरोक्त हरकतीचा विचार करता सदर जमीनीबाबतचे दावे मा.न्यायालयात न्यायप्रविष्ट असल्याने सदर बाबीचे प्रथम निराकरण झालेशिवाय उपरोक्त जमीन मालकांच्या जमीनी संस्थानकरीता खरेदी करणे योग्य व उचित आणि कायदेशीर होणार नाही,त्यामुळे सदर जमीनींचा ३० वर्षांचा सर्च रिपोर्ट तुर्त देणेचे कारण नाही,असेबाबत त्यांचेकडील दि.०७/०२/२०१२ रोजीच्या पत्रान्वये कळविलेले आहे.

**७)** तद्नंतर सदर जमीनींचे किंमतीबाबत दि.१७/०९/२०१३ रोजीच्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेतील विषय नं.४ मध्ये निर्णय क्रं.६१६ प्रमाणे निर्णय झाला की, "सदरहू जमीनीचा शासनाच्या रेडी रेकनरप्रमाणे रेट घेण्यात यावा व त्यानुसार सुधारीत प्रस्ताव तयार करुन तो व्यवस्थापन समितीसमोर निर्णयार्थ सादर करण्यात यावा,असे ठरले."

सदर निर्णयाप्रमाणे उक्त जमीनींचे मुल्यांकन मिळणेकामी मा.मुद्रांक जिल्हाधिकारी तथा सह जिल्हा निबंधक, अहमदनगर यांचेकडेस पत्रव्यवहार करणेत आला. तथापि दरम्यानचे काळात श्री.संग्राम माधवराव देशमुख यांनी मे.दिवाणी न्यायालय,व.स्तर,कोपरगाव यांचे कोर्टात स्पे.मु.नं.५९/२०१२ चा दाखल केलेला असलेने सदर निर्णयाप्रमाणे कार्यवाही पूर्ण झाली नाही.

८) तद्नंतर दि.०४/०२/२०१४ रोजीच्या मा.व्र्यवस्थापन समितीच्या सभेत निर्णय क्रं.८९ अन्वये प्रमाणे, "साईभक्तांना सोयी-सुविधा पुरविणेसाठी प्रस्तावित जमीनीची संस्थानला आवश्यकता असून जर सर्व पक्षकार एकत्रितपणे मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठासमोर संस्थानला जमीन देणेकामी लेखी देत असतील तर तसा प्रस्ताव मा.खंडपीठासमोर सादर करता येईल. मात्र तत्पूर्वी याकामी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये संस्थानच्या वतीने काम पाहणारे ॲड.चौकीदार यांचा सल्ला घेण्यात यावा,असे ठरले."

सदर निर्णयाप्रमाणे ॲड.चौकीदार यांचेकडेस पत्रव्यवहार करणेत आलेला आहे व वेळोवेळी स्मरणपत्र देण्यात आले. तथापि त्यांचेकडून कोणत्याही प्रकारचे अभिप्राय प्राप्त झालेले नाहीत.

**९)** उपरोक्त स्पे.मु.नं.४९/२००८ मधील दि.०६/०३/२०१२ रोजी झालेल्या तडजोडीप्रमाणे व त्यातील दि.०५/०३/२०१२ रोजीच्या करारनाम्यानुसार मूळ जमीन मालक यांनी उपरोक्त जमीनी संस्थानला विकत घेण्यास सहकार्य केले नाही व करारनाम्यानुसार कार्यवाही करणेस अडथळे निर्माण केले आणि ॲड.रविराज लालाजी गोतीस यांनी त्यांचे जाहीर न केलेल्या पक्षकारासाठी दावा मिळकत मूळ जमीन मालक यांचेकडून खरेदी घेणेबाबतचे विधान केले व त्यांना त्यापोटी विसार दिल्याचे विधान केले म्हणून श्री.संग्राम माधवराव देशमुख यांनी मे.दिवाणी न्यायाधीश,व.स्तर,कोपरगाव यांचे कोर्टात सौ.पुष्पाताई लखीचंद भंडारी,श्री.लखीचंद कचरदास भंडारी, श्री.राजेंद्र चंदनमल भनसाळी,श्री.सुभाष चंदनमल भनसाळी,श्रीमती राधाबाई कालियनदास

दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट,श्री.अभिजित जितेंद्र शहा,श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी आणि ॲड.रविराज लालाजी गोतीस यांचेविरुध्द दि.२६/०९/२०१२ रोजी स्पे.मु.नं.५९/२०१२ चा दावा दाखल केलेला आहे.

**१०)** सदर दाव्याचे कामकाज अद्याप चालू असून त्यात उपरोक्त वादी व प्रतिवादी नं.१ ते ६ यांनी या दाव्यात तडजोड करण्याचे निश्चित करुन दाव्यातील जमीनी संस्थानला कायम खरेदी देण्यास संमती दिली आहे व तडजोडीचा मसुदा तयार करुन तो उपरोक्त वादी,प्रतिवादी यांना मान्य आहे. तडजोडीचे मसुद्याबरोबर संस्थानने प्रत्येकाला किती रक्कम द्यावयाची आहे याचा तक्ता तयार केलेला आहे व या पत्रानुसार वर्तन करण्याची तसेच स्पे.मु.नं.५९/२०१२ यात हुकूमनामा करुन घेण्याची उपरोक्त वादी, प्रतिवादी या सर्वांची जबाबदारी आहे. तरी सदरचा तडजोडीचा मसुदा तपासून त्यास मान्यता द्यावी व तडजोडीवर संस्थानच्या जबाबदार प्रतिनिधीमार्फत सही करावी,असेबाबतचा अर्ज श्री.संग्राम माधवराव देशमुख व इतर ६ यांनी दि.०४/०३/२०१६ रोजी इकडेस सादर करुन त्यासोबत तडजोडीचा मसुदा,श्री.अभिजित जितेंद्र शहा यांचे संमतीपत्र व इतर कागदपत्रे आणि कोर्ट हुकूमाच्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती सादर केलेल्या आहेत.

**११)** त्या अनुषंगाने उपरोक्त जमीनीबाबतचे मुळ जमीन मालक व इतर आणि अर्जदार यांनी त्यांचे उपरोक्त वाद मे.कोर्टासमोर एकत्र येवून मिटवावेत व Clear Title झाल्यानंतर संबंधीत जमीन मालक यांनी त्यांचे मर्जीनुरुप संस्थानकडे सदर जमीनीच्या खरेदीबाबतचा प्रस्ताव सादर करावा,असेबाबत अर्जदार यांना दि.०७/०७/२०१६ रोजीच्या पत्रान्वये अलाहीदा कळविणेत आलेले आहे. त्यानंतर देखील अर्जदार यांनी वारंवार अर्ज केलेले आहेत. त्यांना उपरोक्तप्रमाणे अलाहीदा कळविणेत आलेले आहे.

**१२)** प्रस्तुत जमीनी संदर्भात मे.दिवाणी न्यायाधीश,व.स्तर,कोपरगाव यांचे कोर्टात स्पे.मु.नं.५९/२०१२ चा दाखल असून त्यात श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी,ता.राहाता,जि.अहमदनगर तर्फे कार्यकारी अधिकारी श्री.किशोर रामराव मोरे यांना प्रतिवादी नं.७ म्हणून प्रतिवादीपणात सामील केलेले आहे. प्रस्तुत प्रकरणी संस्थान पॅनलवरील वकील ॲड.जे.के.गोंदकर हे मे.कोपरगाव येथील कोर्टात संस्थानतर्फे कामकाज पाहात असलेने प्रस्तुत दाव्यासंदर्भात त्यांचेबरोबर चर्चा करणेत आलेली आहे.

**१३)** दरम्यानचे काळात त्रयस्थ इसम श्री.संग्राम माधवराव देशमुख यांनी दि.१३/११/२०१७ रोजी इकडेस अर्ज सादर करुन त्यासोबत उपरोक्त तडजोडीचा मसुदा सादर करुन जमीनी संस्थानच्या ठरावाप्रमाणे संस्थानने खरेदी घेणेबाबतचा अर्ज सादर केलेला आहे. तसेच जमीन मालक श्री.लखीचंद कचरदास भंडारी व इतर ३ यांनी शासनाकडे दि.१३/०९/२०१७ रोजी अर्ज सादर केलेला आहे.

**१४)** अर्जात नमूद केलेल्या मौजे रुई येथील जमीन गट नं.२८८/अ,२८८/ब,२८८/क आणि गट नं.२९४ एकूण क्षेत्र १०.२३ हेक्टर हे संस्थानला दानपत्राद्वारे प्राप्त झालेल्या गट नं.२९३ क्षेत्र ७ हेक्टर ३२ आर या क्षेत्रालगत आहे.

**१५)** सदरच्या जमीनी महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग,मंत्रालय,मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रं.टीपीएस १६१३/५१/प्र.क्र./०५/२०१३/नवि-९ दि.२८/०८/२०१४ अन्वये कृषी विभागातून वगळून रहिवास विभागात समाविष्ट करणेत आलेल्या आहेत.

**१६)** सदर जमीनींचे सन २०१७-१८ चे बाजारमुल्य खालीलप्रमाणे होत आहे.

श्री.भंडारी/भनसाळी यांची रुई येथील जमीनीचे बाजारमुल्य दर्शविणारा व त्यांनी सुचित केलेला दर दर्शविणारा तक्ता-

| गट नं. | क्षेत्र हे.आर | सन २०१७-१८ चे बाजारमुल्य रु. | बाजारमुल्याप्रमाणे प्रति एकर होणारा दर | श्री.भंडारी यांनी सुचित केलेला दर प्रति एकर | रु.५५,००,०००/- प्रति एकरप्रमाणे होणारी एकूण किंमत |
|---|---|---|---|---|---|
| २८८/अ | २.९२ | रु.४,५४,५४,५००/- | रु.६२,२६,६४०/- | रु.५५,००,०००/- | रु. ४,०१,५०,०००/- |
| २८८/ब | ०.५० | रु.१,१०,५६,५००/- | रु.८८,४५,२००/- | रु.५५,००,०००/- | रु. ६८,७५,०००/- |
| २८८/क | ०.९१ | रु.१,७७,७२,३००/- | रु.७८,१२,०००/- | रु.५५,००,०००/- | रु. १,२५,१२,५००/- |
| २९४ | ५.९० | रु.८,६१,३१,५००/- | रु.५८,३९,४४०/- | रु.५५,००,०००/- | रु. ८,११,२५,०००/- |
| | एकूण | रु.१६,०४,१४,८००/- | -- | -- | रु.१४,०६,६२,५००/- |

जमीन मालक श्री.लखीचंद कचरदास भंडारी व इतर यांनी शासनाकडेस केलेला दि.१३/०९/२०१७ रोजीच्या अर्जाच्या अनुषंगाने मा.कार्यासन अधिकारी,विधी व न्याय विभाग यांनी त्यांचेकडील पत्र क्रं.सासंवि-१०१७/संक्र/१६६९/कार्यासन-१६ दि.३१/१०/२०१७ अन्वये "अर्जदारांची मौजे रुई येथील गट नं.२८८ पैकी व

गट नं.२९४ पैकी या वडीलोपार्जित मालकी हक्काच्या वहीवाटीच्या जागा असून सदर जागा खरेदी करणेबाबतचा ठराव संस्थानच्या दि.२४ सप्टेंबर २०११ रोजीच्या बैठकीत घेण्यात आला. तथापि आजतागायत सदर व्यवहार झालेला नाही. संस्थानशी सदर जमीनींचा व्यवहार करण्याचे निश्चित झाल्यामुळे विकासक जास्त मोबदल्यात सदर जमीन घ्यावयास तयार असूनही अर्जदार विकासकाशी सदर जमीनीचा व्यवहार करत नाहीत. संस्थानला सदर जमीनीचा व्यवहार करावयाचा नसल्यास त्याबाबतचे पत्र अर्जदारास द्यावे,अशी विनंती अर्जदारांनी उक्त अर्जान्वये केली आहे." तरी प्रस्तुत प्रकरणी आपला अहवाल शासनास सादर करण्यात यावा, वगैरेबाबत नमूद केलेले आहे.

तद्रुषंगाने सदर जमीनीचे किंमतीबाबत दि.२४/०९/२०११ रोजीचे व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय नं.१७ मधील निर्णय क्रं.७५९ प्रमाणे म्हणजेच "मा.व्यवस्थापन मंडळाने दि.१०/१०/२०१० रोजीचे सभेत घेतलेल्या निर्णयास अनुसरुन दर्यानानी ट्रस्ट यांची वर नमूद केलेली जमीन सर्व कायदेशीर बाबींची पडताळणी व पुर्तता करुन रु.५५,००,०००/- प्रति एकर या दराने खरेदी करण्यात यावी. याकामी विहीत पध्दतीने संस्थान वकीलामार्फत जमीनीचा सर्च रिपोर्टसह अभिप्राय घेणेत यावा तसेच वकीलामार्फत जमीनीबाबत कोणत्याही व्यक्तीची/संस्थेची हरकत नाही याबाबत वृत्तपत्रात जाहीर नोटीस प्रसिध्द करुन जमीनी खरेदीस कोणाचीही हरकत नाही,याबाबत पडताळणी करण्यात यावी. दर्यानानी ट्रस्ट,संबंधीत जमीन मालक व इतर हितसंबंधीत व्यक्ती/संस्था यांचेत असणारे सर्व न्यायालयीन दावे निपटल्यानंतर जमीन मालकांनी संस्थानकडे जमीन विक्रीचा स्वतंत्ररित्या प्रस्ताव सादर करावा. त्यानुसार जमीनीचे खरेदीखत नोंदणीचे वेळेस जमीनीच्या एकूण किंमतीच्या ८० टक्के रक्कम अदा करणेस व उर्वरित २० टक्के रक्कम जमीनीस संस्थानचे नाव लागलेनंतर संस्थानमार्फत रितसर शासकीय मोजणी करुन ताब्यात मिळणारे जमीनीच्या प्रमाणात रक्कम जमीन मालकांना अदा करणेस तसेच जमीन खरेदीकामी मुद्रांक व नोंदणी शुल्क,सरकारी मोजणी शुल्क,वकील फी आदी अनुषंगिक योग्य त्या समावेशक खर्चास मान्यता देण्यात यावी."या निर्णयाप्रमाणेकार्यवाही करणेकामी मान्यता मिळणेसाठी शासनाकडे अहवाल सादर करणेच्या निर्णयार्थ प्रस्तुतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.०२/०२/२०१८ रोजीच्या सभेपूढे सादर करणेत आला.

सदर सभेत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी "शेती महामंडळाची जमीन खरेदीचा प्रस्ताव शासनाकडे प्रस्तावित आहे. त्यामुळे खाजगी जमीनीच्या खरेदीपेक्षा सरकारी जमीन प्राधान्याने खरेदी कराव्यात," अशी माहीती दिली. त्यावर निर्णय क्रं.९९ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, शेती महामंडळाची जागा खरेदी करणेबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन समितीने मान्य करुन शासन परवानगीसाठी पाठविणेत आलेला आहे. परंतु मौजे रुई,ता.राहाता,जि.अहमदनगर येथील जमीन गट नं.२८८अ,२८८/ब,२८८/क व गट नं.२९४ पै.एकूण क्षेत्र १०.२३ हेक्टर क्षेत्र हे येलो झोनमध्ये असून तेथील संस्थान मालकीच्या जमीनीलगत आहे व शेती महामंडळाकडून खरेदी करावयाच्या जमीनीपेक्षा कमी भावाने मिळत आहे. तसेच संस्थानने प्रस्तावित जमीन खरेदी केल्यास राधा कालियनदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट यांची या व्यतिरिक्त तेथे असलेली उर्वरित जमीन संस्थानला विनामुल्य दान देणेची शक्यता आहे. याकरीता सदरहू क्षेत्र शासनाची मान्यतेने कायम खरेदी करुन घेणेत यावे. यासाठी दि.२४/०९/२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.७५९ ची अंमलबजावणीसाठी प्रस्ताव सादर करणेत यावा,असे ठरले.

सदर निर्णयाप्रमाणे मा.प्रधान सचिव,विधी व न्याय विभाग,महाराष्ट्र शासन,मंत्रालय,मुंबई यांचेकडेस इकडील पत्र जा.नं.एसएसएसटी/मालमत्ता/६२१२/२०१८ दि.१९/०२/२०१८ व जा.नं.एसएसएसटी/मालमत्ता/२१००/२०१८ दि.३०/०७/२०१८ रोजीच्या पत्रान्वये प्रस्ताव सादर करणेत आला.

तदनुषंगाने महाराष्ट्र शासन,विधी व न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रं.सासंवि-१०१८/४४२/प्र.क्र.५४/का.१६ दि.२४/१०/२०१८ अन्वये खालीलप्रमाणे शासन निर्णय निर्गत केलेला आहे.

प्रस्तावना– श्री साईबाबा संस्थानच्या मालकीच्या गट नं.२९३ लगत असलेल्या गट नं.२८८/अ, २८८/ब, २८८/क व गट नं.२९४ पै.एकुण १०.२३ हेक्टर क्षेत्र संस्थानसाठी खरेदी करण्यासाठीचा प्रस्ताव प्राप्त झाला आहे. प्रस्तुत जमीनीबाबत मे.कोपरगाव येथील दिवाणी न्यायाधीश,व.स्तर यांच्या कोर्टात स्पे.मु.नं.५९/२०१२ दाखल असून सदर दाव्यातील वादी प्रतिवादी यांनी दि.१७/१२/२०१४ रोजी तडजोडीचा करारनामा केला असून सदरचे क्षेत्र श्री साईबाबा संस्थान खरेदीने घेत असल्यास सदरचे वाद संपुष्टात येणार असल्याचे नमुद केले आहे. रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर सदर करारनाम्याची छायांकित प्रत संस्थानला सादर केली असून सर्व हक्कदारांनी दि.१७/१२/२०१४ रोजी मेमोरेंडम ऑफ अंडरस्टॅण्डींग सहया केलेल्या आहेत. जमीन मालकाने सदर जमीन शिर्डी संस्थानला विक्री करण्यास संमतीपत्र सादर केले आहे. नगरविकास

विभागाच्या दि.२८/०८/२०१४ रोजीच्या अधिसुचनेद्वारे सदर जमीन अकृषिक असा बदल करण्यात आला आहे. सदर जमीनीचा सर्च रिपोर्ट घेण्यात आला असून सदर मिळकत व इतर मिळकती कायमचे खरेदीखताने खरेदी करता येईल. त्यास कोणतीही कायदेशीर अडचण नाही. मात्र अगोदर दुय्यम निबंधक,राहाता यांच्याकडील सरकारी किंमतीची निश्चिती करणे जरुरीचे आहे. असा अहवाल प्राप्त झाला आहे. दुय्यम निबंधक कार्यालय,ता.राहाता,जि.अहमदनगर यांनी सन २०१७-१८ च्या बाजारमुल्य भावाप्रमाणे सदर जमीनीचे मुल्य रु.१६,०४,१४,८००/- इतके निश्चित केले आहे. सदर जमीनधारक सदर जमीन रु.१४,०६,६२,५००/- इतक्या रकमेस शिर्डी संस्थानला विकण्यासाठी तयार आहे. सदर जमीन विकत घेतल्यास संस्थानला सलग १७.५५ हेक्टर एवढे क्षेत्र सलग उपलब्ध होणार असून या क्षेत्रावर संस्थानचे मेडीकल कॉलेज,नर्सिंग कालेज,कॅन्सर हॉस्पिटल यांच्याकरीता एकत्रित वैद्यकीय संकुल उभारता येईल. समितीच्या दि.१४/०९/२०११ रोजीच्या सभेत सदर जमीन प्रति एकर रु.५५,००,०००/- या दराने खरेदी करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला. तसेच जमीनी खरेदी करण्यासाठी मुद्रांक नोंदणी शुल्क,सरकारी मोजणी शुल्क,वकील फी आदी अनुषंगिक आवश्यक त्या सर्व समावेशक खर्चास शासन मान्यता घेण्यात यावी,असा ठराव करण्यात आला. सदर ठरावानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी,श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांनी त्यांच्या संदर्भीय पत्र क्रं.१ व ३ अन्वये समितीने केलेल्या ठरावाप्रमाणे प्रस्तावास मंजुरी देण्याची विनंती केली आहे. शासनाने संदर्भाधीन पत्र क्रं.२ अन्वये जमीन धोरण निश्चित केले असून या धोरणांन्वये ठरविण्यात आलेले निकष,अटी व शर्ती सदर जमीन खरेदी प्रस्ताव पूर्ण करत असल्याचे संस्थानने कळविले आहे. त्यास अनुसरुन सदर प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)(सुधारणा) अधिनियम २००४ च्या कलम २१(१)(झ) मधील तरतुदीनुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांच्या मालकीच्या गट नं.२९३ लगत असलेल्या गट नं.२८८/अ,२८८/ब,२८८/क व गट नं.२९४ पै.एकुण १०.२३ हेकटर क्षेत्र रु.१४,०६,६२,५००/- (रु.चौदा कोटी सहा लक्ष बासष्ट हजार पाचशे फक्त) इतक्या रकमेस खरेदी करण्यास तसेच यासाठी मुद्रांक नोंदणी शुल्क,सरकारी मोजणी शुल्क, वकील फी आदी अनुषंगिक आवश्यक त्या सर्व समावेशक खर्चास या शासन निर्णयान्वये खालील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

१) मा.दिवाणी न्यायाधीश,व.स्तर,कोपरगाव यांचे कोर्टात दाखल स्पे.मु.नं.५९/२०१२ निकाली काढणेत यावी.
२) सदर जमीनीवरील सर्व हक्कदाराच्या जमीन विक्री करारनाम्यावर सहया घेण्यात याव्यात.
३) जमीन खरेदी करण्यापूर्वी उक्त जमीनीची मोजमापणी भुमी अभिलेख विभागाकडून करुन घेण्यात यावी.
४) जमीन खरेदी करतांना मालमत्ता हस्तांतरण अधिनियम १९८२ मधील कलम ५४ व ५५ मधील तरतुदीचे पालन करणेत यावे.
५) जमीनी खरेदी संदर्भात आवश्यक असणा-या इतर सर्व कायदेशीर बाबी पूर्ण करण्यात याव्यात.
६) सदर जमीनीच्या खरेदीखत नोंदणीच्या वेळी जमीनीच्या एकुण मुल्याच्या ८०% रक्कम अदा करण्यात यावी. संस्थानच्या नावावर जमीन लागल्यानंतर (जमीनीचा ७/१२ संस्थानच्या नावे झाल्यानंतर) व रितसर शासकीय मोजणी करुन संस्थानच्या ताब्यात जमीन घेतल्यानंतर उर्वरित २०% रक्कम अदा करण्यात यावी.

शासनाकडील उपरोक्त निर्णयाप्रमाणे मौजे रुई येथील उपरोक्त विषयांकित जमीन संस्थानला कायम खरेदी करण्याबाबतची प्रक्रिया संस्थान स्तरावरुन चालू आहे.

अवलोकनार्थ सादर.

**निर्णय क्र.६६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे रुई, ता.राहाता, जि.अहमदनगर येथील जमीन गट नं.२८८अ, २८८ब, २८८क व गट नं.२९४ पै. एकूण क्षेत्र १०.२३ हेक्टर क्षेत्र संस्थानला कायम खरेदी करणेकामी महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग यांचेकडील क्र.सासंवि-१०१८/४४२/प्र.क्र.५४/का.१६, दि.२४ ऑक्टोंबर,२०१८ चे शासन निर्णयामध्ये नमुद केलेल्या खालील अटींचे अधिन राहुन सदरहु जमिनी संस्थानला कायम खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली.**

**१) मा.दिवाणी न्यायाधीश,व.स्तर,कोपरगाव यांचे कोर्टात दाखल स्पे.मु.नं.५९/२०१२ निकाली काढणेत यावा.**
**२) सदर जमीनीवरील सर्व हक्कदाराच्या जमीन विक्री करारनाम्यावर सहया घेण्यात याव्यात.**

**३) जमीन खरेदी करण्यापूर्वी उक्त जमीनीची मोजमापणी भुमी अभिलेख विभागाकडून करुन घेण्यात यावी.**

**४) जमीन खरेदी करतांना मालमत्ता हस्तांतरण अधिनियम १९८२ मधील कलम ५४ व ५५ मधील तरतुदीचे पालन करणेत यावे.**

**५) जमीनी खरेदी संदर्भात आवश्यक असणा-या इतर सर्व कायदेशीर बाबी पूर्ण करण्यात याव्यात.**

**६) सदर जमीनीच्या खरेदीखत नोंदणीच्या वेळी जमीनीच्या एकुण मुल्याच्या ८०% रक्कम अदा करण्यात यावी. संस्थानच्या नावावर जमीन लागल्यानंतर (जमीनीचा ७/१२ संस्थानच्या नावे झाल्यानंतर) व रितसर शासकीय मोजणी करुन संस्थानच्या ताब्यात जमीन घेतल्यानंतर उर्वरित २०% रक्कम अदा करण्यात यावी.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.२२** **शिर्डी येथील साईबाबा सुपर हॉस्पिटल समोरील (साईनगर मैदान) येथील कार पार्कींग व्यवसाय चालविणेस देणेबाबत संरक्षण विभागाकडील जा.नं.६९०/२०१९, दि.२०.१२.२०१९ व मा.चेअरमन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी,लि.शिर्डी यांचेकडील जा.क्र.श्रीसासंएक्रेसो/२०७/ २०१९, दि.१३.१२.२०१९ रोजीचे पत्र.**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतूद- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही,विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

प्रस्तावना- यापूर्वी साईबाबा हॉस्पिटल विभागामार्फत साईनगर मैदानावरील डॉक्टर व स्टाफ पार्कींग भाडेतत्वावर चालविणेस देणे व श्री साईबाबा हॉस्पिटलच्या कॅन्टीन विभागामध्ये झेरॉक्स मशिन बसविणे तसेच ते एम्प्लॉईज सोसायटीस भाडेतत्वावर सोसायटीस भाडेतत्वावर चालविणेस देणेसंबंधातील प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९/०३/२०१७ रोजीच्या सभेपुढे सादर करणेत आला होता. त्यात निर्णय क्रं.१८४ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

“साईनगर मैदानावरील डॉक्टर व स्टाफ पार्कींग भाडेतत्वावर चालविणेस देणेस मान्यता देण्यात आली. परंतु संस्थानमार्फत विविध उत्सवांमध्ये साईनगर मैदानावर धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करणेत येत असते त्यामुळे तेथे पार्कींगसाठी शेड तयार न करता आहे ते शेडही काढून घेण्यात यावे. तसेच विविध कामासाठी रुग्णांच्या नातेवाईकांना झेरॉक्स गरज भासते. याकरीता श्री साई संस्थान कर्मचारी सोसायटीला हॉस्पिटलकडील कॅन्टीन विभागामध्ये BOT तत्वावर झेरॉक्स मशिन चालविणेस देण्यात यावे,”असे ठरले.

उपरोक्त निर्णयाप्रमाणे कार्यवाही करणेकामी सभा कामकाज विभागाकडील जा.नं.एसएसएस-वशी-०४/४४६३/२०१७ दि.२५/०३/२०१७ अन्वये वैद्यकीय संचालक,श्री साईबाबा हॉस्पिटल,शिर्डी यांना निर्णयाची प्रत अलाहिदा पाठविणेत आलेली आहे.

तदनंतर प्रस्तुतचे प्रकरणी श्री साईबाबा हॉस्पिटल विभाग यांचेकडून त्यांचेकडील दि.२४/०४/२०१७ रोजीच्या पत्रान्वये मालमत्ता विभागाकडे वर्ग करणेत आलेले आहे. त्यास अनुसरुन सदर निर्णयाप्रमाणे कार्यवाही करणेकामी इकडील पत्र जा.नं. एसएसएसटी/मालमत्ता/१७१४/२०१७ दि.१०/०७/२०१७ रोजीचे पत्रान्वये उपकार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग यांना कळविणेत आले.

सदर निर्णयाप्रमाणे कार्यवाही सुरु असतांना दरम्यानचे कालावधीत मा.चेअरमन,श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि.शिर्डी यांनी त्यांचेकडील जा.नं. श्रीसासंएक्रेसो/२९५/२०१८ दि.१३/०१/२०१८ अन्वये श्री साईबाबा समाधी शताब्दी कालावधीमध्ये व श्री साईबाबांचे दर्शनासाठी येणा-या साईभक्तांचे सोयीसाठी तसेच श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ हॉस्पिटल येथे उपचारासाठी येणा-या रुग्णांच्या व त्यांच्या नातेवाईकांच्या दुचाकी व चारचाकी वाहनांचे सुरक्षिततेकरीता कायमस्वरुपी आपल्या संस्थानच्या मालकीच्या साईनगरचे पाठीमागील बस डेपोच्या जागेत संस्था सशुल्क कार पार्कींग व्यवस्था चालविण्यास तयार आहे. सदर व्यवस्थेसाठी पार्कींग बुकींग कॅबिन,लाईट व इतर व्यवस्था संस्थानमार्फत पुरविल्यास सदर पार्कींग व्यवस्था संस्था संस्थेच्या कर्मचा-यांमार्फत सशुल्क २४ तासासाठी बस रु.५०/-,टेम्पो रु.२५/-,कार रु.२०/- व मोटार सायकल रु.५/- याप्रमाणे पार्कींग सेवा आकार आकारुन तसेच संस्थानचे कर्मचारी

यांचेकरीता मासिक नाममात्र शुल्क आकारुन चालविण्यास तयार आहे. तरी सदर पार्कींग व्यवस्था संस्थेमार्फत सशुल्क चालविणेस परवानगी मिळावी,असेबाबतची विनंती केलेली होती.

सदर पत्राचे अनुषंगाने उपरोक्त दि.०९/०३/२०१७ रोजीच्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेतील निर्णय क्रं.१८४ मधील साईनगर मैदानावरील डॉक्टर व स्टाफ पार्कींग सोसायटीस भाडेतत्वावर चालविणेस देणेच्या जागेऐवजी मा.चेअरमन,श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांचे उपरोक्त दि.१३/०१/२०१८ रोजीचे पत्रातील विनंतीप्रमाणे संस्थान मालकीचे सर्वे नं.१२५ पैकी सुमारे १ एकर क्षेत्रात सशुल्क पार्कींग व्यवसाय करण्यास उक्त सोसायटीस ११ महिन्यांचे लिव्ह अॅण्ड लायसन्स करारावर सार्वजनिक बांधकाम विभाग निश्चित करील या भाडेदराने व विद्युत बील आकार वेगळा आकारुन वापरास देणे तसेच सदर व्यवस्थेसाठी पार्कींग बुकींग कॅबिन,लाईट व इतर व्यवस्था संस्थानमार्फत पुरविणे, सदर पार्कींग व्यवस्था उक्त संस्थेच्या कर्मचा-यांमार्फत सशुल्क २४ तासांसाठी बस रु.५०/-,टेम्पो रु.२५/-,कार रु.२०/- व मोटार सायकल रु.५/- याप्रमाणे पार्कींग सेवा आकारणे तसेच तसेच संस्थानचे कर्मचारी यांना मासिक नाममात्र शुल्क आकारणे व त्याप्रमाणे लिव्ह अॅण्ड लायसन्स कराराकनामा करुन घेणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७/०३/२०१८ रोजीच्या सभेपुढे सादर करणेत आला. त्यात निर्णय क्रं.१७६ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला व सदरहू ठिकाणी पार्कींग व्यवस्था संस्थानमार्फत मोफत करणेत यावी. तसेच वाहन पार्कींगचे ठिकाणी सुरक्षिततेच्या दृष्टिने सीसीटीव्ही कॅमेरे व सुरक्षा रक्षक ठेवणेत यावेत,असे ठरले.

मात्र संरक्षण अधिकारी,संरक्षण विभाग यांनी त्यांचेकडील कार्यालयीन टिपणी जा.क्रं.६९०/२०१९ दि.२०/१२/२०१९ मध्ये "पोलीस निरीक्षक,शिर्डी पोलीस स्टेशन,शिर्डी यांनी संदर्भीय पत्रात श्री साईबाबा संस्थान अंतर्गत श्री साईबाबा सुपर हॉस्पिटल, शिर्डी,ता.राहाता येथे मोठया प्रमाणात गर्दी होत असते. त्या अनुषंगाने रुग्णांचे नातेवाईक हे हॉस्पिटल समोरील फ्री पार्कींगमध्ये वाहन पार्कींग न करता हॉस्पिटल समोरील रस्त्यावर वाहने पार्क करत असतात. त्यामुळे ट्रॅफिक जाम होवून सर्वसामान्य ये-जा करणा-या लोकांना त्रास होत असतो. तसेच सदरच्या रस्त्यावरुन वाहने चोरी होण्याचे प्रमाणे जास्त आहे. तसेच हॉस्पिटल समोरील फ्री पार्कींगमध्ये वाहने लावतांना त्यांना कोणतेही टोकन अथवा पावती न दिल्याने मोटार सायकल मालक याने जरी वाहन पार्क केले असले तरी दुसराच कोणीतरी व्यक्ती सदरची वाहने घेवून जात असतो. त्यामुळे वाहन मालक व चोरी करणारे व्यक्ती यामध्ये फरक करणे शक्य होत नाही. तसेच सदरची फ्री पार्कींगच्या जागेला समोरील बाजूने जाळी असून उर्वरित बाजूला तशाच प्रकारची जाळी लावल्यास मोटार सायकल चोरीस आळा घालणे शक्य होवून श्री साईबाबा सुपर हॉस्पिटल येथे येणा-या पेशंट व त्यांचे नातेवाईक यांची गैरसोय होणार नाही. सन २०१९ मध्ये पो.स्टे.शिर्डी हद्दीतून एकुण ५४ मोटार सायकल चोरी झालेल्या असून त्यापैकी जवळपास ३२ मोटार सायकल या श्री साईबाबा सुपर हॉस्पिटल या ठिकाणाहून चोरीस गेलेल्या आहेत. तरी श्री साईबाबा सुपर हॉस्पिटल समोरील रस्त्यावर नो पार्कींगचे बोर्ड लावण्यात आल्यास सर्व वाहने पार्कींगच्या ठिकाणी लागतील. तसेच वाहन चालकास टोकन अथवा पावती दिल्यास पार्कींग करणाराच व्यक्ती वाहन घेवून जाईन. अशी व्यवस्था झाल्यास सुपर हॉस्पिटल येथे येणा-या लोकांची गैरसोय न होता वाहन चोरीस आळा बसेल. तरी आपले स्तरावर योग्य ती उपाययोजना होणेस विनंती केलेली आहे. सदरची वस्तुस्थिती सत्य असून तेथील नियुक्त सुरक्षा रक्षकांना देखील गाडी पार्क करुन गेलेली व्यक्ती ही तीच आहे किंवा इतर इसम याबाबत संभ्रम निर्माण होतो. त्यातूनच गाडया चोरीस जाण्याचे प्रकार घडत आहे. सदर प्रकारास आळा घालणेकामी संस्थान कर्मचारी सोसायटीतर्फे यापूर्वी कार पार्कींग चालविणेत येत होती. त्याप्रमाणे मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने सोसायटीस पार्कींग चालविण्यास देणेबाबत पुढील कार्यवाही करणेकामी मालमत्ता विभागास सुचित केलेले आहे.

यापूर्वी संस्थानचे विधी विभागाकडील जा.क्रं.एसएसएस/वशी-विधी/६२३५/२०१२ दि.१२/०३/२०१२ रोजीचे पत्रान्वये श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी,शिर्डी यांना साईभक्तांच्या सोयीसाठी व सेवेसाठी मा.व्यवस्थापन मंडळाचे दि.१४/०१/२०१२ रोजीचे ठरावास अनुसरुन संस्थानचे द्वारावती भक्तनिवासस्थान व साईबाबा भक्तनिवासस्थान परिसरात कार पार्कींग व्यवसाय करणेकामी लिव्ह अॅण्ड लायसन्स तत्वावर दि.०१/०६/२०११ ते दि.३१/०५/२०१२ या कालावधीसाठी द्वारावती भक्तनिवासस्थान येथील कार पार्कींगचे जागेचे मासिक भाडे रक्कम रु.१४,२६८/- व साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) येथील कार पार्कींगचे जागेचे मासिक भाडे रक्कम रु.५७,०६४/- व विद्युत बील वेगळे आकारुन वापरास देणेत आलेले आहे. सदरची कार पार्कींग व्यवसायाची मुदत दि.३१/०५/२०१२ रोजी संपुष्टात आलेने

सोसायटीने पुढील मुदतवाढ मिळणेकामी दि.२०/०४/२०१२ रोजीच्या पत्रान्वये विनंती केलेली होती. मात्र दरम्यानचे काळात श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि,शिर्डी यांनी त्यांचेकडील दि.१२/१२/२०१३ रोजीचे पत्राने कार पार्कींग व्यवसायाचे व्यवस्थापनावर होणारा कर्मचारी खर्च,जागा भाडे व स्टेशनरी खर्चाचे तुलनेत कार पार्कींगचे उत्पन्न मिळत नाही. त्यामुळे सोसायटीमार्फत चालविणेत येणारे कार पार्कींग व्यवस्था दि.३१/१२/२०१३ पासून बंद करत असून सदर कार पार्कींगचे भाडे व विद्युत बीलाची आकारणी करु नये,असे बाबतची संस्थानला विनंती केलेली आहे. सदर पत्राचे अनुषंगाने उक्त सोसायटीस संस्थानचे विधी विभागाकडील पत्र जा.क्रं.एसएसएस/वशी-विधी/४९१९/२०१४ दि.२४/०१/२०१४ रोजीचे पत्रान्वये द्वारावती भक्तनिवास परिसरातील व साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) परिसरातील कार पार्कींग व्यवसाय बंद करणेबाबत कळविणेत आलेले आहे.

दरम्यानचे कालावधीत मा.चेअरमन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांनी त्यांचेकडील पत्र जा.नं.श्रीसासंएक्रेसो/२०७/२०१९ दि.३०/१२/२०१९ रोजीचे पत्रान्वये "श्री साईबाबांचे दर्शनासाठी येणा-या साईभक्तांचे सोईसाठी साईप्रसाद इमारत,साईबाबा भक्तनिवासस्थान,साईआश्रम धर्मशाळा नं.१ व २,द्वारावती निवासस्थान परिसरात तसेच श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ हॉस्पिटल येथे उपचारासाठी येणा-या रुग्णांच्या व त्यांच्या नातेवाईकांच्या दुचाकी व चारचाकी वाहनांचे सुरक्षिततेकरीता कायमस्वरुपी आपल्या संस्थानच्या मालकीच्या साईनगर परिसर व साईनगरचे पाठीमागील बस डेपोच्या जागेत संस्था सशुल्क कार पार्कींग व्यवस्था संस्था संस्थेच्या कर्मचा-यांमार्फत सशुल्क २४ तासासाठी बस रु.५०/-, टेम्पो रु.२५/-,कार रु.२०/- व मोटार सायकल रु.५/- याप्रमाणे पार्कींग सेवा आकार आकारुन तसेच संस्थान कर्मचा-यांकरीता नाममात्र शुल्क आकारुन चालविण्यास तयार आहे. तरी संस्थेचे साईभक्त,रुग्ण व त्यांचे नातेवाईक तसेच संस्थान कर्मचा-यांचे सोईसाठी कार पार्कींग व्यवस्था संस्थेमार्फत सशुल्क चालविण्यास परवानगी मिळावी," असेबाबत इकडेस विनंती केलेली आहे.

विभागाचा अभिप्राय- सध्यस्थितीत संस्थान परिसरात संस्थान मालकीचे जागेत कोणत्याही ठिकाणी कार पार्कींग व्यवसाय चालविणेस दिलेला नाही. मात्र संरक्षण विभागाकडील उपरोक्त दि.२०/१२/२०१९ रोजीच्या कार्यालयीन टिपणीचे अनुषंगाने व श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी,शिर्डी यांचेकडील उपरोक्त दि.३०/१२/२०१९ रोजीच्या पत्राचे अनुषंगाने उक्त सोसायटीस साईनगर मैदान या ठिकाणी पे ॲण्ड पार्क या तत्वावर कार पार्कींग व्यवसाय,उक्त जागेचे भाडे सार्वजनिक बांधकाम विभाग निश्चित करील त्या मासिक दराने अथवा संस्थान निश्चित करील त्या मासिक भाडेदराने यापैकी जे जास्त असेल त्या मासिक भाडेदराने व विद्युत बील वेगळे आकारुन श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी,शिर्डी यांना २४ तासांसाठी बससाठी आकार रु.५०/-, टेम्पो साठी रु.२५/-,कार साठी रु.२०/- व मोटार सायकलसाठी रु.५/- आणि संस्थान कर्मचा-यांकरीता नि:शुल्क या दराने आकारणेच्या अटीवर व इतर अटींवर ११ महिनेंच्या कालावधीसाठी चालविणेस देता येईल व त्याप्रमाणे करारनामा करुन घेता येईल.

प्रस्ताव- श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी,शिर्डी यांना श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१२५ पै.चे साईनगर मैदान या ठिकाणी पे ॲण्ड पार्क या तत्वावर कार पार्कींग व्यवसाय, उक्त जागेचे भाडे सार्वजनिक बांधकाम विभाग निश्चित करील त्या मासिक भाडे दराने अथवा संस्थान निश्चित करील त्या मासिक भाडेदराने यापैकी जे जास्त असेल त्या मासिक भाडेदराने व विद्युत बील वेगळे आकारुन २४ तासांसाठी बससाठी आकार रु.५०/-, टेम्पो साठी रु.२५/-, कार साठी रु.२०/- व मोटार सायकलसाठी रु.५/- आणि संस्थान कर्मचा-यांकरीता नि:शुल्क या दराने आकारणेच्या अटीवर व इतर अटींवर ११ महिनेंच्या कालावधीसाठी चालविणेस देणेच्या व त्याप्रमाणे करारनामा करुन घेणेच्या निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१२५ पै.चे साईनगर मैदान या ठिकाणी श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी, शिर्डी यांना पे ॲण्ड पार्क या तत्वावर कार पार्कींग व्यवसायासाठी दिल्यास सोसायटी संस्थानला किती रक्कम देणार याबाबत स्पष्ट उल्लेख करुन सविस्तर प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर सादर करण्यात यावा,असे ठरले.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.२३** **श्री रामनवमी उत्सव-२०२० कार्यक्रमांचे नियोजन व उत्सव साजरा करणेसाठी येणारे खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४-**

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधिन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे. भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३. कलम २१ (१) (ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे;

४. (ग) भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे;

प्रस्तावना- साईभक्त श्री गोपाळराव गुंड यांच्या पुढाकाराने शिर्डीमध्ये सन १८९७ पासून उरुस (यात्रा) भरावयास सुरुवात झाली त्यानंतर सन १९११ मध्ये साईभक्त (कै) श्री.कृष्ण जोगेश्वर भिष्म यांच्या कल्पनेतून व श्री साईबाबांच्या परवानगीने/आशिर्वादाने श्रीरामनवमी उत्सव (शिर्डी गावची यात्रा) शिर्डी येथे सुरु झाला. (संदर्भ श्री साईसच्चरित अध्याय क्र.६ मध्ये उल्लेख आलेला आहे.)

उपरोक्त अधिनियमातील तरतुदीनुसार व पुर्वापार रुढी परंपरेनुसार संस्थान व्यवस्थापनामार्फत धार्मिक पुजा विधी, उत्सव साजरे केले जात आहेत.

यंदाचा श्री रामनवमी उत्सव २०२० बुधवार दि.०१.०४.२०२० ते शुक्रवार दि.०३.०४.२०२० (चैत्र शु.८ शके १९४२ ते चैत्र शु.१० शके १९४२ ) असा तीन दिवस साजरा करण्यात येणार आहे.

विभागाचा अभिप्राय– सन २०२० मध्ये साजरा करावयाचे श्री रामनवमी उत्सवासाठी पुढीलप्रमाणे नियोजन करावे लागणार आहे.

| अ.नं | तपशील | श्री रामनवमी -२०२० चे उत्सवाचे अनुषंगाने करावयाचे नियोजन//कामे |
|---|---|---|
| ०१ | उत्सव निमत्रंण पत्रिका व उदीप्रसाद | अधिनियमातील तरतुदीनुसार भक्तमंडळाचे सामान्य, आजीव व आश्रयदाते सभासदांना तसेच मान्यवरांना उत्सवाच्या निमत्रंण पत्रिका पाठवाव्या लागतात. यंदाचे श्री रामनवमी उत्सवात सभासदांना, प्रतिष्ठीत व्यक्ती/ग्रामस्थ यांना पाठविणेसाठी १,८०,००० पत्रिका छपाई करुन घेणेसाठी स्वतंत्रपणे प्रस्ताव सादर करण्यात येत/आला आहे.तसेच नेहमीप्रमाणे वर्तमानपत्रातून प्रेस नोट (न्यूज अॅटम) प्रसिध्दीस देण्यात येईल. |
| | सांस्कृतिक कार्यक्रमाची पार्श्वभुमी | श्री.गो.र.दाभोळकर लिखित व संस्थान प्रकाशित श्री साईसच्चरित या ग्रंथात तसेच याच ग्रंथाचे गद्य रुपांतर असलेल्या (ले.कर्नल.श्री.मु.ब. निंबाळकर लिखीत) श्रीसाईंचे सत्यचरित्र या ग्रंथातल्या अध्याय क्र.२९ मध्ये पुढीलप्रमाणे मजकूर आहे.<br>श्री साईसच्चरित<br>साईबाबा महासंत \| धीर उदार आणि दान्त \| यात्रेकरुंसी कृपावंत \| पैसे अत्यंत वांटिती\|\|४\|\| दिडक्या चवल्या हाताचा कीस \| अधेल्या-पावल्यांचा पाऊस \| रुपये दहा कोणास वीस \| कोणास पन्नास ते देत \|\|५\|\| हें काय सणासुदा दिसी \| कार्यविशेषीं कां पर्वकाळासी \| प्रतिदिवशीं उक्त प्रमाणेंसीं \| संतोषेंसीं अर्पीत \|\|६\|\| पहूड येती भवय्ये नाचती \| गवय्ये गाती भाट वानिती \| तमासगीर मुजरे देती \| भजनीं रंगती हरिभक्त \|\|७\|\| ऐसे महाराज उदारवृत्ती \| दानधर्मी सढळ स्थिती \| ऐकूनि कर्णोपकर्णी ही कीर्ति \| इच्छा धरिती दर्शनाची \|\|८\|\| कधीं आलिया बाबांचे चित्तीं \| पांथस्थांतेंही पैसे वांटिती \| दीनदुबळयांचा परामर्ष घेती \| कृपामुर्ति साईनाथ \|\|९\|\|<br>श्री साईंचे सत्य चरित्र<br>साईबाबा थोर, उदार व दान करणारे महान संत होते. यात्रेकरुंना कृपावंत होऊन ते खूप पैसा वाटीत असत. दिडक्या-चवल्या (एक पैसा व दोन आण्यांची नाणी. त्या काळची अगदी कमी |

| | | |
|---|---|---|
| | | किंमतीची नाणी.४ पैसे = १ आणा, १६ आणे= १ रुपया) अगदी सहजपणे आणि अधेल्या पावल्यांचा (चार व आठ आण्यांचा म्हणजे आजच्या पंचवीस व पन्नास पैशांच्या नाण्यांचा) पाऊस पाडत; म्हणजे भरपूर पैसे वाटत असत. कोणाला दहा, कोणाला वीस, तर कोणाला पन्नास रुपये ते देत असत. हे काय सणाच्या किंवा उत्सवाच्या<br>दिवशी काही विशेष कार्य असताना किंवा पुण्यकाळ असतानाच नव्हे, तर दररोज वर म्हटल्याप्रमाणे मोठ्या खुशीने ते वाटीत असत. पहूडे व भवय्ये ( तमासगीर व नाचे लोक)येत असत आणि नाचत असत, गवई गाणे गात असत आणि भाट स्तुती करीत असत. तमासगीर मुजरे देत असत आणि हरिभक्त भजन करण्यात रंगून जात असत. महाराजांची अशा उदार स्वभावाची व दानधर्म करण्यात सढळ हाताची कीर्ती कर्णोपकर्णी ऐकून हे लोक दर्शनाची इच्छा मनात धरीत असत.कधी मनाला आले, तर बाबा प्रवाशांनाही पैसे वाटीत असत. साईनाथ दयेची मूर्ती होते. दीन-दुबळयांच्या गरजा व दु:खे काय आहेत याची सहृदयपणे ते विचारपूस करीत असत आणि त्यांना मदत करीत असत.<br>थोडक्यात श्री साईबाबांच्या काळापासूनच शिर्डीत सांस्कृतिक कार्यक्रम होत असल्याचे आढळून येते व श्री साईबाबा हे कोणाचीही सेवा–चाकरी मोफत वा विनामुल्य घेत नसत ते स्वतः सढळहस्ताने कलाकारांना मानधन देत असत हीच परंपरा आजही शिर्डीत सुरु आहे. |
| ०२ | अ) सांस्कृतिक कार्यक्रम | संस्थानमार्फत |
| | प्रारंभ दिवस,<br>बुधवार<br>दि.०१/०४/२०२०<br>चैत्र शु ८ शके १९४२ | उत्सवांचे तीनही दिवसाकरीता निमंत्रित कलाकारांचे कार्यक्रम निश्चीत करावयाचे आहेत. सांस्कृतिक कार्यक्रमाचा स्वतंत्रपणे प्रस्ताव सादर करण्यात येत/आला आहे. मागील श्री रामनवमी उत्सवातील (२०१९) कलाकार कार्यक्रम साईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडप (१६ गुठें) याठिकाणी आयोजित करण्यात आले होते. आता सायंकाळी ७.३० ते रात्री १०.३० पर्यत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम श्री साईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडप स्टेजवर आयोजित करता येईल. |
| | मुख्य दिवस<br>गुरुवार<br>दि.०२/०४/२०२०<br>चैत्र शु ९ शके १९४२ | १) सायंकाळी ७.३० ते रात्रौ १०.०० पर्यत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम श्री साईबाबा समाधी शताब्दी मंडप स्टेजवर आयोजित करता येईल.<br>२) कलाकार हजेरी कार्यक्रमात रात्रौ. १०.३० ते पहाटे ५.०० पर्यत (दि.०३/०४/२०२०) यावेळेत इच्छुक कलाकारांच्या साईभजनांचा कार्यक्रम श्री साईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडप स्टेजवर आयोजित करता येईल. या मुख्य दिवशी समाधी मंदीर दर्शनासाठी रात्रभर उघडे राहिल. |
| | सांगता दिवस<br>शुक्रवार<br>दि.०३/०४/२०२०<br>चैत्र शु.१० शके १९४२ | सायंकाळी ७.३० ते १०.०० पर्यत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम श्री साईबाबा समाधी शताब्दी मंडप स्टेजवर आयोजित करता येईल. |
| | | ग्रामस्थामार्फत<br>श्री रामनवमी उत्सवात (यात्रा) शिर्डी ग्रामस्थांमार्फत स्वतंत्रपणे सांस्कृतिक कार्यक्रमाचे नियोजन करण्यात येते या कार्यक्रमाचे मानधन मात्र संस्थानतर्फे आदा केले जाते.<br>मागीलवर्षी श्री रामनवमी उत्सवात ग्रामस्थांमार्फत साईनगर मैदानावर सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. यावर्षी सांस्कृतिक कार्यक्रमासाठी ग्रामस्थांकडून मागणी आल्यास त्यांना मा. तदर्थ समितीच्या निर्णयानुसार स्टेज व मंडप उभारुन देणेबाबत कार्यवाही करता येईल. |
| | ब) कीर्तन कार्यक्रम | दासगणू महाराज प्रतिष्ठाण गोरटे यांचेमार्फत पाठविण्यात येणा-या कीर्तनकारामार्फत<br>श्री रामनवमी उत्सवातील तीनही दिवशी परंपरेनुसार कीर्तन केले जाते. आताही परंपरेनुसार किर्तनाचा कार्यक्रम ठेवता येईल. सन २०१९ मधील रामनवमी उत्सवात कीर्तनकारास रु.१५,००१/- मानधन देण्यात आले होते. आता यावर्षी श्री रामनवमी उत्सवातील कीर्तनकारास रु.१५००१/- मानधन देणेबाबत निर्णय व्हावा. |

| | | |
|---|---|---|
| ०३ | श्री सत्यनारायण पूजा व अभिषेक पूजा | उत्सव काळात साईभक्तांची गर्दी असल्याने मंदिर विभागामार्फत पार पाडल्या जाणा-या श्री साई सत्यव्रत पुजा व अभिषेक पूजा भक्तांच्या गर्दीचा अंदाज घेऊन चालू किंवा बंद ठेवता येईल. |
| ०४ | अखंड पारायण व्यवस्था | उत्सव काळात दि.०१/०४/२०२० रोजी सकाळी ५.१५ वाजता श्री व्दारकामाई मंदिरात श्री साईसच्चरिताचे अखंड पारायणास सुरुवात होईल. दि.०२/०४/२०२० सकाळी ५.०० वाजता त्याची समाप्ती होईल. मा. तदर्थ समितीचे सदस्य पहिले ०५ अध्याय वाचतील व राहिलेले ४८ अध्याय प्रत्येकी एक याप्रमाणे ४८ भक्त वाचतील. इच्छुक भक्तांची नावे दि.३१/०३/२०२० रोजी नोंदविली जातील व त्याच दिवशी सायंकाळी त्यांच्या नावाच्या<br>चिठ्ठया काढून पारायणाकरीता नावे निश्चित केली जातील. पारायणात भाग घेणा-या प्रत्येक भक्तास प्रसाद म्हणून एक श्रीफळ देण्यात येईल. अखंड पारायणाकरीता व्दारकामाई रात्रभर उघडी ठेवण्यात येईल. श्री रामनवमी उत्सवात पोथी, वीणा, प्रतिमा, अध्याय वाचन, रुद्राभिषेक, पाद्यपूजा या कार्यक्रमाकरीता मा.तदर्थ समितीच्या सदस्यांची नावे ठरविणे आहे. याबाबतची टिपणी मा.तदर्थ समितीचे सभेत अलाहिदा स्वतंत्रपणे सादर करण्यात येईल. |
| ०५ | पालखी व रथ मिरवणूक | उत्सवाचे पहिले दिवशी बुधवारदि.०१/०४/२०२० रोजी रात्रौ ९.१५ वाजता श्रींचे पालखीचे गावातून मिरवणूक व मुख्य दिवशी गुरुवार दि.०२/०४/२०२० रोजी सायंकाळी ५.०० वाजता श्रींच्या रथाची गावातून मिरवणूक निघेल. |
| ०६ | कावडी व निशाणाची मिरवणूक | उत्सवाचे मुख्य दिवशी दिनांक ०१/०४/२०२० रोजी सकाळी ५.१५ वाजता श्रींचे कावडी व सायंकाळी ४.०० वाजता निशाणाची मिरवणूक राहिल. श्री रामनवमीचे दिवशी सकाळी श्रींचे मंगलस्नानासाठी परिसरातील गांवकरी व साईभक्त गोदावरी नदीचे पवित्र पाणी कावडीने घेऊन येतात. यासाठी समाधी मंदिराचे बाहेरील बाजूस दक्षिण गेटच्यासमोर अभिषेक मुर्ती ठेऊन स्वतंत्र व्यवस्था करण्यात येते. कावडीधारकांना श्रीफळ प्रसाद दिला जातो. या वर्षीही तशी कार्यवाही करण्यात येईल. |
| ०७ | विद्युत रोषणाई | श्री रामनवमी उत्सवात विद्युत विभागामार्फत समाधी मंदीर, व्दाराकामाई, श्री चावडी, श्री गुरुस्थान व मंदिर परिसरात विद्युत रोषणाई करण्यात येईल. विद्युत रोषणाईचे कामासाठी येणा-या साईभक्तांची निवास, भोजन, चहा-नाष्टयाची व्यवस्था संस्थानमार्फत दरवर्षी विनामुल्य करण्यात येते. त्याप्रमाणे याही वर्षी विनामुल्य करण्यात येईल. मात्र विद्युत रोषणाईचे सामान आणणे व नेणेकामीचे ट्रक भाडे व जाणे-येण्याचा खर्च देण्यात येतो. या उत्सवातही त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. |
| ०८ | संरक्षण व्यवस्था | उत्सव काळात समाधी मंदिर व मंदिर परिसरात बंदोबस्त ठेवणेकामी संरक्षण विभागात ठेकेदारी पध्दतीने जादा गार्ड नेमण्यात येतील. तसेच शांतता व सुव्यवस्था राखणेसाठी पुरेसा बंदोबस्त ठेवणेकामी मा. पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांना तसेच सांस्कृतिक कार्यक्रमासाठी ध्वनीक्षेपणचे परवानगीबाबत मा. पोलीस निरीक्षक, शिर्डी यांना विनंती करण्यात येईल.. |
| ०९ | प्रसाद-भोजन व्यवस्था | उत्सव काळात प्रसादालयात मिष्टान्नासह भक्तांना मोफत प्रसाद भोजन दिले जाते. मा. तदर्थ समितीचे सदस्य व त्यांचे कुटुंबिय तसेच निमंत्रित कलाकारांना स्वतंत्र प्रसाद भोजनाची व्यवस्था करण्यात येईल. पोलीस कर्मचारी व उत्सवात काम करणेकरीता मदतीसाठी येणा-या व्यक्तीची प्रसाद भोजनाची व्यवस्था नेहमीप्रमाणे केली जाईल. साईभक्तांचे सोयीसाठी स्वतंत्र चहा, कॉफी, दूध व बिस्कीटे इत्यादीची कॅटींनमध्ये २४ तास सुविधा उपलब्ध आहे. लाडू प्रसाद तसेच तीनही दिवस मिष्टान्न प्रसाद नेहमीप्रमाणे देण्यात येईल. उत्सव काळात लाडू प्रसाद विक्री जास्तीत जास्त ठिकाणी सुरु करणेत येईल. याकामी सबंधित विभागाकडुन नियोजन करणेत येईल.<br>सन २०२० चे श्री रामनवमी उत्सवात तिनही दिवसांचे प्रसाद भोजनात मिष्टांन्न पदार्थ देणेसाठी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्तरावर निश्चिती करता येईल. |
| १० | देणगी काऊंटर्स | उत्सवाचे मुख्य दिवशी मंदीर रात्रभर उघडे असल्याने देणगी काऊंटर्स तीन शिफ्टमध्ये सुरु ठेवण्यात येतील. तसेच उत्सव कालावधीत देणगी काऊंटर्सची वेळ सकाळी ५ वा. ते रात्रौ ११ वा. पर्यत करण्यात येईल. |
| ११ | जादा कंत्राटी कर्मचारी | उत्सवाचे पुर्वतयारी करणेकामी व उत्सव पार पाडणेकरीता विविध विभागांकडून आलेल्या मागणीची छाननी केल्यानंतर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, यांचे स्तरावर ज्या-त्या खात्यास जादा कंत्राटी कर्मचारी वर्ग देण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| १२ | भक्तांची प्रासंगिक निवास व्यवस्था | संस्थानचे व्दारावती, भक्तनिवासस्थान इ. इमारतीमधून तसेच साई आश्रम, व साई धर्मशाळा परिसरात स्वतंत्र मंडप टाकून पालखी पदयात्रीसाठी व भक्तांची निवास व्यवस्था करण्यात येईल. उत्सवात समाधी मंदिर परिसर व इतर ठिकाणी तसेच आवश्यकतेनुसार मंडप/शामियाने व कलाकारांसाठी स्टेज इ. व उन्हाळी मंडपही टाकणेत येतील. आवश्यकतेनुसार व गरजेनुसार त्यात वाढ करता येईल याकामी बांधकाम विभागासह इतर संबंधित विभागामार्फत नियोजन करणेत येईल. पालखी धारकांची आलेल्या पत्रानुसार सर्व निवासस्थाने एकत्रित नियोजन करतील. |
| १३ | प्रथमोपचार केंद्र | मागील उत्सवात संस्थानमार्फत दिक्षीतवाडा येथे तीनही दिवशी तीन शिफ्ट मध्ये प्रसादालय परिसरात व पिंपळवाडी रोड वरील दर्शनरांग प्रवेशव्दार येथे पहिल्या व तिस-या दिवशी दोन शिप्ट मध्ये व मुख्य दिवशी तीन शिफ्ट मध्ये असे दोन ठिकाणी प्रथमोपचार केंद्र सुरु करण्यात आले होते. तसेच सुसज्ज अशी रुग्णवाहिका मंदिर परिसरात ठेवण्यात आली होती. त्याप्रमाणे या उत्सवातही कार्यवाही करण्यात येईल. |
| १४ | पालखी व्यवस्था | श्री रामनवमी उत्सवात मुंबई तसेच इतर ठिकाणाहून पालख्या येत असतात. उत्सवात येणा-या पालख्या ठेवण्याची व्यवस्था श्री साईबाबा धर्मशाळा येथे करण्यात येते. या वर्षीही नेहमीप्रमाणे ती व्यवस्था करण्यात येईल. त्याचप्रमाणे येणा-या पालख्यांसाठी पिण्याचे पाण्याची व्यवस्था सिन्नर ते शिर्डी रस्त्यावर मागील श्री रामनवमी उत्सवाप्रमाणे यंदाही करावी लागणार आहे. त्या सबंधी खर्चाची टिपणी पाणीपुरवठा विभाग तयार करुन मंजूरीसाठी सादर करत आहे. गरजेनुसार पालख्या मुक्कामाचे ठिकाणी खर्डी, लतीफवाडी, घाटनदेवी, खंबाळे, वेल्लोळी, नाशिक,शिंदे, सिन्नर (एम.आय.डी.सी), खोपडी, दत्तमंदीर, पांगरी, वावी, हॉटेल वनराई, पोहेगांव, दुशिंगवाडी, मलढोण फाटा, सायाळे, जवळके, डो-हाळे, इ. ठिकाणी पालखी मंडप, वीज व्यवस्था व पाणी व्यवस्था करणेत येईल. |
| १५ | कुस्त्या हंगामा | कुस्ती या क्रिडा प्रकाराची साईबाबांना अतिशय आवड होती. श्री साइबाबा हे स्वत: एक कसलेले पहिलावान होते, मोहोद्दिन नावाच्या एका पहिलवानांशी साईबाबांची कुस्ती झाल्याचा उद्देश श्री साई सच्चरित या ग्रथांच्या ५ व्या अध्यायामध्ये आढळून येतो. साईबाबांना असलेल्या कुस्तीच्या आवडीवरुनही श्री रामनवमी उत्सवात कुस्ती हगामा भरवण्याची कल्पना पुढे आली असल्याची शक्यता नाकारता येत नाही.<br>श्री रामनवमी उत्सवात कुस्त्यांचा हगामा गावक-यांमार्फत भरविण्यात येतो. सन २०१९ चे उत्सवात कुस्त्यांचे हगामासाठी व सांस्कृतिक कार्यक्रमासाठी मुळ अंदाजपत्रकीय रक्कम रु.१५,००,०००/- मात्र मंजूर होती. त्यापैकी रुपये रु. ९,०३,६६०/-मात्र खर्च झालेला आहे.<br>तरी श्री रामनवमी उत्सवात कुस्त्या हगामासाठी व सांस्कृतिक कार्यक्रमासाठी यावर्षी अंदाजपत्रकीय तरतुदीत रक्कम रु.११,००,०००/-तरतुद दर्शविण्यात आलेली आहे. मा. तदर्थ समितीचे मंजुरीनुसार सदर तरतुद कमी /जास्त करता येईल. |
| १६ | पाणीपुरवठा | पाटबंधारे खात्यास उत्सव काळात कॅनॉलला पाणी सोडणे बाबत विनंती करण्यात येईल. नियमित पाणीपुरवठा राहिल याची व्यवस्था करण्यात येईल. |
| १७ | खर्चाचे अंदाजपत्रक | श्री रामनवमी उत्सव-२०१९ करीता अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ९१,५७,००० ( रुपये एक्यान्नव लाख सत्तावन्न हजार) मात्र इतक्या रकमेस मंजुरी देण्यात आली होती. प्रत्यक्ष खर्च रुपये ५५,१५,२६७/- (रुपये पंचावन्न लाख पंधरा हजार दोनशे सदुसष्ट) मात्र इतका खर्च झाला होता.<br>श्री रामनवमी २०२० करीता अंदाजपत्रकीय रक्कम रुपये **८७,७६,३००**/- (रुपये सत्याऐंशी लाख शहात्तर हजार तीनशे) मात्र मंजूरीसाठी सादर केलेले आहे. |

श्री रामनवमी उत्सव -२०२० अंदाजपत्रक

| अ.नं | तपशील | विभाग | श्री रामनवमी उत्सव-२०१९ | | श्री रामनवमी उत्सव-२०२० |
|---|---|---|---|---|---|
| | | | अंदाजे खर्च | प्रत्यक्ष खर्च | तरतूद |
| ०१ | मंडप कमानी स्टेज | बांधकाम विभाग | १०,८४,००० | १०,७०,८३० | १५,३६,००० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ०२ | कलाकार,कीर्तनकाराची बिदागी व इतर खर्च | मंदिर विभाग | ८,०३,००० | ८,४५,७३३ | ९,०२,५०० |
| ०३ | भक्तांना मिष्टान्न, फर्निचर खर्च | प्रसादालय विभाग | ७,००,००० | ६,८६,३५० | ६,१९,००० |
| ०४ | विद्युत रोषणाई | विद्युत विभाग | १२,००,००० | ७,७२,३२० | १०,००,००० |
| ०५ | निमत्रंण पत्रिका छपाई, पत्रिका उदीप्रसाद पाठविणेसह पोस्टेज व जाहिरात खर्च | वशी-५/८ | १५,००,००० | ९,५८,९२७ | १४,००,००० |
| ०६ | एल.ई.डी पडदा व सीसीटीव्ही कॅमेरे | सी.सी.टी.व्ही | ३,५०,००० | - | ३,८४,९०० |
| ०७ | फुल सजावट | बगीचा | २,००,००० | - | २,५०,००० |
| ०८ | जादा कामगार | कामगार | ६,८०,००० | २१,४०० | ६,२३,००० |
| ०९ | पदयात्री पालख्या पिण्याचे पाणी व्यवस्थेसाठी प्लंबींग साहित्य, कापडी व डिजीटल बॅनर, जनरेटर, भाडोत्री वाहन, डिझेल, पेट्रोल, रॉकेल इंधन खर्च आयत्या वेळचा प्रासंगिक खर्च (जादा टॅंकर भाडोत्री लावावयाचे झाल्यास) | पाणी पुरवठा | ९,००,००० | ५४,४८१ | ९,००,००० |
| १० | सांस्कृतिक कार्यक्रम व कुस्ती हगामा | लेखाशाखा | १५,००,००० | ९,०३,६६० | ११,००,००० |
| ११ | इतर खर्च<br>कुस्ती हगामा व सांस्कृतिक कार्यक्रमाकरीता भाडोत्री साऊंड सिस्टीम, भाडोत्री मालवाहतुक /कार्यालयीन वाहन खर्च,भाडोत्री क्रेन खर्च व क्रेटस व भांडी भाडेतत्वाव घेणेकामी. | ध्वनिक्षेपण टेलिफोन, वाहन विभाग,/लाडू निमिती विभाग | २,४०,००० | २,०१,५६६ | ६०,९०० |
| | | **एकूण रुपये** | **९१,५७,०००** | **५५,१५,२६७** | **८७,७६,३००** |

मंदिर व मंदिर परिसरात करावयाच्या फुल सजावटीसाठी देणगीदार साईभक्तांचा प्रस्ताव प्राप्त न झाल्यास संस्थानमार्फत फुल सजावट करणेसाठी उपरोक्त अ.नं.७ मध्ये तरतूद करणेत आलेली आहे.

अधिनियमातील तरतुदीनुसार उत्सव आयोजित करणे व तो पार पाडण्याची अंमलबजावणी करावयाची असल्याने मा. उच्च न्यायालयात उत्सवाच्या अंदाजपत्रकाच्या मान्यतेसाठी सिव्हील ॲपलिकेशन दाखल करण्याची आवश्यकता नाही असे नम्र आहे.

श्री रामनवमी उत्सव २०२० साजरा करण्याकामी वरीलप्रमाणे कार्यवाही करता येईल.

प्रस्ताव- तरी विभागाचे अभिप्रायात नमुद केलेप्रमाणे श्री रामनवमी उत्सव-२०२० साजरा करणेकामी कार्यवाही करणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रक्कम रुपये ८७,७६,३००/- (रुपये सत्याऐंशी लाख शहात्तर हजार तिनशे) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री रामनवमी उत्सव-२०२० कार्यक्रमांचे नियोजन व उत्सव साजरा करणेकामी उपरोक्त प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.८७,७६,३००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच याकामी मान्यतेसाठी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात यावे, असे ठरले.**

**(कार्यवाही-शताब्दी कक्ष/विधी विभाग)**

---

**विषय नं.२४** **श्री रामनवमी उत्सव-२०२० मध्ये आयोजित करावयाच्या सांस्कृतिक कार्यक्रमांचे कलाकार व मानधन निश्चित करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :-

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या

प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

३. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ ( ग) भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदीरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

प्रस्तावना:- मागील वर्षी श्री रामनवमी उत्सव २०१९, मध्ये खालील नामवंत कलाकाराचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

| अ.नं. | कलाकाराचे नांव | कार्यक्रम प्रकार | ठिकाण | दिनांक व वेळ | प्रवास खर्चासह मानधन |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री निनाद आजगांवकर, मुंबई | "गीत रामायण " | श्री साईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडप | दि.१२/०४/२०१९ सायं.७.३० ते रात्री ९.०० रात्री ९.३० ते रात्री १०.३० | १,००,०००/- |
| ०२ | सुदेशचंद्र भोसले, मुंबई | भावगीत / भक्ती संगीत | | दि.१३/०४/२०१९ सायं.७.३० ते रात्री १०.०० | ७,००,०००/- |
| ०३ | कैलास हरेकृष्णा दास, नागपूर | साई भजन संध्या | | दि.१४/०४/२०१९ सायं.७.३० ते रात्री १०.०० | विनामुल्य |

श्री रामनवमी उत्सव -२०२० बुधवार दिनांक ०१.०४.२०२० ते शुक्रवार दिनांक ०३.०४.२०२० असा तीन दिवस साजरा करण्यात येणार आहे. श्री रामनवमी उत्सवात कार्यक्रम करणेसाठी खालील कलाकारांचे अर्ज प्राप्त झाले आहेत.

| अ.नं. | कलाकाराचे नांव | मो.नंबर | कार्यक्रमाचा प्रकार | कलाकार संख्या | मानधन |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री राम उद्धवराव कोठेकर, हिवरा आश्रम (विवेकानंद आश्रम), बुलढाणा | ९०२१४६१७१९<br>९६०४३१७६१८ | भक्ती संगीत व गीत रामायण | ०४ | १५,०००/- |
| ०२ | रोशनी (सविता) म्हात्रे , मुंबई | ९८१९८१९५९७ | भजन व भक्तीगीते | ३० | विनामुल्य |
| ०३ | मालोबिका मंडळ, दिल्ली | ९८१०५८३४१२<br>९९१०९६५२३३ | भक्ती संगीत | ०५ | १,००,०००/- |
| ०४ | आश्विनी जोशी,नाशिक | ८९९९३६५३०७ | साई भजन संध्या | १५ | विनामुल्य |
| ०५ | श्री अनंत पांचाळ, मुंबई | ९९३०१२६३२७ | भजन संध्या | १० | ४०,०००/- |
| ०६ | सौ.अर्चना लक्ष्मीकांत देशमुख,हिंगोली | ९३५९३६४३७६ | भजन संध्या | ०५ | ५०,०००/- |
| ०७ | विजय साखरकर, मुंबई | ९८२१३९३३२३ | साई स्वर नृत्योत्सव | २५ | ५०,०००/- |
| ०८ | एन. पांडूरंग नाथम, अमृता संगित पाठशाळा,आंध्रप्रदेश | ०९८४९६०४४७८<br>०९५५३६४२४२५ | साई भजन | १५ | विनामुल्य |
| ०९ | समिरण दिलीप बर्डे, पुणे | ९५६१११७७१६ | भक्ती संध्या | १० | ४५,०००/- |
| १० | निनाद ग्रुप, पुणे, (सौ. पद्मावती पारेकर व सौ. विदुला फणसळकर) | ९६०४६१९५८४<br>९८८१२३०४७६ | भक्ती संगीत | १० | २५,०००/- |

विभागाचा अभिप्राय:- मागील श्री रामनवमी उत्सवातील (२०१९) कलाकार कार्यक्रम श्री साईबाबा समाधी मंदीर शताब्दी मंडप ह्या ठिकाणी आयोजित करण्यात आले होते. चालू वर्षीचे कलाकार कार्यक्रम ही श्री साईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडप या ठिकाणी आयोजित करता येतील, तसेच संस्थानकडे प्राप्त झालेल्या अर्जातील अथवा मा. तदर्थ समिती सुचविल यातून कलाकारांची निवड निश्चित करता येईल असे नम्र मत आहे.

प्रस्ताव:- तरी श्री रामनवमी उत्सव कालावधीत आयोजित करावयाच्या सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी कलाकार निश्चित करणेसाठी सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री रामनवमी उत्सव-२०२० दिनांक ०१.०४.२०२० ते दिनांक ०३.०४.२०२० या कालावधीत श्री साईबाबा समाधी मंदीर शताब्दी मंडप ह्या ठिकाणी खालील प्रमाणे कलाकारांचे कार्यक्रम आयोजित करण्यास व मानधन आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

| अ.नं. | कलाकाराचे नांव | कार्यक्रमाचा दिनांक | कार्यक्रमाचा प्रकार | मानधन |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री राम उद्धवराव कोठेकर, हिवरा आश्रम (विवेकानंद आश्रम), बुलढाणा | ०१.०४.२०२० | भक्ती संगीत व गीत रामायण | १५,०००/- |
| ०२ | एन. पांडूरंग नाथम, अमृता संगित पाठशाळा, आंध्रप्रदेश | ०२.०४.२०२० | साई भजन | विनामुल्य |
| ०३ | निनाद ग्रुप, पुणे, (सौ. पद्मावती पारेकर व सौ. विदुला फणसळकर) | ०३.०४.२०२० | भक्ती संगीत | २५,०००/- |

**(कार्यवाही- शताब्दी कक्ष)**

---

**विषय नं.२५** **श्री.बी.नरसिम्हा, न्युयॉर्क यांचे श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव-२०२० मध्ये 'एक मे अनेक' नाटय प्रयोग शिर्डी येथे सादर करणेकामी परवानगी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४-

१) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे. भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालववावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२) २१.(ख) रुढी व प्रथांनुसार मंदिरातील धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे;

३) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

४) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम २(ठ) अन्वये, श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण यांबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील.

प्रस्तावना:- साईभक्त श्री. बी.नरसिम्हा, न्युयॉर्क यांनी श्री साईबाबांच्या जीवनावरील "एक मे अनेक " नाटक श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव २०२० मध्ये सादर करणेबाबत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी व मा.अध्यक्ष महोदय यांना खालीलप्रमाणे पत्र व ईमेलव्दारे कळविले आहे.

Letter Dated 18.02.2019– To Promote Baba's teachings and spread Baba's life among Baba's Devotees & younger generation, we created " Sai Samarpan' Group in USA. Unlex this banner, We staged A 3 hour long musical Drama on Baba's life in New York recently which was well received Now we would like to offer the performance at the Lotus feet of our Beloved Baba in shirdi during 2019 Dasara celebrations. The play will be in Hindi. We appreciate if you could provide this devine opportunity.

Email Dated-11.04.2019- This is Narasimha Rao from New York, If you remember we met along with Vivek Muley ji in Feb and reques beloved Shri Sai Baba In Oct 2019, As you requested we translated the play into Hindi and here is the Hindi script I would request you to let us know your confirmation and probable dates so that we can plan for our traval.

Email Dated -05.06.2019- On the occasion of Baba's Samadhi centenary year, we-group of Baba's devotees in USA, offerd at humble feet of our belovd Lord Shri Sainath, a stage play on Baba's life and teachings. This was performed in couple of locations in New York and New jersey. The play in named as "Ek Me Anek" which is about 2 hours 40 minutes filled with Baba's messages from selected leelas or stories in Sai Satcharitra reflected live on stage and spectacularly performed by 60+artists on stage with melodious music accompaniments. The play was well received by audience as it evokd divine feelings. In appreciation of the noble idea of spreading Baba's life story, New jersey state Government awarded an official Citation as well.

It is our sincere wish that we perform this "Ek Me Anek"in Shirdi under the auspices of Shri Shirdi Sai Sansthan during Dashara celebrations of this year. We already gave a letter requesting for necessary permission with specific date in one of the days during Dashara celebrations. Since it involves organizing the calendars of more than 70 people and book their travel to Shirdi, we would appreciate if you could grant approval at the earliest.

Email Dated -24.06.2019 For your information, few video clippings of promotional videos giving glimpse of this show and few feedback news coverage items are attached.

Thank you so much for taking my call regarding the stage play that we want to perform at the foot steps of Baba in Shirdi.

This play is about Baba's life story called "Ek Me Anek" with 8 acts based on Shri Sai Satcharitra. It is a pre recorded musical drama filled with Baba's messages and melodilous tunes. We created this during Baba's Mahasamadhi celebrations last year and staged in New York as fund raising event for Shri Shirdi Sai Baba Temple in Flushing, New York. Encouraged by huge public applause, we were requested to perform in New jersey by Shri Sai Datta Peetham. It evoked tremendous public response with more than 1000 people attending the event. Feedback was very divine as many devotees appreciated the play as they could transport themselves to pre 1918 era in Shirdi as we relived those days. It is Baba's blessings that the play was successful. In appreciation, New jersey state honored with official citation as well Salient features include.

. More than 75 artists (on stage and off stage)
. 9 melodious songs
. Pre recorded voice
. 2 hours and 40 minutes play with Baba's messages
. Old village style props to bring back Baba's life time settings in Shirdi.

It is our desire to perform in front of Baba in Shirdi and thank you and Sansthan for granting permission to stage the show during Ram Navami Celebtrations in 2020

As suggested by you, here are our requirements:

1. Accommodation for 70+people in Shirdi during the program.
2. Stage arrangements (40ft width and 30 ft depth)
3. Audio and lighting arrangements
4. Help in arranging local props for stage set

Since it is a colorful show, we prefer to stage it from 7.30pm and it will go till 10pm.

Also, attached the script in Hindiwhich we already shared with Shri Raj Tilak ji of publications dept. He also made some suggestions and we implemented those changes in

the revised script as attached. However, we will be happy to make any changes as Sansthan suggests. Once we hear from you, we can send revised and fine tuned version.

Meanwhile, we would appreciate if you could provide us official communication on sansthan permission with date of the program. We need this official communication for our visa and travel arrangements as necessary.

Email Dated -23.07.2019- Could you please let us know update on our program Ek Me Anek to be staged in Shirdi during 2020 Ramnavami Celebrations. Would appreciate if you could grant approval and send your confirmation as soon as possible so that we can make arrangements for our travel and visa etc.

Email Dated -29.08.2019- As advised by you, I reached out to Deepak ji but unfortunately I haven't gotten the date for our program. He acknowledged the email and messages and I guess he is trying his best to get it approved by the committee. I agree our request may be a not so important item given the many other complex issues that Sansthan is dealing with.

But as group of staunch devotees of our beloved Shri Saibaba it is our earnest desire to perform in His holy darbar. We kindly request you to make it happen in April during Sri Ramnavami celebrations as you indicated earlier. All that we need is a firm date so that 70+team members can plan their schedules, leaves, visas and travel arrangements. Many of us visit India every year and they are all waiting for this date so that they can plan their travel

So, I request your goodselves to consider our humble request.

Email Dated -20.12.2019- As discussed earlier, our "Sai Samarpah" gropu's objective is to spread Baba's messages and teachings to the general public in USA. Our Sai Samarpan group is eagerly looking forward to visit Shirdi and stage our play "EK ME Anek" as an offering at lotus feet of our beloved Sai Baba.

It was heartening that you were kind enough to meet with us and explore the possibility of staging this play on 24 October 2020, the first day of Dushera celebrations. It is very perfect choice as being auspicious day and also give an opportunity to all our crew and family members of witnessing the whole 3 day celebrations in Shirdi . If I can reiterate, as of now nearly 200 members of our group (all artists and their family members) are planning to travel to Shirdi for this programme. As this requires lot of planning and organizing their schedules, we will be happy if you could confirm in writing the oct 24 2020 date for the program.

As mentioned before, the revised Hindi version of the script incoroporating the changes suggested by Tilak ji has Already been sent. But for quick reference, the same is attached.

Email Dated -21.12.2019- I forgot to mention,If the revised script still needs to be changed, we can do it as we have enough time from now to October 2020. But we need official confirmation sooner so that there are several things that we can start working on.

उपरोक्त संदर्भीय पत्र व ईमेलव्दारे बी. नरसिम्हा, न्युयॉर्क यांनी "एक मे अनेक" (श्री साईबाबा पर एक नाटक) लेखक श्री. चंद्रशेखर यांनी लिहीलेले व रिंकी दास, अनुराधा धानक, सुप्रिया सिंह यांनी हिंदी भाषेत भांषातर केलेले नाटक पुण्यतिथी उत्सवात (२०२०) सादर करण्याकामी परवानगी मागितली असून, नाटकाची स्क्रीप्टही पाठविली आहे व त्यांनी स्क्रीप्टमध्ये काही दुरुस्त्या असल्यास त्या दुरुस्त्या करुन देण्यास सहमती दशर्वली असून, आमचे कलाकार व त्यांचे कुटूंबिय अशा एकूण २०० व्यक्तिंचे विमानाची तिकीटे, बस बुकिंग, हॉटेल बुकिंग इत्यादीसाठी नियोजन करावे लागणार असल्याने, लवकरात लवकर साईबाबांच्या जीवनावरील नाटकाच्या कार्यक्रमासाठी लवकर परवानगी मिळणेसाठी विनंती केली आहे.

विभागाचा अभिप्राय:- "एक मे अनेक" श्री साईबाबांचे जीवनावरील हिंदी नाटकाची स्क्रीप्ट मा. व्यवस्थापन समितीचे दि.२५.०९.२०१७ चे सभेतील निर्णयानुसार मुळ श्री साईसच्चरित ग्रंथाचा सखोल अभ्यास असणारे संस्थानमधील कायम कर्मचारी श्री. नवेंदू मराठे, लिपीक- टंकलेखक यांना तपासणीसाठी देण्यात आली होती. सदर नाटकाची स्क्रीप्ट त्यांनी तपासली असता त्यांना काहीप्रमाणात त्रुटी-तथा-विसंगती आढळल्याने सदर स्क्रीप्टमध्ये दुरुस्त्या करणेबाबत श्री. बी.नरसिम्हा, न्युयॉर्क व श्री.विवेक मुळे यांना वेळोवेळी दूरध्वनीवरुन सांगण्यात आले होते. त्यांनी दुरुस्त्या करुन स्क्रीप्ट संस्थानला इमेलव्दारे पाठविली आहे. त्यात ब-याचशा दुरुस्त्या करण्यात आल्या आहेत. सदर स्क्रीप्टमध्ये आणखी काही त्रुटी असल्यास सदर त्रुटींचे निराकरण करुन देणेची तयारी त्यांनी दर्शविली आहे.

सदरचे साईभक्त व त्यांचा संच अमेरिकेतून येणार असल्याने त्यांचे विमान बुकींग, ट्रॅव्हल बुकींग, हॉटेल बुकींग विचारात घेता त्यांचे विनंतीप्रमाणे श्री साईबाबांचे जीवनावरील "एक मे अनेक" नाटक पुण्यतिथी उत्सव (२०२०) मध्ये ठेवणेकरीता स्क्रीप्ट मधील किरकोळ दुरुस्तीचे आधिन राहून श्री. बी.नरसिम्हा, न्युयॉर्क यांना परवानगी देण्यास हरकत नाही असे नम्र मत आहे.

प्रस्ताव– तरी श्री साईबाबांचे जीवनावरील "एक मे अनेक" हे नाटक पुण्यतिथी उत्सव (२०२०) मध्ये दि.२४/१०/२०२० रोजी आयोजन करणेकरीता स्क्रीप्ट मधील किरकोळ दुरुस्तीचे आधिन राहून श्री. बी.नरसिम्हा, न्युयॉर्क यांना परवानगी देणेसाठी निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबांचे जीवनावरील "एक मे अनेक" या नाटकाची स्क्रीप्ट जनसंपर्क अधिकारी, व संस्थान कर्मचारी श्री.नवेंदू मराठे, लिपीक-टंकलेखक यांचेकडून तपासून घेण्यात यावी, त्यांनी सुचविलेल्या दुरुस्तीचे अधिन राहून सदर नाटकाचे आयोजन पुण्यतिथी उत्सव-२०२० मध्ये दि.२४/१०/२०२० रोजी करण्यास श्री.बी.नरसिम्हा, न्युयॉर्क यांना परवानगी देण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- शताब्दी कक्ष/ जनसंपर्क विभाग)**

---

**विषय नं.२६** **संस्थानमार्फत साजऱ्या होणाऱ्या सन २०२० मधील तीनही उत्सवांच्या निमंत्रण पत्रिका छपाई करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** उपरोक्त विषयांकित प्रस्ताव मा. तदर्थ समितीच्या दि.०४.१२.२०१९ रोजीचे सभेत सादर करण्यात आला होता त्यावर याकामी संबंधित विभागाने मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचा सखोल अभ्यास करुन यथायोग्य प्रस्ताव समितीसमोर सादर करावा,असे ठरले आहे.

भक्तमंडळाच्या सभासदांना उत्सवाच्या निमत्रणपत्रिका आणि उदीप्रसाद पाठविण्याच्या तरतुदींची पूर्वपिठीका पुढील प्रमाणे आहे.

**(१)** दि.०९/१०/१९५५,दि.२०/११/१९५५ व दि.१८/१२/१९५५ रोजी झालेल्या भक्तमंडळाच्या सभेत शिर्डी संस्थानचे योजना कानू व नियम तयार करण्यात आले त्यास मा.धर्मादाय आयुक्त यांनी पसंती दर्शविली व मा. जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांनी दि.११/०५/१९५६ रोजी योजना मंजूर केली.

सदरहू योजनेमध्ये संस्थानमार्फत साज-या होणा-या तीन उत्सवांचे निमंत्रण देणेबाबत खालीलप्रमाणे तरतुद आहे.

**ध्येय व उद्देश**

ब) आजवर चालत आलेल्या रुढीनुसार शिरडी येथे श्रीरामनवमी, गुरुपौर्णिमा, गोकुळ अष्टमी व पुण्यतिथी यादिवशी नेहेमींप्रमाणे उत्सव साजरे करणें व जत्रा भरविणे.

**परिशिष्ट ब) सन्मान्य संयुक्त चिटणीस**

४. त्यांनी भक्तमंडळाच्या सभासदांचे नावांची, त्यांचे पत्ते वगैरे सह, रजिस्टरें ठेवून ती अद्यावत राखली पाहिजेत.

११. तीन मुख्य उत्सवांची आमंत्रणे भक्तमंडळाच्या सर्व सभासदांना पाठवण्याची त्यांनी व्यवस्था केली पाहिजे

**(२)** मा. मुंबई सिटी सिव्हील कोर्टात दाखल झालेल्या चॅरिटी सुट नं. ३४५७ /१९६० मध्ये मा.न्यायाधीश श्री एन.आय माखिजानी यांनी दि.१८/१०/१९८२ रोजी रोझनामा मंजूर केला त्यात कलम नं.९ मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे. CLAUSE NO (9) BHAKTA MANDAL

(1) The Bhakta Mandal shall consist of patrons, life members, ordinary members,

Honorary members, Associates and Institute members (affiliated).

(2) A person of any caste, religion or sex who has completed 18 years of age and agrees with the aims and objects of the Sansthan shall be eligible and may be admitted by the Board of Management as a member of the Bhakta Mandal.

(4) The rights and privileges of the members of the Bhakta Mandal.

i) Invitations to members to attend the three utsavas of Shirdi viz Ramnavami, Guru Pournima and Punyatithi of Shri Saibaba shall be extended by publishing the same in English and Marathi newspapers having wide circulation, personal invitation shall be extended to Patrons and life Members only but it would be in the discretion of the Executive officer to extend personal invitations to ordinary members.

v) Every member shall be entitled to receive the Udiprasad at his address by post after each of the three official festivals without payment of any charges.

(३) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूदः-

१) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधिन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

३) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

४) अधिनियम १९ (१) समारंभ,उत्सव, पूजा इत्यादींची शिफारस करण्यासाठी आश्रयदाते, आजीव सदस्य, सर्वसामान्य सदस्य, सन्मान्य सदस्य, सहयोगी सदस्य आणि संस्था सदस्य (संलग्न) यांचा समावेश असलेले एक भक्त मंडळ असेल, सदस्यत्वाच्या प्रत्येक प्रकारासाठी वर्गणीचा दर विनियमांव्दारे निर्धारित करुन दिल्याप्रमाणे असेल.

(२) कोणत्याही व्यक्तीस, मग तिची जात, धर्म अथवा लिंग कोणतेही असले तरी, भक्तमंडळाचे सदस्यत्व देण्यात येईल.

परंतु, अशा व्यक्तीने वयाची अठरा वर्ष पूर्ण केली असली पाहिजेत व ती श्री साईबाबांचा भक्त असली पाहिजे.

(३) भक्तमंडळाच्या सदस्यांचे अधिकार, विशेषाधिकार आणि कर्तव्ये विनियमांव्दारे निर्धारित करुन दिल्याप्रमाणे असतील.

समिती, भक्तमंडळाच्या सदस्यत्वासाठी अर्ज करणा-या अर्जदाराने पूर्ण करावयाच्या इतर अटी व शर्ती देखील विनियमांव्दारे निर्धारित करुन देईल.

उपरोक्त अधिनियमास अनुसरुन संस्थान व्यवस्थापनाने तयार केलेले श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) भक्तमंडळ विनियम सन २०१३ मध्ये शासनाने मान्य केलेले आहेत. या विनियमातील कलम (४) भक्त मंडळाच्या सभासदांचे हक्क आणि विशेषाधिकार यामध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.

१) भक्तमंडळांच्या सभासदांना संस्थानच्या तीन उत्सवाचे म्हणजेच रामनवमी, गुरुपौर्णिमा आणि साईबाबांची पुण्यतिथी या उत्सवांचे निमंत्रण पाठविण्यात येईल. असे निमंत्रण डाकेने, एक्सप्रेस कुरीयरने, फॅक्स, ई-मेल व्दारा किंवा इलेक्ट्रॉनीक संपर्काच्या इतर कोणत्याही पध्दतीने पाठविण्यात येईल.

२) वर उल्लेख केलेल्या तीन अधिकृत उत्सवानंतर प्रत्येक सभासद डाकेने **'उदीप्रसाद'** प्राप्त होण्यास पात्र असेल.

३) हे विनियम लागू होण्यापूर्वीचे आश्रयदाते आणि आजीव सभासदांचे सर्व हक्क आणि विशेषाधिकार पुढे चालु रहातील

**(४)** या प्रमाणे भक्तमंडाळाचे सभासदांना प्रत्येक उत्सवाची निमंत्रणपत्रिका आणि उदीप्रसाद पाठविण्याच्या तरतुदींची पुर्वपिठीका आहे.

सन १९५६ पासून ते सन २०१२ पर्यंत त्या त्या वेळी असलेली व्यवस्थापन मंडळे आणि व्यवस्थापन समिती उत्सवाच्या निमंत्रणपत्रिका छापून त्या भक्तमंडळाच्या सभासदांना पाठवण्याचा निर्णय आपल्या अधिकारात घेत असत व त्यांची अंमलबजावणी मा.कार्यकारी अधिका-यामार्फत करण्यात येत असे. जेव्हा संस्थानवर व्यवस्थापन मंडळ नव्हते तेव्हा ही कार्यवाही मा.न्यायालयधारक (Court Receiver) यांच्यामार्फत होत असे.

दि. १३ मार्च २०१२ रोजी मा. उच्च न्यायालयाचे निर्देशानुसार संस्थानचा कारभार पाहाण्यासाठी त्रिसदस्य समिति (मा. प्रथम सत्र जिल्हा न्यायाधीश, मा.जिल्हाधिकारी व मा.कार्यकारी अधिकारी ) अधिकारावर आली या समितीस मोठ्या खर्चाचे अधिकार नव्हते. त्यामुळे सर्वच मोठ्या खर्चांसाठी मा. उच्च न्यायालयाची अनुमती घ्यावी लागत असे. संस्थानमध्ये साजरे होणा-या उत्सवाच्या खर्चाचाही यात समावेश होता.

**(५)** यानुसार श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव २०१५ साजरा करण्यास व त्यासाठी येणा-या अंदाजे रक्कम रु. ५२,४६,२००/- चे खर्चास मा. उच्च न्यायालयाने नेमलेल्या त्रिसदस्य समितीने (मा. प्रथम सत्र जिल्हा न्यायाधीश, मा.जिल्हाधिकारी व मा.कार्यकारी अधिकारी) मान्यता दिली. सदरच्या खर्चास मा. उच्च न्यायालयाची मान्यता घेणेकामी सिव्हील ॲप्लीकेशन नं.१३२६८/२०१५ (IN PIL/18/ 2011) दाखल केले त्यात खालीलप्रमाणे नमुद आहे.

1. This Honourable Court, by its order dated 13th March 2012, has appointed a three Member Committee to look after the affairs of "Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi" Accordingly, a Committee, comprising of three persons, namely, (i) the Principal District Judge, Ahmednagar, (ii) the Collector, Ahmednagar and (iii) the Executive Officer of Shri Saibaba Sansthan Trust, has been constituted. The said Committee had taken over the charge for supervision, monitoring and looking after the affairs of the Trust w.e.f. 01.04.2012

2. This Honourable Court vide its order dated 13.03.2012 and 16.10.2012 (passed in Civil Application No.12056/2012) has imposed various restrictions and one of them is that, the Committee shall not take major financial decision of whatsoever nature without intimating this Honourable Court. For ready reference copy of the order dated 13.3.2012 and 16.10.2012 ( passed in C.A.No.12056/2012) are annexed hereto and marked at EXHIBIT-A &B respectively.

3. The applicant submits that as per the provisions contained in the Act on every year Utsav/programme of Shri Sai Baba Punyatithi ( Death Anniversary of Shri Sai Baba) has to be celebrated as per the usual custom and practice followed. Various programmes arranged on the occasion of anniversary which includes sending of invitation cards and other programmes as stated in the Resolution.

4. The applicant submits that large number of devotees visits Shirdi on that occasion and various arrangements are required to be made to cater the devotees who visits Shirdi on the said occasion.

5. The applicant submits that considering the above said aspect the Committee appointed by this Hon'ble Court had discussed the said aspect in its meeting held on 8.10.2015 being subject-matter No.32 and sanctioned expenditure of estimated cost of rupees 52,46,200/- required for performance and celebration of the said occasion. For ready reference, copy of the Resolution No.351 dated 08/10/2015 is annexed herewith and marked at **EXHIBIT-'C'**

**6.** The applicant submits Civil Application No 9621/2014 in the year 2014 and prior thereto application are filed. The Division Bench of this Hon'ble Court had permitted

Court Order Dt,26/09/2014 the Sansthan to spend amount stated therein for performance and celebration of Punyatithi Utsav in the year 2014. The applicant craves liberty to place on record the aforesaid order. For ready reference, copy of the Hon'ble Court order dated 26/09/2014 is annexed herewith and marked at **EXHIBIT-'D'**

7. The applicant submits that celebration and performance of the Utsav is prescribed and cited in the act which is celebrated and performed in accordance with the settled practice, customs and traditions in vogue. The applicant submits that in view of the facts and circumstances stated hereinabove, the applicant Committee may be permitted to spend an amount of rupees 52,46,200/- for the purposes of celebration of the Shri Sai Baba Punyatithi Utsav which is to be performed between the period 21.10.2015 to 23.10.2015

त्यानंतर सिव्हील ॲप्लीकेशनमध्ये मा. उच्च न्यायालयास खालीलप्रमाणे विनंती करण्यात आली होती.

(B) By allowing this application the applicant Committee may be permitted to spend an amount of Rs.52,46,200/- for the purposes of celebration and performance of Punyatithi Utsav of Lord Shri Sai Baba scheduled to be held between the period 21.10.2015 to 23.10.2015

उपरोक्त सिव्हील ॲप्लीकेशनवर मा. उच्च न्यायालयाचे खंडपीठाने दि.१५/१०/२०१५ रोजी

1. Heard the learned counsel for rival parties.

2. We have perused page No.25 showing the details about the proposed expenditure for this year's function for Dasara. We find Item Nos.5 and 6 relate to printing and posting etc. of the invitation cards and the amount against these two items is Rs.5,00,000/ plus Rs.9,96,000/

3. Mr. Choukidar, learned counsel for the Trust submits that the invitees are residing in the interior part of the villages and towns etc.and therefore, there is a system to send the invitation cards by post as they are the patron members of the Trust. Not only that according to him, some of the patron members are residing abroad and they are also required to be invited by sending invitation cards.

4. We find that the expenditure at item Nos. 5 and 6 towards printing and posting of invitation cards is not required in these days of technological advancement namely SMS, MMS, Internet, publication, television etc. There is no point in spending huge amount as aforesaid towards said item Nos.5 and 6. Certainly the said amount can be saved and Mr. Choukidar, learned counsel for Trust also fairly states that the Trust would adopt other ways of inviting the devotees rather than spending huge amount over these two items. We make it clear that in future also if such an application is made, expenditure thereon shall not be claimed on these two items. We have perused the details of other expenditure and we think the same should be allowed in view of the function at the Sansthan. We, therefore, allow the prayer for making expenditure as per Item Nos.1 to 10 except Item Nos.5 and 6. Consequently, the total amount to be spent shall be reduced by Rs.14,96,000/.

5. Civil Application No.13268 of 2015 is disposed of.

खालीलप्रमाणे निर्देश दिले.

मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या उपरोक्त निर्देशामध्ये निमंत्रणपत्रिका छापणे व उदीप्रसाद पाठविणेच्या खर्चास मान्यता दिलेली नाही,असे स्पष्टपणे नमूद केले आहे. तथापि, या संदर्भात मा.उच्च न्यायालयाकडे वरील अर्ज करण्याअगोदर दि.२२.०९.२०१५ रोजीचे मंजूरीन्वये संस्थान प्रशासनाकडून श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव २०१५ च्या निमंत्रणपत्रिका(रु.३,२१,२५५/-) छापण्याबाबत व भक्तमंडळाच्या सभासदांना पाठविण्याची (रु.९,४७,२१७/-) कार्यवाही दि.१४.१०.२०१५ पर्यंत पूर्ण केलेली आहे असे निदर्शनास येत आहे.

**(६)** तथापि निमंत्रणपत्रिका व उदीप्रसाद पाठविणेबाबत झालेल्या वरील आदेशाचा संस्थानने मा. उच्च न्यायालयाकडे पुनर्विचार अर्जही (रिव्ह्यु ॲप्लीकेशन नं.१८२/२०१५) सादर केला होता परंतु सदर अर्जावर मा.उच्च न्यायालयाकडून दि.१८.०३.२०१६ रोजी खालीलप्रमाणे निर्देश देण्यात आलेले होते.

1. Learned Counsel for the applicant has not pressed the review application

2. The review application stands disposed of accordingly.

**(७)** त्यानंतर सालाबादप्रमाणे श्री रामनवमी उत्सव २०१६ साजरा करण्यास त्यासाठी येणा-या अंदाजे रक्कम रु.७७,००,०००/- चे खर्चास मा. उच्च न्यायालयाने नेमलेल्या त्रिसदस्य समितीने (मा.प्रथम जिल्हा सत्र न्यायाधीश, मा.जिल्हाधिकारी व मा.कार्यकारी अधिकारी) मान्यता दिली. सदरच्या खर्चास मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेणेकामी सिव्हील ॲप्लीकेशन नं.३४९७/२०१६ (IN PIL/18/ 2011) दाखल केले त्यात खालीलप्रमाणे नमुद आहे.

1. This Honourable Court by its order dated 13th March 2012, has appointed a three Member Committee to look after the affairs of “Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi”. Accordingly, a Committee, comprising of three persons, namely, (i) the Principal District Judge, Ahmednagar, (ii) the Collector, Ahmednagar and (iii) the Executive Officer of Shri Saibaba Sansthan Trust, has been constituted. The said Committee had taken over the charge for supervision, monitoring and looking after the affairs of the Trust w.e.f.01.04.2012.

2. This Honourable Court vide its order dated 13.3.2012 and 16.10.2012 (passed in Civil Application No.12056/2012) has imposed various restrictions and one of them is that, the Committee shall not take major financial decision of whatsoever nature without intimating this Honourable Court. For ready reference copy of the order dated 13.3.2012 and 16.10.2012 ( passed in C.A.No.12056/2012) are annexed hereto and marked at EXHIBIT-A&B respectively.

3. Applicant submits that Ram Navmi Utsav is celebrated every year on the day of Ram Navmi. The said festival is amongst three major festivals which are celebrated in sansthan.

4. Applicant submits that, the aspect as to the celebration of Ram Navmi Utsav was subject matter of consideration before three member committee in its meeting held on 16/02/2016 whrerin Resolution No79 was passed thereby approving expenditure of Rs.77,00,000/- for the purposes of celebration of Ram Navmi Utsav. For ready reference, copy of the Resolution No.79 dated 16/02/2016 is annexed herewith and marked at **EXHIBIT-‘C’**

5. Applicant submits that, for last year i.e.2015 this Hon,ble Court vide its order dated 13/03/2015 passed in the Civil Application No 3499 of 2015 is annexed hereto and marked at **EXHIBIT-‘D’**

**6.** **A**pplicant submits that though permission to spend an amount of Rs.60,55,000/- was allowed by this Hon,ble Court for the last year, however, an amount of Rs.53,62,678/- was actually spent.

7. Applicant submits that, since celebration of Ram Navmi Utsav festival is amongst three major festivals and has been celebrated since last so many years, in the interest of justice, it is necessary to grant permission requested for in the application.

त्यानंतर सिव्हील ॲप्लीकेशनमध्ये मा. उच्च न्यायालयास खालीलप्रमाणे विनंती करण्यात आली होती.

(B) By allowing this application, the Committee may be permitted to spend an amount of Rs.77,00,000/- for the purposes of expenditure namely celebration of Ram Navmi Utsav-2016 stated in resolution No dated 16/02/2016, which is at Exht. C to this application and for that purpose grant permission in that behalf.

उपरोक्त सिव्हील ॲप्लीकेशनवर मा. उच्च न्यायालयाचे खंडपीठाने दि.१८/०३/२०१६ रोजी खालीलप्रमाणे निर्देश दिले.

1. Heard. We perused earlier order passed by this Court on 15.10.2015 in Civil Application 13268 of 2015. We found that this Court suggested to the trust that they should avoid cost incurred for sending invitation cards in physical form. They should try to send invitations through Email, SMS etc. Learned Counsel for the applicant then had assured the Court that the trust would start sending invitations through Email etc. Today, learned Counsel for the applicant reiterated the trust's commitment to adopt technology for sending soft copies of invitation. He also added that so far the trust has secured Email addresses of 12000 members and is in the process of collecting Email addresses of all members. He also assured the Court that the trust is collecting telephone numbers also. The applicant trust still mentions that the trust proposes to spend Rs.4 lakhs for printing invitation cards and packets of udiprasad. We are not against sending udiprasad to each members by post and expenses for such dispatch is necessary and should be allowed.

2. Learned Counsel for the applicant also informs to this Court that their members are very keen to receive udiprasad in physical form and many members have made complaints that they are not receiving udiprasad in physical form.

3. In view of above circumstances, we allow this application in terms of prayer clause (B) and stands disposed of.

उपरोक्त निर्देशानुसार निमंत्रणपत्रिकाची छपाई आणि उदीप्रसाद पोष्टाव्दारे पाठविण्यास मा. उच्च न्यायालयाने अनुमती दिल्याचे स्पष्ट होते. परंतु सन २०१५ रोजीच्या श्री. पुण्यतिथी उत्सवाच्या निमंत्रणपत्रिका छापून त्या पोस्टाव्दारे पाठविण्यास मा. उच्च न्यायालयाने परवानगी नाकारल्याच्या पार्श्वभुमीवर संबंधित प्र.अधिक्षक, विधी अधिकारी व संबंधित प्रशासकीय अधिकारी यांनी निमंत्रणपत्रिका पाठविण्याच्या रुढीबाबत असलेल्या तरतुदींची माहिती सिव्हिल ॲप्लीकेशनमध्ये करुन मा. उच्च न्यायालयास अवगत करुन देणे आवश्यक होते,जेणेकरुन मा. उच्च न्यायालयास अधिनियमातील तरतुदीस अनुसरुन असलेल्या रुढींची माहिती झाली असती असे वाटते. थोडक्यात संस्थानसाठी शासनानेच केलेल्या अधिनियमाची मा. उच्च न्यायालयास माहिती मिळाली असती व त्यानुसार उचित आदेश झाले असते.

(८) मा. उच्च न्यायालय औरंगाबाद येथे श्री.उत्तमराव रंभाजी शेळके यांनी श्री साईबाबा संस्थानचे व्यवस्थापन समिती नेमणूकीचे संदर्भात महाराष्ट्र शासन व इतर यांचे विरुद्ध पीआयएल नं.१२०/२०१९ दाखल केले आहे. सदर पीआयएल मध्ये अर्जदार यांनी सिव्हील ॲप्लीकेशन नं.१३०२९/२०१९ दाखल केले आहे. त्यामध्ये मा. उच्च न्यायालयाने दि. २७.११.१९ चे आदेशाने इच्छुक असल्याने वादी व प्रतिवादी यांना शपथपत्र सादर करणेबाबत आदेश केला होता त्यासअनुसरुन संस्थानकडून शपथपत्र व त्यासोबत मा. तदर्थ समितीचे सभेचा अजेंडा (विषय सुची) सादर करण्यात आला त्यावर मा. उच्च न्यायालयाने खालीलप्रमाणे निर्देश दिलेले आहेत.

1. Heard Ms Talekar, learned Counsel for the applicants

2. Mr Bhavar, learned Counsel appearing on behalf of respondent no.2 invited our attention to the affidavit-in-reply filed on behalf of respondent no.2 Shri Ravindra s/o Chindhu Thakare, Deputy Chief Executive Officer ( In Charge Chief Executive Officer) of Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi, Taluka Rahata, District Ahmednagar and more particularly, the intimation dated 26.11.2019 of the meeting scheduled on 4.12.2019 at 10.00 a.m. by the ad-hoc Committee appointed by this Court. There are as many as ninety six subjects. It was the submission of Mr Bhavar that all these subjects need immediate attention. Permission be granted to conduct the meeting as scneduled on 4.12.2019 by the ad-hoc Committee.

3. Ms Talekar, learned Counsel appearing for the applicant though had not raised any serious objection to conduct the meeting, her only submission was that let the ad-hoc Committee conduct the meeting, keeping in mind the directions of this Court in order dated 15.10.2019 in Civil Application No.13268 of 2015 in P.I.L. No.18 of 2011, order dated 18.3.2016 in Civil Application No.3497 of 2016 in P.I.L. No.18 of 2011 and order dated 30.1.2019 in P.I.L. 152 of 2018 with P.I.L. No.86 of 2018. Ms Talekar submitted that it would be necessary for the adhoc Committee to consider these issues, more particularly while considering the subject no.61, which deals with printing of the invitation cards in year 2020.

4. Per contra, it was submitted by Mr Bhavar, learned counsel for respondent no.2 that as many of the devotees reside in remote area or villages, the modern technology or modern method of communication may not be very useful so as to reach these devotees. On perusal of order dated 15.10.2015, order dated 18.3.2016 and order dated 30.1.2019, what emerges is the thrust of the Court on saving the expenditure and an attempt to prevent unnecessary expenditure. We are of the opinion that the balance can be striked up by permitting the ad-hoc Committee to consider the issue, i.e. subject no.61 on a consideration of the cost efficient measures, such as instead of

printing the invitation cards either on hard bond papers or making the invitations decorative, selective use of paper and an optional mode of computerised printed pamphlets may achieve the object and target of intimation. As the order dated 15.10.2015 refers to mode of publication, the ad-hoc Committee may also consider a publication of a notice in a vernacular newspaper having wide circulation in Ahmednagar district. We further make it clear that our observations are on a broad base utility and the ad-hoc Committee is at liberty to take appropriate measures into consideration for cost efficient mode.

**(९)** विभागाचा अभिप्राय - सदर निर्देशात मा. उच्च न्यायालयाने उत्सवाची माहिती अहमदनगर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात वितरीत होणा-या वर्तमानपत्रात जाहिरात स्वरुपात छापावी असे सुचित केले आहे. भक्तमंडळात नोंदणीकृत असलेला साईबाबांचा भक्तगण हा केवळ अहमदनगर जिल्ह्यात नसुन देशात तसेच देशाबाहेरही विखुरलेला आहे.

संस्थानचे आजीव सभासद व आश्रयदाते सभासद यांची संख्या दि. ०९ /०१/ २०२० अखेर सुमारे १,७७,००० इतकी असून यामध्ये भारतातील राज्यनिहाय्य आजीव सभासद व आश्रयदाते असलेल्या सभासदांची सांख्यिकीय आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | राज्य | संख्या | अ.नं. | राज्य | संख्या |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | एअरमेल (परदेशी) | ३३४७ | २० | हरियाना | २४४७ |
| ०२ | महाराष्ट्र ( अ.नगर जिल्हा सोडून) | ३४७११ | २१ | केरळ | ३९१ |
| ०३ | कर्नाटक | २०७३६ | २२ | जम्मु काश्मीर | ३०२ |
| ०४ | गुजराथ | ८५२७ | २३ | हिमाचल प्रदेश | २९८ |
| ०५ | मध्यप्रदेश | ४४५३ | २४ | आसाम | १९६ |
| ०६ | उत्तरप्रदेश | ७१५४ | २५ | अंदमान निकोबार | १५ |
| ०७ | तामिळनाडु | ९५०८ | २६ | अरुणाचल प्रदेश | ०२ |
| ०८ | गोवा | २२४५ | २७ | त्रिपुरा | ० ६ |
| ०९ | राजस्थान | १४९१ | २८ | मनिपुर | ०४ |
| १० | ओडिसा | ३६७४ | २९ | दिवदमन | ०४ |
| ११ | दिल्ली | ८९२० | ३० | पौंडेचरी | ५६ |
| १२ | आंध्रप्रदेश | ५४९०९ | ३१ | सिक्कीम | १६ |
| १३ | तेलंगणा | १५२६ | ३२ | मेघालय | १० |
| १४ | पंजाब | १५७१ | ३३ | उत्तराखंड | ५८२ |
| १५ | वेस्टबंगाल | १८५४ | ३४ | युनियम टेरेटरी | १७ |
| १६ | बिहार | ९९० | ३५ | दादरनगर हवेली | १३ |
| १७ | झारंखंड | ६९६ | ३६ | मिल्ट्री कोड | १२ |
| १८ | चंदीगड | ४८ | ३७ | अहमदनगर (जिल्हा) | ४६३६ |
| १९ | छत्तीसगड | १६१० | | **एकूण संख्या** | **१,७६,९७७** |

परदेशातील साईभक्त सभासदांची संख्या ३३४७ आहे. वरील राज्यनिहाय व विदेशनिहाय सभासदांची सांख्यिकीय आकडेवारी लक्षात घेता मा. उच्च न्यायालयाचे निर्णयाप्रमाणे केवळ अहमदनगर जिल्हयात मोठ्या खपाच्या वर्तमानपत्रात उत्सवांच्या कार्यक्रमांची जाहिरात देणे उचित होणार नाही असे नम्र मत आहे.

पुर्वी भक्तमंडळ सभासदांना उत्सवापूर्वी निमंत्रणपत्रिका पाठविल्या जात असत व उत्सव झाल्यानंतर उदीप्रसाद पाठविला जात होता. त्यामध्ये दोनदा पोस्टेजचा खर्च होत होता त्यासाठी श्री रामनवमी उत्सव २०१२ पासून निमंत्रणपत्रिका व उदीप्रसाद आज तागायत एकत्रितरित्या पाठविण्याची पध्दत सुरु आहे परिणामतः पोस्टेजचा खर्च निम्याने कमी झालेला आहे.

भक्तमंडळाचे सभासदांना पाठवावयाच्या उत्सवाच्या निमंत्रणपत्रिकेच्या पाकीटावर (सन २०१३ ते २०१६ मधील तीनही उत्सव) Please communicate your email address for further correspondence असा मजकूर छापण्यात आला होता. तथापि यास अत्यंत अत्यल्प प्रतिसाद मिळाला आहे.

निमंत्रणपत्रिका छपाईचा वार्षिक खर्च साधारणतः ११ ते १२ लाखाच्या दरम्यान आहे. प्रत्येक उत्सवासाठी संस्थानचा उदीप्रसाद व निमंत्रणपत्रिका पाठविण्याचा खर्च साधारणतः ९ ते १० लाखाच्या दरम्यान आहे. म्हणजेच सन २०१२ ते २०१९ या आठ वर्षामध्ये जवळपास रु.७०ते ७२ लाख पर्यंत पोस्टेज खर्चाची बचत झाली आहे. तसेच उदीप्रसाद व निमंत्रणपत्रिका एकत्र पाठविलेबाबत साईभक्तांचीही तक्रार नाही.

यापूर्वी सन २०१९ सालातील तीनही उत्सवाच्या निमंत्रण पत्रिका छपाई करणेकामी प्रती पत्रिका रु. २.२० पैसे इतका खर्च आलेला आहे. याकामी एकूण रक्कम रु. ११,८५,४०८/- इतका खर्च झालेला आहे.

संस्थानमार्फत साज-या होणा-या सन २०२० मधील तीनही उत्सवांच्या निमंत्रणपत्रिका छपाई करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबतचा विषय दि. ०४.१२.२०१९ रोजी तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेत खालील प्रमाणे निर्णयार्थ सादर करणेत आला होता

**(१०)** निमंत्रण पत्रिका

| निमंत्रण पत्रिका छपाई तपशिल | प्रती उत्सव छपाई संख्या १,८०,००० प्रमाणे तीनही उत्सवांची छपाई संख्या |
|---|---|
| अ) निमंत्रण पत्रिका- फोर कलर छपाई<br>आकार-९.५" x९.५"<br>कागदाचा प्रकार १३० GSM आर्ट पेपर<br>ब) पाकीटे (फोर कलर) आकार -५" x १०"<br>९० GSM आर्ट पेपर<br>क) पत्रिका घडी करुन पाकीटात भरणे पाकीटांसाठी गमटेप वापरणे. | ५,४०,००० |

उपरोक्त प्रस्तावाबाबत दि. ४.१२.२०१९ रोजीच्या तदर्थ समितीचे सभेत निर्णय क्र.५४० खालीलप्रमाणे झालेला आहे.

या विषयावर भरपुर सविस्तर चर्चा झाली मा. उच्च न्यायालयाचे निर्णय पाहीले समितीच्या असे निदर्शनास आणून देण्यात आले की, तुर्तास नजिकच्या काळात उत्सव नसल्याने या विषयावर लगेच निर्णय घेण्याची आवश्यकता नाही. अशा परिस्थितीत संबंधीत विभागाने मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या सखोल अभ्यास करुन यथायोगय प्रस्ताव समितीसमोर सादर करावा व तसे सिव्हील ॲप्लीकेशन मा.उच्च न्यायालयासमोर दाखल करण्याची तरतुद ठेवावी.

मा.जिल्हा न्यायाधीश, मा.सिटीसिव्हील कोर्ट यांनी केलेले नियम व आताच्या अधिनियमातील तरतुदी विचारात घेता भक्तमंडळाच्या सभासदांना निमंत्रण पाठविणे बंधनकारक आहे.

अधिनियमातील तरतुदी, दि.०४.१२.२०१९ रोजी झालेल्या तदर्थ समितीच्या सभेतील निर्णय व मा.उच्च न्यायालयाचे दि.०३.१२.२०१९ चे निर्देश विचारात घेता निमंत्रण पत्रिकेचा खर्च कमी करणेसाठी प्रेसधारकांकडून काही पर्याय मागविण्यात आले आहे त्याची माहिती खालीलप्रमाणे

| अ.नं. | निमंत्रण पत्रिका छपाई तपशिल | प्रती उत्सव छपाई संख्या १,८०,००० प्रमाणे तीनही उत्सवांची छपाई संख्या | निमंत्रण पत्रिका प्रती दर रुपये | जीएसटी ०.१२% | एकूण दर | एकुण रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | अ) निमंत्रण पत्रिका- फोर कलर छपाई<br>- आकार-९.५" x९.५"<br>कागदाचा प्रकार १२० GSM आर्ट पेपर<br>ब) पाकीटे (फोर कलर) आकार -५" x १०" ९० GSM आर्ट पेपर<br>क) पत्रिका घडी करुन पाकीटात भरणे. पाकीटांसाठी गमटेप वापरणे. | ५,४०,००० | १.९१ पैसे | ०.२३ पैसे | २.१४ पैसे | ११,५५,६००/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ०२ | अ) निमंत्रण पत्रिका- फोर कलर छपाई - आकार-९.५" x९.५"<br>कागदाचा प्रकार १२० GSM आर्ट पेपर<br>ब) पाकीटे (फोर कलर) आकार -५" x १०"- ७० GSM मॅपलिथो पेपर<br>क) पत्रिका घडी करुन पाकीटात भरणे. पाकीटांसाठी गमटेप वापरणे. | ५,४०,००० | १.८० पैसे | ०.२२ पैसे | २.०२ पैसे | १०,९०,८००/- |
| ०३ | अ) निमंत्रण पत्रिका- फोर कलर छपाई आकार-९.५" x९.५"<br>कागदाचा प्रकार १२० GSM आर्ट पेपर<br>ब) पाकीटे (सिंगल कलर) आकार - ५"x१०" ७० GSM मॅपलिथो पेपर<br>क) पत्रिका घडी करुन पाकीटात भरणे पाकीटांसाठी गमटेप वापरणे. | ५,४०,००० | १.७४ पैसे | ०.२१ पैसे | १.९५ पैसे | १०,५३,०००/- |

वरील ३ पर्यायांपैकी पर्याय क्र.२ मधील पत्रिका आर्ट पेपरवर मुद्रीत होणार असून पाकीट साध्या कागदावर मुद्रीत होणार आहे. हे दिसायला विसंगत तर दिसेलच मात्र पाकीट ७० जीएसएम कागदाचे असल्याने उदीप्रसादाच्या वजनाने ते फाटू शकते परिणामी उदीप्रसाद पाकीटातून पडू शकतो व साई भक्तांपर्यंत सुरक्षीतपणे पत्रिका व उदीप्रसाद पोहचू शकणार नाही.

पर्याय क्र. ३ मध्ये पत्रिकेची छपाई आर्ट पेपरवर ४ रंगात असून पाकीट साध्या कागदावर १ रंगात छपाईचे व ७० जीएसएम कागदाचे असल्याने पर्याय क्र. २ मधील कारणानुसार ते साईभक्तांपर्यत सुरक्षीतपणे पोहचू शकणार नाही.

म्हणून पर्याय क्र. १ हा सुयोग्य पर्याय असल्याचे वाटते. व तो स्विकारण्यात यावा असे नम्र मत आहे.

संस्थानचे आजीव सभासदत्व (Life membership) घेण्यासाठी साईभक्ताला पूर्वी प्रत्येकी रु.२५१/- शुल्क म्हणून भरावे लागत होते. हे शुल्क आता (दि.०१.०१.२०१५ पासून) रु.५००००/-(अक्षरी पन्नास हजार) मात्र एवढे आहे. हे शुल्क सभासदास परत दिले जात नाही ते संस्थानकडेच जमा असते. यामध्ये महत्वाची बाब अशी आहे की शुल्काच्या या रकमेवर संस्थानला वर्षानुवर्षे व्याज मिळत आहे.भक्तमंडळाच्या सभासदात्वापोटी (कायम निधी –Permanent Fund) दि.३१.०३.२०१९ अखेर रक्कम रुपये २८,०३,१८,२७३/- एवढी व्याजासह जमा आहे.साईभक्त सभासदांना उत्सवाच्या ज्या निमंत्रण पत्रिका पाठवल्या जातात त्यांचा छपाईपासून त्या पोस्टात पडेपर्यंतचा सर्व खर्च या व्याजातूनच वळता होत असणार त्यासाठी संस्थानच्या तिजोरीतून कुठलीही वेगळी किंवा जास्तीची रक्कम खर्च होत नाही असे वाटते साईभक्त हा संस्थानचा सर्वात मोठा आणि अनन्यसाधारण महत्व असलेला घटक आहे. साईभक्ती आणि साईभक्तांची वाढ व्हावी, त्यांच्यासाठी सर्वोत्तम सुविधांची उभारणी व्हावी आणि साईभक्तीत त्यांना आनंद प्राप्त व्हावा यासाठीच संस्थान विविध उपक्रम तथा विकासकामे सातत्याने राबवत आहे. निमंत्रणपत्रिका व उदीप्रसाद हा एक भक्तांप्रती आदर दर्शविणारा लहानसा उपक्रम आहे आणि तो उपक्रम सन १९५६ सालापासून म्हणजेच गेल्या ६३ वर्षांपासून सुरु आहे. त्यामागे साईभक्तांच्या भावना निगडीत आहेत. भक्तांना पाठविण्यात येणारी निमंत्रणपत्रिका ही केवळ निमंत्रणपत्रिका नसुन त्यामध्ये उत्सवाचे प्रत्येक दिवसात होणा-या प्रत्येक कार्यक्रमाचे तपशिलवार वेळापत्रक दिलेले असते. त्याचा वापर करुन भक्त शिर्डी येथे येण्यासाठी नियोजन करतात तसेच अन्य ठिकाणी असलेल्या साईमंदिरांचे व्यवस्थापकही त्यानुसार त्यांच्या मंदिरातील कार्यक्रमाचे नियोजन करु शकतात.

संस्थानमध्ये साज-या होणा-या सर्वच उत्सवांना साईबाबा हयात असल्यापासूनची परंपरा आहे. साहजिकच उत्सव हा संस्थानचा नियमित कार्यक्रमांचा भाग आहे. पर्यायाने त्यासाठी विविध बाबींवर होणारा खर्च हा देखील नियमित खर्चाचा भाग आहे. संस्थान कर्मचा-यांची दरमहाची पगार बिले, विद्युत बिले, इंधन बिले आदी प्रमाणेच सुमारे शंभरपेक्षा अधिक वर्षाची परंपरा असलेल्या उत्सवांसाठी करावा लागणारा खर्च हा संस्थानच्या नि यमित खर्चाचाच भाग आहे. सदर खर्चासाठी संस्थानच्या प्रत्येक वर्षीच्या मुळ अंदाजपत्रकात

तरतुद केलेली असते व मुळ अंदाजपत्रकास मा. व्यवस्थापन समिती यांची मान्यता घेतली जाते त्याचप्रमाणे प्रत्येक उत्सवाचे आगोदर त्या त्या उत्सवास लागणा-या अपेक्षित खर्चासही मा.व्यवस्थापन समिती/ तदर्थ समितीची मान्यता घेण्यात येते त्यामुळे यासारख्या नियमित खर्चास मा. उच्च न्यायालयाची मान्यता घेण्याची आवश्यकता नसावी असे नम्र मत आहे.

अधिनियमातील तरतुद तसेच भक्तांच्या भावनेचा विचार करता (उदीप्रसाद प्राप्त होणेसाठी) निमंत्रण पत्रिका छपाई व पोस्टेजचा खर्च गौण ठरतो असे नम्रपणाने नमूद करावेसे वाटते.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम क्र.१९ (३) ची तरतुद व त्यानुसार तयार करण्यात आलेले विनियम विचारात घेता परिछेद १० नुसार कार्यवाही केल्यास रु.३०,०००/- खर्च कमी होईल.

निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७१** **यावर सविस्तर चर्चा झाली, समितीच्या असेही निदर्शनास आणून देण्यात आले की, दि.०९/१०/१९५५, दि.२०/११/१९५५ व दि.१८/१२/१९५५ रोजी झालेल्या भक्तमंडळाच्या सभेत शिर्डी संस्थानचे योजना कानू व नियम तयार करण्यात आले त्यास मा.धर्मादाय आयुक्त यांनी पसंती दर्शविली व मा. जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांनी दि.११/०५/१९५६ रोजी योजना मंजूर केली.**

**सदरहू योजनेमध्ये संस्थानमार्फत साज-या होणा-या तीन उत्सवांचे निमंत्रण देणेबाबत खालीलप्रमाणे तरतुद आहे.**

**ध्येय व उद्देश**

**ब) आजवर चालत आलेल्या रुढीनुसार शिरडी येथे श्रीरामनवमी, गुरुपौर्णिमा, गोकुळ अष्टमी व पुण्यतिथी यादिवशी नेहेमींप्रमाणे उत्सव साजरे करणें व जत्रा भरविणे.**

**परिशिष्ट ब) सन्मान्य संयुक्त चिटणीस**

**४. त्यांनी भक्तमंडळाच्या सभासदांचे नावांची, त्यांचे पत्ते वगैरे सह, रजिस्टरें ठेवून ती अद्यावत राखली पाहिजेत.**

**११. तीन मुख्य उत्सवांची आमंत्रणे भक्तमंडळाच्या सर्व सभासदांना पाठवण्याची त्यांनी व्यवस्था केली पाहिजे**

**मा. मुंबई सिटी सिव्हील कोर्टात दाखल झालेल्या चॅरिटी सुट नं. ३४५७ /१९६० मध्ये मा.न्यायाधीश श्री एन.आय माखिजानी यांनी दि.१८/१०/१९८२ रोजी रोझनामा मंजूर केला त्यात कलम नं.९ मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.**

**CLAUSE NO (9) BHAKTA MANDAL**

**(1) The Bhakta Mandal shall consist of patrons, life members, ordinary members, Honorary members, Associates and Institute members (affiliated).**

**(2) A person of any caste, religion or sex who has completed 18 years of age and agrees with the aims and objects of the Sansthan shall be eligible and may be admitted by the Board of Management as a member of the Bhakta Mandal.**

**(4) The rights and privileges of the members of the Bhakta Mandal.**

**i) Invitations to members to attend the three utsavas of Shirdi viz Ramnavami, Guru Pournima and Punyatithi of Shri Saibaba shall be extended by publishing the same in English and Marathi newspapers having wide circulation, personal invitation shall be extended to Patrons and life Members only but it would be in the discretion of the Executive officer to extend personal invitations to ordinary members.**

**v) Every member shall be entitled to receive the Udiprasad at his address by post after each of the three official festivals without payment of any charges.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूदः-**

१) **अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधिन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था**

**करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.**

**तसेच संस्थान व्यवस्थापनाने तयार केलेले श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) भक्तमंडळ विनियम सन २०१३ मध्ये शासनाने मान्य केलेले आहेत. या विनियमातील कलम (४) भक्त मंडळाच्या सभासदांचे हक्क आणि विशेषाधिकार यामध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.**

**१) भक्तमंडळांच्या सभासदांना संस्थानच्या तीन उत्सवाचे म्हणजेच रामनवमी, गुरुपौर्णिमा आणि साईबाबांची पुण्यतिथी या उत्सवांचे निमंत्रण पाठविण्यात येईल. असे निमंत्रण डाकेने, एक्सप्रेस कुरीयरने, फॅक्स, ई-मेल व्दारा किंवा इलेक्ट्रॉनीक संपर्काच्या इतर कोणत्याही पध्दतीने पाठविण्यात येईल.**

**२) वर उल्लेख केलेल्या तीन अधिकृत उत्सवानंतर प्रत्येक सभासद डाकेने 'उदीप्रसाद' प्राप्त होण्यास पात्र असेल.**

**३) हे विनियम लागू होण्यापूर्वीचे आश्रयदाते आणि आजीव सभासदांचे सर्व हक्क आणि विशेषाधिकार पुढे चालु रहातील**

**वरील नियमांचे अवलोकन करण्यात येऊन, तसेच भक्तमंडळाच्या सभासदात्वापोटी (कायम निधी –Permanent Fund) दि.३१.०३.२०१९ अखेर रक्कम रुपये २८,०३,१८,२७३/- एवढी व्याजासह जमा आहे. साईभक्त सभासदांना उत्सवाच्या ज्या निमंत्रण पत्रिका पाठवल्या जातात त्यांचा छपाईपासून त्या पोस्टात पडेपर्यंतचा सर्व खर्च या व्याजातूनच वळता होत असल्याने त्यासाठी संस्थानच्या तिजोरीतून कुठलीही वेगळी किंवा जास्तीची रक्कम खर्च होत नाही. तसेच या निमंत्रण पत्रिकेच्या पाकीटातूनच "उदीप्रसाद" पाठविला जातो कारण तशी तरतुद आहे व "उदीप्रसादाशी" भक्तांच्या धार्मिक भावना जोडलेल्या आहेत. त्यामुळे पाकीट व्यवस्थीत असणे आवश्यक आहे, असे समितीचे मत झाले. याकरीता संस्थानमार्फत साजऱ्या होणाऱ्या सन २०२० मधील तीनही उत्सवांच्या निमंत्रण पत्रिका उपरोक्त प्रस्तावात नमुद केलेल्या पर्याय क्रमांक १ प्रमाणे छपाई करणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु.११,५५,६००/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच याकामी मान्यतेसाठी मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात यावे, असे ठरले.**

**(कार्यवाही- शताब्दी कक्ष/विधी विभाग)**

---

**विषय नं.२७ श्री साईबाबांचे पादुका दर्शन सोहळयाचे आयोजनाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद :-

१) अधिनियमाचे कलम १७ (२) ठ- श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लिला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील.

२) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ड) श्रीसाईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे.

मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय -

१) दि.२८.०४.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२८०- जे सर्वसामान्य साईभक्त दर्शनासाठी शिर्डी येथे येऊ शकत नाही, अशा साईभक्तांच्या सोयीसाठी, समाधी शताब्दी महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर श्रींच्या मुळ पादुका देश-विदेशामध्ये ठिकठिकाणी दर्शनासाठी उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

२) दि.२३.०५.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३५८- देश विदेशातील पादुका दर्शनासाठी दोन पादुकांचा सेटचा वापर करण्यात यावा.

३) दि.२२.०८.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५२८- पादुका दर्शन सोहळा शताब्दी वर्ष समाप्तीनंतरही भविष्यात सुरु ठेवावेत

४) दि. ०६.०६.२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१९८- श्री साईबाबांचे पादुका दर्शन सोहळयाचे आयोजन करणेकामी मा. श्री बिपीनदादा कोल्हे, अध्यक्ष व मा. ॲड. मोहन जयकर सदस्य, यांची समिती गठीत

करण्यात आली या समितीने श्री साईबाबांचे पादुका दर्शन सोहळयाचे आयोजन करणेबाबत धोरनात्मक निर्णय घ्यावा असे ठरले.

तसेच, श्री साईबाबांच्या मुळ पादुका भारताबाहेर नेण्यात येऊ नये असे त्याऐवजी चांदीच्या पादुका नेण्यात याव्यात असे ठरले.

५) दि. ०४.०७.२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३७६- श्री. रामचंद्र लोळे, पेठ वडगांव, कोल्हापुर यांना २ ते १२ सप्टेंबर २०१९ या कालावधीत त्यांनी मागणी केल्यानुसार दोन दिवसांसाठी श्रींच्या पादुका नियमावलीचे कोटेकोरपणे अनुपालन करुन उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

६) मा. तदर्थ समितीचे दि.०४.१२.२०१९ चे सभेतील निर्णय क्र.५४५- साई मंदिर पेठ वडगांव, कोल्हापूर यांना दि.१० डिसेंबर २०१९ ते १५ डिसेंबर २०१९ या दरम्यानचे कालावधीत दोन दिवस श्री साई पादुका दर्शनासाठी साई मंदिर पेठ वडगांव, कोल्हापूर याठिकाणी उपलब्ध करुन देणेस मागील व्यवस्थापन समितीने दिलेल्या मान्यतेस अधिन राहुन तसेच पादुका समितीची मान्यता आल्यानंतर देण्यास मान्यता देण्यात आली.

प्रस्तावना– श्री साईबाबा समाधी शताब्दी कालावधीमध्ये संपूर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले होते. श्री साईबाबांच्या शिकवणीचा प्रचार व प्रसार करणेसाठी महाराष्ट्रासह देशातील विविध राज्यांतील शहरांमध्ये श्रींचे पादुका दर्शन सोहळा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येऊन, श्रींचे पादुका दर्शनाचा अनेक साईभक्तांनी लाभ घेतलेला आहे.

आता पादुका दर्शन सोहळ्यासाठी खालीलप्रमाणे प्रस्ताव प्राप्त झाले आहेत.

१) श्री साई कालेश्वर सेवा समिती, मध्यप्रदेश,
२) शिर्डी साई फ्रेडन्स असोशियेशन सेलम, तामिळनाडू
३) श्री साई ट्रस्ट दावनगेरे, कर्नाटक
४) शिर्डी साई श्रध्दा सेवा ट्रस्ट, कोलकत्ता

विभागाचा अभिप्राय– जे सर्वसामान्य साईभक्त शिर्डी येथे दर्शनासाठी येवू शकत नाही अशा साईभक्तांच्या सोईसाठी तसेच खाजगी व्यक्ती व त्रयस्थ संस्था यांचेमार्फत साईबाबांच्या मुळ पादूकाविषयी साईभक्तांची फसवणूक होवू नये यासाठी यापुढे वेळोवेळीच्या मागणीप्रमाणे कायमस्वरुपी पादूका उपलब्ध करुन देण्यात याव्यात असे मत आहे.

मा.तदर्थ समितीचे दि.०४.१२.२०१९ चे सभेतील निर्णय क्र.५४५ नुसार साई मंदिर, पेठ वडगांव, कोल्हापूर यांना दि.१० डिसेंबर २०१९ ते १५ डिसेंबर २०१९ या दरम्यानचे कालावधीत दोन दिवस श्री साई पादुका दर्शनासाठी साई मंदिर पेठ वडगांव, कोल्हापूर याठिकाणी उपलब्ध करुन देणेस मागील व्यवस्थापन समितीने दिलेल्या मान्यतेस अधिन राहुन तसेच पादुका समितीची मान्यता आल्यानंतर देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

तथापि, मा.उच्च न्यायालयाने संस्थानचे कामकाज पाहण्यासाठी मा. तदर्थ समितीची नेमणूक केली असल्याने सध्याची मा. व्यवस्थापन समिती अथवा तिची पादुका समिती यांना निर्णय घेण्याचे कोणतेही अधिकार नाही अशी धारणा आहे. त्यामूळे साई मंदिर पेठ वडगाव, कोल्हापूर यांना त्यांच्या मागणीप्रमाणे मा.तदर्थ समितीच्या स्तरावर श्री साईबाबांच्या पादुका उपलब्ध करुन देता येईल तसेच आता नव्याने प्राप्त झालेल्या प्रस्तावाबाबतही मा.तदर्थ समितीच्या स्तरावर निर्णय घेता येईल त्यासाठी प्रस्तावधारकांना मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेसमोर चर्चेसाठी बोलावून त्याचा अहवाल परत मा. तदर्थ समितीसमोर ठेवून त्यावर अंतिम निर्णय घेता यईल असे नम्र मत आहे.

प्रस्ताव– तरी, विभागाच्या अभिप्रायात नमुद केलेप्रमाणे मा.तदर्थ समितीची मान्यता असल्यास साई मंदिर, पेठवडगांव, कोल्हापूर यांना पादुका उपलब्ध करुन देणेस व नवीन प्रस्तावधारकांशी पादुकादर्शन सोहळयाची रुपरेषा ठरविणेकामी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेसमोर चर्चेसाठी बोलविणेस व त्याचा अहवाल मा. तदर्थ समितीच्या सभेसमोर सादर करणेसाठी सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई मंदिर पेठ वडगांव, कोल्हापूर यांनी मागणी केल्यानुसार दोन दिवसांसाठी श्रींचे पादुका नियमावलीचे काटेकोरपणे अनुपालन करण्याच्या अटींचे अधीन राहून उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली. तथापी श्रींच्या पादुका उपलब्ध करुन देण्यापुर्वी संस्थानचे अधिकाऱ्यांमार्फत सदर जागेची समक्ष पाहणी करण्यात यावी, असे ठरले.**

**तसेच श्रींचे पादुका दर्शन सोहळा कार्यक्रमांचे आयोजन करणेकामी आलेल्या नविन प्रस्तावधारकांशी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चर्चा करुन याबाबतचा सविस्तर प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर सादर करण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- शताब्दी कक्ष)**

---

**विषय नं.२८** **आजारी किंवा इतर कारणाने सलग १ वर्षापेक्षा कमी कालावधीत गैरहजर असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांची कागदपत्रांची पडताळणी /तपासणी प्रशासकीय अहवाल.**

**प्रस्ताव-** संस्थानचे विविध विभागात कंत्राटी पध्दतीने काम करणारे आजारी व इतर कारणास्तव गैरहजर असलेले कंत्राटी कर्मचारी यांना पुर्ववत कामावर हजर करुन घेणेबाबत वेळो-वेळी गैरहजर कर्मचारी यांनी संस्थानकडे अर्ज केलेले होते. सदर कर्मचारी यांना पुर्ववत कामावर घेणेबाबत एक वर्षापेक्षा कमी कालावधीत गैरहजर व एक पेक्षा जास्त कालावधीत गैरहजर असणा-या कर्मचा-यांची माहिती दि.२६/०७/२०१९ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णयार्थ सादर करण्यात आलेली होती.

सदर प्रस्तावावर मा.व्यवस्थापन समिति सभा दि.२६.०७.२०१९, (आयत्या वेळचा) विषय नं.११, निर्णय क्र.४१४ – यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तुत प्रकरणी उप मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्यलेखाधिकारी व संबंधित विभागाचे प्रशासकीय अधिकारी यांची समिती गठीत करण्यात यावी, या समितीने सलग १ वर्षापेक्षा कमी कालावधीसाठी गैरहजर असलेल्या प्रत्येक कर्मचा-यांचे गैरहजेरीचे कारणाचे अवलोकन करुन याबाबतचा सविस्तर प्रस्ताव स्थानिक उपसमितीचे सभेपुढे सादर करण्यात यावा, असे ठरले. त्यास अनुसरुन, जा.न.एसएसएस/वशी-७ए/१२४३/२०१९, दिनांक-२२/०८/२०१९ अन्वये प्रशासकीय समिती गठीत करण्यात आलेली आहेत. या समितीत खालील सदस्यांचा समावेश आहे. सदर समितीने दि.३१.०८.२०१९ रोजी ३.३० वा. मा.उप मुख्य कार्यकारी अधिकारी सो. यांचे कक्षेत गैरहजर असलेल्या कंत्राटी कर्मचा-यांना पुर्ववत कामावर घेणेबाबत त्यांनी सादर केलेली वैद्यकीय प्रमाणपत्रे, अनुषंगीक कागदपत्रे व गैरहजेरीचे कारणांची पडताळणी / तपासणी केलेली आहे.

| **अ.नं.** | **अधिकारी यांचे नाव** | **पदनाम** |
|---|---|---|
| ०१ | श्री रविंद्र चिंधू ठाकरे | उप मुख्य कार्यकारी अधिकारी |
| ०२ | श्री बाबासाहेब बाळकृष्ण घोरपडे | मुख्य लेखाधिकारी, लेखाशाखा |
| ०३ | श्री सुर्यभान विठ्ठलराव गमे | प्रशासकीय अधिकारी |
| ०४ | श्री दिलीप त्र्यंबक उगले | प्रशासकीय अधिकारी |
| ०५ | श्री अशोक रंभाजी औटी | प्रशासकीय अधिकारी |
| ०६ | डॉ.आकाश रामहरी किसवे | प्रशासकीय अधिकारी |

या समितीकडून १ वर्षेपेक्षा कमी कालावधीत गैरहजर असलेल्या कंत्राटी कर्मचारी यांनी सादर केलेल्या कागदपत्रांचे वैद्यकीय प्रमाणपत्रांचे तपासणी / पडताळणी करुन अवलोकन करण्यात आले. त्याबाबतचा अहवाल खालीलप्रमाणे आहे.

| अ. नं. | कर्मचारी नांव | झालेली एकूण सेवा | अर्ज दिलेल्या दिनांकास गैरहजर कालावधी | आजचे दिनाकांस गैरहजर कालावधी | बदली झाली आहे किंवा कसे | समितीचा अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री सर्जेराव तान्हाजी शेळके | १६ वर्ष | ०४ –०५ महिने तारीख नाही | १० महिने | संरक्षणकडून हॉस्पीटल मध्ये बदली झालेपासून | सदर व्यक्तीचे आजारपणाबाबतच्या दस्ताऐवजांचे/ कागदपत्रांचे अवलोकन केले असता ते आजारपणामुळे गैरहजर असल्याची बाब स्पष्ट होते. |
| | आजारपणाबद्दल उपचाराचा तपशिल व कागदपत्रे<br>मणक्याचे आजाराने त्रस्त असल्याने खाजगी रुग्णालयाचे, कमलनयन मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, अहमदनगर यांचे फिटनेस सर्टिफिकेट १.कमलनयन मल्टिस्पेशालिटी हॉस्पीटील,अहमदनगर यांचे दि २०.०८.२०१८ ते दि.१५.०१.२०१९ या कालावधीचे | | | | | |

<table>
<tr><td></td><td colspan="6">वैद्यकीय प्रमाणपत्र जोडले आहे, दि.२०.०८.२०१८, दि.२२.०९.२०१८, दि.२५.१०.२०१८, दि.१८.१२.२०१८ रोजीचे केसपेपर.<br>२.जिल्हा रुग्णालय, अहमदनगर यांचा दि.०५.०१.२०१९ रोजीचा केसपेपर.<br>३.दि.१६.०१.२०१९ रोजीचे अर्जात गैरहजर कालावधी नमुद केलेला नाही. अर्जदारांने श्री साईबाबा हॉस्पीटल,शिर्डी व श्री साईनाथ रुग्णालय, शिर्डी किंवा शासकीय रुग्णालय यांचेकडे उपचार घेतलेले नाही.<br>अर्जदार यांची संरक्षण विभागाकडून हॉस्पीटल विभागाकडे बदली झाल्यापासून गैरहजर आहे.</td></tr>
<tr><td rowspan="2">०२</td><td>श्री किसन दगडू पवार</td><td>१५ वर्ष</td><td>०४ महिने</td><td>११ महिने</td><td>बदली झालेली नाही.</td><td>सदर व्यक्तीचे आजारपणाबाबतच्या दस्ताऐवजांचे/ कागदपत्रांचे अवलोकन केले असता ते आजारपणामुळे गैरहजर असल्याची बाब स्पष्ट होते.</td></tr>
<tr><td colspan="6">आजारपणाबद्दल उपचाराचा तपशिल व कागदपत्रे<br>मणक्याचा आजार असल्याने, सोबत श्री साईबाबा हॉस्पिटल येथील एम आर आय रिपोर्ट व उपचाराबाबतची कागदपत्रे. तसेच डॉ.राहुल मोदगी, नासिक यांचे केसपेपर सादर केले आहे.<br>१) श्री साईबाबा हॉस्पीटल, शिर्डी यांचेकडील दि ०१.०७.२०१८ रोजीचा एम.आर.आय. रिपोर्ट.<br>२) श्री साईबाबा हॉस्पीटल, शिर्डी यांचेकडील दि.३०.०६.२०१८ व दि.२४.०७.२०१८ रोजीचा केसपेपर.<br>३) वोक्हार्ट हॉस्पीटल, नाशिक यांचेकडील दि.२०.०७.२०१८ रोजीचा केसपेपर.<br>४) श्री साईबाबा हॉस्पीटल, शिर्डी यांचेकडील दि २८.०५.२०१७ रोजीचा एम.आर.आय. रिपोर्ट.<br>अर्जदार यांनी संस्थानचे रुग्णालयात उपचार घेतलेले आहे. तसेच त्यांनी दि ३०.०६.२०१८ ते दि. १९.०१.२०१९ या गैरहजर कालवधीमध्ये उपचार घेतलेबाबत मेडीकल सर्टीफिकेट जोडलेले आहे. त्यां ची इतर कोणत्यांही विभागाकडे बदली झालेली नाही.</td></tr>
<tr><td rowspan="2">०३</td><td>श्री राजेंद्र चंद्रभान डांगे</td><td>११ वर्षे</td><td>०५ महिने</td><td>०८ महिने</td><td>बदली झालेली नाही.</td><td>सदर व्यक्ती आजारी असलेबाबत सबळ पुरावे सादर केलेले नाही. त्यामुळे ते आजारपणामुळे गैरहजर असल्याचे स्पष्ट होत नाही.</td></tr>
<tr><td colspan="6">आजारपणाबद्दल उपचाराचा तपशिल व कागदपत्रे<br>हाताला मुंग्या व ॲसिडीटीचा त्रास खाजगी रुग्णालयाचे डॉ. भोंगळे, राहाता यांचे सर्टिफिकेट<br>१)डॉ.भोंगळे, राहाता यांचेकडील दि.०१.०९.२०१८ ते दि.१७.०१.२०१९ कालावधीतील वैद्यकीय सर्टिफिकेट जोडलेले आहे. यामध्ये Not valid for any medicolegal a court use असा उल्लेख आहे.<br>२)अर्जदारांने श्री साईबाबा हॉस्पीटल,शिर्डी व श्री साईनाथ रुग्णालय, शिर्डी किंवा शासकीय रुग्णायलय यांचेकडे उपचार केल्याचे दिसून येत नाही.<br>३) अर्जदार यांची गैरहजर कालावधी दि.१९.०१.२०१८ ते दि. १८.०१.२०१९ आहे. .</td></tr>
<tr><td rowspan="2">०४</td><td>श्री रविंद्र निवृत्ती बनसोडे</td><td>१८ वर्षे</td><td>०३ महिने</td><td>०६ महिने</td><td>बदली झालेली नाही.</td><td>सदर व्यक्तीचे आजारपणाबाबतच्या दस्ताऐवजांचे/ कागदपत्रांचे अवलोकन केले असता ते आजारपणामुळे गैरहजर असल्याची बाब स्पष्ट होते.</td></tr>
<tr><td colspan="6">आजारपणाबद्दल उपचाराचा तपशिल व कागदपत्रे<br>सदर घटना ड्युटीवर असतांना घडलेली असलेबाबत अर्जात नमुद केलेले आहे.<br>१.लेंडीबागेत कामावर असताना भक्तांची भांडणे सोडविणेकामी पळत असताना पाय घसरून पडले. २.ऑगस्ट–२०१८ मध्ये प्रसादालय विभागात कामावर असताना पायाचे ऑपरेशन झाले,तसेच नविन भक्तनिवासस्थान येथे रसोडयात काम करत असताना परत त्याच पायावर पडल्याने खाजगी हॉस्पीटल डॉ.जपे, व श्री साईबाबा हॉस्पिटल येथे उपचार घेतले आहे. ३. ऑक्टोबर-२०१८ दसरा उत्सव असल्याने पाय दुखत असतानांही ०३ दिवस प्रसादालयात काम केले आहे.४.दि.११.०१.२०१९ रोजी तब्बेत बरी झालेने प्रसादालय विभागात कामावर हजर होणेकामी गेलो असता, वरिष्ठांनी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांना भेटणेस सांगितले.<br>१)डॉ.सुजय राधाकृष्ण विखे पा. यांचे दि.२७.०२.२०१९ रोजीचे कामावर घेणेबाबतचे पत्र.<br>२)सुश्रुत जनरल ॲण्ड- सर्जिकल क्लिनिक, श्रीरामपूर यांचे दि.१५.१०.२०१८ ते दि.१२.०१.२०१९ रोजीचे मेडीकल सर्टिफिकेट.<br>३)श्री साईबाबा हॉस्पीटल, शिर्डी यांचे दि.२७.०७.२०१८ व दि.१७.१०.२०१८, दि.१८.१०.२०१९, दि.०५.११.२०१८, दि.१७.०८.२०१८, दि.०३.१०.२०१८, दि.०४.१०.२०१८,दि.०९.१२.२०१८, दि.१३.१२.२०१८, दि.०५.१२.२०१८, दि.०८.१२.२०१८, दि.२६.१२.२०१८, दि.१६.१२.२०१८ व दि.२३.०५.२०१८, दि.०७.०६.२०१८, दि.२९.०६.२०१८ रोजीचे मेडिकल सर्टिफिकेट व केसपेपर.<br>४)श्री साईबाबा हॉस्पीटल दि.१३.१२.२०१८ रोजीचा ई.सी.जी.रिपोर्ट व दि.०९.०६.२०१८ ते दि.१५.०६.२०१८ रोजीचे डिस्चार्ज</td></tr>
</table>

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | कार्ड.<br>५)डॉ.जपे हॉस्पीटल, कोपरगाव यांचा दि.२७.१२.२०१८ रोजीचा केसपेपर. अर्जदार यांनी संस्थानचे रुग्णालयात उपचार घेतलेले आहे. तसेच अर्जात गैरहजर कालवधीचा उल्लेख नाही.त्यांची इतर विभागाकडे बदली झालेली नाही. | | | | | |
| ०५ | श्री सचिन रामदास काळे | १३ वर्षे | ०४ महिने | ७ महिने | बदली झालेली नाही. | सदर व्यक्तीचे आजारपणाबाबतच्या दस्ताऐवजांचे/ कागदपत्रांचे अवलोकन केले असता ते आजारपणामुळे गैरहजर असल्याची बाब स्पष्ट होते. |
| | आजारपणाबद्दल उपचाराचा तपशिल व कागदपत्रे<br>श्री साईप्रसादालय विभागात कामावर असताना आजारी पडल्या ने दि.०५.१०.२०१८ पासून ते दि.०७.०२.२०१९ अखेर पर्यंत गैरहजर आहे. आजाराबाबत डॉ. अनंत एच. भोंगळे यांचेकडे उपचार घेतलेबाबतचे सर्टिफिकेट सादर केलेले आहे. तसेच डॉ. संदीप काळोखे, अहमदनगर यांचेकडे व डॉ. मुरादे ॲक्सीडेंट हॉस्पीटल श्रीरामपूर तसेच माधवबाग हॉस्पीटल, संगमनेर यांचेकडे उपचार घेतलेबाबतचे कागदपत्र सादर केलेले आहे. १)डॉ.भोंगळे यांचेकडील दि.०७.०२.२०१९ रोजीचे सर्टिफिकेट. (दि.०५.१०.२०१८ ते दि.०७.०२.२०१८) यामध्ये Not valid for any medicolegal a court use असा उल्लेख आहे.<br>२)डॉ.संदीप काळोखे, अहमदनगर यांचेकडील दि.१८.१२.२०१८, दि.२३.१०.२०१८, रोजीचा केसपेपर व दि.२३.१०.२०१८ रोजीचा सोनोग्राफी रिपोर्ट. ४)मुरादे ॲक्सिडेंट हॉस्पिटल, श्रीरामपूर यांचे दि.३०.०९.२०१८ रोजीचा केसपेपर. ५) डॉ.काळे, अ.नगर यांचेकडील दि.२९.११.२०१८ रोजीचा मेडिकल रिपोर्ट. ५)माधवबाग हॉस्पीडटल, संगमनेर, यांचेकडील केसपेपर.<br>६)डॉ.भांडगे, कोपरगाव यांचे दि.१८.११.२०१८, दि.२४.१२.२०१८ दि.१५.०१.२०१९, दि.०६.१०.२०१८ व दि.०६.१०.२०१८ रोजीचा केसपेपर. श्री साईप्रसादालय विभागात कामावर असताना आजारी पडल्याने दि.०५.१०.२०१८ पासून ते दि.०७.०२.२०१९ अखेर पर्यंत गैरहजर आहे. त्यांनी विभाग रुग्णालयात उपचार घेतलेले आहे. तसेच त्यांची बदली इतर विभागाकडे झालेली नाही. | | | | | |
| ०६ | श्रीमती सारीका नंदलाल कोडेले | १३ वर्षे | ०४ महिने | ०९ महिने | संरक्षणकडून प्रसादालयात बदली झालेपासून | सदर व्यक्तीचे आजारपणाबाबतच्या दस्ताऐवजांचे/ कागदपत्रांचे अवलोकन केले असता ते आजारपणामुळे गैरहजर असल्याची बाब स्पष्ट होते. |
| | आजारपणाबद्दल उपचाराचा तपशिल व कागदपत्रे<br>सलग ३ महिन्यापासून स्वतः आजारी असल्यामुळे श्री साईबाबा हॉस्पील. येथे उपचार घेतल्याचे सर्टिफिकेट<br>१)श्री साईबाबा हॉस्पीटल, शिर्डी यांचेकडील दि.१९.०९.२०१८ ते दि.२२.०९.२०१८ या कालावधीत ०४ दिवस व दि.१७.०२.२०१८ ते दि.२१.०२.२०१८ या कालावधीत ०४ दिवस रोजीचे डिस्चार्ज कार्ड जोडलेले आहे.<br>२)डॉ.लोढा, कोपरगाव यांचेकडील दि.०२.१०.२०१८ ते दि.३०.११.२०१८ रोजीचे सर्टिफिकेट. ( तारखेत खोडाखोड आहे)<br>३)श्री साईबाबा हॉस्पीटल शिर्डी यांचेकडील दि.२७.०१.२०१९ रोजीचा लॅब रिपोर्ट.<br>४)डॉ.शिंदे, श्रीरामपूर यांचा दि.०८.०४.२०१९ रोजीचे मेडीकल सर्टिफिकेट.(दि.१९.०९.२०१८ व दि.०८.०४.२०१९)<br>५) दि.१०.१२.२०१८ रोजी मुलीच्या लग्नाची लग्नपत्रिका.<br>अर्जदार यांची संरक्षणकडून प्रसादालयात बदली झालेपासून गैरहजर आहे. अर्जदार यांनी दि.०३.०१.२०१९ अर्जात गैरहजर कालावधीचा उल्लेख नाही. | | | | | |
| ०७ | श्री नसीन सुभाण पठाण | १५ वर्षे | ०४ महिने | ०९ महिने | संरक्षणकडून प्रसादालयात बदली पासून | सदर व्यक्तीचे आजारपणाबाबतच्या दस्ताऐवजांचे/ कागदपत्रांचे अवलोकन केले असता ते आजारपणामुळे गैरहजर असल्याची बाब स्पष्ट होते. |
| | आजारपणाबद्दल उपचाराचा तपशिल व कागदपत्रे<br>डायबेटीसचा त्रास असल्यामुळे व चक्कर येत असल्यामुळे सोबत उपचार घेतलेबाबत<br>१)स्मृती क्लिनीक, अहमदनगर यांचेकडील दि.०४.०७.२०१९ रोजीचे मेडीकल सर्टिफिकेट.<br>२)डॉ.तनपुरे, अ.नगर यांचे दि.१९.०७.२०१८, दि.०४.०१.२०१९ रोजीचे सर्टिफिकेट.<br>३)थायरोकेअर यांचा दि.०६.०७.२०१८ रोजीचा रिपोर्ट.<br>४)डॉ.गोंधळी यांचेकडील दि.१६.११.२०१८ रोजीचा रिपोर्ट.<br>५)डॉ.तनपुरे यांचेकडील दि.१९.०२.२०१८ व दि.०६.०७.२०१८ रोजीचे केसपेपर.<br>६)दि.०६.०७.२०१८ रोजीच लॅब रिपोर्ट व ई.सी.जी. रिपोर्ट.<br>अर्जदार दि. ०४.०१.२०१९ रोजीचे अर्जाने ०३ महिनेपासून अजारी असलेबाबत कळविले आहे. संस्थान रुग्णालयात, शासकीय | | | | | |

<table>
<tr><td></td><td colspan="6">रुग्णालयात उपचार घेतलेले नाही. त्यांची बदली संरक्षण विभागातून प्रसादालय विभागात झालेले आहे.</td></tr>
<tr><td rowspan="2">०८</td><td>श्री राजू भिमराज जाधव</td><td>११ वर्षे</td><td>०६ महिने</td><td>११ महिने</td><td>संरक्षणकडून साईप्रसादालयात बदली पासून</td><td>सदर व्यक्तीचे आजारपणाबाबतच्या दस्ताऐवजांचे/ कागदपत्रांचे अवलोकन केले असता ते आजारपणामुळे गैरहजर असल्याची बाब स्पष्ट होते.</td></tr>
<tr><td colspan="6">आजारपणाबद्दल उपचाराचा तपशिल व कागदपत्रे<br>पाठीच्या मनक्याचा त्रास व स्पॉन्डीलायसीसचा त्रास होत असल्यामुळे - १)श्री साईबाबा हॉस्पीटल शिर्डी यांचेकडील दि.२९.०१.२०१९ रोजीचा एम.आर.आय. रिपोर्ट व २ डी इको रिपोर्ट. २)श्री साईनाथ रुग्णालय शिर्डी यांचा दि.३१.०१.२०१९ रोजीचा रिपोर्ट. ३)डॉ.दोडीया, सावळीविहीर यांचे दि.१५.०८.२०१८ रोजीचे मेडीकल सर्टिफिकेट. (दि.०१.०७.२०१८ ते दि.१५.०८.२०१८). अर्जदार जुलै २०१८ पासून कामावरुन कमी गैरहजर असलेबाबत दि.२२.१२.२०१८ अर्जाने कळविलेले आहे. संस्थान रुग्णालयात, शासकीय रुग्णालयात उपचार घेतलेले नाही. त्यांची बदली संरक्षण विभागातून प्रसादालय विभागात झालेले आहे.</td></tr>
<tr><td rowspan="2">०९</td><td>श्री शिवाजी यमाजी कनगरे</td><td>१२ वर्षे</td><td>०३ महिने</td><td>११ महिने</td><td>बदली झालेली नाही.</td><td>सदर व्यक्तीचे आजारपणाबाबतच्या दस्ताऐवजांचे/ कागदपत्रांचे अवलोकन केले असता ते आजारपणामुळे गैरहजर असल्याची बाब स्पष्ट होते.</td></tr>
<tr><td colspan="6">आजारपणाबद्दल उपचाराचा तपशिल व कागदपत्रे<br>अ) डॉ.शिंदे यांचे सर्टिफिकेटवर St.Luke’s हॉस्पीटल, श्रीरामपुर, माजी वैद्यकिय अधिक्षक असे नमुद असल्याने St.Luke’s हॉस्पीटलमध्ये संपर्क साधला असता सदर नावाचे वैद्यकिय अधिकारी कधीही कार्यरत नसलेचे तेथील अधिकारी यांनी सांगीतले. ब) तसेच श्री साईनाथ रुग्णालयामध्ये बाह्यरुग्ण विभागात उपचार घेतलेला होता. सदर उपचार घेतल्याची नोंद ओ.पी.डी.पेपरवरुन निदर्शनास येत आहे. तसेच कनगरे यांना ब्रॉन्कीयल अस्थमा हा आजार आहे. सदर आजार हा दिर्घकालीन असु शकतो असे नमूद आहे.<br>१)डॉ.शिंदे, श्रीरामपूर यांचा दि १९.०३.२०१८ चे मेडीकल सर्टिफिकेट (दि.१०.०१.२०१८ ते दि.१९.०३.२०१८ या कालावधी.)<br>२)साई ॲक्सिडेंट हॉस्पीटल, राहाता यांचे दि.०१.०९.२०१८ रोजीचा केसपेपर.<br>३)श्री साईनाथ हॉस्पीटल शिर्डी यांचे दि.०६.०९.२०१९, दि.१५.०९.२०१९, दि.०५.१२.२०१८, दि.०४.१०.२०१८, दि.११.११.२०१८, दि.०८.०९.२०१८, दि.२६.०१.२०१९, दि.११.१०.२०१८, दि.२२.१०.२०१८ रोजीचे केसपेपर.<br>४)मा.वि.श्री.भाऊसाहेब वाकचौरे यांचे शिफारस पत्र. ५)श्री साईबाबा हॉस्पीटल दि.२६.०१.२०१९ रोजीचा रिपार्ट.<br>अर्जदार यांनी संस्थान रुग्णालयात उपचार घेतलेले आहेत. यांची बदली इतर विभागाकडे बदली झालेली नाही.</td></tr>
<tr><td rowspan="2">१०</td><td>श्री आण्णासो. धर्माजी माकुणे</td><td>१३ वर्षे</td><td>०५ महिने</td><td>१० महिने</td><td>बदली झालेली नाही.</td><td>सदर व्यक्तीचे आजारपणाबाबतच्या दस्ताऐवजांचे/ कागदपत्रांचे अवलोकन केले असता ते आजारपणामुळे गैरहजर असल्याची बाब स्पष्ट होते.</td></tr>
<tr><td colspan="6">आजारपणाबद्दल उपचाराचा तपशिल व कागदपत्रे<br>स्वतःला चिकणगुणिया हा आजार झाल्यामुळे, सोबत खाजगी रुग्णालय – टिळेकर हॉस्पीटल, श्रीरामपूर यांचे सर्टिफिकेट<br>१)टिळेकर हॉस्पीटल व अतिदक्षता विभाग, श्रीरामपूर यांचे दि.१५.१२.२०१८ रोजीचे दि.०१.०८.२०१८ ते दि.१५.१२.२०१८ वैद्यकीय सर्टिफिकेट जोडलेले आहे. त्यांनी संस्थान रुग्णालयात, शासकीय रुग्णालयात उपचार घेतलेले नाही.</td></tr>
<tr><td rowspan="2">११</td><td>श्री शिवाजी उत्तम कराड</td><td>१५ वर्षे</td><td>२ महिने</td><td>३ महिने</td><td>बदली झालेली नाही.</td><td rowspan="2">सदर व्यक्ती यांनी आजारपणामुळे गैरहजर आसल्याचे अर्जात नमुद केलेले आहे.ते आजारी असलेबाबत त्यांनी कोणतेही रुग्णालयाची उपचार घेतलेबाबत कागदपत्र/ दस्ताऐवज सादर केलेले नाही त्यामुळे ते आजारपणामुळे गैरहजर असलेबाबत स्पष्ट होत नाही.</td></tr>
<tr><td colspan="5">आजारपणाबद्दल उपचाराचा तपशिल व कागदपत्रे अर्जदार यांनी दिनांक ०१.०४.२०१९ पासून टायफाईड हा आजरी झालेने गैरहजर असल्याचे अर्जात नमुद केले आहे. परंतु आजारी असल्यामुळे त्यांनी रुग्णालयात उपचार घेतल्याचे कोणतेही दस्तदेवज जोडलेले नाही.अर्जदार हे मे.२०१८ पासून महिन्यात केवळ १ ते २ दिवस डयुटी करतात</td></tr>
<tr><td>१२</td><td>श्री पांडूरंग रावबा आहिरे</td><td>१४ वर्षे</td><td>६ महिने</td><td>१० महिने</td><td>बदली झालेली नाही.</td><td>सदर व्यक्तीचे आजारपणाबाबतच्या दस्ताऐवजांचे/ कागदपत्रांचे अवलोकन केले असता ते आजारपणामुळे गैरहजर असल्याची</td></tr>
</table>

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | बाब स्पष्ट होते. |
| | आजारपणाबद्दल उपचाराचा तपशिल व कागदपत्रे<br>१)डॉ.समदडिया, मालेगाव यांचे दि.०६.०३.२०१९ रोजीचे सर्टिफिकेट (दि.०८.०८.२०१८ ते दि.०६.०५.२०१९) अर्जदार यांनी दि. ०८.०८.२०१८ पासून गैरहजर असलेबाबत दि. १४.०३.२०१९ अर्जाने कळविले आहे. संस्थान रुग्णालयात, शासकीय रुग्णालयात उपचार घेतलेले नाही. | | | | | |
| | श्री महेश चंद्रकांत गायकवाड | १० वर्षे | ५ महिने | ७ महिने | बदली झालेली नाही. | सदर व्यक्तीचे आजारपणाबाबतच्या दस्ताऐवजांचे/ कागदपत्रांचे अवलोकन केले असता ते आजारपणामुळे गैरहजर असल्याची बाब स्पष्ट होते. |
| १३ | आजारपणाबद्दल उपचाराचा तपशिल व कागदपत्रे<br>आजारी असल्यामुळे कामावर येऊ शकले नाही. सोबत उपजिल्हा रुग्णालय, मनमाड येथील डॉक्टररांचे सर्टिफिकेट<br>१)उपजिल्हा रुग्णालय मनमाड यांचेकडील दि.२०.०१.२०१९ ते दि.१४.०३.२०१९ या कालावधीतील दि.१४.०३.२०१९ रोजीचे सर्टिफिकेट.<br>२)उपजिल्हा रुग्णालय, मनमाड यांचेकडील दि.०५.११.२०१८ ते दि.१५.०१.२०१९ या कालावधीतील दि.१५.०१.२०१९ रोजीचे सर्टिफिकेट.<br>अर्जदार यांनी दि. ०५.११.२०१८ ते दि. १४.०८.२०१९ या कालावधीत गैरहजर असलेबाबत दि. १५.०३.२०१९ रोजीचे अर्जाने कळविलेले आहे. त्यांनी शासकीय रुग्णालयात उपचार घेतलेले आहे. | | | | | |
| | श्री राजेंद्र दत्तात्रय दिवेकर (मयत) | १९ वर्षे | १५ दिवस | ५ महिने २५ दिवस | बदली झालेली नाही. | सदर व्यक्तीचे आजारपणाबाबतच्या दस्ताऐवजांचे / कागदपत्रांचे अवलोकन केले असता ते आजारपणामुळे गैरहजर असल्याची बाब स्पष्ट होते. |
| १४ | आजारपणाबद्दल उपचाराचा तपशिल व कागदपत्रे<br>स्वतःच्या हाताचा दुखापत झाल्यामुळे कामावर येऊ शकले नाही.<br>१)डॉ.क्षिरसागर, सावळीविहीर यांचेकडील दि.२०.०४.२०१९ रोजीचे सर्टिफिकेट. ( दि. ०१.०३.२०१९ ते दि. २०.०४.२०१९)<br>२)सोनाई हॉस्पीटल व प्रसुतीगृह, चांदेकसारे यांचेकडील दि.२०.०५.२०१९ रोजीचे दि.०१.०२.२०१९ ते दि.०१.०३.२०१९ या कालावधीतील मेडीकल सर्टिफिकेट.अर्जदार यांनी जानेवारी २०१९ पासून गैरहजर असलेबाबत दि. १३.०१.२०१९ अर्जाने कळविलेले आहेत. त्यांलची बदली इतर विभागात झालेली नाही. | | | | | |

उपरोक्त यादीतील एक वर्षेपेक्षा कमी कालावधीत आजारी कारणास्तव गैरहजर असलेल्या कर्मचा-यांची कागदपत्रांची अवलोकन केले असता –

१. अ.नं.१४- राजेंद्र दत्तात्रय दिवेकर हे दि.२९.१०.२०१९ रोजी मयत झालेले असल्याने त्यांचेबाबत निर्णय घेण्याची आवश्यकता नाही.

२. अ.क्र-०३ (राजेंद्र चंद्रभान डांगे) व अ.क्र.११ (शिवाजी उत्तम कराड) या कर्मचा-यांचे आजारीपणाचे/ गैरहजेरीचे कारण योग्य वाटत नाही, तरी त्यांना कामावर घेता येणार नाही. असे मत आहे.

३. अ.नं.०३, ११ व १४ वगळता उर्वरित अ.नं.१,२,४,५,६,७,८,९,१०,१२ व १३ या कर्मचा-यांना पुर्ववत कामावर घेणेस हरकत नाही असे मत आहे.

तरी, सदर प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.७३** **सदरचा विषय स्थगित ठेवण्यात आला.**

**(कार्यवाही-कामगार विभाग)**

---

**विषय नं.२९** **संस्थानला कंत्राटी पध्दतीने सुरक्षा व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी न्युनत्तम (L-1) दरधारकांशी चर्चा करुन नवीन कॉन्ट्रॅक्टर्सची नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे विविध विभागांना लागणारे कंत्राटी सुरक्षा व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी नवीन कॉन्ट्रॅक्टर्सची नेमणूक करणेबाबत ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती.

| | | |
|---|---|---|
| १ | खरेदी करावयाचे साहित्य / वस्तुचा तपशिल. | सुरक्षा व माजी सैनिक सुरक्षा कंत्राटी कर्मचारी पुरविणेकामी नवीन कॉन्ट्रॅक्टर्स नेमणूकीबाबत- २०१९-२० |
| २ | मागणी | सुरक्षा अकुशल- ७४६ व सुरक्षा कुशल- ६७, एकूण- ८१३ |
| ३ | ई-निविदा प्रसिध्दी | दि.१२.०९.२०१९ ते दि.२६.०९.२०१९ |
| ४ | वृत्तपत्राच्या अधिसुचनेच्या व्यतिरिक्त चौकशी कशी पाठवली जाते ? | www.mahatenders.gov.in, संस्थान वेबसाईट |
| ५ | तर तसे, कोणाला पाठविले ? | -- |
| ६ | निविदा सुरु झालेची दिनांक व वेळ | दि.१२.०९.२०१९ रोजी सकाळी- ११.०० वा. |
| ७ | प्राप्त निविदाकारांची संख्या. | ०५ ( पाच ) |
| ८ | पात्र निविदाकारांची संख्या. | ०३ ( तीन ) |
| ९ | सर्व निविदाकारांनी नमुने दिली आहेत का. | निविदेत नमुने मागविलेले नाहीत. |
| १० | सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम आदा केली आहे का. | होय. |
| ११ | जर नमूने दिले नाही, तर का. | निविदेत नमुने मागविलेले नाहीत. |
| १२ | निविदाकारांनी सादर केलेले दर- | |

| अ.क्र | निविदाकाराचे नाव | सादर केलेले दर प्रती नग रु. | स्थिती |
|---|---|---|---|
| १. | मे.सेंट्रल इन्व्हेस्टीगेशन ॲण्ड सिक्युरिटी सर्व्हिसेस लि. मुंबई | २.९९% | L - 2 |
| २. | मे.मॉडर्न विर रेस सिक्युरिटी फोर्स प्रा.लि.पुणे | १.००% | L - 1 |
| ३. | मे.ईगल हंटर सोल्युशन लि. दिल्ली | १.००% | L - 1 |

१३ यापुर्वी केलेल्या खरेदीचा तपशील आणि खरेदी दर -

| अ.क्र. | वर्ष | परिमाण | (सेवा कर दर) |
|---|---|---|---|
| १ | सन २०१८– १९ करीता | -- | सर्व्हिस चार्जेस दर ०.००००००००००१ % |

१४ मागील वर्षात वापरण्यात आलेल्या परिमाणाचा तपशिल -

| अ.क्र | तपशील | वर्ष | खर्च परिमाण |
|---|---|---|---|
| १ | सुरक्षा व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी | २०१८ -१९ | -- |

| | | |
|---|---|---|
| १५ | सध्याची शिल्लक स्थिती | -- |
| १६ | मागील खरेदी दर | सर्व्हिस चार्जेस दर ०.००००००००००१ % |
| १७ | मागील पुरवठादार | १)मे.सेंट्रल इन्व्हेस्टीगेशन ॲण्ड सिक्युरिटी सर्व्हिसेस लि. मुंबई |
| १८ | सध्याचे न्युनतम निविदाकाराने सादर केलेले दर | १.००% |
| १९ | सध्याचे न्युनतम निविदाकाराचे नाव | १)मे.मॉडर्न विर रेस सिक्युरिटी फोर्स प्रा.लि.पुणे<br>२)मे.ईगल हंटर सोल्युशन लि.दिल्ली |
| २० | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला आहे का? | होय |
| २१ | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला असल्यास उपस्थितांची नावे. | मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, प्रशासकीय अधिकारी |
| २२ | घाऊक आणि किरकोळ दर यांचे तपशील अंदाजे रु. प्रति सेट मार्केट रेट रु. | |
| २३ | मागील खरेदी सध्याचे प्राप्त दर फरक % ने कमी / जास्त | |
| | रु.०.००००००००००१%रु.१.००%-- -- | |

संक्षिप्त टीप– मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२६.०२.२०१९, निर्णय क्र.११० अन्वये सन २०१९-२० कालावधीसाठी संस्थानला कंत्राटी सुरक्षा व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी नवीन कॉन्ट्रॅक्टर्सची नेमणूक करणेकामी व निविदा मागविणेस व तसेच जाहिरात प्रसिध्द करणेस व येणा-या खर्चास मान्यता

मिळालेली आहे. त्यानुसार www.mahatenders.gov.in, वसंस्थानचे वेबसाईटवर, वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करणेत आलेली होती.

सदर ई-निविदेमध्ये ०५ निविदा धारकांनी भाग घेतला होता. प्राप्त निविदा (तांत्रिक निविदा) दि.०५.११.२०१९ रोजी खरेदी समिती सभेसमोर उघडण्यात आले असून याकामी तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या ०३ निविदाधारकांच्या कमर्शिअल (वाणिज्यीक) निविदा दि.१८.१२.२०१९ रोजी खरेदी समिती सभेसमोर उघडणेत आलेल्या आहेत.

उघडण्यात आलेल्या वाणिज्यिक निविदेचा तपशिल पुढील प्रमाणे

| अ.नं. | कामाचा तपशिल | मे.सेंट्रल इन्व्हेस्टीगेशन ॲण्ड सिक्युरिटी सर्व्हिसेस, मुंबई यांचे दर % | मे.मॉडर्न विर रेस सिक्युरिटी फोर्स प्रा.लि.पुणे यांचे दर % | मे.ईगल हंटर सोल्युशन लि. पुणेयांचे दर % |
|---|---|---|---|---|
| १) | Service Charges ( in Percentage) for Supply of Security Guards (Ladies/Gents), Security Guards (Ex Servicemen), Security Supervisors, Security Gun men's, Security Officers, Gym Triner, Employees as mentioned on page no 10 of tender document (Excluding PF,GST, Group Insurance, Ex-gratia etc.) | २.९९ | १.०० | १.०० |

उपरोक्त तक्त्यात नमूद केलेप्रमाणे (१) मे.मॉडर्न विर रेस सिक्युरिटी प्रा.लि.पुणे व (२) मे.ईगल हंटर सोल्युशन लि., दिल्ली या दोनही निविदाधारकांचे दर हे १.००% (एक टक्का) असे न्यून्नतम (L–1) असल्याने, संबंधित दोनही निविदाधारकांना विषयांकित कामाचा कार्यादेश विभागून देता येईल.

तरी, कंत्राटी पध्दतीने कंत्राटी सुरक्षा व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरविणेबाबत निविदेतील न्युन्नतम(L-1) निविदाधारकमे.मॉडर्न विर रेस सिक्युरिटी फोर्स प्रा.लि.पुणे व मे.ईगल हंटर सोल्युशन लि., दिल्ली यांना विभागुन कार्यादेश देणेबाबतचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेपुढेसादर करण्यात आला होता.

मा. तदर्थ(Ad-hoc) समितीचे दिनांक १४/०१/२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र.३० नुसार " यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानला कंत्राटी पध्दतीने कंत्राटी सुरक्षा व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रीयेमध्ये मे.मॉडर्न विर रेस सिक्युरिटी प्रा.लि.पुणे व मे.ईगल हंटर सोल्युशन लि.,दिल्ली या दोघांचे दर समान असल्याने या दोघांना मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे पुढील सभेसमोर चर्चेसाठी बोलविण्यात यावे असे ठरले." त्यास अनुसरुन सदर ठेकेदारांना मा.तदर्थ(Ad-hoc) समितीचे सभेसमोर उपस्थित रहाणेकामी दुरध्वनीवरुन कळविण्यात आलेले आहे.

तरी,कंत्राटी पध्दतीने सुरक्षा व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी निविदेतील न्युनतम (L-1) निविदाधारक मे.मॉडर्न विर रेस सिक्युरिटी फोर्स प्रा.लि.पुणे व मे.ईगल हंटर सोल्युशन लि., दिल्ली यांचेशी चर्चा होऊन त्यांना विभागुन कार्यादेश देणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.७४** **प्रस्तुत प्रकरणी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमध्ये मे.मॉडर्न विर रेस सिक्युरिटी प्रा.लि.पुणे व मे.ईगल हंटर सोल्युशन लि.,दिल्ली या दोघांचे दर समान असल्याने या दोघांचे प्रतिनिधी आजचे मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. समितीने त्यांचेशी सविस्तर चर्चा केली. या चर्चेदरम्यान सुरक्षा रक्षकांच्या गैरप्रकारांना आळा घालण्याच्या दृष्टीने अशा गैरप्रकाराची चौकशी करण्याकरीता एक समिती नेमण्याचे ठरले. या समितीमध्ये Security Agency चा एक प्रतिनिधी व उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांचा समावेश असले. ही समिती सदर ठेकेदार एजन्सीच्या सुरक्षा रक्षकाने सशुल्क दर्शन रांगेतून विनापास अथवा पासांच्या संख्येपेक्षा जास्तीच्या व्यक्तीस सोडल्यास त्या सुरक्षा कर्मचाऱ्याची चौकशी करुन अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे पाठवील व त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी निर्णय घेतील. अशा जास्तीच्या किंवा विनापास सोडलेल्या प्रत्येक व्यक्तीसाठी पासाची किंमत रु.२००/-चे दुपटीची रक्कम म्हणजेच रु.४००/- प्रति व्यक्ती ठेकेदार एजन्सीकडून वसुल केली जाईल, असा निर्णय घेण्यात आला. हा निर्णय मान्य असल्याबाबतचे हमीपत्र**

**दोन्ही ठेकेदार एजन्सीने समितीसमोर सादर केले. ते या निर्णयाचा भाग समजण्यात यावा, व अशी समिती गठीत करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच सदर निर्णयाची अंमलबजावणी ठेकेदार एजन्सी यांना कार्यादेश दिल्यापासून एक महिन्यानंतर करण्यात यावी, असे ठरले.**

**We hereby undertake as follows:**

**We will follow all the rules and regulations of the sansthan for allowing a devotee inside the temple. In case of any mischief is committed by any employee, there shall be a Committee consisting of Deputy Chief Executive Officer and one representative of the Security Agency. The said committee shall take decision on the said mischief. In case the decision is positive, we agree that Rs.400/- per devotee sent inside the temple contrary to the rules Default committed through the paid pass entry point (double the amount of paid pass, prevalent at that time) it shall be deducted from the charges payable to our Security Company.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानला कंत्राटी पध्दतीने सुरक्षा व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमध्ये मे.मॉडर्न विर रेस सिक्युरिटी प्रा.लि.पुणे व मे.ईगल हंटर सोल्युशन लि., दिल्ली या दोघांचे १.००% हे निम्नतम दर समान असल्याने सदरचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन या दोघांना समान काम विभागुन व कामाचे ठिकाण स्वतंत्रपणे ठरवुन देऊन कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- कामगार विभाग)**

---

**विषय नं.३०** **श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टँडबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट सन २०२०-२०२१ या वर्षासाठी देणेकामी मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही एका प्रयोजनासाठी करण्यात येईल:-

( क). मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडीच्या ०१).मंदिर परीसर,०२).साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम), ०३).श्री साईबाबा हॉस्पीटल + साईनगर,०४). व्दारावती भक्तनिवास + श्री साईनाथ हॉस्पिटल, ०५).श्री साई प्रसादालय,०६). साईआश्रम भक्तनिवास,०७). साई धर्मशाळा,०८). पाणीपुरवठा साठवण तलाव, ०९). साईआश्रम भक्तनिवास ए.सी. या वेगवेगळया ठिकाणी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून वीजपुरवठा घेण्यात आलेला आहे. महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचा वीजपुरवठा काही कारणास्तव वेळोवेळी खंडीत होतो. मोठे दुरुस्तीचे कामे चालू असल्यास महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून २४ तास ते ४८ तास देखील वीजपुरवठा बंद ठेवला जातो. अशा काळात संस्थानचे कामकाज सुरळीत चालावे व गर्दीत, अंधारात काही अनुचीत घटना घडू नये म्हणून पर्यायी वीजपुरवठयासाठी ठिकठिकाणी २३ नग जनसेट बसविण्यात आलेले आहे. हे सर्व जनरेटर सुस्थितीत कार्यान्वित असणे गरजेचे आहे. त्याकरीता यासर्व जनरेटरच्या इंजिनची काही ठरावीक कालावधीत इंजिन आईल, डिझेल फिल्टर, ऑईल फिल्टर, बायपास फिल्टर, कुलंट फिल्टर बदली करुन बी चेक सर्व्हिसिंग करणे गरजेचे असते. तसेच काही फॉल्ट झाल्यास तातडीने दुरुस्त करुन जनसेट कार्यान्वित करणे गरजेचे असते. ऑईल फिल्टर व इतर मटेरीअल हे जनरेटर उत्पादक कंपनीचे वापरणे फायदेशिर असते.हे सर्व मटेरीअल आपल्याकडे उपलब्ध नसते. म्हणून जनरेटर इंजिनची सर्व्हिसिंग हे जनरेटर इंजिन उत्पादक कंपनीचे अधिकृत सर्व्हिस डिलर यांचेकडून करुन घेणे गरजेचे असते. जनसेटचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | जनसेट ठिकाण | जनसेट क्षमता | ईएसएन क्र. | मॉडेल क्र. | संख्या |
|---|---|---|---|---|---|
| ०१) | श्री साई मंदिर परीसर (नविन) | ५०० केव्हीए | २५२६०००३ | व्हीटीए-२८-जी. | ०१ नग. |
| ०२) | श्री साई मंदिर परीसर (जुना) | ५०० केव्हीए | २५१६७८०९ | व्हीटीए-१७१०-जी. | ०१ नग. |
| ०३) | साईबाबा भक्तनिवासस्थान(५०० रुम) | ५०० केव्हीए | २५२४२३१७ | व्हीटीए-२८-जी. | ०१ नग. |
| ०४) | साईबाबा भक्तनिवासस्थान(५०० रुम) | १०० केव्हीए | २५१८७२९६ | एनटी-४९५-जी. | ०१ नग. |
| ०५) | श्री साईबाबा हॉस्पीटल + साईनगर | १०१० केव्हीए | २५३६५८०५ | केटीए-३८-जी-५ | ०१ नग. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ०६) | श्री साईबाबा हॉस्पीटल + साईनगर | ५०० केव्हीए | २५३५०२८१ | केटीए-१९-जी-९ | ०१ नग. |
| ०७) | व्दारावती भक्तनिवास + श्री साईनाथ हॉस्पिटल | २५० केव्हीए | २५२४९०८५ | एनटीए-८५५-जी. | ०१ नग. |
| ०८) | व्दारावती भक्तनिवास + श्री साईनाथ हॉस्पिटल | २५० केव्हीए | २५२४९२८५ | एनटीए-८५५-जी. | ०१ नग. |
| ०९) | श्री साई प्रसादालय | ५०० केव्हीए | २५३२०२७१ | केटीए-१९-जी-९ | ०१ नग. |
| १०) | श्री साई प्रसादालय | २५० केव्हीए | २५२४९०८७ | एनटीए-८५५-जी. | ०१ नग. |
| ११) | साईआश्रम भक्तनिवास | ५०० केव्हीए | २५३६९१६६ | केटीए-१९-जी-९ | ०१ नग. |
| १२) | साईआश्रम भक्तनिवास | ५०० केव्हीए | २५३६७६०४ | केटीए-१९-जी-९ | ०१ नग. |
| १३) | साई धर्मशाळा | ५०० केव्हीए | २५३५०९७० | केटीए-१९-जी-९ | ०१ नग. |
| १४) | साई धर्मशाळा | ५०० केव्हीए | २५३०९०२८ | केटीए-१९-जी-९ | ०१ नग. |
| १५) | साईआश्रम भक्तनिवास ए.सी. | ३२० केव्हीए | २५३८१०५७ | एनटीए-८५५-जी-२-I | ०१ नग. |
| १६) | साईआश्रम भक्तनिवास ए.सी. | ३२० केव्हीए | २५३८१०५८ | एनटीए-८५५-जी-२-I | ०१ नग. |
| १७) | पाणीपुरवठा साठवण तलाव | २५० केव्हीए | २५७६९५२९ | ६ सीटीएए ८.३-६४ | ०१ नग. |
| १८) | पाणीपुरवठा साठवण तलाव | १०० केव्हीए | २५१५४५१४ | एनटीए-४९५-जी | ०१ नग. |
| १९) | रथपालखी (सिंगल फेज) | १५ केव्हीए | ३०९७४ | F1-7G1 | ०१ नग. |
| २०) | इर्मजन्सी(थ्री फेज)(स्पेअर) | १०केव्हीए | SC21300645 | X13G2 | ०१ नग. |
| २१) | शांतिनिकेतन | १५ केव्हीए | D21022-0300022 | DM 20 | ०१ नग. |
| २२) | बसस्थानक भक्तनिवास | ६२.५ केव्हीए | ७२०३११८४ | ४ बीटीटीई ३.३ जी ११ | ०१ नग. |
| २३) | फायर ॲण्ड सेफ्टी विभाग | ५० केव्हीए | ७२०३७५२१ | ४ बीटीटीई ३.३ जी १ | ०१ नग. |

मागील वर्षी श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थेच्या सर्व पॉवरींग स्टॅण्डबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट दि.०१-०२-२०१९ ते दि.३१-०१-२०२० या कालावधीकरीता देणेकामी महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.in या वेबसाईटवर जाहीरात प्रसिध्द करुन ई-निविदा बोलविण्यात येऊन प्राप्त ई-निविदांमधील निम्नतम दर दिलेले निविदाधारक मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद यांचेशी दि.२२-०१-२०१९ रोजी मा.स्थानिक उपसमितीचे सभेत दराबाबत चर्चा झाल्यानंतर मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद यांनी रक्कम रु. ४०,५०,०००/- मात्र दर देऊ केले. मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०-०१-२०१९ रोजीचे सभेतील आयत्या वेळेचा विषय नं.०१ निर्णय ७४ (०४) अन्वये यावर सविस्तर चर्चा होऊन,श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टॅण्डबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे दि.०१-०२-२०१९ ते दि.३१-०१-२०२० या कालावधीकरीता सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट देणेकामी निम्नतम निविदाधारक मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद यांनी चर्चेअंती देऊ केलेली रक्कम रु. ४०,५०,०००/- मात्र अंतिम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असा निर्णय झाला होता. व त्यानुसार श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टॅण्डबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे दि.०१-०२-२०१९ ते दि.३१-०१-२०२० या कालावधीकरीता सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट देणेकामी जा.नं.एसएसएसटी/विद्युत/५४८३/२०१९ दि.१३-०२-२०१९ अन्वये मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद यांना रक्कम रु. ४०,५०,०००/- मात्र रकमेचा कार्यादेश देण्यात आलेला आहे. मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, नाशिक हे मे.कमिन्स यांचे अहमदनगर, नाशिक, जळगांव व औरंगाबाद जिल्ह्याकरीता कंपनी मान्यताप्राप्त एकमेव अधिकृत सर्व्हीस डिलर आहेत. या सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट कालावधीमध्ये त्यांनी उत्तमरित्या सर्व्हिस दिली असून सर्व जनसेट सुरळीत कार्यान्वित आहेत. आता या सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टचा कालावधी दि.३१-०१-२०२० रोजी संपत आहे.

उपरोक्त सर्व २३ नग जनसेट नेहमी कार्यान्वित राहावे म्हणून वेळोवेळी सर्व्हिसिंग करणे गरजेचे असते. त्यामुळे श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टॅण्डबाय २३ नग जनरेटरसेटच्या डिझेल इंजिनचे सन २०२०-२०२१ या वर्षाकरीता वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट देणे गरजेचे आहे.

याबाबत दिनांक ०४.१२.२०१९ रोजी झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे संस्थानचे सर्व पॉवरींग स्टॅंडबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट सन २०२०-२०२१ या वर्षासाठी देणेकामी

तसेच येणा-या अंदाजे रक्कम रु.४१,००,०००/- (अक्षरी रक्कम रु.एक्केचाळीस लाख) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

दि.०४-१२-२०१९ चे सभेतील विषय नं.४१ निर्णय क्र.५२० अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टॅन्डबाय जनसेटच्या डिझेल इंजिनची तपशीलवार माहिती (उदा.खरेदी दिनांक, खरेदी किंमत इ.सह) तसेच दि.०१-०२-२०१९ ते दि.३१-०१-२०२० या कालावधीकरीता दिलेल्या सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टमध्ये मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद यांनी केलेल्या देखभालीचे स्वरुप ( उदा.कोणकोणते स्पेअरपार्टस् खराब झाले, बदलावे लागले. किती वेळा **AMC** ला **Call** लॉग केले इ.) याबाबतचा सविस्तर प्रस्ताव तक्त्याच्या स्वरुपात तदर्थ (**Ad-hoc**) समितीसमोर सादर करावा, असे ठरले.

त्यानुसार दि.०४-१२-२०१९ रोजीचे सभेतील निर्णयानुसार सोबत तपशिलवार तक्ता जोडलेला आहे.

मागणी:- श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टॅण्डबाय २३ नग जनसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट सन-२०२०-२०२१ या वर्षाकरीता देणेकामी अंदाजे रक्कम रु.४१,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये एक्केचाळीस लाख) मात्र खर्च येणे अपेक्षित आहे. तरी श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टँडबाय २३ नग जनसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट सन-२०२०-२०२१ या वर्षासाठी देणेकरीता येणा-या खर्चास व शासनाच्या वेबसाईटवर ई-निविदा प्रकाशित करुन मे.कमिन्स कंपनीचे अधिकृत सर्व्हीस डिलर यांचेकडून ई-निविदा मागविणेस तसेच जादा खपाच्या मुंबई येथील इंग्रजीतील एका वर्तमानपत्रात, पुणे येथील मराठीतील एका वर्तमानपत्रात तसेच स्थानिक मराठीतील एका वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन ई-निविदा बोलविणेस तसेच येणा-या अंदाजे रक्कम रु.४१,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये एक्केचाळीस लाख) मात्रचे खर्चास मान्यता मिळावी, ही विनती.

**निर्णय क्र.७५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टँडबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट सन २०२०-२०२१ या वर्षासाठी देणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.४१,००,०००/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-विद्युत विभाग)**

---

**विषय नं.३१** **"श्री रामनवमी उत्सव-२०२०" मध्ये दि.०१.०४.२०२० ते दि.०३.०४.२०२० अखेर श्री साई मंदिर व मंदिर परिसरात विद्युत रोषणाई करणेस व देखावा उभारणीसाठी येणाऱ्या खर्चाबाबत.**

**विषय नं.३२** **व्दारावती भक्तनिवास इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावरील प्रत्येक रुममध्ये बसविण्यात येणाऱ्या ए.सी.तसेच टि.व्ही.संचाकरीता वायरींग काम करणेकामी उघडण्यात आलेल्या निविदांमधील न्युनतम दर निवीदाधारकांशी चर्चा/वाटाघाटी होऊन निर्णय होणेबाबत.**

**विषय नं.३३** **श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शन रांग इमारत बांधकाम प्रकल्पातील ESS (Electrical Substation) इमारतीचे बांधकामाकरीता मंजुर रेखांकनात ॲमेनिटी स्पेस म्हणून दक्षिण-पुर्व कोपऱ्यात (गेट नं.०२ समोर) दर्शविलेली सर्व्हे नं.२/४,३/१ व ३/७ मधील १२७५ चौ.मिटर जागा ठेकेदार यांना उपलब्ध करुन देणेबाबत तसेच कनेक्टींग कॉरीडॉरचे कामासाठी सध्या कार्यरत असलेला Electrical Transformer स्थलांतरीत करणेबाबत.**

**विषय नं.३४** **नव्याने बांधकाम करणेत आलेले शैचालयाचे 'पे ॲन्ड युज' तत्वावर चालविणेस देणेबाबत.**

**विषय नं.३५** **मंदिरातुन निघणारे हार व फुलांचे निर्माल्यापासून तयार करणेत येणाऱ्या अगरबत्ती पाकीटावर संस्थानचे नावाचा उल्लेख करणेबाबत.**

**निर्णय क्र.७६** **उपरोक्त विषय नंबर ३१ ते ३५ या विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.**

---

**विषय नं.३६** **सन २०२०-२१ मधील (दि.०१.०३.२०२० ते दि.२८.०२.२०२१) करीता साईआश्रम भक्तनिवास, साईधर्मशाळा विभागाकरीता यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबीग, स्वच्छता इ. दुरुस्ती व देखभालीची कामे व व्दारावती भक्तनिवास विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, स्वच्छता कामे आऊटसोर्स ठेकेदाराकडून करुन घेणेकामी दैनिक वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद:- २१ (१) (ग) "भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी /सुविधा पुरविणे." व (२) पोट कलम (१) (ख) "भक्तांना राहण्यासाठी व वापर करण्याकरीता विश्रामगृहे बांधणे व त्याची देखभाल करणे."

प्रस्तावीक:- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ चे तरतुदीनुसार श्रींचे दर्शनासाठी राज्यभरातून, देशभरातून, देश-विदेशातून येणा-या साईभक्तांचे निवासाचे सोयीसाठी साईआश्रम भक्तनिवास विभागात एकूण १५३६ खोल्या, साई धर्मशाळा विभागात १९२ हॉल व व्दारावती भक्तनिवास विभागात ३१६ खोल्या वापरात आहेत. या विभागांतील निवासी साईभक्तांना अधिकाधिक चांगली सेवा सुविधा उपलब्ध व्हावी याकरीता यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग विद्युत, प्लंबींग स्वच्छता इ. दुरुस्ती व देखभालीची कामे आऊटसोर्स ठेकेदारामार्फत करुन घेतले जाते.

सन २०१९-२० मधील दि.०१/०२/२०१९ ते दि.२९/०२/२०२० करीता साईआश्रम भक्तनिवास, साई धर्मशाळा विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबीग, स्वच्छता इ. दुरुस्ती व देखभालीची कामे व व्दारावती भक्तनिवास विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग/स्वच्छता कामे आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि.१३/१२/२०१८ रोजीचे सभेतील आयत्या वेळेचा विषय नं.१३ निर्णय क्र.७८३ नुसार यापुर्वी साईआश्रम भक्तनिवास, साई धर्मशाळा व व्दारवती भक्तनिवास निवासस्थानाकरीता कर्मचारी संख्या निश्चित करुन व त्याचा आकृतीबंध तयार करुन ई-निविदा प्रक्रिया राबविली जात होती. त्याऐवजी व्दारावती भक्तनिवास विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग/स्वच्छता व साईआश्रम भक्तनिवास, साईधर्मशाळा विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबिंग इ. मेन्टेन्स/स्वच्छता कामाचे स्वरुप निश्चित करुन सदरची कामे ठोक पध्दतीने करुन देणेबाबत ई-निविदेत नमुद करुन ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी, असे ठरले.

त्यानुसार कामाचे स्वरुप निश्चित करुन ई-निविदा मागविणेत येऊन मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/०१/२०१९ रोजीचे सभेतील आयत्या वेळेचा विषय नं.१३,१४,१५ निर्णय क्र.८६,८७, ८८ नुसार अनुक्रमे साईआश्रम भक्तनिवास, साई धर्मशाळा विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबीग, स्वच्छता इ. दुरुस्ती व देखभालीची कामे कामाचे स्वरुप निश्चित करुन ठोक पध्दतीने करुन देणेकामी बी.व्ही.जी.इंडिया,लि पुणे यांचे व व्दारावती भक्तनिवास विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग/स्वच्छता कामे कामाचे स्वरुप निश्चित करुन ठोक पध्दतीने करुन देणेकामी स्पिक एन स्पॅन सर्व्हिसेस, मुंबई यांचे दर निम्नतम असल्याने त्यांना दि.०१/०२/२०१९ ते दि.२९/०२/२०२० या कालावधीसाठी कार्यादेश खालील कोष्टकात नमुद केलेप्रमाणे कार्यादेश देण्यात आला आहे.

| विभागाचे नाव | स्वच्छता कामी मशिनरी संख्या | इतर साहीत्य | GST वगळून दरमहा रक्कम रु. | १८%GST सह दरमहा रक्कम रु. | GST वगळून वर्षाला रुपये | १८%GST सह वर्षाला येणारा खर्च रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| साईआश्रम भक्तनिवास | ७९ | १६१ | ६९,४६,०००/- | ८१,९६,२८०/- | ८,३३,५२,०००/- | ९,८३,५५,३६०/- |
| साईधर्मशाळा | ४० | ७५ | २८,०१,०००/- | ५,०४,१८०/- | ३,३६,१२,०००/- | ३,९६,६२,१६०/- |
| व्दारावती भक्तनिवास | ०८ | ३७ | ९,९९,७३०/- | ११,७९,६८१/- | १,१९,९६,७६०/- | १,४१,५६,१७२/- |

मागणी:- उपरोक्त कोष्टकात नमुद केलेप्रमाणे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार साईआश्रम भक्तनिवास, साई धर्मशाळा विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबीग, स्वच्छता इ. दुरुस्ती व देखभालीची कामे कामाचे स्वरुप निश्चित करुन ठोक पध्दतीने करुन देणेकामी बी.व्ही.जी.इंडिया,लि पुणे यांचे व व्दारावती भक्तनिवास विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग/स्वच्छता कामे कामाचे स्वरुप निश्चित करुन ठोक पध्दतीने करुन देणेकामी स्पिक एन स्पॅन सर्व्हिसेस, मुंबई यांचे दर निम्नतम असल्याने त्यांना दि.०१/०२/२०१९ ते दि.२९/०२/२०२० या कालावधीसाठी देण्यात आलेल्या कार्यादेशाची मुदत दि.२९/०२/२०२० रोजी संपुष्टात येत असल्याने, सन २०२०-२१ मधील दि.०१/०३/२०२० ते दि.२८/०२/२०२१ या कालावधीकरता दैनिक वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा प्रक्रिया राबवावी लागणार आहे.

सन २०२०-२१ करीता साईआश्रम भक्तनिवास, साईधर्मशाळा व व्दारावती भक्तनिवास विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबीग, स्वच्छता इ. दुरुस्ती व देखभालीची कामे

पदनिहाय मनुष्यबळ संख्या नमुद करुन देणे कामी ई-निविदा प्रक्रिया राबविणेकामी खालील तक्त्यात नमुद प्रमाणे मनुष्यबळ संख्येसह खर्च अपेक्षित आहे.

१) साईआश्रम भक्तनिवास पदनिहाय मनुष्यबळ संख्याचा तपशील खालीलप्रमाणे.

विभागातील बारा इमारती, संपुर्ण परिसर, कॅन्टीन, बस सेवा व कार्यालयाचे हाऊसकिपींग (आऊटसोर्सिंग) कामासाठी आवश्यक मनुष्यबळाचा तपशील.

| | | अ.नं. | पदनाम | मनुष्यबळ संख्या | | एकूण मनुष्यबळ |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | कुशल | अकुशल | |
| अ | हाऊसकिपींग कामासाठी | १ | जनरल मॅनेजर | १ | - | |
| | (बॅटरी कार वाहन चालक, कॅन्टीन व बस | २ | पर्यवेक्षक | १८ | - | |
| | वरील मदतनिस कर्मचारी-यांसह) | ३ | लिपीक टंकलेखक | ३६ | - | |
| | | ४ | बॅटरी कार ऑपरेट चालक | ६ | - | |
| | | ५ | स्टोअर किपर | १ | - | |
| | | ६ | मुकादम | ३ | - | |
| | | ७ | मदतनिस (१५६+३६) | - | १९२ | |
| | | ८ | शिपाई | - | २ | |
| | | ९ | स्वच्छता कर्मचारी | - | १५४ | |
| | हाऊसकिपींग कामासाठी एकूण कर्मचारी संख्या | | | ६५ | ३४८ | ४१३ |
| ब | विद्युत मेन्टनेन्स | १० | तारतंत्री | ७ | - | |
| | | ११ | एसी मॅकेनिक | २ | - | |
| | | १२ | सोलर ऑपरेटर | २ | - | |
| | | १३ | तारतंत्री – मदतनीस | - | ७ | |
| | | १४ | एसी मदतनीस | - | २ | |
| | | १५ | लिफ्ट ऑपरेटर | - | ३९ | |
| | | १६ | जनरेटर ऑपरेटर | ३ | - | |
| | | १७ | वेल्डर | ३ | - | |
| | विद्युत मेन्टनन्स कामासाठीएकूण कर्मचारी संख्या | | | १७ | ४८ | ६५ |
| क | प्लंबींग मेन्टनेन्स | १८ | प्लंबर | ३ | - | |
| | | १९ | प्लंबर मदतनीस | - | ६ | |
| | | २० | पंपमन | ६ | - | |
| | | २१ | **STP** प्लॅन्ट मदतनीस | - | ३ | |
| | | २२ | मदतनिस(कार्यालय) | - | १ | |
| | | २३ | मदतनिस(हौद व टाक्या साफ सफाई करणेकामी) | - | ५ | |
| | प्लंबींग मेन्टनन्स कामासाठी एकूण कर्मचारी संख्या | | | ९ | १५ | २४ |
| ड | सुतारी,गंवडी व रंगकाम मेन्टनन्स | २४ | गंवडी कारागीर | ५ | - | |
| | | २५ | सुतार कारागीर | ५ | - | |
| | | २६ | पेंटर कारागीर | ४ | - | |
| | | २७ | गंवडी, सुतार, मदतनिस | - | २० | |
| | गंवडी,सुतार व रंगकाम मेन्टनन्स कामासाठी एकूण कर्मचारी संख्या | | | १४ | २० | ३४ |
| | | | | १०५ | ४३१ | ५३६ |
| नियमीत दररोज कुशल १०५ व अकुशल ४३१ असे एकूण ५३६ कर्मचारी मनुष्यबळ पुरवावे लागेल. | | | | | | |

२. साई धर्मशाळा पदनिहाय मनुष्यबळ संख्याचा तपशील खालीलप्रमाणे.

| | तपशील | अ.नं. | पदनाम | मनुष्यबळ संख्या | | एकुण मनुष्यबळ |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | कुशल | अकुशल | |
| अ | हाऊसकिपींग कामासाठी | १ | जनरल मॅनेजर | १ | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | २ | पर्यवेक्षक | ४ | | |
| | | ३ | लिपीक टंकलेखक | ११ | | |
| | | ४ | स्टोअर किपर | १ | | |
| | | ५ | मुकादम | ३ | | |
| | | ६ | मदतनीस | | ५६ | |
| | | ७ | शिपाई | | १ | |
| | | ८ | स्वच्छता कर्मचारी | | ११७ | |
| | हाऊसकिपींग कामासाठी एकुण कर्मचारी संख्या | | | २० | १७३ | १९३ |
| ब | विद्युत मेटेनन्स | ९ | जनरेटर व पॅनेल ऑपरेटर | ०३ | | |
| | | १० | तारतंत्री | ०३ | | |
| | | ११ | तारतंत्री मदतनीस | | ०३ | |
| | विद्युत मेटेनन्स कामासाठी एकुण कर्मचारी संख्या | | | ०६ | ०३ | ०९ |
| क | मेकॅनिकल विभाग | १२ | सोलर ऑपरेटर | ०१ | | |
| | मेकॅनिकल मेटेनन्स कामासाठी एकुण कर्मचारी संख्या | | | ०१ | | ०१ |
| ड | प्लंबींग मेटेनन्स | १३ | प्लंबर | ०३ | | |
| | | १४ | प्लंबर मदतनिस | | ०३ | |
| | | १५ | पंपमन | | ०३ | |
| | | १६ | एस टी पी मदतनीस | | ०३ | |
| | प्लंबींग मेटेनन्स कामासाठी एकुण कर्मचारी संख्या | | | ०३ | ०९ | १२ |
| इ | सुतार मेटेनन्स | १७ | सुतार कारागीर | ०३ | | |
| | | १८ | गंवडी | ०३ | | |
| | | १९ | सुतार,गंवडी मदतनीस | | १० | |
| | गंवडी,सुतार,रंगकाम मेटेनन्स कामासाठी एकुण कर्मचारी संख्या | | | ०६ | १० | १६ |
| | | | एकुण कर्मचारी | ३६ | १९५ | २३१ |
| नियमीत दररोज कुशल ३६ व अकुशल १९५ असे एकुण २३१ कर्मचारी मनुष्यबळ पुरविले जाईल.<br>टिप – लिफ्ट सुविधा चालु झाल्यास २५ (अकुशल कर्मचारी) पुरवावे लागतील. | | | | | | |

२) व्दारावती भक्तनिवास पदनिहाय मनुष्यबळ संख्याचा तपशील खालीलप्रमाणे.

| | कामगारांची आवश्यकता | |
|---|---|---|
| अ.नं. | पदनाम | संख्या |
| १ | जनरल मॅनेजर **Unit in – charge** | ०१ |
| २ | पर्यवेक्षक **Shift Supervisor** | ०३ |
| ३ | मदतनीस **Room Attendent** | २४ |
| ४ | भांडार लिपीक **Store Clerk** | ०१ |
| ५ | सोलर मेन्ट्नन्स **Solar Maintenace** | ०१ |
| ६ | स्वच्छता कामगार **House keeper** | ४६ |
| | एकुण मनुष्यबळ संख्या | ७६ |

उपरोक्त प्रमाणे पदनिहाय मनुष्यबळ संख्या निश्चित करुन नव्याने सन २०२०-२१ करीता ई-निविदा राबवितांना यापुर्वी सन २०१८-१९ या वर्षामध्ये पदनिहाय मनुष्यबळ संख्येनुसार एम.पी.एन्टरप्रायजेस, पुणे यांना दि.०१/०३/२०१८ ते दि.२८/०२/२०१९ अखेर कार्यादेश देण्यात आला होता. परंतू सदर ठेकेदाराचे काम समाधानकारक नसल्याने त्यांचा कार्यादेश दि.१५/१०/२०१८ रोजी रद्द करण्यात येऊन, संस्थानचे इतर विभागात कार्यरत असलेल्या इतर ठेकेदारांकडून दरपत्रके मागवून निम्नतम दरधारकाकडून कामे करुन घ्यावे असे ठरले होते त्यानुसार बी.व्ही.जी.इंडिया लि पुणे यांचे दर निम्नतम असल्याने त्यांना दि.१५/१०/२०१८ ते नवीन ठेकेदाराची

नेमणूक होईपावेतो देण्यात आलेल्या कार्यादेशाचा आधार घेऊन साईआश्रम भक्तनिवास, साई धर्मशाळा व व्दारावती भक्तनिवास विभागाकरीता खालील तक्त्यात नमुद प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| विभागाचे नाव | बी.व्ही.जी.इंडिया लि पुणे यांचे दर GST वगळून प्रति महा दर रु. | GST वगळून वार्षिक दर रु. | २०% वाढ गृहित धरुन अपेक्षित खर्च रु | GST वगळून एकूण अपेक्षित खर्च रुपये |
|---|---|---|---|---|
| साईआश्रम भक्तनिवास | ८०,९३,०६८ | ९,७१,१६,८१६ | १,९४,२३,३६३ | ११,६५,४०,१७९ |
| साई धर्मशाळा | ३४,७१,१७० | ४,१६,५४,०४० | ८३,३०,८०८ | ४,९९,८४,८४८ |
| व्दारावती भक्तनिवास | ११,५३,२२७ | १,३८,३८,७२४ | २७,६७,७४५ | १,६६,०६,४६९ |
| एकूण रक्कम रु. | १,२७,१७,४६५ | १५,२६,०९,५८० | ३,०५,२१,९१६ | १८,३१,३१,४९६ |

विभागाचे स्पष्ट मत/अभिप्राय –

१) सन २०२०-२१ मधील (दि.०१/०३/२०२० ते दि.२८/०२/२०२१) करीता साईआश्रम भक्तनिवास विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबीग, स्वच्छता इ. दुरुस्ती व देखभालीची कामे पदनिहाय मनुष्यबळ संख्या निश्चित करुन आऊटसोर्स ठेकेदाराकडून करुन घेणेकामी दैनिक वर्तमान पत्रात ई-निविदा प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या **GST** वगळून अपेक्षित खर्च रुपये.**११,६५,४०,१७९**/- (अक्षरी रु.अकरा कोटी पासष्ट लाख चाळीस हजार एकशे एकोणऐंशी) मात्र खर्चास,

२) सन २०२०-२१ मधील (दि.०१/०३/२०२० ते दि.२८/०२/२०२१) करीता साई धर्मशाळा विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबीग, स्वच्छता इ. दुरुस्ती व देखभालीची कामे पदनिहाय मनुष्यबळ संख्या निश्चित करुन आऊटसोर्स ठेकेदाराकडून करुन घेणेकामी दैनिक वर्तमान पत्रात ई-निविदा प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या **GST** वगळून अपेक्षित खर्च रुपये.४,९९,८४,८४८/- (अक्षरी रु.चार कोटी नव्यान्नव लाख चौ-याऐंशी हजार आठशे आठेचाळीस) मात्र खर्चास,

३) सन २०२०-२१ मधील (दि.०१/०३/२०२० ते दि.२८/०२/२०२१) करीता व्दारावती भक्तनिवास विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग/स्वच्छता कामे पदनिहाय मनुष्यबळ संख्या निश्चित करुन आऊटसोर्स ठेकेदाराकडून करुन घेणेकामी दैनिक वर्तमान पत्रात ई-निविदा प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या **GST** वगळून अपेक्षित खर्च रुपये.**१,६६,०६,४६९**/- (अक्षरी रु.एक कोटी सहासष्ठ लाख सहा हजार चारशे एकोणसत्तर) मात्र खर्चास,

उपरोक्त अ.नं ०१,०२ व ०३ नुसार तीनही विभागाकडील हाऊसकिपींग कामाकरीता दैनिक वर्तमानपत्रात एकत्रित ई-निविदा जाहिरात प्रसिध्द करुन ठेकेदाराकडून तीनही विभागाकरीता स्वतंत्र पदनिहाय मनुष्यबळ संख्या रविणेकामी ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या **GST** वगळून अंदाजे एकूण रक्कम रु.**१८,३१,३१,४९६**/- (अक्षरी रु.आठरा कोटी एकतीस लाख एकतीस हजार चारशे शहान्नव) मात्रचे खर्चास,

उपरोक्त प्रस्तावास मान्यता मिळणेकामी सदर प्रस्ताव मा.तदर्थ (**Ad-hoc**) समिती सभेसमोर सादर.

**निर्णय क्र.७७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०२०-२१ मधील (दि.०१.०३.२०२० ते दि.२८.०२.२०२१) करीता साईआश्रम भक्तनिवास, साईधर्मशाळा विभागाकरीता यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबीग, स्वच्छता इत्यादी दुरुस्ती व देखभालीची कामे व व्दारावती भक्तनिवास विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग,स्वच्छता कामे आऊटसोर्स ठेकेदाराकडून करुन घेणेकामी तीनही विभागाकरीता स्वतंत्र पदनिहाय मनुष्यबळ संख्या पुरविणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या GST वगळून अंदाजे रक्कम रु.१८,३१,३१,४९६/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच याकामी मान्यतेसाठी मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांचेकडे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात यावे, असे ठरले.**

**(कार्यवाही- साईआश्रम भक्तनिवास, साईधर्मशाळा, व्दारावती भक्तनिवास/ विधी विभाग)**

---

**विषय नं.३७** **साईआश्रम भक्तनिवासस्थान,साईधर्मशाळा विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबींग, स्वच्छता इ.दुरुस्ती व देखभालीची कामे व्दारावती भक्तनिवास विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग/स्वच्छता कामे सध्या कार्यरत आऊटसोर्स ठेकेदाराकडून ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होई पावेतो आहे त्याच मंजूर दरात करुन घेणेकामी मुदतवाढ कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद:- २१(१) (ग) "भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी /सुविधा पुरविणे." व (२) पोट कलम (१) (ख) "भक्तांना राहण्यासाठी व वापर करण्याकरीता विश्रामगृहे बांधणे व त्याची देखभाल करणे."

प्रस्तावीक:- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ चे तरतुदीनुसार श्रींचे दर्शनासाठी राज्यभरातून, देशभरातून, देश-विदेशातून येणा-या साईभक्तांचे निवासाचे सोयीसाठी साईआश्रम भक्तनिवासविभागात एकूण १५३६ खोल्या, साईधर्मशाळा विभागात १९२ हॉल व व्दारावती भक्तनिवास विभागात ३१६ खोल्यावापरातआहेत. या विभागांतील निवासी साईभक्तांना अधिकाधिक चांगली सेवा सुविधा उपलब्ध व्हावी याकरीता यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग विद्युत, प्लंबींग स्वच्छता इ. दुरुस्ती व देखभालीची कामे आऊटसोर्स ठेकेदारामार्फत करुनघेतले जाते.

सन २०१९-२० मधील दि.०१/०२/२०१९ ते दि.२९/०२/२०२० करीता साईआश्रम भक्तनिवास, साईधर्मशाळा विभागाकडील यांत्रिकीकरणासहहाऊसकिपींग, विद्युत, प्लंबीग, स्वच्छता इ. दुरुस्ती व देखभालीची कामे व व्दारावती भक्तनिवास विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग/स्वच्छता कामे आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामीमा.व्यवस्थापन समितीचे दि.१३/१२/२०१८ रोजीचे सभेतील आयत्या वेळेचा विषय नं.१३ निर्णय क्र.७८३ नुसार यापुर्वी साईआश्रम भक्तनिवास, साईधर्मशाळा व व्दारवती भक्तनिवास निवासस्थानाकरीता कर्मचारी संख्या निश्चित करुन व त्याचा आकृतीबंध तयार करुन ई-निविदा प्रक्रिया राबविली जात होती. त्याऐवजी व्दारावती भक्तनिवास विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग/स्वच्छता व साईआश्रम भक्तनिवास, साईधर्मशाळा विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबिंग इ. मेन्टेन्स/स्वच्छता कामाचे स्वरुप निश्चित करुन सदरची कामे ठोक पध्दतीने करुन देणेबाबत ई-निविदेत नमुद करुन ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी, असे ठरले.

त्यानुसार कामाचे स्वरुप निश्चित करुन ई-निविदा मागविणेत येऊन मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/०१/२०१९ रोजीचे सभेतील आयत्या वेळेचा विषय नं.१३,१४,१५ निर्णय क्र.८६,८७, ८८ नुसार अनुक्रमे साईआश्रम भक्तनिवास, साईधर्मशाळा विभागाकडील यांत्रिकीकरणासहहाऊसकिपींग, विद्युत, प्लंबीग, स्वच्छता इ. दुरुस्ती व देखभालीचीकामे कामाचे स्वरुप निश्चित करुन ठोक पध्दतीने करुन देणेकामी बी.व्ही.जी.इंडिया,लि पुणे यांचे व व्दारावती भक्तनिवास विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग/स्वच्छताकामे कामाचे स्वरुप निश्चित करुन ठोक पध्दतीने करुन देणेकामी स्पिक एन स्पॅन सर्व्हिसेस, मुंबई यांचे दर निम्नतम असल्याने त्यांना दि.०१/०२/२०१९ ते दि.२९/०२/२०२० या कालावधीसाठी कार्यादेश खालील कोष्टकात नमुद केले प्रमाणे कार्यादेश देण्यात आला आहे.

| विभागाचे नाव | स्वच्छता कामी मशिनरी संख्या | इतर साहीत्य | GST वगळून दरमहा रक्कम रु. | १८%GST सह दरमहा रक्कम रु. | GST वगळून वर्षाला रुपये | १८% GST सह वर्षाला येणारा खर्च रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| साईआश्रम भक्तनिवास | ७९ | १६१ | ६९,४६,०००-/ | ८१,९६,२८०-/ | ८,३३,५२,०००-/ | ९,८३,५५,३६०-/ |
| साईधर्मशाळा | ४० | ७५ | २८,०१,०००/- | ५,०४,१८०/- | ३,३६,१२,०००/- | ३,९६,६२,१६०/- |
| व्दारावती भक्तनिवास | ०८ | ३७ | ९,९९,७३०/- | ११,७९,६८१/- | १,१९,९६,७६०/- | १,४१,५६,१७२/- |

मागणी:- उपरोक्त कोष्टकात नमुद केलेप्रमाणे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार साईआश्रम भक्तनिवास, साईधर्मशाळा विभागाकडील यांत्रिकीकरणासहहाऊसकिपींग, विद्युत, प्लंबीग, स्वच्छता इ. दुरुस्ती व देखभालीची कामे कामाचे स्वरुप निश्चित करुन ठोक पध्दतीने करुन देणेकामी बी.व्ही.जी.इंडिया,लि पुणे यांचे व व्दारावती भक्तनिवास विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग/स्वच्छता कामे कामाचे स्वरुप निश्चित करुन ठोक पध्दतीने करुन देणेकामी स्पिक एन स्पॅन सर्व्हिसेस, मुंबई यांचे दर निम्नतम असल्याने त्यांना दि.०१/०२/२०१९ ते दि.२९/०२/२०२० या कालावधीसाठी देण्यात आलेल्या कार्यादेशाची मुदत

दि.२९/०२/२०२० रोजी संपुष्टात येत असल्याने, सन २०२०-२१ मधील दि.०१/०३/२०२० ते दि.२८/०२/२०२१ या कालावधीकरता दैनिक वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा प्रक्रिया राबविणेकामी प्रस्ताव दि.०३/१२/२०१९ रोजी मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमोर मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला आहे.सदर प्रस्तावास मान्यता मिळालेनंतर ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात येईल. परंतू ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होणेस कालावधी लागणार असल्याने, ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होई पावेतो आहे त्याच मंजूर दरात व अटी शर्तीस अधिन राहून सध्या साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा विभागाकडील ठेकेदार मे.बी.व्ही.जी.इंडिया लि पुणे व व्दारावती भक्तनिवास विभागाकडील ठेकेदार मे.स्पिक एन स्पॅन सर्व्हिसेस, मुंबई यांचेकडून काम करुन घ्यावे लागणार आहे.

विभागाचे स्पष्ट मत/अभिप्राय– साईभक्तांना देण्यात येणा-या निवासव्यवस्थेतील खोल्यामध्ये व परिसरात अस्वच्छता होऊन साईभक्तांची गैरसोय होऊ नये याकरीतासाईआश्रम भक्तनिवास, साईधर्मशाळा विभागाकडील यांत्रिकीकरणासहहाऊसकिपींग, विद्युत, प्लंबीग, स्वच्छता इ. दुरुस्ती व देखभालीची कामे कामाचे स्वरुप निश्चित करुन ठोक पध्दतीने करुन देणेकामी बी.व्ही.जी.इंडिया,लि पुणे यांचे व व्दारावती भक्तनिवास विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग/स्वच्छता कामे स्पिक एन स्पॅन सर्व्हिसेस, मुंबई यांचा कामाचा कालावधी दि.२९/०२/२०२० अखेर संपुष्टात येत असल्याने, ई-निविदा प्रक्रिया राबवून नविन ठेकेदाराची नियुक्ती होईपावेतो सध्या तीनही विभागाकडे कार्यरत असलेल्या आऊटसोर्स ठेकेदारांकडून कामे आहे त्याच मंजूर दरात व अटी शर्तीस अधिन राहून मुदतवाढ देणेस मान्यता असावी.

सदर प्रस्तावास मान्यता मिळणेकामी मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमोर सादर.

**निर्णय क्र.७८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भक्तनिवासस्थान, साईधर्मशाळा विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबींग, स्वच्छता इ.दुरुस्ती व देखभालीची कामे व व्दारावती भक्तनिवास विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग/स्वच्छता कामे आऊटसोर्स ठेकेदाराकडून करुन घेणेकामी ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होई पावेतो सध्या कार्यरत असलेले आऊटसोर्स ठेकेदाराकडून आहे त्याच मंजूर दरात व अटी शर्तीनुसार करुन घेणेकामी दि.३१.०३.२०२० पर्यंत अथवा ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन कार्यादेश देई पावेतो यापैकी जे आगोदर होईल तोपर्यंत मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- साईआश्रम भक्तनिवास, साईधर्मशाळा, व्दारावती भक्तनिवास)**

---

**विषय नं.३८** **दि.१४.०३.२०२० ते दि.२३.०३.२०२० अखेर होणाऱ्या डॉ.सुभाष पाळेकर गुरुजी यांच्या नैसर्गीक शेती विषयक शिबीरासाठी साईआश्रम भकतनिवास विभागातील खोल्या व शताब्दी मंडप आरक्षित करुन ठेवणेबाबत.**

**विषय नं.३९** **संस्थानचे कर्मचारी गणवेश कापड खरेदीकामी ई-निविदेत प्राप्त न्युनतम दराबाबत निर्णय होणेबाबत.**

**निर्णय क्र.७९** **उपरोक्त विषय नं.३८ व ३९ या विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.**

---

**विषय नं.४०** **गाईचे शुध्द तुप खरेदी सन-२०२० करीता ई-निविदेतील न्युनतम दरधारक मे.हर्ष डेअरी प्रॉडक्टस प्रा.लि. भगवानपुर यांना चर्चा वाटाघाटीसाठी बोलावुन अंतिम निर्णय होणे, व्हेंडर ऑडीटसाठी संस्थानची टिम निश्चित होणे व याकामी येणारे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २६.०७.२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ३९१ अन्वये ८,४०० क्विंटल तुप खरेदी कामी भांडार विभागाने व मा.तदर्थ समितीचे दि.४/१२/२०१९ चे सभेतील निर्णय क्रं.५३० अन्वये खरेदी विभागाने मान्यता घेतली होती. सदर निर्णयांना अनुसरुन त्यातील वार्षिक मागणी विचारात घेऊन सन २०२० या एक वर्षासाठी तुप खरेदीबाबत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.१६/१२/२०१९ ते ०६/०१/२०२० या कालावधीत ४ टप्प्यांसाठी ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात आली होती. यामध्ये शक्यतो तांत्रीक निविदा (Technical Bid) दि.०९.०१.२०२० रोजी उघडण्यात येतील असे नमुद करण्यात आले होते. तसेच तूपाचे नमुने दि.०७/०१/२०२० ते ०८/०१/२०२० अखेर मागविण्यात आले होते.

मा.तदर्थ समितीचे दि.०४.१२.२०१९ चे सभेत सदर शुध्द तूप खरेदीस व याकामी येणारे खर्चास मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेण्याचे ठरले होते. त्यास अनुसरून याकामी उच्च न्यायालयाची मान्यता दि. २०.१२.२०१९ रोजी मिळालेली आहे.

वरील ऑनलाईन ई-निविदेस अनुसरून सन २०२० वर्षासाठी मुदतीअखेर गाईचे शुध्द तूपाच्या १० ई-निविदा प्राप्त झाल्या होत्या. त्याचा तपशील खालीलप्रमाणे-

१. हर्ष फ्रेश डेअरी प्रॉडक्ट्स प्रा.लि., भगवानपुर, हरिद्वार
२. स्मृती प्रॉडक्टस् प्रा.लि., सहा, अंबाला, हरियाणा
३. व्ही.एस.पी.डेअरी इंडस्ट्रीज, अहमदाबाद
४. सनफ्रेश ॲग्रो इंडस्ट्रीज प्रा.लिमीटेड, रांजणखोल, महाराष्ट्र
५. ऊमिया मिल्क प्रॉडक्ट्स, मेहसाना, गुजरात
६. श्री राधे डेअरी फार्म ॲन्ड फुडस प्रा.लि., सुरत.
७. रजवाडी डेअरीज प्रा.लि., कमली, जि.मेहसाना, गुजरात
८. एस डि पी इंडस्ट्रीज प्रा.लि., दमण
९. मल्टी ग्लोब डेअरी प्रा.लि., नानहेरी, हरीयाणा
१०. श्रीमुल डेअरीज प्रा.लि.पालनपूर, गुजरात

वरील ई-निविदांच्या तांत्रिक निविदा दि.९/१/२०२० रोजीचे खरेदी समितीचे सभेत उघडण्यात आल्या होत्या. सदर ई-निविदांची छाननी केली असता खालील बाबी निदर्शनास आल्या होत्या.

वरील निविदांची ऑनलाईन छाननी केली असता सदर निविदाधारकांपैकी

(अ) अनुक्रम नं. १ ते ३ निविदाधारकांनी संस्थानचे मागणीप्रमाणे सर्व कागदपत्रे ऑनलाईन सादर केलेली आहेत त्यामुळे ते पात्र ठरले.

(आ) अ.नं. ४ ते ७ यांनी सादर केलेल्या टर्न ओव्हर Certificate मध्ये सन २०१६-१७, सन २०१७-१८ व सन २०१८-१९ चा टर्नओव्हर नमूद केला आहे.

(इ) अ.नं. ८ यांनी सादर केलेले फॅक्टरी लायसेन्सची प्रत सादर केलेली आहे. यामध्ये त्यांचे सदर परवान्याची मुदत दि..३१/१२/२०१९ रोजी संपलेली असल्याचे नमूद केलेले आहे.

(ई) अ.नं. ०९ यांनी सादर केलेल्या टर्न ओव्हर Certificate मध्ये सन २०१६-१७, सन २०१७-१८ व सन २०१८-१९ चा टर्नओव्हर नमूद केला आहे.

२) उत्पादन क्षमता प्रमाणपत्र सादर केले आहे, त्यामध्ये तुपाचा उल्लेख नाही.

(उ) अ.नं. १० यांनी FSSAI चे प्रमाणपत्र रिटेलरचे सादर केलेले आहे.

२) सी.ए. चे टर्नओव्हर प्रमाणपत्र जोडलेले नाही. तथापि, सन २०१६-१७, २०१७-१८, २०१८-१९ या तीन वर्षाचे आय.टी. रिटर्न जोडलेले आहेत.

३) तुप उत्पादन क्षमता सी.ए. चे प्रमाणपत्र जोडले आहे.

वरील अ.नं. ४ ते ९ या ६ निविदाधारकांनी सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये किरकोळ अनियमीतता दिसून आली होती.

केंद्र शासनाच्या वित्त विभागाच्या Manual for Procurement of Goods 2017 मधील ७.३.४ व ७.३.५ मध्ये वरील किरकोळ स्वरुपाचे अनियमीततेबाबत खालीलप्रमाणे तरतुदी आहेत.

7.3.4 Minor Infirmity/Irregularity/Non-conformity-

During the preliminary examination, some minor infirmity and/or irregularity and/or nonconformity may also be found in some tenders. Such minor issues could be a missing pages/ attachment or illegibility in a submitted document; non-submission of requisite number of copies of a document. There have been also cases where the bidder submitted the amendment Bank Guarantee, but omitted to submit the main portion of Bid Document. The court ruled that this is a minor irregularity. Such minor issues may be waived provided they do not constitute any material deviation (please refer to Para 7.4.1 (iv)) and financial impact and, also, do not prejudice or affect the ranking order of the tenderers. Wherever necessary, observations on such 'minor' issues (as mentioned above) may be conveyed to the tenderer by registered letter/ speed post, and so on, asking him to respond by a specified date also mentioning therein that, if the tenderer does not conform Procuring Entity's view or respond by that specified date, his tender will be liable to be rejected. Depending on the outcome, such tenders are to be ignored or considered further.

7.3.5 Clarification of Bids/Shortfall Documents-

During evaluation and comparison of bids, the purchaser may, at his discretion, ask the bidder for clarifications on the bid. The request for clarification shall be given in writing by registered/ speed post, asking the tenderer to respond by a specified date, and also mentioning therein that, if the tenderer does not comply or respond by the date, his tender will be liable to be rejected. Depending on the outcome, such tenders are to be ignored or considered further. No change in prices or substance of the bid shall be sought, offered or permitted. No postbid clarification at the initiative of the bidder shall be entertained. The shortfall information/ documents should be sought only in case of historical documents which pre-existed at the time of the tender opening and which have not undergone change since then. These should be called only on basis of the recommendations of the TC. (Example: if the Permanent Account Number, registration with sales tax/VAT has been asked to be submitted and the tenderer has not provided them, these documents may be asked for with a target date as above). So far as the submission of documents is concerned with regard to qualification criteria, after submission of the tender, only related shortfall documents should be asked for and considered. For example, if the bidder has submitted a supply order without its completion/performance certificate, the certificate can be asked for and considered. However, no new supply order should be asked for so as to qualify the bidder.

वरील अ.नं. ४ ते ७ व ९ या निविदाधारकांकडून संस्थानने निविदेत नमुद केल्याप्रमाणे टर्नओव्हर सर्टीफिकिट व अ.नं.८ यांचेकडून अद्ययावत फॅक्ट्री लायसेन्स, तसेच अ.नं. ९ यांचेकडून तुपाचा उल्लेख असलेले क्षमता प्रमाणपत्र सदर ई-निविदेमध्ये अधिकाधिक स्पर्धा होण्याच्या दृष्टीने २ दिवसांची मुदत देवून सदर कागदपत्रे ई-मेल द्वारे मागविण्यात आली होती. सदर कागदपत्रे मागविल्यामुळे या प्रक्रियेत काही नव्याने कागदपत्रे मागविली असा अर्थ होणार नाही. तसेच अ.नं. १० निविदाधारकाचे FSSAI प्रमाणपत्र रिटेलरचे असल्यामुळे (संस्थानने Manufacturer/ Processor यांनीच निविदा भरण्याची मागणी केलेली आहे) ते अपात्र ठरले आहेत, त्यामुळे त्यांना कागदपत्रे सादर करण्याची संधी देणे उचित होणार नाही असे ठरले होते.

त्यामुळे वरील अ.नं ४ ते ९ या निविदाधारकांकडून ई-मेलव्दारे मागविलेले कागदपत्रांचा व छाननीचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.नं | निविदाधारकाचे नांव | मागणी केलेली कागदपत्रे | मेलद्वारे सादर केलेली कागदपत्रे | कागदपत्रे छाननीनंतर आढळून आलेली वस्तुस्थिती. |
|---|---|---|---|---|
| ०१ | सनफ्रेश ॲग्रो इंडस्ट्रीज प्रा.लि., रांजणखोल (प्रभात डेअरी) (४) | सन २०१५-१६ टर्न ओव्हर सर्टिफिकेट मागणी केली आहे. | सीए श्री.मानधने यांचेकडील सन २०१५-१६ वर्षाचे टर्न ओव्हर सर्टिफिकेट रू.६९१.५९ कोटी मेलद्वारे सादर केले आहे. | सन २०१५-१६, २०१६-१७ व २०१७-१८ या ३ वर्षाचा एकुण टर्न ओव्हर रू.२७८०.८६ कोटी होत आहे. तसेच एकूण सरासरी उलाढाल रू.९२८.८८ कोटी होत आहे. त्यामुळे सदर निविदाधारक **पात्र** ठरले. |
| ०२ | उमिया फुड प्रॉडक्ट्स, मेहसाना, गुजरात (५) | सन २०१५-१६ टर्न ओव्हर सर्टिफिकेट मागणी केली आहे. | दि.३१.०३.२०१६ अखेरचे Profit & Loss Account Statment मेलद्वारे सादर केले आहे. यामध्ये टर्न ओव्हर २,०१,८१,०४४/- नमूद आहे. | सन २०१५-१६, २०१६-१७ व २०१७-१८ या तीन वर्षाचा टर्न ओव्हर रू.३३,२४,५७,४६९/- होत आहे. सरासरी टर्न ओव्हर रू.११.०८ कोटी होत आहे. संस्थानने निविदेमध्ये सरासरी ३ वर्षाचा टर्नओव्हर १५ कोटी अगर त्यापेक्षा जास्त नमूद केला आहे. त्यामुळे सदर निविदाधारक **अपात्र** ठरले. |
| ०३ | श्री राधे डेअरी फार्म ॲण्ड फुड्स प्रा.लि., सुरत (६) | सन २०१५-१६ टर्न ओव्हर सर्टिफिकेट मागणी केली आहे. | सीए श्री.Naval Tummar & Co. यांचे सन २०१५-१६ चे श्री राधे डेअरी फार्म या नावाने टर्न ओव्हर सर्टिफिकेट | श्री राधे डेअरी फार्म ॲण्ड फुड्स प्रा.लि., सुरत ही फर्म जून २०१६ ला सुरु झाली आहे. सदर निविदाधारकाने त्यांचे श्री राधे डेअरी फार्म या फर्मचे सन २०१५-१६ या वर्षाचे टर्नओव्हर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | जोडले आहे. यामध्ये सन २०१५-१६ चा टर्न ओव्हर रू.२४,७८,१२,०५४/- नमूद आहे. तसेच सदर दोन्हीही फर्मचे एमडी व प्रोप्रायटर एकच असल्याचे सीए श्री.नवल तूम्मर ॲण्ड कंपनी, सुरत चे सर्टिफिकेट सादर केले आहे. | सर्टिफीकेट सादर केले आहे. तसेच दोन्हीही फर्मचे प्रोप्रायटर एक असल्याचे सीए सर्टिफीकेट सादर केले आहे. तथापि सदर दोन्हीही फर्म स्वतंत्र कार्यरत असल्याचे दिसून येते. मात्र सदर निविदाधारक सन २०१५-१६ चे निविदा भरलेले फर्मचे टर्नओव्हर सर्टिफीकेट सादर न करु शकलेमुळे सदर निविदाधारक **अपात्र** ठरले. |
| ०४ | रजवाडी डेअरीज प्रॉ., गुजरात (७) | सन २०१५-१६ टर्न ओव्हर सर्टिफिकेट मागणी केली आहे. | सन २०१५-१६ चा टर्न ओव्हर २७,७१,६०२/- मेलद्वारे सादर केला आहे. | सन २०१५-१६, २०१६-१७ व सन २०१७-१८ या ३ वर्षांचा एकूण टर्नओव्हर रु.३,०७,२०,१८४/- होत आहे. म्हणजेच एकूण सरासरी उलाढाल १,०२,४०,०६१/- होत आहे. संस्थानने निविदेमध्ये सरासरी ३ वर्षांचा टर्नओव्हर १५ कोटी अगर त्यापेक्षा जास्त नमूद केला आहे. सरासरी टर्न ओव्हरमध्ये सदर निविदाधारकांचा टर्नओव्हर कमी असलेमुळे ते **अपात्र** ठरले. |
| ०५ | एसडीपी इंडस्ट्रीज प्रा.लि., मुंबई (८) | परवाना सर्टिफिकेटची मुदत दि.३१.१२.२०१९ पर्यंतच नमूद होती. अदयावत दाखल्याची प्रत मागविण्यात आली होती. | सुधारीत अदयावत परवाना प्रत मेलद्वारे सादर केली आहे. | मेलद्वारे सादर केलेले परवान्यामध्ये Renewal तारीख ०३.०१.२०२० आहे व परवाना मुदत ३१.१२.२०२० पर्यंत आहे. त्यामुळे सदर निविदाधारक **पात्र** ठरले. |
| ०६ | मल्टीग्लोब डेअरीज प्रा.लि., नानेरी, फतेहबाद (९) | १.सन २०१५-१६ टर्न ओव्हर सर्टिफिकेट मागणी केली आहे.<br>२.क्षमता सर्टिफिकेट नाही. FSSAI सर्टिफिकेट जोडले आहे. त्यामध्ये तूपाचा उल्लेख नाही. | १.FSSAI सर्टिफिकेट Food Categorization Code कागदपत्रे सादर केली आहेत.<br>२. सन २०१५-१६ चे टर्न ओव्हर सर्टिफिकेट ऐवजी सदर कंपनी डिसेंबर २०१७ मध्ये सुरू झाल्याचे सीए सर्टिफिकेट सादर केले आहे. | १.FSSAI सर्टिफिकेट Food Categorization Code मध्ये २.१.१ मध्ये Butter oil, anhydrous milk fat, ghee नमूद आहे.<br>२.संस्थानने निविदेमध्ये सरासरी ३ वर्षांचा टर्नओव्हर १५ कोटी अगर त्यापेक्षा जास्त नमूद केला आहे. सरासरी टर्न ओव्हरमध्ये सदर निविदाधारकांचा टर्नओव्हर कमी असलेमुळे ते **अपात्र** ठरले. |

शुध्द तूपाचे सन २०२० चे निविदांची ऑनलाईन तांत्रिक छानना व ई मेलव्दारे मागविलेले कागदपत्रांचे छाननीअंती वरील एकूण १० निविदाधारकांपैकी खालीलप्रमाणे ५ ई-निविदाधारक पात्र ठरले आहेत.

१. हर्ष फ्रेश डेअरी प्रॉडक्ट्स प्रा.लि., भगवानपुर, हरिद्वार
२. स्मृती प्रॉडक्टस् प्रा.लि., सहा, अंबाला, हरियाणा
३. व्ही.एस.पी.डेअरी इंडस्ट्रीज, अहमदाबाद
४. सनफ्रेश ॲग्रो इंडस्ट्रीज प्रा.लिमीटेड, रांजणखोल, महाराष्ट्र
५. एस डि पी इंडस्ट्रीज प्रा.लि., दमण

वरील पात्र निविदाधारकांचे कमर्शिअल बीड दि.१८.०१.२०२० चे खरेदी समितीमध्ये उघडण्यात आले आहेत. सदर ई-निविदेतील क्वॉर्टरवाईज दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे-

अ- जानेवारी २०२० ते मार्च २०२०

| Sl.No | Description of Work / Item(s) | No.of Qty | Units | SDP INDUSTRIES PVT LTD | SMRITI PRODUCTS PRIVATE LIMITED | VSP DAIRY INDUSTRIES | HARSH FRESH DAIRY PRODUCTS PVT LTD | Sunfresh Agro Industries Pvt. Ltd. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1.00 | Cow Ghee - Pure 15Kg. New Tin Packing, AGMARK/FSSAI | 2100.00 | Quintal | 36960.00 | 39400.00 | 35800.00 | **26150.00** | 45920.00 |

ब- एप्रिल २०२० ते जून २०२०

| Sl.No | Description of Work / Item(s) | No.of Qty | Units | SDP INDUSTRIES PVT LTD | SMRITI PRODUCTS PRIVATE LIMITED | VSP DAIRY INDUSTRIES | HARSH FRESH DAIRY PRODUCTS PVT LTD | Sunfresh Agro Industries Pvt. Ltd. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1.00 | Cow Ghee - Pure 15Kg. New Tin Packing, AGMARK/FSSAI | 2100.00 | Quintal | 36960.00 | 39400.00 | 36800.00 | **26275.00** | 45920.00 |

क- जुलै २०२० ते सप्टेंबर २०२०

| Sl.No | Description of Work / Item(s) | No.of Qty | Units | SDP INDUSTRIES PVT LTD | SMRITI PRODUCTS PRIVATE LIMITED | VSP DAIRY INDUSTRIES | HARSH FRESH DAIRY PRODUCTS PVT LTD | Sunfresh Agro Industries Pvt. Ltd. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1.00 | Cow Ghee - Pure 15Kg. New Tin Packing, AGMARK/FSSAI | 2100.00 | Quintal | 38080.00 | 39400.00 | 37500.00 | **26450.00** | 45920.00 |

ड- ऑक्टोंबर २०२० ते डिसेंबर २०२०

| Sl.No | Description of Work / Item(s) | No.of Qty | Units | SDP INDUSTRIES PVT LTD | SMRITI PRODUCTS PRIVATE LIMITED | VSP DAIRY INDUSTRIES | HARSH FRESH DAIRY PRODUCTS PVT LTD | Sunfresh Agro Industries Pvt. Ltd. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1.00 | Cow Ghee - Pure 15Kg. New Tin Packing, AGMARK/FSSAI | 2100.00 | Quintal | 38080.00 | 39400.00 | 38000.00 | **26150.00** | 45920.00 |

वरील ४ तिमाहीतील तुलनात्मक तक्तयांचे अवलोकन करता ४ ही क्वॉर्टरमध्ये मे.हर्ष फ्रेश डेअरी प्रॉ.प्रा.लि., भगवानपुर यांचे दर न्युनतम आलेले आहेत. सदर न्युनतम दरांबाबत संबंधित निविदाधारकाशी चर्चा-वाटाघाटी करून अंतिम निर्णय घेतला जात असतो. त्यानंतर त्यांचे फर्मचे व्हेंडर ऑडिट करून त्याचा अहवाल मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करून अहवाल सकारात्मक असल्यास संबंधित न्युनतम दरधारकास पुरवठा आदेश दिला जातो.

तथापि सध्या भांडार विभागामध्ये दि.१८.०१.२०२० अखेर शुध्द तूपाचा ४९६ क्विंटल साठा शिल्लक आहे. तो साधारण १५ दिवस पुरेल असा अंदाज आहे. त्यामुळे पुढील कालावधीत साईभक्तांना बुंदी व लाडू प्रसाद सेवा देणेत अडचण होऊ नये म्हणून १ महिन्यासाठी आवश्यक असणारे १००० क्विंटल शुध्द तूप तातडीने खरेदी करणे गरजेचे होते.

यापुर्वी सन २०१८ या वर्षामध्ये माहे जानेवारी ते डिसेंबर या कालावधीमध्ये मे.हर्ष डेअरी प्रॉ.प्रा.लि., भगवानपुर यांनी संस्थानला ८२४०.२२ क्विंटल शुध्द तूपाचा पुरवठा केलेला होता. तसेच त्यांचे व्हेंडर ऑडिटचा अहवालही समाधानकारक होता तसेच केंद्र सरकारच्या एनडीआरआय या संस्थेनेही मे.हर्ष डेअरी प्रॉ.प्रा.लि., भगवानपूर यांचे प्लॅन्टचे संस्थानचे विनंतीवरुन इन्स्पेक्शन केले होते. त्यांनीही दि.४ एप्रिल, २०१८ रोजी overall remark मध्ये Considering all the condition and production practice and record keeping, the plant comes in the fair category as per best knowledge of our plant practices. या बाबी विचारात घेता, मे.हर्ष फ्रेश डेअरी प्रॉ. प्रा.लि., भगवानपुर यांना जानेवारी ते मार्च २०२० या कालावधीतील न्युनतम दर रू.२६,१५०/- प्रती क्विंटल दराने एक महिन्यासाठी आवश्यक असणारे १००० क्विंटल शुध्द तूपाचा पुरवठा आदेश देऊन दरम्यानचे कालावधीत त्यांना मा.व्यवस्थापन तदर्थ समितीचे सभेपुढे चर्चा-वाटाघाटीसाठी बोलविता येईल व व्हेडर ऑडिट करता येईल. असे चक्रिय पध्दतीने मान्यता मिळणेकामी प्रस्तावित करण्यात आले आहे. याबाबतची पुढील कार्यवाही चालू आहे.

आता मे.हर्ष फ्रेश डेअरी प्रॉ. प्रा.लि., भगवानपुर यांचे मालक/प्रतिनिधीला चर्चा-वाटाघाटीसाठी पुढील मा.तदर्थ समितीचे सभेमध्ये बोलवुन दरांबाबत अंतिम निर्णय होणे गरजेचे आहे. तसेच व्हेंडर ऑडिटसाठी संस्थानकडून टिम निश्चित होणे गरजेचे आहे. व्हेंडर ऑडिट अहवाल व दराबाबत अंतिम निर्णय झालेनंतर क्वॉर्टरवाईज टप्प्याटप्प्याने पुरवठा आदेश देण्यात येतील.

मागील वर्षीचे व्हेंडर ऑडिटसाठी संस्थानच्या टिममध्ये मा.व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष, मा.उपजिल्हाधिकारी, मा.मुख्य लेखाधिकारी व प्र. अधिक्षक, खरेदी विभाग तसेच महाराष्ट्र शासनाच्या अन्न व औषध प्रशासन विभागाचे दोन अन्न सुरक्षा अधिकारी गेले होते. तसेच सन २०१७ व २०१८ या दोन वर्षी अनुक्रमे व्हेंडर ऑडिटसाठी अंबाला व भगवानपुर, हरिव्दार या ठिकाणी विमानाने जाणे-येणेकामी येणारा खर्च तसेच रस्त्याने जातांना-येतांना जो खर्च झाला तो संस्थानमार्फत करण्यात आला होता. तर प्लॅन्ट व्हिजीटच्या कालावधीत त्या ठिकाणची राहणेची व वाहनाची व्यवस्था संबंधित पुरवठाधारकाने केली होती. त्याप्रमाणेच टिम निश्चित झालेनंतर जाणे-येणेचा व प्रवासात होणारा खर्च संस्थानमार्फत करता येईल.

तरी,

१. मे.हर्ष फ्रेश डेअरी प्रॉ. प्रा.लि., भगवानपुर यांचे प्लॅन्टचे व्हेंडर ऑडिटसाठी संस्थानकडील टिम निश्चित होणेस,

२. मे.हर्ष फ्रेश डेअरी प्रॉ. प्रा.लि., भगवानपुर यांना ४ ही क्वॉर्टरमधील दराबाबत चर्चा-वाटाघाटी करणेकामी बोलविणेस व याबाबत अंतिम निर्णय होणेस,

३. व्हेंडर ऑडिटसाठी निश्चित झालेल्या टिमसाठी विमानाने जाणे-येणेकामी व प्रवासात होणारे खर्चास मान्यता मिळणेस,

वरील प्रस्तावित १ ते ३ बाबींवर निर्णय होणेकामी सदरचा विषय मा.तदर्थ समितीचे सभेत सविनय सादर.

**निर्णय क्र.८०** **प्रस्तुत प्रकरणी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक मे.हर्ष फ्रेश डेअरी प्रॉ. प्रा.लि., भगवानपुर यांचे प्रतिनिधी आजचे मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. समितीने त्यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा केली असता त्यांनी खालील प्रमाणे दर देऊ केले.**

**जानेवारी २०२० ते मार्च-२०२०**

| अ.नं | तपशील | परिमाण क्विंटलमध्ये | निविदेतील दर प्रती क्विंटल | चर्चा वाटाघाटीनंतरचा दर प्रती क्विंटल |
|---|---|---|---|---|
| १ | गाईचे शुध्द तूप | २,१०० | २६,१५०/- | २६,१००/- |

**एप्रिल २०२० ते जून २०२०**

| अ.नं | तपशील | परिमाण क्विंटलमध्ये | निविदेतील दर प्रती क्विंटल | चर्चा वाटाघाटीनंतरचा दर प्रती क्विंटल |
|---|---|---|---|---|
| १ | गाईचे शुध्द तूप | २,१०० | २६,२७५/- | २६,२००/- |

**जुलै २०२० ते सप्टेंबर २०२०**

| अ.नं | तपशील | परिमाण क्विंटलमध्ये | निविदेतील दर प्रती क्विंटल | चर्चा वाटाघाटीनंतरचा दर प्रती क्विंटल |
|---|---|---|---|---|
| १ | गाईचे शुध्द तूप | २,१०० | २६,४५०/- | २६,४००/- |

**ऑक्टोंबर २०२० ते डिसेंबर २०२०**

| अ.नं | तपशील | परिमाण क्विंटलमध्ये | निविदेतील दर प्रती क्विंटल | चर्चा वाटाघाटीनंतरचा दर प्रती क्विंटल |
|---|---|---|---|---|
| १ | गाईचे शुध्द तूप | २,१०० | २६,१५०/- | २६,१००/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सन-२०२० करीता गाईचे शुध्द तुप खरेदीकामी ई-निविदेतील निम्नतम दरधारक मे.हर्ष डेअरी प्रॉडक्टस प्रा.लि. भगवानपुर यांनी चर्चेअंती देऊ केलेले वरील प्रमाणे अंतिम दर स्विकारणेत येऊन त्यांना पुरवठा आदेश देण्यास मान्यता देण्यात आली. याकामी मान्यतेसाठी मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांचेकडे सिव्हील अॅप्लीकेशन दाखल करण्यात यावे, असे ठरले.**

**तसेच मे.हर्ष फ्रेश डेअरी प्रॉ. प्रा.लि., भगवानपुर यांचे प्लॅन्टचे व्हेंडर ऑडिटसाठी मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सदस्य मा.श्री.दिलीप स्वामी व उप मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.रविंद्र ठाकरे यांना पाठविण्यास व त्याकामी येणाऱ्या अनुषंगीक खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-खरेदी विभाग/विधी विभाग)**

---

**विषय नं.४१** **संस्थानला माहे जुलै २०१९ ते सप्टेंबर २०१९ या कालावधीमध्ये प्राप्त झालेल्या शुध्द तूप व खाद्यतेलाचे विविध प्रयोगशाळेमार्फत करणेत आलेल्या तपासण्यांचे अहवालाबाबत.**

**विषय नं.४२** **साईप्रसाद निवासस्थान विभागाकडे पाणीवाटप काम करत असलेले २८ आऊटसोर्स कंत्राटी कर्मचाऱ्यांबाबत.**

**निर्णय क्र.८१** **उपरोक्त विषय नंबर ४१ व ४२ या विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.**

---

**विषय नं.४३** **महाशिवरात्री-२०२० निमित्त श्री साईबाबा संस्थानचे वतीने श्रींचे गुरुस्थान मंदिर येथे महारुद्राभिषेक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे वतीने वेळोवेळी विविध धार्मिक व सांस्कृतीक कार्यक्रमांचे आयोजन करणेत येते. प्रतिवर्षाप्रमाणे महाशिवरात्री शुक्रवार माघ कृ.॥ १३/१४ दि.२१/०२/२०२० रोजी साजरा करण्यात येणार आहे. प्रतिवर्षी रात्री १२ वाजता श्रींचे गुरुस्थान मंदिरात मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे हस्ते "रुद्राभिषक" पूजा करणेत येते. यावर्षी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी महाशिवरात्री निमित्त महारुद्राभिषेक करणेत यावा असे निर्देश दिलेले आहेत.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी अधिनियम २००४ मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे. -

कलम २१ (१) (ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पुजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

(ग) भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

महाशिवरात्रीनिमित्त महारुद्राभिषेक करावयाचे झाल्यास बाहेरगावावरुन ५० ब्राह्मण बोलवावे लागतील. त्यांना अंदाजे प्रत्येकी रु.२५००/- इतके मानधन आणि प्रवास खर्च, निवास व भोजन व्यवस्था संस्थानमार्फत मोफत करावी लागेल. तसेच महारुद्राभिषेक या विधीसाठी लागणारे साहित्य बाहेरुन खरेदी करावे लागेल. महारुद्राभिषेक रात्री ८ वाजता आरंभ होऊन पहाटे अंदाजे ४ वाजेपर्यंत करणेत येईल. या सर्व खर्चासाठी अंदाजे रु.२,००,०००/- रुपये खर्च येणार आहे.

तरी महाशिवरात्री-२०२० निमित्त यावर्षी संस्थानचे गुरूस्थान मंदिरात महारुद्राभिषेक करणेस व याकामी अंदाजे रु.२,००,०००/- इतक्या खर्चास परवानगी मिळणेचे विषयावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, महाशिवरात्री-२०२० निमित्त संस्थानचे गुरूस्थान मंदिरात महारुद्राभिषेक करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.२,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-मंदिर विभाग)**

---

**विषय नं.४४** **श्रींचे समाधीचे वरील बाजुकडील असलेल्या सोन्याचे कठडयाचे तसेच पादुकांचे बाजुचे असलेले सोन्याचे कठडयाचे डागडुजीकरणाचे काम तसेच बाबांचे सिंहासना खालील उर्वरीत भागास (मार्बलला) नव्याने सोन्याचे आवरण बसविणेचे काम देणगी स्वरुपात करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८/११/२०१५ रोजीचे सभेतील विषय नं.११, निर्णय क्र.५२९ "यावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्त श्री.के.व्ही.भास्कर, डायरेक्टर फायनान्स, हेटरो ग्रुप ऑफ कंपनीज, है.बाद यांचेकडून श्रींचे समाधी मंदिरातील समाधीचे व पादुकांचे बाजुला असलेल्या चांदीच्या पट्टीवर देणगीदाखल सोन्याचा पत्रा बसवून घेण्यास मान्यता देण्यात आली."

प्रस्तावना–सध्याचे श्रींचे समाधीचे वरील बाजुकडील असलेल्या सोन्याचे कडठयांवर तसेच श्रींचे पादुकांचे बाजुचे असलेले सोन्याचे कठडयांवर सोने बसवून देण्याचे काम हे मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८/११/२०१५ रोजीचे सभेतील विषय नं.११, निर्णय क्र.५२९ अन्वये देणगीदार साईभक्त श्री.के.व्ही.भास्कर रेड्डी, हैद्रबाद यांनी देणगी स्वरुपात करुन दिलेले आहे.

आता सदरहू कठडयाचे बाबांचे स्नानाचे पाणी जाऊन तसेच दैनंदिन साफसफाई / वापरामुळे काही ठिकाणी सोन्याचा पत्रा निघुन खराब झालेला आहे. त्याबाबत साईभक्त श्री.के.व्ही.भास्कर रेड्डी, है.बाद यांनी सदरहू दैनंदिन वापरामुळे खराब झालेले श्रींचे समाधीचे बाजुकडील कठडयाचे व श्रींचे पादुकांचे बाजुचे सोन्याचे कठडयांचे डागडुजीकरणाचे काम तसेच बाबांचे सिंहासनाखालील उर्वरीत भागास (मार्बलवर) सोन्याचे आवरण बसविणे हे काम देणगी स्वरुपात करण्यास परवानगी मागितलेली आहे. (सोबत देणगीदार यांनी करावयाच्या कामाचा फोटो जोडलेला आहे.)

विभागाचा अभिप्राय- यापुर्वी उपरोक्त मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८/११/२०१५ रोजीचे सभेतील विषय नं.११, निर्णय क्र.५२९ अन्वये समाधी मंदिरातील श्रींचे समाधी भिंतींना, खाबांना व समाधीचे चौथ-याला सोन्याचा मुलामा करण्याचे काम तसेच बाबांचे सोन्याचे सिंहासन तयार करण्याचे काम देणगी स्वरुपात करण्यात आलेले आहे. तदनंतर मा.अध्यक्ष महोदय यांनी समाधी चौथ-याचे खालील खराब झालेल्या भागाची डागडुजी अथवा नुतनीकरण करणेबाबत निर्देश दिलेले दिलेनुसार दि.१२/१२/२०१९ ते दि.१४/१२/२०१९ या कालावधीत यापुर्वीचे देणगीदार साईभक्त श्री.बी.विजयकुमार, है.बाद यांचेमार्फत देणगी स्वरुपात करण्यात आलेले आहे.

तसेच श्रींचे समाधीचे बाजुकडील व पादुकांचे बाजुकडील सोन्याचा कठडा बाबांचे स्नानाचे पाणी जाऊन तसेच दैनंदिन वापरामुळे खराब झालेला आहे. साईभक्त श्री.के.व्ही.भास्कर रेड्डी यांनी दि.०६/०१/२०२० रोजीचे पत्रान्वये सदरहू सोन्याचे कठडयांचे डागडुजीकरण करुन देण्यास तसेच बाबांचे सिंहासना खालील उर्वरीत भागास (मार्बलला) नव्याने सोन्याचे आवरण देणगी स्वरुपात बसवून देण्यास सहमती दर्शविलेली आहे. देणगीदार साईभक्त यांनीच यापुर्वी सदरचे काम देणगी स्वरुपात करुन दिलेले असल्याने, त्यांचेकडूनच सदरचे डागडुजीकरणाचे काम देणगी स्वरुपात करुन घेता येईल, असे नम्र मत आहे.

प्रस्ताव- तरी श्रींचे समाधीचे बाजुकडील व पादुकांचे बाजुकडील सोन्याचा कठडयाचे डागडुजीकरणाचे काम तसेच बाबांचे सिंहासना खालील उर्वरीत भागास (मार्बलला) नव्याने सोन्याचे आवरण बसविणेकामी यापुर्वीचेच देणगीदार साईभक्त श्री.के.व्ही.भास्कर रेड्डी, डायरेक्टर, हेटरो ड्रग्स लिमि., है.बाद यांचेकडून देणगी स्वरुपात करुन घेणेबाबत सदरहू प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८३** **सदर विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** **(कार्यवाही- मंदिर विभाग)**

---

**विषय नं.४५** **सन २०२०-२०२१ या वर्षाकरीता फुटाणे प्रसाद, विडयाची पाने, पावडर मार्बलमुर्ती, प्युअर मार्बल मुर्ती व काशी पावडर अष्टगंध खरेदीकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणे तसेच व्दारकामाई धुनीकरीता रानशेणी गोवरी खरेदी करणेकामी तसेच सत्यनारायण, अभिषेक, पुजेकरीता नारळ खरेदी करणेकामी खरेदी विभागामार्फत ई-निविदा प्रक्रिया करणे व त्याकामी येणारे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ तरतुद-

| कलम/तरतूद क्रमांक | कलम/ तरतूदीचे शीर्षक | पोटकलम व तरतूद |
|---|---|---|
| २१ | विश्वस्त व्यवस्था निधीचा विनीयोग | १(क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन, १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे. १ (ग) भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे. |

प्रस्तावना:- श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मंदिर विभागामार्फत प्रत्येक शुक्रवारी एकादशी वगळता साईभक्तांना धुपारतीनंतर फुटाणेप्रसाद वाटण्यात येतो, साईभक्तांकरीता श्रीसाई सत्यव्रत व अभिषेक पूजेमध्ये विड्याची पाने व नारळ ठेवण्यात येतात, मान्यवरांचे सत्काराकरीता पावडर मार्बल मुर्ती तसेच अतिमहत्वाचे प्रसंगी प्युअर मार्बल मूर्ती व सर्व साईभक्तांना दर्शनरांगेत गंध लावणेकामी अष्टगंध खरेदी करुन वापरण्यात येतात.

विभागाचा अभिप्राय:-

१) फूटाणे खरेदी- श्रींचे प्रत्येक शुक्रवारी एकादशी वगळता धुपारतीनंतर फुटाणेप्रसाद वाटण्याची प्रथा आहे. माहे-मार्च-२०२० अखेर सध्याचे पुरवठादार यांची फुटाणे पुरविण्याची मुदत संपणार असल्याने, माहे-एप्रिल-२०२० ते माहे-मार्च-२०२१ अखेर या आर्थिक वर्षात शुक्रवारचे धुपारतीचे प्रसादासाठी एकादशीचे दिवस वगळता दर शुक्रवारी ९ किलो प्रमाणे अंदाजे वार्षिक खरेदीत अंदाजे ४५० किलो फुटाणे खरेदी करावे लागणार आहेत. माहे-एप्रिल-२०१९ ते माहे-डिसेंबर-२०१९ या कालावधीत रु.१०/-प्रती किलो प्रमाणे एकूण २८८ किलो फुटाणे प्रसाद साईभक्त श्री.ईश्वर आधार साटोटे, कोपरगाव यांनी देणगी स्वरुपात पुरविलेला आहे. तसेच पुढील वर्षाकरीता समाधी मंदिराचे उपबजेटमध्ये तरतूद करण्यात आलेली असून, फुटाणे प्रसाद खरेदी करणेसाठी विहित पध्दतीने कोटेशन्स मागविणेस व त्याकामी होणारे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

०२) विडयाचे पाने खरेदी- श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेमार्फत भक्तांकरीता मंदिर परिसरामध्ये दररोज श्रीसाईसत्यव्रत पूजा व भक्त अभिषेक पूजा करण्यात येतात. प्रत्येक सत्यनारायणाच्या पूजेकरीता पूजेच्या चौरंगावर दोन विड्याची पाने ठेवण्यात येतात. सदरहू विड्याची पानाची मुदत माहे-मार्च-२०१९ अखेर संपणार असल्याने पुढील माहे-एप्रिल-२०२० ते मार्च-२०२१ अखेर या आर्थिक वर्षाकरीता श्रीसत्यनारायण पूजेकरीता वार्षिक खरेदी करणे आवश्यक आहे. सदरहू पूजेकरीता माहे-एप्रिल-२०१९ ते माहे-डिसेंबर-२०१९ अखेर या कालावधीत एकूण १०२५४४ नग विडयाची पाने दर रु.०.८०/- प्रति नगाप्रमाणे एकूण पुर्णांकीत रक्कम रु.८२,०३५/- (रुपये ब्याऐंशी हजार पस्तीस मात्र) खर्च झालेला आहे. त्याकरीता पुढील आर्थिक वर्षात पूजेकरीता विड्याची पाने खरेदी करणेकामी समाधी मंदिराचे उपबजेटमध्ये तरतूद करण्यात आलेली आहे.

०३) पावडर मार्बल मुर्ती खरेदी - श्रीसाईबाबांच्या दर्शनासाठी देश-विदेशातुन अनेक सन्माननीय व्यक्ती येत असतात. या मान्यवर अतिथींचा संस्थानचे वतीने यथोचित सत्कार करण्यात येतो. सत्कारामध्ये मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष, मा.विश्वस्त मंडळ, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.उप मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.प्रशासकीय अधिकारी व जनसंपर्क अधिकारी यांचे सुचनेनुसार मान्यवरांना आवश्यकतेप्रमाणे पावडर मार्बल मूर्ती देण्यात येते. तसेच संस्थान सेवेतुन सेवानिवृत्त होणारे कर्मचा-यांना संस्थानमार्फत पावडर मार्बल मूर्ती देऊन सत्कार करण्यात येतो.त्याकरीता आवश्यकतेप्रमाणे पुरवठादारांकडुन पावडर मूर्ती नंबर ३, मूर्ती नंबर ४, मूर्ती नंबर ५ अशा पावडर मूर्ती खरेदी करण्यात येतात. माहे-मार्च-२०२० अखेर मुर्ती खरेदीची मुदत संपणार आहे. त्यामुळे माहे- सन-२०२०-२१ या आर्थिक वर्षाकरीता पावडर मार्बल मूर्ती खरेदी करणे आवश्यक आहे.

माहे-एप्रिल-२०१९ ते माहे- डिसेंबर-२०१९ अखेर या कालावधीत ०४ नंबर मूर्ती- एकूण ६९० नग दर रु.१८९/- एकूण रु.१,३०,४१०/- (अक्षरी रुपये एक लाख तीस हजार चारशे दहा मात्र) खर्च झालेला आहे. तरी पुढील आर्थिक वर्षाकरीता पावडर व प्युअर मार्बल मुर्ती खरेदी करणेकामी समाधी मंदिराचे उपबजेटमध्ये तरतूद करण्यात आलेली आहे.

**१)** प्युअर मार्बल मुर्ती खरेदी- मा.महामहिम राष्ट्रपती, मा.उपराष्ट्रपती, मा.मुख्यमंत्री महोदय, मा.सुप्रिम कोर्ट व इतर कोर्ट, मा.खासदार किंवा व्ही.व्ही.आय.पी., देणगीदारसाईभक्त व इतर तत्सम महत्वाचे व्यक्ती मंदिरात दर्शनासाठी येत असतात. त्यांचा संस्थानचे वतीने शॉल, उदी देऊन यथोचित सत्कार करण्यात येतो. काही व्यक्तींना वेळप्रसंगी वरिष्ठांचे सूचनेनुसार प्युअर/ मकराना मार्बल मूर्ती संस्थानमार्फत भेट म्हणून देण्यात येते. ती ऐनवेळी शिर्डीतील स्थानिक मार्केटमधुन थेट खरेदी करण्यात येते. अशा प्युअर मार्बल मूर्ती आवश्यकतेप्रमाणे थेट

खरेदी कराव्या लागतात त्याची संख्या निश्चित नसते. काही अतिमहत्वाचे व्यक्तींना वेळप्रसंगी प्युअर मकराना मार्बल मूर्ती संस्थानमार्फत भेट म्हणून देण्यात येते. माहे-एप्रिल-२०१९ ते माहे-डिसेंबर -२०१९ अखेर मंदिर विभागामार्फत खर्च झालेला नाही. तरी आवश्यकतेप्रमाणे प्युअर मार्बल मूर्ती थेट खरेदी करणेस व त्याकामी येणारे खर्चास तसेच सदर बीलाची रक्कम लेखाशाखेमार्फत आदा होणेस मान्यता असावी, ही विनंती.

**२)** काशी अष्टगंध खरेदी - श्रींचे दर्शनासाठी समाधी मंदिरात येणा-या साईभक्तांना दर्शनापूर्वी श्रींचा गंध लावणेत येत आहे. गंध लावल्यामुळे साईभक्तांमध्ये भक्तीमय वातावरण निर्माण होत आहे. साईभक्त व ग्रामस्थ यांना दैनंदिन गंध लावणेत येत असल्याने, सदरहू अष्टगंध आतापर्यंत साईभक्तांनी देणगी स्वरुपात दिलेला आहे. साधारणता: मंदिर विभागासाठी अंदाजे ३५ ते ४५ किलो अष्टगंध प्रति महिन्यास वापर होत आहे. तरी मंदिर विभागासाठी वार्षिक काशी अष्टगंध पावडर अंदाजे ६०० किलो खरेदी करावे लागणार आहेत. त्याकामी अंदाजे रक्कम रु.२००/- प्रमाणे एकूण १,२०,०००/- (अक्षरी रुपये एक लाख वीस हजार मात्र) खर्च अपेक्षित आहे. सदरहू खर्चाची पुढील वर्षाकरीता समाधी मंदिराचे उपबजेटमध्ये तरतूद करण्यात आलेली आहे.

**३)** गोवरी खरेदी- श्रीसाईभक्तांना श्रीद्वारकामाईचे धुनीतील पवित्र उदीचे वाटप करण्यासाठी मंदिर विभागामार्फत प्रतिवर्षी श्रींचे द्वारकामाई धुनीकरीता गोवरी खरेदी करुन त्याचा वापर धुनी प्रज्वलीत राहणे व उदी निर्माण होणे याकामी करण्यात येतो. श्रीसाईभक्तांना पवित्र उदी मिळणे व श्रींची धुनी अखंड प्रज्वलीत राहणेकामी प्रतिवर्षी श्रींचे द्वारकामाई धुनीकरीता गोवरी खरेदी करावी लागते. सदर खर्च अंदाजे रुपये तीन लाखापेक्षा जास्त असल्याने सन-२०१९ मध्ये ई-टेंडर प्रक्रीयेद्वारे खरेदी विभागामार्फत गोवरी खरेदी करणेत आलेली आहे. आज तागायतपर्यंत एकूण १३१०० किलो गोवरी इकडील विभागाकडे प्राप्त झालेली आहे. तरी मागील वर्षाप्रमाणे सन २०२०-२१ या वर्षाकरीता खरेदी विभागामार्फत ई-टेंडर प्रक्रीया करणेस व गोवरी खरेदीकामी होणा-या खर्चास मान्यता असावी, ही विनंती.

**४)** नारळ खरेदी -श्रीसाईसत्यव्रत पूजा व भक्त अभिषेक पूजेकरीता लागणारे श्रीफळ साईभक्तांमार्फत जमा होणारे श्रीफळ वापरण्याची प्रथा होती. आता साईभक्तांकडील श्रीफळ येण्याचे प्रमाण दिवसें-दिवस कमी होत असल्याने सत्यनारायण पूजेसाठी व भक्त अभिषेक पूजेसाठी श्रीफळ उपलब्ध होत नाही. श्रीसाईसत्यव्रत पूजा व भक्त अभिषेक पूजेकरीता तसेच उत्सवातील कार्यक्रमातील कलाकारांचे सत्कारासाठी व इ. करीता लागणारे श्रीफळ संस्थानमार्फत खरेदी करावे लागणार आहे. संस्थानमार्फत प्रती महिन्यास अंदाजे साधारण श्रीसाईसत्यव्रत ६,५०० व अभिषेक ५,००० पुजा होत असतात. तसेच श्रावण महिना, उत्सव, पौर्णिमा, सुटयांचे काळात सदरच्या पुजेमध्ये वाढ होत असते. एप्रिल-१९ ते ऑक्टोंबर-१९ अखेर सत्यनारायण व अभिषेक पुजेकरीता एकूण ७२५५७ नग नारळ खर्ची झालेले आहे. तरी सन १९२०-२१ या कालावधीत नारळ/श्रीफळ खरेदी करणेकामी खरेदी विभागामार्फत ई-टेंडर प्रक्रीया करणेस व सदरहू कामी होणा-या खर्चास मान्यता असावी, ही विनंती.

तरी खालील तपशीला प्रमाणे सन-२०१९-२०२० या आर्थिक वर्षाकरीता साहित्य खरेदी करावे लागणार आहे -

| अ.क्र | तपशील | एप्रिल-२०१९ ते डिसेंबर-२०१९ खर्च सध्याचे दर व खर्च | | सन-२०-२१ ची मागणी (अंदाजे) (आवश्यकतेप्रमाणे) | अंदाजे दर | | | अंदाजे खर्च रुपये | एकूण अंदाजे खर्च रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | दर रुपये | प्रमाण | | रुपये | पैसे | प्रमाण | | |
| ०१ | फुटाणे प्रसाद | १०/- | २८८ किलो देणगी | ४५० किलो | २५ | ०० | किलो | ११,२५०/- | ११,२५०/- |
| ०२ | विड्याची पाने | ०.८० पैसे | १०२५४४ नग | २,००,००० नग | ०१ | ०० | नग | २,००,०००/- | २,००,०००/- |
| ०३ | पावडर मूर्ती नं.३ | ११८/- | --- | १०० नग | १२५ | ०० | नग | १२,५००/- | १,८१,२५०/- |
| | पावडर मूर्ती नं.४ | १८९/- | ६९० नग | ७०० नग | २०० | ०० | नग | १,४०,०००/- | |
| | पावडर मूर्ती नं.५ | ५५५/- | --- | ५० नग | ५७५ | ०० | नग | २८,७५०/- | |
| ०४ | काशी अष्टगंध पावडर | १७०/- | ४०५ किलो | ६०० किलो | २०० | ०० | किलो | ९०,०००/- | ९०,०००/- |
| | | देणगी स्वरुपात प्राप्त | | | | | | | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०५ | रानशेणी गोवरी | (खरेदी विभागामार्फत) | २,५०,००० किलो | ०६ | ०० | किलो | १५,००,०००/- | १५,००,०००/- |
| ०६ | नारळ / श्रीफळ | ७२५५७ नग<br>देणगी स्वरुपात प्राप्त | १,५०,००० नग | १५ | ०० | नग | २२,५०,०००/- | २२,५०,०००/- |

उपरोक्त नमूद केल्यानुसार मागीलवर्षाप्रमाणे माहे- एप्रिल-२०२० ते माहे मार्च-२०२१ अखेर या आर्थिक वर्षामध्ये

**अ)** तकत्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे अ.क्र.०१ ते ०४ चे साहित्य रु.३,००,०००/-चे आत असल्याने विहीत पद्धतीने दरपत्रके मागवुन त्यातील न्युनतम दरधारकाचे दर मान्य करणेस व कार्यादेश देणेस तसेच त्याकामी होणारे सर्व समावेशक खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**ब)** त्याचप्रमाणे तक्त्यात नमूद केलेले अ.क्र.०५ व ०६ ची रानशेणी गोवरी व नारळ खरेदी विभागामार्फत ई-निविदा प्रक्रीयाद्वारे खरेदी करणेस व त्याकामी होणारे सर्व समावेशक खर्चास मान्यता असावी, ही विनंती.

तरी उपरोक्त अ) व ब) मध्ये नमूद केल्याप्रमाणे सदरहू प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०२०-२०२१ या वर्षाकरीता उपरोक्त् प्रस्तावात नमुद पावडर मार्बल मुर्ती व प्युअर मार्बल मुर्ती वगळता उर्वरीत फुटाणे प्रसाद, विडयाची पाने, व काशी पावडर अष्टगंध खरेदीकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणे तसेच व्दारकामाई धुनीकरीता रानशेणी गोवरी खरेदी करणेकामी व सत्यनारायण, अभिषेक, पुजेकरीता नारळ खरेदी करणेकामी खरेदी विभागामार्फत विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या सर्व समावेशक अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच पावडर मार्बल मुर्ती व प्युअर मार्बल मुर्ती खरेदीकामीचा स्वतंत्र प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर सादर करावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- मंदिर विभाग)**

---

**विषय नं.४६** **दर्शन/आरती पासेसचे देणगी शुल्कात वाढ करणेबाबत.**

**विषय नं.४७** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वार्ड/विभागाकरीता Indian कंपनीचे Instrument खरेदीकामी रु.११,२६,८३७/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

**विषय नं.४८** **श्री साईबाबा रुग्णालयातील CVTS OT I & II या विभागांकरीता Imported कंपनीचे Instrument खरेदीकामी रु.१,१२,०९,१५५/-चे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

**विषय नं.४९** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वार्ड/विभागांकरीता हॉस्पिटल व कार्यालयीन फर्निचर खरेदीकामी रु.१६,५४,०४६/-चे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

**विषय नं.५०** **संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु.७,०२,६१६/-मात्र आदा करणेस मंजुरी मिळणेबाबत.**

**विषय नं.५१** **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये डिसेंबर-२०१९ महिन्यात वैद्यकीय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.८८,६०,७६०/-ची नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.८५** **उपरोक्त विषय नंबर ४६ ते ५१ या विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.५२** **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयात ११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने कार्यरत परिचारक/परिचारीकांचा नेमणूक कराराचा कालावधी संपुष्टात येत असलेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम कलम २००४ तरतुद- कलम १३(४) मधील समितीस संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालविणेसाठी आणि या अधिनियमान्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिका-यांची (कार्यकारी अधिका-यांव्यतिरिक्त) व कर्मचा-याची नेमणूक करता येईल.

परंतु ज्या अधिका-याला किंवा कर्मचा-याला दरमहा दोन हजार रुपयांहून अधिक वेतन देण्यात येत असेल किंवा द्यावयाचे असेल, अशा कोणत्याही अधिका-यांची किंवा कर्मचा-याची नेमणूक, समितीकडून, असे पद राज्य शासनाने मान्य केलेल्या कर्मचारी आकृतीबंधानुसार मंजूर करण्यात येईपर्यंत केली जाणार नाही. आकृतीबंधातील अटी-शर्ती क्र. ३ –"सदर पदांवर नव्याने नियुक्ती करताना समितीने सदर पदाची आवश्यकता व

अर्हता याबाबत विस्तृत प्रसिद्धी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परीक्षा घेऊन नियुक्ती करावी.''तसेच अट शर्त क्र. ८ मध्ये ''समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पद्धतीने भरावी जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही'' असे नमुद आहे.

मंजुर आकृतीबंधामध्ये, कंत्राटी पध्दतीने भरावयाची पदे ११ महिन्यांच्या कराराने भरावी व कराराचे दरवर्षी नुतनीकरण करावे असे नमुद आहे.

व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.–

१) मा व्यवस्थापन समिती दि. ०८/१२/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र १०४९.- याकरीता व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष मा. श्री चंद्रशेखर कदम यांचे अध्यक्षतेखाली समिती सदस्य मा. श्री भाऊसाहेब वाकचौरे व मा श्री प्रताप भोसले यांची समिती तयार करणेत आली. या समितीने प्रस्तावित परिचारक/ परिचारीकांना मुदतवाढ देणे योग्य होईल का, याची शहानिशा करून त्याचा अहवाल व्यवस्थापन समितीसमोर सादर करावा, असे ठरले.

२) मा व्यवस्थापन समिती दि. ०२/०२/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र १२८.- प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

३) मा व्यवस्थापन समिती दि. ०७/०३/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र १३९.- दिनांक ०२/०२/२०१८ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करत असताना खालीलप्रमाणे दुरूस्त्या करण्यात आल्या, त्यास मान्यता देण्यात आली.

(१) निर्णय क्र. १२८- यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.

प्रस्तावित ११ परिचारक/ परिचारीकांना सध्या रू. १५,४००/- मात्र प्रतिमहा एकत्रित वेतनावर बाह्ययंत्रणेद्वारे नेमणूक देण्यात यावी. त्याचबरोबर सदरहू परिचारक / परिचारीका यांना पुर्वीप्रमाणे ११ महिने कालावधीसाठी नेमणूक देणेकामी शासनाचे मार्गदर्शन घेण्यासाठी प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.

४) मा व्यवस्थापन समिती दि. ०४/०४/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र २२५ (२५).- श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पिटलमध्ये ११-११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेल्या ११ परिचारक / परिचारीका यांना दिनांक ०२.०२.२०१८ रोजीचे व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र १२८ अन्वये बाह्ययंत्रणेद्वारे नेमणूक देणेबाबत ठरलेले आहे. परंतु आता, ज्या शासन निर्णयाचे अनुशंगाने निर्णय क्र १२८ घेण्यात आला, त्या शासन निर्णयास स्थगिती मिळालेली आहे. त्यामुळे सदरहू परिचारक / परिचारीका यांना पुर्वीप्रमाणेच ११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने नेमणूक देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

५) मा व्यवस्थापन समिती दि. ०४/०७/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र ३३६.- यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावात नमुद परिचारीकांचा ११ महिने नेमणूकीचा कालावधी संपुष्टात आल्यापासुन ०४ दिवस ब्रेक देऊन या औद्योगिक न्यायालय अहमदनगर यांचे दि. ३०/०३/२०१९ रोजीचे आदेशास अनुसरून ११ महिने कालावधीकरीता याआधी नेमणूका केलेल्या परिचारीकांकडून दि. ०७/०८/२००९ रोजीचे शासन निर्णयामध्ये नमुद केलेनुसार कराराचे नुतनीकरण करणेस मान्यता देण्यात आली.

प्रस्तावना- श्री साईबाबा संस्थानचे श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयात ११ महिने कालावधीसाठी तात्पुरत्या नेमणूका दिलेल्या परिचारक / परिचारीकांचा नेमणूक कालावधी डिसेंबर २०१७ ते जुन २०१८ या कालावधीत टप्पा-टप्प्याने संपुष्टात येत असल्याने त्यांना पुन्हा नव्याने ११ महिने कालावधीसाठी अथवा आरक्षित वर्गासाठी उमेदवार उपलब्ध होईपावेतो यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत तात्पुरत्या स्वरूपात नेमणूका देणेबाबत निर्णय घेणेकरीता प्रस्ताव दि. ०८/१२/२०१७ रोजीचे मा व्यवस्थापन समिती सभेसमोर सादर करणेत आला होता त्यावर निर्णय क्र १०४९ नुसार, याकरीता व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष मा. श्री चंद्रशेखर कदम यांचे अध्यक्षतेखाली समिती सदस्य मा. श्री भाऊसाहेब वाकचौरे व मा श्री प्रताप भोसले यांची समिती तयार करणेत आली. या समितीने प्रस्तावित परिचारक/ परिचारीकांना मुदतवाढ देणे योग्य होईल का, याची शहानिशा करून त्याचा अहवाल व्यवस्थापन समितीसमोर सादर करावा, असे ठरले.

प्रस्तावातील नमुद ११ महिने कालावधीकरीता कार्यरत परिचारीका यांनी दि. १९/०१/२०१८ रोजीचे पत्रान्वये, आपण सांगितल्याप्रमाणे आम्ही आमची कोर्ट केस मागे घेतलेली असुन केस withdrawal copy सोबत जोडत आहेत. तरी आम्हाला ११ महिने ब्रेकनंतर पुन्हा duty Rejoin करून घेण्यात यावे, असे कळविले होते.

तदनंतर, मा व्यवस्थापन समिती दि. ०२/०२/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र १२८ अन्वये प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

तदनंतर मा व्यवस्थापन समिती दि. ०७/०३/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र १३९ अन्वये, दिनांक ०२/०२/२०१८ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करत असताना खालीलप्रमाणे दुरूस्त्या करण्यात आल्या, त्यास मान्यता देण्यात आली.

(१) निर्णय क्र. १२८- यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली

याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.

प्रस्तावित ११ परिचारक/ परिचारीकांना सध्या रू. १५,४००/- मात्र प्रतिमहा एकत्रित वेतनावर बाह्ययंत्रणेद्वारे नेमणूक देण्यात यावी. त्याचबरोबर सदरहू परिचारक / परिचारीका यांना पुर्वीप्रमाणे ११ महिने कालावधीसाठी नेमणूक देणेकामी शासनाचे मार्गदर्शन घेण्यासाठी प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.

तदनंतर, मा व्यवस्थापन समिती दि. ०४/०४/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र २२५ (२५) अन्वये, श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पिटलमध्ये ११-११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेल्या ११ परिचारक / परिचारीका यांना दिनांक ०२.०२.२०१८ रोजीचे व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र १२८ अन्वये बाह्ययंत्रणेद्वारे नेमणूक देणेबाबत ठरलेले आहे. परंतु आता, ज्या शासन निर्णयाचे अनुशंगाने निर्णय क्र १२८ घेण्यात आला, त्या शासन निर्णयास स्थगिती मिळालेली आहे. त्यामुळे सदरहू परिचारक / परिचारीका यांना पुर्वीप्रमाणेच ११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने नेमणूक देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

उपरोक्त निर्णयास अनुसरून श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयातील एकुण ११ परिचारक / परिचारीकांपैकी १० परिचारीकांकडून ११ महिने कालावधीसाठी नेमणूक देतेवेळी ॲफीडेव्हीट करून घेतलेले आहे. कु आशुमती संपत सदाफुले ह्या नेमणूक आदेशातील अटी-शर्ती नुसार १५ दिवसाचे आत कामावर हजर न झाल्याने त्यांचा नेमणूक आदेश संपुष्टात आलेला आहे. तदनंतर त्यांनी कामावर हजर करून घेणेसाठी संस्थानविरोधात औद्योगिक न्यायालय अहमदनगर येथे कोर्टकेस दाखल केलेली असुन सदर केसचे कामकाज संस्थानमार्फत ॲड अशोक पाटील हे पहात आहे.

उपरोक्त परीचारक/परीचारीका यांचा ११ महिने नेमणूक कालावधी संपुष्टात येत असल्याने त्यांचे कामकाजाबाबतचा अहवाल प्र वैद्यकीय संचालक व प्र वैद्यकीय अधिक्षीका यांनी समाधानकारक असल्याचे कळविलेले होते.

उपरोक्त १० अस्थायी (११ महिने कालावधीसाठी) परिचारक/परिचारीका यांनी संस्थानविरोधात तक्रार युएलपी क्रमांक ४१-५०/२०१८ औद्यागिक न्यायालय, अहमदनगर येथे दाखल केलेली असुन सदर केसचे कामकाज संस्थानमार्फत ॲड अशोक पाटील, अहमदनगर हे पहात आहेत.

सदर कोर्ट केसमध्ये परिचारक/परिचारीका यांनी खालीलप्रमाणे मागणी केलेली आहे.

मा. न्यायालयास तक्रारदारातर्फे नम्र प्रार्थना की,

अ) जाब देणार यांनी तक्रादाराबाबत तक्रारीत नमुद केलेल्या अनुचीत कामगार प्रथांचा अवलंब केल्याचे जाहीर करुन त्या बेकायदेशीर अयोग्य असुन त्या रद्द करण्याचे आदेश जाब देणार यांना व्हावेत.

ब) तक्रारदारास समान कामास समान मोबदला तत्वाने प्रथम नेमणूकीपासुन दिलेले वेतन व देय वेतन व फायदे फरकासहीत अदा करण्याचे आदेश जाब देणार यांना व्हावेत.

क) तक्रारदारास प्रथम नेमणुकीपासुन किंवा २४० दिवस सेवेपासुन किंवा योग्य त्या काळापासुन परिचारीका म्हणून कायम करुन सर्व फायदे फरकासहीत अदा करण्याचे आदेश जाब देणार यांना व्हावेत.

ड) तक्रारदारास सध्याचे नेमणुकपत्र देताना घेण्यात आलेला करार हा बेकायदेशीर असल्याचे जाहिर करावे.

इ) सोबतच्या अंतरीम आदेश अर्जातील बाबी कायम व्हाव्यात.

ई) इतर योग्य ते न्यायोचित आदेश तक्रारदाराच्या बाजुने व्हावेत.

तसेच त्यांनी अंतरीम आदेशास्तव अर्ज सादर केला असुन त्यात त्यांनी खालीलप्रमाणे मागणी केलेली आहे.

अ) तक्रारीच्या सुनावणीच्या काळात तक्रारदारास सेवेतून कमी न करण्याविषयक आदेश, सेवेत ठेवण्याचे आदेश जाब देणार यांना व्हावेत.

ब) तक्रारदारास समान कामास समान मोबदला तत्वाने कायम परिचारिका प्रमाणे मुळ वेतन, ग्रेड पे आणि

इतर वेतन देण्याचे आदेश जाब देणार यांना व्हावेत.

क) तक्रारीचे कामकाज तक्रारीचे स्वरुप पाहाता त्वरीत पुर्ण करण्याविषयक आदेश व्हावेत.

ड) इतर योग्य ते न्यायोचित आदेश तक्रारदाराच्या बाजुने व्हावेत.

यावर मा. औद्योगिक न्यायालय, अहमदनगर यांनी दि. १८/०६/२०१८ रोजी खालीलप्रमाणे आदेश दिले आहेत.

Perused the applications for dispensing with the notice Under Rule 115 and other papers. Heard Mr. Modgekar Advocate. The Complainants are stated to be in the employment for years and were services are likely to be terminated. Issue show cause notice returnable on 22-06-2018. Till then only the services of the complainants was not be terminated except by following due process of law.

तदनंतर, उपरोक्त परिचारीका यांनी मा औद्योगिक न्यायालय अहमदनगर येथे दाखल केलेल्या तक्रार युएलपी क्र ४१/२०१८ ते क्र ५०/२०१८ यावर मा न्यायालयाने दि. ३०/०३/२०१९ रोजी EXH U2 वर खालीलप्रमाणे आदेश दिलेला आहे.

1. Application Exh.U-2 is partly allowed.
2. Respondent is directed not to terminate service of complainant without following due process of law till disposal of complaint.
3. Respondent is directed to Renew contractual agreement of complainant strictly as per rules and regularations of Government Resolution dated 7 August 2009 till disposal of main complaint.

मा न्यायालयाचे उपरोक्त दि. ३०/०३/२०१९ रोजीचे आदेशास अनुसरून याआधी नेमणूका केलेल्या प्रस्तावातील १० परिचारक / परिचारीकांकडून दि. ०७/०८/२००९ रोजीचे शासन निर्णयामध्ये नमुद केलेनुसार कराराचे नुतनीकरण करणेबाबतचा प्रस्ताव दि. ०४/०७/२०१९ रोजीचे मा व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करणेत आला होता त्यावर निर्णय क्र ३३६ खालीलप्रमाणे झाला आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावात नमुद परिचारीकांचा ११ महिने नेमणूकीचा कालावधी संपुष्टात आल्यापासुन ०४ दिवस ब्रेक देऊन या औद्योगिक न्यायालय अहमदनगर यांचे दि. ३०/०३/२०१९ रोजीचे आदेशास अनुसरून ११ महिने कालावधीकरीता याआधी नेमणूका केलेल्या परिचारीकांकडून दि. ०७/०८/२००९ रोजीचे शासन निर्णयामध्ये नमुद केलेनुसार कराराचे नुतनीकरण करणेस मान्यता देण्यात आली.

मा व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयातील १० परिचारीकांकडून खालीलप्रमाणे ११ महिने कालावधीसाठी दि. २४/०७/२०१९ रोजी करारनामा करून घेतलेला आहे.

तक्ता क्र ०१

| अ नं | परिचारक / परिचारीकांचे नाव | कामावर हजर तारीख | नेमणूक संपुष्टात येत असल्याची तारीख |
|---|---|---|---|
| १ | कु मनिषा स्टिफन आवारे | ०७/०४/२०१९ | ०६/०३/२०२० |
| २ | श्रीमती वैशाली भगवान महागडे | ०७/०४/२०१९ | ०६/०३/२०२० |
| ३ | श्री आशिष शरद सुर्यवंशी | ०७/०४/२०१९ | ०६/०३/२०२० |
| ४ | सौ आशा रमेश जगताप | ०७/०४/२०१९ | ०६/०३/२०२० |
| ५ | कु प्रतिमा रामचंद्र कोळगे | ०७/०४/२०१९ | ०६/०३/२०२० |
| ६ | श्री राहुल प्रकाश आहोळ | ०७/०४/२०१९ | ०६/०३/२०२० |
| ७ | कु प्राजक्ता दिपक जाधव | ०७/०४/२०१९ | ०६/०३/२०२० |
| ८ | श्रीमती कावेरी सुदाम म्हस्के | ०७/०४/२०१९ | ०६/०३/२०२० |
| ९ | सौ रूथ निलेश श्रीवास्तव | ०७/०४/२०१९ | ०६/०३/२०२० |
| १० | कु कविता योसेफ पंडीत | ०९/०४/२०१९ | ०८/०३/२०२० |

उपरोक्त परीचारक / परीचारीका यांचा ११ महिने करारनामा कालावधी संपुष्टात येत असल्याने त्यांचे कामकाजाबाबतचा अहवाल प्र वैद्यकीय संचालक व प्र वैद्यकीय अधिक्षीका यांनी दि. ०४/०१/२०२० व दि. ०२/०१/२०२० रोजीचे पत्रान्वये खालीलप्रमाणे कळविलेला आहे.

| अनं | नाव | अहवाल |
|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ |
| १ | कु मनिषा स्टिफन आवारे | त्यांची वर्तणुकही चांगली असुन ते हुकूमाप्रमाणे कामे करीत आहेत. त्यांची कामकाज समाधानकारक आहेत. |
| २ | श्रीमती वैशाली भगवान महागडे | त्यांची वर्तणुकही चांगली असुन ते हुकूमाप्रमाणे कामे करीत आहेत. त्यांची कामकाज समाधानकारक आहेत. |
| ३ | श्री आशिष शरद सुर्यवंशी | त्यांची वर्तणुकही चांगली असुन ते हुकूमाप्रमाणे कामे करीत आहेत. त्यांची कामकाज समाधानकारक आहेत. |
| ४ | सौ आशा रमेश जगताप | त्यांची वर्तणुकही चांगली असुन ते हुकूमाप्रमाणे कामे करीत आहेत. त्यांची कामकाज समाधानकारक आहेत. |
| ५ | कु प्रतिमा रामचंद्र कोळगे | त्यांची वर्तवणुक चांगली असुन ते हुकूमाप्रमाणे कामे करतात. त्यांचे बाबत काहीही प्रकरणे चालु अथवा प्रस्तावीत नाही. त्यांना नियमाप्रमाणे मुदतवाढ देणेस हरकत नाही. |
| ६ | श्री राहुल प्रकाश आहोळ | त्यांची वर्तणुकही चांगली असुन ते हुकूमाप्रमाणे कामे करीत आहेत. त्यांची कामकाज समाधानकारक आहेत. |
| ७ | कु प्राजक्ता दिपक जाधव | त्यांची वर्तणुकही चांगली असुन ते हुकूमाप्रमाणे कामे करीत आहेत. त्यांची कामकाज समाधानकारक आहेत. |
| ८ | श्रीमती कावेरी सुदाम म्हस्के | त्यांची वर्तवणुक चांगली असुन ते हुकूमाप्रमाणे कामे करतात. त्यांचे बाबत काहीही प्रकरणे चालु अथवा प्रस्तावीत नाही. त्यांना नियमाप्रमाणे मुदतवाढ देणेस हरकत नाही. |
| ९ | सौ रूथ निलेश श्रीवास्तव | त्यांची वर्तणुकही चांगली असुन ते हुकूमाप्रमाणे कामे करीत आहेत. त्यांची कामकाज समाधानकारक आहेत. |
| १० | कु कविता योसेफ पंडीत | त्यांची वर्तणुकही चांगली असुन ते हुकूमाप्रमाणे कामे करीत आहेत. त्यांची कामकाज समाधानकारक आहेत. |

श्री साईबाबा संस्थान रूग्णालयाकरीता सन २००९ चे मंजुर आकृतीबंधानुसार परिचारक / परिचारीका ची मंजुर पदसंख्या व सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

तक्ता क्र ०२

| अनं | रूग्णालय | मंजुर पदे | | | एकुण | भरलेली पदे | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | स्थायी | कंत्राटी | काल्पनिक पदे (११ महिनेसाठी) | | स्थायी | अस्थायी (११ महिने) | काल्पनिक पदे(११ महिनेसाठी) | आऊटसोर्सिंग / बाह्ययंत्रणेद्वारे | एकुण |
| **०१** | ०२ | **०३** | ०४ | ०५ | **०६** | **०७** | **०८** | **०९** | **१०** | **११** |
| १ | साईबाबा | १६० | ४० | ०० | २०० | १०१ | ०८ | ०० | ८४ | १९३ |
| २ | साईनाथ | १०२ | २५ | २५ | १५२ | ५२ | ०२ | २५ | ५८ | १३७ |
| | **एकूण** | **२६२** | **६५** | **२५** | **३५२** | **१५३** | **१०** | **२५** | **१४२** | **३३०** |

संस्थान अधिनियम/ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करून अनुमान- प्रति कर्मचारी एकत्रित मासिक वेतन रू. १५,४००/- याप्रमाणे रू. १,५४,०००/-.

विभागाचा अभिप्राय- उपरोक्त १० अस्थायी (११ महिने कालावधीसाठी) परिचारक / परिचारीका यांनी संस्थानविरोधात दाखल केलेल्या तक्रार युएलपी क्रमांक ४१-५०/२०१८ औद्यागिक न्यायालय, अहमदनगर येथे प्रलंबित आहे. मा न्यायालयाने दि. ३०/०३/२०१९ रोजी दि. ०७/०८/२००९ रोजीचे शासन निर्णयामध्ये नमुद केलेनुसार कराराचे नुतनीकरण करणेबाबत अंतरीम आदेश दिलेले आहेत.

शासन निर्णय क्र सासंवि-२००९/४३३/३७/०९ का सोळा दि. ०७/०८/२००९ मध्ये कंत्राटी पध्दतीने भरावयाची पदे ११ महिनेचे कराराने भरावी व कराराचे दरवर्षी नुतनीकरण करावे असे नमुद आहे.

तरी, प्रस्तावातील नमुद परिचारीकांचा ११ महिनेचा कराराचा कालावधी (तक्ता क्र १ स्तंभ क्र ४ मध्ये दर्शविलेल्या तारखेअखेर) संपुष्टात आल्याचे लगतचे दिनांकापासुन ०४ दिवस ब्रेक देऊन पुन्हा ११ महिने कालावधीसाठी सध्याचेच वेतनावर नव्याने करारनामा करता येईल, असे नम्र मत आहे.

निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.८६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयात ११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने कार्यरत परिचारक/परिचारीका उपरोक्त प्रस्तावातील तक्ता क्र.१ मधील अ.नं.१ ते ९ यांचा नेमणूक कराराचा कालावधी दि.०६.०३.२०२० रोजी संपत असल्याने त्यांना दि.११.०३.२०२० पासून पुन्हा ११ महिने कालावधीसाठी व अ.नं.१० कविता योसेफ पंडीत यांचा नेमणूक कालावधी दि.०८.०३.२०२० रोजी संपत असल्याने त्यांना दि.१३.०३.२०२० पासून पुन्हा ११ महिने कालावधीसाठी सध्याचेच वेतनावर नव्याने करारनामा करुन घेण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**यानंतर आजचे तदर्थ (Ad-hoc) समिती सभेमध्ये आयत्या वेळी खालील विषयांवर निर्णय घेण्यात आले.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१** **ऐतिहासिक वस्तु,शस्त्रास्त्रे,कलादालन व प्रदर्शन मांडण्यासाठी वापरास दिलेल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीची मौजे निमगाव-को-हाळे,ता.राहाता येथील साईप्रसादालय इमारतीतील जागा वापराची पुढील मुदतवाढ संबंधातील मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्रं.५१० बाबत श्री.अभिजित देविदास शिंदे,रा.श्रीरामपुर यांचा दि.२५/०१/२०२० रोजीचा अर्ज व सार्वजनिक बांधकाम विभाग,संगमनेर यांचेकडील भाडे प्रमाणपत्र दि.२७/१२/२०१९.**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतूद - श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

प्रस्तावना- श्री.अभिजित देविदास शिंदे यांचे यापूर्वीचे दि.१४/१०/२०१९ रोजीच्या अर्जास अनुसरुन मा.कार्यासन अधिकारी, विधी व न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई यांचेकडील पत्र जा.क्रं.सासंवि-१०१६/८४०/ प्र.क्र.११०/का.१६ दि.२२/१०/२०१८ रोजीच्या पत्राचे अनुषंगाने ऐतिहासिक वस्तु,शस्त्रास्त्रे, कलादालन व प्रदर्शन मांडण्याकरीता श्री.अभिजित देविदास शिंदे, रा.श्रीरामपूर यांना वापरास दिलेल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे मौजे निमगाव-को-हाळे, ता.राहाता येथील गट नं.८० व ८५ पै. यामधील साईप्रसादालय इमारतीतील पहिल्या मजल्यावरील आय.टी.विभागाशेजारी असलेला हॉल अंदाजे रुंदी दक्षिणोत्तर ६० फुट व लांबी पूर्व-पश्चिम १२० फुट याचे साधारणत: क्षेत्रफळ ७२०० चौ.फुट या जागेच्या वापराची तिसरी मुदतवाढ दि.०१/११/२०१९ ते दि.३०/०९/२०२० या ११ महिने कालावधीसाठी, यापूर्वीची मासिक भाडेदराची रक्कम रु.१२,१००/- मध्ये १०% वाढ करुन म्हणजेच रक्कम रु.१२,१००/-+ रु.१,२१०/- अशी एकुण रक्कम रु.१३,३१०/- इतकी आकारुन व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन मुदतवाढ देणेच्या व यापूर्वी प्रमाणेच लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा करुन घेणेच्या निर्णयार्थचा प्रस्ताव संस्थानचे मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४/१२/२०१९ रोजीचे सभेपुढे सादर करणेत आला. त्यात निर्णय क्रं.५१० प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन, तसेच सर्व वाचन केले व ऐकले असता असे दिसून येते की,सदरचे प्रदर्शन पाहण्यासाठी प्रवेश शुल्क आकारण्यात येते. याचा अर्थ असा की, नाममात्र शुल्कावर दिलेल्या इमारतीचा उपयोग वाणिज्यीक कारणासाठी केला जातो. येथे नमुद करावेसे वाटते की,शासनाने जा.क्रं.सासंवि-१०१६/८४०/प्र.क्र.११०/का.१६ दि.२२/१०/२०१८ चे पत्रान्वये खालील अटी शर्तीवर परवानगी दिलेली होती.

अ) प्रत्येक वेळी लिव्ह ॲण्ड लायसन्स करार करतांना मागील वर्षाच्या भाडयात १०% वाढ करण्यात यावी.

ब) या कलादालनात व प्रदर्शनात ठेवण्यात आलेल्या वस्तू या शिवकालीन व पुरातन असल्याचा उल्लेख करारनाम्यात करण्यात येणार नाही.

क) कोणत्याही व्यक्तीने या कलादालनात प्रदर्शनासाठी ठेवलेल्या वस्तू या शिवकालीन किंवा पुरातन नाहीत याबाबत घेतलेल्या कोणत्याही आक्षेपा संदर्भात फक्त लायसेन्सी हेच जबाबदार असतील.

ड) सदर कलादालन/प्रदर्शनामुळे भविष्यात काही कायदेविषयक बाबी किंवा अन्य कारणास्तव होणा-या नुकसानीची,खर्चाची संपूर्ण भरपाई लायसेन्सीने संस्थानला करुन देणे आवश्यक राहील.

शासनाचे जा.क्रं.सासंवि-१०१६/८४०/प्र.क्र.११०/का.१६ दि.२२/१०/२०१८ चे पत्र समितीच्या निदर्शनास आणून दिले. जर ११ महिन्याच्या Licence प्रमाणे पुढील दहा वर्ष मुदतवाढ सदर पत्राद्वारे दिली तर ती श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) चे उल्लंघन होणारे ठरेल व तसे करणे हे कायद्याच्या कलमांशी प्रतारणा करणारे ठरेल,असे समितीला वाटते.

सदरची इमारत श्री साई मंदिरापासून १ किमी. अंतरावर आहे. समितीने सर्व बाबींचा साकल्यपुर्ण विचार केला. सदरची जागा ही ७२०० चौ.फुट आहे व त्याचा वाणिज्यिक वापर दिसून येतो. अशा परिस्थितीत सदरची जागा नाममात्र शुल्कावर पुढील कालावधीसाठी देणे संस्थानच्या आर्थिक हिताच्या आड येण्याची शक्यता आहे,असे वाटते. अशा परिस्थितीत सदरच्या कराराची मुदत ऑक्टोबर २०१९ मध्ये संपलेली असल्याने श्री.शिंदे यांना लगेचच जागा खाली करा असे सांगणे उचित होणार नाही. करिता समिती सर्वानुमते असा निर्णय घेते की,

१) श्री.शिंदे यांचेकडून नोव्हेंबर २०१९ पासून ३१ मार्च २०२० पर्यंत पाचपट जास्त म्हणजेच दरमहा रक्कम रु.६०,५००/- मात्र (१२,१००x५) व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे असे शुल्क आकारण्यात येईल व असे शुल्क देण्यास ते तयार आहेत का? अशी विचारणा त्यांचेकडे करावी व त्यांनी त्यास तयारी दर्शविल्यास ३१ मार्च २०२० पर्यंत मुदतवाढ दरमहा रक्कम रु.६०,५००/- मात्र व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे या शुल्कावर द्यावी व पुढील कार्यवाही करावी.

२) सदर जागेचा सध्यस्थितीतील वाणिज्यीक वापरासाठीचा बाजारातील दर किती आहे याची पडताळणी संबंधीत विभागाकडून करावी व तसा अहवाल समितीला सादर करावा. त्यानंतर योग्य तो निर्णय समिती घेईल.

३) श्री.शिंदे यांना वरील क्रं.१ मधील नमुद बाब मान्य नसल्यास डिसेंबर २०१९ अखेर सदरची जागा खाली करण्यासाठी नोटीस श्री.शिंदे यांना द्यावी व सदरची जागा खाली करुन घेण्याची कारवाई करावी,असे सर्वानुमते ठरले.

उपरोक्त निर्णयाप्रमाणे श्री.अभिजित देविदास शिंदे यांना इकडील पत्र जा.नं.एसएसएसटी/ मालमत्ता/ ३७५८/२०१९ दि.२६/१२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये "सदर निर्णयात नमुद केलेप्रमाणे उक्त मिळकत वापरासाठीचे भाडे माहे नोव्हेंबर २०१९ पासून ते ३१ मार्च २०२० पर्यंत पाचपट म्हणजेच दरमहा रक्कम रु.६०,५००/- मात्र (१२,१००x५) व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे असे शुल्क आकारण्यात येत आहे. हे आपणास मान्य आहे किंवा कसे? याबाबत इकडेस दोन दिवसात खुलासा सादर करावा.सदरची बाब आपणास मान्य नसल्यास ऐतिहासिक वस्तु,शस्त्रास्त्रे,कलादालन व प्रदर्शन मांडण्यासाठी आपणास वापरास दिलेल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे उक्त मौजे निमगाव-को-हाळे,ता.राहाता येथील साई प्रसादालय इमारतीतील जागा दि.३१ डिसेंबर २०१९ अखेर खाली करुन देणेत यावी." असेबाबत कळविणेत आलेले आहे.

तदनुषंगाने श्री.अभिजित देविदास शिंदे यांनी त्यांचेकडील उपरोक्त दि.२८/१२/२०१९ रोजीच्या अर्जान्वये "आपण शिवसृष्टीच्या वापरासाठी दिलेल्या साईप्रसादालयाच्या इमारतीतील जागेच्या संदर्भात दिलेल्या पत्रान्वये आमचे म्हणणे सादर करणेकामी दोन दिवसाची मुदत दिलेली आहे. मात्र सध्या नवीन वर्षानिमित्त शिर्डी येथे असलेली भाविकांची गर्दी विचारात घेता तसेच शिवसृष्टी संग्रहालयाचे सामाजिक,धार्मिक,ऐतिहासिक महत्व लक्षात घेवून याबाबत खुलासा देणेकामी किमान एक महिना मुदत मिळावी,"असेबाबत इकडेस विनंती केलेली आहे.

सदरचा अर्ज मा.तदर्थ समितीचे होणा-या सभेपुढे अवलोकनार्थ सादर करणेत आलेला आहे.

दरम्यानचे काळात श्री.अभिजित देविदास शिंदे यांनी उपरोक्त दि.०४/१२/२०१९ रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.५१० चे अनुषंगाने त्यांना दिलेल्या उपरोक्त दि.२६/१२/२०१९ रोजीच्या नोटीसचे अनुषंगाने दि.२५/०१/२०२० रोजीचे अर्जान्वये खालीलप्रमाणे खुलासा सादर केलेला आहे.

"आपण दिलेल्या दि.२६/१२/२०१९ चे पत्र मिळाले. मजकुर समजला. आपण दिलेल्या पत्राचा आम्ही आदर राखतो. ऐतिहासिक वस्तु शस्त्रास्त्रे कलादालन शिवसृष्टी संग्रहालय यामधून शिवछत्रपती यांचे कार्याचा प्रचार आणि प्रसार जगासमोर करणेसाठी जो नाममात्र सेवाशुल्क आकारुन (रु.१०/-) तसेच शिवछत्रपती यांचेबाबत पुस्तके ऐतिहासिक वस्तु प्रतिकृती यांची ना नफा ना तोटा तत्वावर विक्री करुन (सेवा देणेकामी होणारा खर्च भागवणेसाठी) हे ऐतिहासिक शस्त्र संग्रहालय चालवित आहोत. याचा कुठलाही वाणिज्यिक वापर आम्ही करत नाही. हे आम्ही विश्वासपुर्वक सांगू इच्छितो. महाराष्ट्र शासन यांचे पुरातत्व व वस्तु संग्रहालये संचालनालय यांची शिवसृष्टी संग्रहालयाला मान्यता मिळालेली आहे. त्याची प्रत सोबत जोडत आहे. श्री साईंचे दर्शनासाठी येणा-या शालेय विद्यार्थ्यांसाठी विशेष सवलत देतो. त्यांना या संग्रहालयातून नक्कीच प्रेरणा भेटते. तसेच दिव्यांग, अपंग लोक भारतीय सेनेमधील सैनिक,लहान मुले या मोफत सेवेचा लाभ आपण देतो. सदर ऐतिहासिक शस्त्र संग्रहालयात ३५ कर्मचारी यांचे मानधन + विजेचे बील + जागा भाडे + ऐतिहासिक शस्त्र यांची देखभाल + इतर मेंटेनन्स करणेकामी येणारा खर्च आम्ही ऐतिहासिक शस्त्र संग्रहालय प्रवेश फी तसेच वस्तु विक्रीतून भागवतो. तसेच या सर्व बाबींची कल्पना शिवसृष्टीचा प्रस्ताव सादर केल्यावर मा.श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांनी मान्यता दिलेली आहे. संग्रहालय पाहण्यास येणारे जगभरातील सर्व जाती धर्माचे साईबाबांचे भाविक तसेच इतिहास प्रेमी व शिवप्रेमी भाविक येतात,असे मी नम्रपणे या ठिकाणी नमुद करतो. आम्हाला या कामामध्ये कोणतीही शासकीय आर्थिक मदत तसेच अनुदान मिळत नसल्याने व मा.श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांनी दाखवलेल्या धारीष्टया व कृपेमुळेच आम्ही छत्रपती शिवाजी महाराज यांचा कार्याचा प्रचार व प्रसार जगासमोर मांडू शकलो व मांडत आहे. याचा एक प्रकारे पर्यटन वाढीसाठी देखील मदत होत आहे. सदर संग्रहालयाचे ऐतिहासिक, सामाजिक व शैक्षणिक महत्व देखील आहे. वरील सर्व बाबींचा विचार करुन आपले दि.२६/१२/२०१९ चे पत्रानुसार आपण जो मार्च २०२० पर्यंतचा जो भाडे वाढचा निर्णय घ्याल तो मान्य असेल. आपण या संग्रहालयाचे ऐतिहासिक,सामाजिक व शैक्षणिक महत्व लक्षात घेवून योग्य तो निर्णय घ्याल,अशी आशा मी बाळगतो," असेबाबत खुलासा केलेला आहे.

तसेच मा.तदर्थ समितीचे दि.०४/१२/२०१९ रोजीच्या सभेतील उपरोक्त निर्णय क्रं.५१० मधील उत्तरार्धात अ.क्रं.२ वर "सदर जागेचा सध्यस्थितीतील वाणिज्यिक वापरासाठीचा बाजारातील दर किती आहे याची पडताळणी संबंधीत विभागाकडून करावी व तसा अहवाल समितीला सादर करावा. त्यानंतर योग्य तो निर्णय समिती घेईल," असेबाबत निर्णय घेणेत आलेला आहे. तदनुषंगाने उक्त जागेचे वाणिज्यिक प्रयोजनासाठीचे मासिक भाडेदराचे प्रमाणपत्र मा.कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,संगमनेर यांचेकडून प्राप्त करुन घेतले असून मा.कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर यांनी त्यांचेकडील दि.२७/१२/२०१९ रोजीचे डिजिटल भाडे प्रमाणपत्र निर्गत केलेले आहे. तदनुसार उक्त जागेचे मासिक भाडे रक्कम रु.८८,०२२/- (अक्षरी रु.अठ्ठयांऐंशी हजार बावीस मात्र) इतके निश्चित केलेले आहे.

विभागाचा अभिप्राय– श्री.अभिजित देविदास शिंदे यांचा उपरोक्त दि.२५/०१/२०२० रोजीचा खुलासा अर्ज मा.तदर्थ समितीचे सभेपुढे अवलोकनार्थ सादर करता येईल.

तसेच उपरोक्त निर्णय क्रं.५१० चे अनुषंगाने उक्त जागेचे सार्वजनिक बांधकाम विभाग,संगमनेर यांचे कार्यालयाकडून प्राप्त झालेले दि.२७/१२/२०१९ रोजीचे डिजिटल भाडे प्रमाणपत्र मा.तदर्थ समितीचे सभेपुढे अवलोकनार्थ सादर करता येईल.

प्रस्ताव– श्री.अभिजित देविदास शिंदे,रा.श्रीरामपुर यांचा उपरोक्त दि.२५/०१/२०२० रोजीचा खुलासा अर्ज तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग,संगमनेर यांचेकडून प्राप्त झालेले दि.२७/१२/२०१९ रोजीचे डिजिटर भाडे प्रमाणपत्र अवलोकनार्थ सादर.

**निर्णय क्र.८७** **यावर सविस्तर चर्चा झाली, प्रस्तुत प्रकरणी मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे दि.०४.१२.२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५१० अन्वये श्री.शिंदे यांचेकडून नोव्हेंबर २०१९ पासून ३१ मार्च २०२० पर्यंत पाचपट जास्त म्हणजेच दरमहा रक्कम रु.६०,५००/- मात्र (१२,१००x५) व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे असे शुल्क आकारण्यात यावे, तसेच सदर जागेचा सध्यस्थितीतील वाणिज्यिक वापरासाठीचा बाजारातील दर किती आहे याची पडताळणी संबंधीत विभागाकडून करावी व तसा अहवाल समितीला सादर करावा, असा निर्णय झालेला आहे. सदर निर्णयाबाबत श्री.शिंदे यांना दि.२६.१२.२०१९ रोजी पत्र देण्यात आले होते. यावर श्री.शिंदे यांनी दि.२५.०१.२०२० रोजीचे पत्रान्वये मा.तदर्थ (Ad-hoc) समिती जो निर्णय घेईल तो मान्य असेल असे कळविले आहे.**

**सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी सदरहु जागेबाबत दि.२२.०१.२०२० रोजी दिलेल्या मासिक भाडेदराचे प्रमाणपत्रानुसार रक्कम रु.८८,०२२/- इतके दर निश्चीत केले आहे. मालमत्ता विभागाचे प्रशासकिय अधिकारी श्री.किसवे यांनी समितीचे असे निदर्शनास आणून दिले की, सदरची जागा श्रींचे मंदिरापासून १ कि.मी.अतंरावर श्री साई प्रसादालयाचे इमारतीमध्ये आहे, व सद्यस्थितीत सदरहु जागेचा बाजाराभावाप्रमाणे वाणिज्यीक वापराचा दर रु.१ लाख पेक्षा जास्त असण्याची शक्यता आहे.**

**अशा सर्व परिस्थीतीत मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे दि.०४.१२.२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५१० याव्दारे रद्द करण्यात येत आहे, व श्री.शिंदे यांना मान्य असल्यास दि.०१ मार्च, २०२० पासून पुढील ११ महिने कालावधीसाठी म्हणजे दि.३१ जानेवारी,२०२१ पर्यंत दरमहा रक्कम रु.१,००,०००/-मात्र परवाना शुल्क ॲडव्हान्समध्ये संस्थानकडे जमा करणेच्या व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे या अटीवर सदरची जागा वापरास देत असल्याचे व याबाबत आपली अनुमती दि.१५ फेब्रुवारी,२०२० चे आत कळवावी असे श्री.शिंदे यांना कळविण्यात यावे. श्री.शिंदे यांची संमती असल्यास पुढील कार्यवाही करण्यात यावी. तसेच श्री.शिंदे यांची संमती न आल्यास दि.२९ फेब्रुवारी,२०२० पर्यंत सदरची जागा खाली करुन घेण्यात यावी, असे ठरले.**

**(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०२**
**निर्णय क्र.८८**

**मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सदस्य तथा अतिरिक्त महसूल आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांनी सभेत मुद्दा उपस्थित केला की, मा. प्रमुख जिल्हा न्यायाधिश, अहमदनगर तथा सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती यांनी तदर्थ (Ad-hoc) समितीचे सदस्य तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी दि.०४.०१.२०२० चे दैनिक लोकसत्ता या वर्तमानपत्रामध्ये ५८८ कंत्राटी कामगारांना संस्थान सेवेत सामाऊन घेऊन नियमित नेमणूक आदेश दिल्याबाबतचे जे वृत्त प्रसिध्द झाले त्या विषयाचे संदर्भात दि.०६ जानेवारी,२०२० चे जे पत्र दिले त्याविषयी चर्चा करावी.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे बैठकीमध्ये सदरचे विषयासंबधी सविस्तर माहिती द्यावी,असे ठरले. सदरचा विषय दि.१५.०२.२०२०चे सभेच्या अजेंडयावर घेण्यात यावा.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

वरील निर्णय क्र.४६ ते ८८ सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर सायं.०६.४५ वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

स्वाक्षरीत/-
**(श्रीमती गिता पी.बनकर)**
**सहा.धर्मादाय आयुक्त,**
**अहमदनगर.**

स्वाक्षरीत/-
**(दिलीप स्वामी)**
**अप्पर महसुल विभागीय आयुक्त,**
**नाशिक**

स्वाक्षरीत/-
**(दीपक मुगळीकर,भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.**

स्वाक्षरीत/-
**(श्रीकांत एल.आणेकर)**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश,**
**अहमदनगर.**